स्त्री मुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा

म. ग्रं. सं. ठाणें.
विषय निबंध
सं. क्र. ३४८७७

# स्त्री अस्मितेचा आविष्कार : एकोणिसावे शतक

## मृणालिनी जोगळेकर

### भाग ३

### राबाई शिंदे
### जनाक्का शिंदे

REFBK-0026627

अहिल्याश्रम

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

चना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे,
केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे
र्गणी भरावी लागेल.

SEP 1992
10 OCT 1992
25 NOV 1992
NOV 1992
2 DEC 1992
JAN 1997

૨૭|૧૨|૯૯
25|3|2000

(क्र. मा. पहा)
२०००-१२-८८

संदर्भ
निबंध
३७५५
२६६२८
८।५।८२

तस ..
जादा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध
दा. क्र. 3866
26626
8/6/82
शाखा (स्थानक प्रत)

# स्त्रीअस्मितेचा आविष्कार

## एकोणिसावे शतक

भाग ३

ताराबाई शिंदे , जनाक्का शिंदे

अभ्यासमालिका

## स्त्रीमुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा

संपादिका : सुमा चिटणीस

निर्मिती : छाया दातार

**१. संत कवयित्री**

- इंदुमती शेवडे

**२. राज्यसत्तेच्या फटींमधून पेशवेकालीन स्त्रिया**

- नीलिमा भावे

**३. स्त्रीप्रश्नांची चर्चा : एकोणिसावे शतक**

- प्रतिभा रानडे

**४. स्त्रीअस्मितेचा आविष्कार : एकोणिसावे शतक**

भाग १ : पंडिता रमाबाई

भाग २ : रमाबाई रानडे

भाग ३ : ताराबाई शिंदे, जनाक्का शिंदे

- मृणालिनी जोगळेकर

**५. स्त्रीस्वातंत्र्यवादिनी : विसाव्या शतकातील परिवर्तन**

- विनया खडपेकर



जनाक्का शिंदे

स्त्रीमुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा

# स्त्रीअस्मितेचा आविष्कार

## एकोणिसावे शतक

भाग ३

ताराबाई शिंदे, जनाक्का शिंदे

मृणालिनी जोगळेकर

REFBK-0026627

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

स्त्रीअस्मितेचा आविष्कार
एकोणिसावे शतक
भाग ३ : ताराबाई शिंदे,
जनाक्का शिंदे
(म- ७६७)
पॉप्युलर प्रकाशन
ISBN 81- 7185- 600 - 4

STREEASMITECHA AVISHKAR
Ekonisave Shatak
Bhag 3 :Tarabai Shinde, Janakka Shinde
(Marathi : Social History)
Mrinalini Joglekar

© १९९१, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स

पहिली आवृत्ती : १९९१ / १९१३

अक्षरजुळणी
सौ. नूतन ढवळे
४२, तुळशीबागवाले कॉलनी
सहकारनगर, पुणे ४११००९.

मुद्रक
मारुती ऑफसेट
४३३, बुधवार पेठ
पुणे ४११००२.

प्रकाशक
रामदास भटकळ
पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.
३५ सी, पं. मालवीय मार्ग
ताडदेव, मुंबई ४०००३४.

यशापयशाचा विचार न करता
निष्काम कर्मयोग आचरण्याचा
आदर्श घालून देणाऱ्या
महर्षी शिंदे व जनाक्का शिंदे
या भावंडांस -

# अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| प्रस्तावना<br>- छाया दातार | नऊ |
| प्रास्ताविक | तेरा |

## ताराबाई शिंदे

| | |
|---|---|
| १. पार्श्वभूमी | १ ते ५ |
| २. ताराबाईंची भूमिका | ६ ते २२ |
| ३. ताराबाईंचे कर्तृत्व | २३ ते २९ |
| ४. ताराबाई - एक व्यक्ती | ३० ते ४२ |

## जनाक्का शिंदे

| | |
|---|---|
| प्रास्ताविक | ४३ ते ४४ |
| १. जडण घडण | ४५ ते ७९ |
| २. संन्यस्त कर्मयोगिनी | ८० ते १०९ |
| ३. जनाक्का - एक व्यक्ती | ११० ते १२४ |
| ४. समारोप | १२५ ते १३० |

# प्रस्तावना

'स्त्रीअस्मितेचा आविष्कार : एकोणिसावे शतक' या मृणालिनी जोगळेकरलिखित अभ्याससंचापैकी हे तिसरे व शेवटचे पुस्तक. 'स्त्रीमुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा' या मालिकेमध्ये एकोणिसाव्या शतकातील प्रमुख स्त्रीव्यक्तिरेखा आणि त्यांचा स्त्रीमुक्तीच्या दिशेने चाललेला प्रवास संशोधित करून ठळकपणे पुढे मांडण्याचे काम मृणालिनी जोगळेकर यांनी उचलले होते. अनेक व्यक्तिरेखांचा विचार करता करता शेवटी चार स्त्रियांची निवड केली गेली. काही स्त्रीचरित्रांवर आधीच काम झालेले होते. काहींवर काम झालेले असले तरी अधिक साधने उपलब्ध असल्याचे लक्षात आले. म्हणूनच ही निवड काहीशी ॅयीने केली गेली. मात्र ताराबाई शिंदे व जनाक्का शिंदे यांची नावे जाणीवपूर्वक उचलून त्यांच्याबद्दल माहिती जमा करण्याचे ठरले. त्या अब्राह्मण किंवा मराठा स्त्रिया आहेत हे त्यांचे वैशिष्ट्य जाणवत होते. मन्वंतराच्या या मंथनाचा मराठा समाजावर काय परिणाम झाला होता हे बघण्याचे अगत्य सर्वांनाच वाटते. मात्र त्याबद्दल फारशी माहिती उपलब्ध होऊ शकत नाही याचे दुःख आहे. येथेही असे आढळले, की पंडिता रमाबाई व रमाबाई रानडे यांच्या प्रवासाचा शोध घेणारे लेखन खूपच आखडते झालेले आहे. तरीही विषयाच्या नाविन्यामुळे हे लेखन प्रसिद्ध क॰ ाचा निर्णय आम्ही घेतला आणि प्रथमतः एका पुस्तकाचा ऐवज होईल या अपेक्षेने चालू झालेले लेखन एकूण तीन पुस्तकांच्याद्वारे आपल्यापुढे सादर होत आहे.

ज्योतिबा फुल्यांसारख्या अतिशय परखडपणे स्त्री-पुरुष संबंधांची चिकित्सा करणारा, तळागाळातून वर येऊन ब्राह्मणी धर्माची पकड झुगारून देऊन स्त्रिया व अतिशूद्र आणि शूद्र यांना मानव म्हणून जगण्यासाठी पुढे या असे आवाहन करणारा सुधारक एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर होऊन गेला. त्याच्यामुळेच परिवर्तनाचा विचार केवळ ब्राह्मण व शहरी समाजापुरता मर्यादित न राहता शेतकरी आणि दलित समाजापर्यंत जाऊन पोहोचला. फार मोठे सामाजिक मंथन महाराष्ट्रामध्ये घडून आले. दुर्दैवाने फुल्यांच्या विचारातील वर्ण व जाती

वर्चस्वाविरुद्ध संघर्ष करण्याचे आव्हान काही प्रमाणात पेलले गेले. परंतु पुरुषी वर्चस्वाविरुद्ध जो आवाज फुल्यांनी उठविला तो मात्र जवळजवळ विरून गेल्याचे जाणवते. फुल्यांची आमूलाग्र बंडखोर वृत्ती त्यांच्या अनुयायांना भावली नाही, आणि स्वतःला सोयीस्कर अशी स्वजातीचे सामाजिक स्थान उंचावण्यासाठी आवश्यक विचारधारा तेवढी या पुरुष अनुयायांनी राबविली. ब्राह्मण पुरुषांना शह देण्यासाठी ती त्यांना उपयोगी पडली; पण स्वजातीतील स्त्रीवर्गापर्यंत फुल्यांनी दिलेला स्त्रीपुरुष समानतेचा संदेश पोहचविण्याचे काम या मंडळींनी टाळलेले आढळते आणि म्हणूनच फार कमी स्त्रियांना स्वतःच्या अस्मितेच्या आविष्काराची संधी मिळालेली दिसते. ताराबाई शिंदे व जनाक्का शिंदे या दोघी अशाच दुर्मिळ स्त्रियांपैकी म्हणून त्यांचे महत्त्व.

ताराबाईंचे वडील बापूजी हरी शिंदे हे म. फुले यांचे अनुयायी. विदर्भातील बुलढाणा येथे त्यांचे वास्तव्य होते. त्यांच्या उत्तेजनामुळे ताराबाई शिकून सवरून आर्थिक व्यवहार व शेतीची व्यवस्था यांमध्ये तरबेज झाल्या असाव्यात असे दिसते. जनाक्कांना प्रोत्साहन मिळाले ते भावामुळे - विठ्ठलराव शिंदे यांच्यामुळे. भारतातील स्त्रीमुक्तीचे हे वैशिष्ट्य म्हणावे लागेल, की स्त्रियांच्या बंडखोरीला पुरुष पाठिराखे म्हणून असण्याची गरज भासलेली आहे. पंडिता रमाबाईसारख्या उत्तुंग आणि स्वयंभू स्त्रीलाही संस्कृत ग्रंथांचे ज्ञान देणारा व स्वतःच्या भ्रमंतीमध्ये बरोबर घेऊन हिंडणारा पिता लाभलेला होता. कदाचित येथील धर्म व संस्कृती यांच्या अधिक घट्ट विणीतून बाहेर पडण्याची धडपड करणे स्त्रीला अधिक कठीण जात असावे. ब्राह्मण स्त्रियांना औद्योगिकरणातून झालेल्या नागरीकरणाची पार्श्वभूमी मिळालेली दिसते. परंतु शेतकरी कुटुंबामध्ये मात्र स्त्रियांना शिक्षण मिळणे कठीण दिसते. म्हणूनच अजूनही शेती करणाऱ्या मराठा, माळी वगैरे जातींमधून पुढे येणाऱ्या, सार्वजनिक जीवनात भाग घेणाऱ्या किंवा साहित्याच्या क्षेत्रात भर टाकणाऱ्या स्त्रियांची संख्या खूपच मर्यादित राहिलेली आढळते. किंबहुना शेतकरी समाजातील ज्यांची सांपत्तिक स्थिती शेतीमधील नगदी पिकांमुळे सुधारली त्या थरांतील स्त्रिया तर अधिक पडद्यामागे गेल्या आणि खानदानीपणाच्या व संस्कृतीकरणाच्या बळी झाल्या असेही चित्र आज पुढे येत आहे. अशा परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर एकोणिसाव्या शतकातील परिवर्तनाचा रेटा खरोखरीच जबरदस्त असावा आणि त्या लाटेमुळेच केवळ ताराबाई व जनाक्का यांच्यासारखी रत्ने इतिहासपटावर फेकली गेली असावीत. त्याचबरोबर ज्योतिबा फुल्यांसारख्या सुधारकांच्या उर्मीसुद्धा निखळ व सर्वस्पर्शी असल्याची साक्ष पटते. ताराबाईंच्या लेखनावर टीका करणाऱ्या स्वतःच्या सहकाऱ्याला सुद्धा दटावायला फुले कचरत नाहीत असे लेखिकेने दाखवून दिले आहे.

ताराबाई शिंदे यांनी हिंदुधर्मातील व्यवहारांवर व पुरुषांच्या दुटप्पीपणावर घणाघाती प्रहार केले आणि एका अर्थाने स्त्रीला न्याय मिळावा, मोकळेपणा मिळावा, विकासाची संधी मिळावी म्हणून आग्रह धरला. स्वतःचे जीवन अतिशय स्वतंत्र बाण्याने जगण्याचा प्रयत्न केला. जनाक्कांनी कृतीची भर घातली. परित्यक्तेचे जिणे हे लाजिरवाणे न मानता त्या भावाच्या मदतीने सार्वजनिक जीवनात आल्या आणि दलितांच्या सुधारणेसाठी त्यांनी प्रयत्न केले.

त्यांच्या विचारांचा व कार्याचा तत्कालीन मराठा समाजातील स्त्रियांवर काय परिणाम झाला याचा शोध आतापर्यंत फारसा घेतला गेला नाही हे दुर्दैव. यामुळेच स्त्रीप्रश्नांची आच इतिहासकारांना नाही हे पुन्हा एकदा जाणवते. तथापि मृणालिनी जोगळेकरांनी जनाक्कांच्या समकालीन व्यक्तींचा शोध घेऊन त्यांच्याकडून जनाक्कांच्या जीवनाविषयी खूप माहिती मिळविली. त्या माहितीमधून त्या काळी समाजमान्यतांच्या विरुद्ध जाऊन जनाक्का शिंदेनी बहुजन समाजात किती कार्य केले, मूकपणे काय काय सोसले, आणि तरीही आयुष्याच्या अखेरीपर्यंत कशा ताठ राहिल्या ह्याचा अनुभव येतो. त्यांच्या उदाहरणाने धीट होऊन बहुजन समाजातील काही स्त्रिया सभा-संमेलने, समाजकार्य वगैरेसाठी बाहेर पडू लागल्याचे पण लेखिकेने दाखवून दिले आहे.

या लेखनाच्या रूपाने ह्या महत्त्वाच्या टप्प्याची निदान नोंद तरी झालेली आहे. आज मराठा स्त्रिया पुरुषांचा हात धरून राजकारणात उतरू पाहत आहेत; परंतु ते प्रस्थापितांचे, सत्तेचे राजकारण आहे. या दोन स्त्रिया प्रस्थापिततेविरुद्ध संघर्षाच्या प्रवाहात उतरलेल्या होत्या हे विशेष. या स्त्रियांचा आदर्श समोर ठेवून शेतीवर अवलंबित जातींमधील स्त्रियाही स्त्रीमुक्ती चळवळीत सामील होतील आणि चळवळ अधिक व्यापक होईल. तसेच मुक्तीच्या कल्पना अनेक अंगांनी पारखून घेतल्या जातील अशी आशा धरायला हरकत नाही. त्या दृष्टीने शेतकरी आंदोलनातील स्त्रियांचा सहभाग, वर्कराजा घरणाच्या निमित्ताने शेतकरी स्त्रियांचे पर्यायी शेतीविकासाच्या चर्चेत भाग घेणे वगैरे घटना उत्साहजनक आहेत. या वेळी मात्र वर्तमानकालीन घटनांच्या नोंदी व्यवस्थित केल्या जाण्याची जबाबदारी चळवळीतील शिकलेल्या स्त्रियांनीच उचलली पाहिजे. पुरुष इतिहासकारांना दोष देऊन भागणार नाही, हे लक्षात असू द्यावे.

छाया दातार
प्रपाठक, स्त्री- अभ्यास विभाग,
टाटा समाजविज्ञान संस्थान,
मुंबई.

# प्रास्ताविक

१९ व्या शतकातील, चौकटीबाहेरचे जीवन जगलेल्या स्त्रियांच्या जीवनाचा वेध, आजच्या स्त्री-मुक्ती चळवळीच्या संदर्भात घेऊन त्यातून काही समान जाणिवा, संकल्पना वा सूत्रे हाती लागतात का हे पाहण्याचे आम्ही ठरवले होते. ह्या समान जाणिवा जरी अस्पष्ट आढळल्या तरी आजच्या चळवळीची ती पाळेमुळे आहेत ह्या दृष्टीने त्या महत्त्वाच्या ठरतील.

अशा दृष्टीने १९ व्या शतकातील महाराष्ट्राच्या इतिहासाचा वेध घेता, चौकटीबाहेर पडलेल्या अनेक स्त्रिया दिसू लागल्या.

पं. रमाबाई, आनंदीबाई जोशी, रखमाबाई राऊत, रमाबाई रानडे, लक्ष्मीबाई टिळक, आनंदीबाई कर्वे, पार्वतीबाई आठवले अशी खूप नावे भेटत गेली. ह्या सर्वजणींविषयी थोडे थोडे लिहिण्यापेक्षा त्यांतल्या पं. रमाबाई व रमाबाई रानडे ह्या दोन अगदी भिन्न प्रवृत्तींच्या स्त्रिया घेऊन त्यांच्या चरित्रांतून त्यांची जडणघडण, त्यांचे कर्तृत्व व त्यांनी स्त्री म्हणून जोपासलेली स्वतःची अस्मिता ह्यांचा शोध घेण्याचे ठरवले.

हे करत असताना जाणवले, की ह्या दिसलेल्या बहुतेक स्त्रिया वरिष्ठ वर्गातल्या आहेत. १९ व्या शतकात जी परिवर्तनाची लाट ह्या देशावर आली, तिचे धक्के समाजाच्या खालच्या स्तरापर्यंतही पोहोचले होते. तिचे स्वागत किंवा तिच्याशी कडवी झुंज, हे आपापल्या प्रवृत्तीप्रमाणे त्याही वर्गातले पुरुष देतच होते. आणि ह्या संक्रमणाच्या झोतात, ह्या पुरुषांच्या जोडीने त्यांच्या नात्यातील काही तुरळक स्त्रियापण त्यांच्या वेगळ्या जाणिवांमुळे उठून दिसू लागल्या होत्या.

आणि म्हणून वरिष्ठ वर्गातील स्त्रियांच्या जोडीने एक-दोन ब्राम्हणेतर स्त्रियांच्या जीवनाचापण वेध घेणे इष्ट होईल, असे वाटू लागले.

अशा स्त्रियांपैकी सावित्रीबाई फुल्यांचे नाव आपल्या परिचयाचे आहे. त्यांच्या जीवन परिवर्तनाविषयी बरेच लिहिले गेले आहे. म्हणून मग थोड्याफार प्रकाशाआड राहिलेल्या

ताराबाई शिंदे व जनाक्का शिंदे ह्या दोन तडफदार स्त्रियांच्या जीवनाचा वेध घेण्याचे ठरविले.

कालमानदृष्ट्या ताराबाई शिंदे ह्या पं. रमाबाईंच्या समकालीन किंबहुना थोड्याफार अगोदरच जन्मलेल्या. दोघींचा एकत्र उल्लेख महात्मा फुल्यांनी आपल्या सत्सारच्या दुसऱ्या अंकात आदरपूर्वक केलेला आढळतो.

तर जनाक्का शिंदे ह्या थोड्याफार रमाबाई रानड्यांच्या समकालीन.

निराश्रित साह्यकारी मिशनच्या अधिवेशनाच्या निमित्ते दोघी एकत्र आलेल्या दिसतात.

ह्या दोन शिंदे भगिनींची जीवन चरित्रे पाहता आणखी एक लक्षात येते, की स्त्री-मुक्ती चळवळीतील स्त्रियांचे जे दोन प्रमुख गट दिसतात,एक बौद्धिक ( intellectual) पातळीवर कर्तृत्व करणारा व दुसरा कृतिशील (activist) पातळीवर कार्य करणारा त्या दोन गटांच्याच ह्या एक-एक प्रतिनिधी आहेत, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. ह्या दृष्टीने प्रथम आपण ताराबाई शिंद्यांचे जीवन व कर्तृत्व त्यांच्या एकमेव उपलब्ध पुस्तकाच्या व अल्प माहितीच्या आधारे पाहणार आहोत व त्यानंतर जनाक्कांच्या जीवन चरित्राचा वेध घेणार आहोत.

ह्या दोघीजणी १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात मराठा जातीत जन्मलेल्या. शैक्षणिक दृष्ट्या हा समाज त्या काळी खूपच मागासलेला होता असे दिसते. ह्यातला संपन्न क्षत्रिय गट सरंजामशाही वातावरणात गुरफटलेला तर कुणबी शेतकरी वर्ग सनातन ग्रामीण वर्गव्यवस्थेत अडकलेला. ज्योतिराव फुल्यांनी सत्यशोधक चळवळीद्वारे आणलेले नवविचारांचे वारे ह्या दोन्ही तटबंदींत फारसे आतपर्यंत शिरू शकलेले जाणवत नाही. बहुजन समाजाच्या उद्धाराची पहिली पायरी म्हणजे शिक्षण- विद्या मिळवणे - असे ज्योतिबा तळमळीने सांगत; पण हा मंत्रही मराठा समाजाने शिंद्यांच्या काळापर्यंत उचललेला दिसत नाही. महर्षी शिंदे जेव्हा सतत पहिल्या नंबराने शाळेत पास होत गेले तेव्हा, त्याविषयी कौतुक करताना त्यांचे चरित्रकार व निकटवर्ती अनुयायी श्री. रा. ना. चव्हाण म्हणतात--

"त्या काळी किंवा त्यापूर्वीच्या काळी, अशा प्रकारचे शिक्षणं घेणारे, मराठ्याचे पोर जमखिंडीत नव्हते... त्या काळी शिक्षणाचा प्रसार अगदी थोडा झालेला आणि मराठा समाजात शिकणारे मूल तर क्वचित !" *

स्वत: शिंद्यांच्या घरात शिंद्यांसारखे विद्याप्रेम पुढच्या पिढीतही आढळत नाही.

पुरुषवर्गाची ही गत तर स्त्रियांची परिस्थिती काय असेल ह्याची सहज कल्पना करता येईल.

महर्षी शिंद्यांच्या आगेमागे होऊन गेलेल्या, बहुजन समाजातील सुशिक्षित कर्तृत्ववान पुरुषांची आत्मचरित्रे वाचताना, त्यांच्या बालपणातील आजूबाजूच्या स्त्रियांची जीवने पाहताना, त्या वेळच्या मराठा स्त्रीच्या जीवनाची बंदिस्तता लक्षात येते. यशवंतराव चव्हाण, पा. चिं. पाटील, भास्करराव जाधव, बाबासाहेब बोले..... सर्वांच्या आयाबहिणी सुजाण आहेत, कष्टाळू आहेत, कणखर आहेत. . मनानं उदारमनस्कपण आहेत. पण त्यांना आपल्या व्यक्तिमत्व

* कर्मवीर विद्यार्थी (१९३०) रा. ना चव्हाण, पृष्ठ १३

विकासाची, कर्तृत्व दाखवण्याची संधी गरिबीमुळे, शिक्षणाच्या अभावामुळे, परपुरुषांत वावरण्याची बंदी असल्यामुळे, सामाजिक पुरुषप्रधान संकेतांमुळे लाभलेली दिसत नाही.

क्षत्रिय परंपरा असलेल्या मराठा समाजात खानदानीपणाच्या नावाखाली स्त्रियांना मोठ्या अभिमानाने असूर्यस्पर्शी ठेवले जात होते असे दिसते. जिथे परपुरुषाची साधी नजर वा त्याचा वाराही कुलीनतेला बाधक मानला जाई, तिथे स्त्रियांचे शिक्षण वा मिश्र समाजात वावरणे ह्या कल्पना मानवणे कठीणच होते. १८८५ साली मुलींच्या स्वतंत्र शिक्षणासाठी हुजूरपागा ह्या शाळेची स्थापना झाली, तेव्हा सुरवातीला मराठा समाजाकडून फार अल्प प्रतिसाद लाभलेला दिसतो. महर्षी शिंद्यांचे वाई प्रार्थना समाजातील सहकारी श्री. रा. कृ. बाबर ... आपल्या मुलाखतीत सांगत होते, "ज्योतिराव फुले व महर्षी शिंदे ह्यांच्या प्रभावाखालचा मी ! लग्न झाल्यावर माझ्या ४ थी पास वधूला पुढे शिकवू लागलो, तर आमचे पाव्हणे (सासरे) नाराज झाले. 'आपण देशमुख. आपल्या मुलींना तुम्ही शिकवून घराबाहेर जायला लावणार ?' असे ते म्हणाले."

२० व्या शतकात देखील बऱ्यापैकी सुधारलेल्या, मुंबईसारख्या प्रगत शहरात राहणाऱ्या, मराठा पुरुषांची स्त्रियांबाबतची विचारसरणी ही अशी दिसते. हळूहळू शिक्षण प्रसार जरा मूळ धरू लागला. तथापि, मिश्रसमाजाची कल्पना मराठा वर्गाला जराही मानवत नव्हती असे दिसते.

याचा एक मजेशीर पुरावा आपल्याला त्या काळातील प्रसिद्ध लेखिका आनंदीबाई शिर्के ह्यांच्या आत्मचरित्रात वाचावयास मिळतो. त्या लिहितात --*

"..१९३८ साली पुण्यास भरलेल्या अखिल भारतीय मराठा महिला परिषदेच्या १ ल्या अधिवेशनाचे अध्यक्षपद मजकडे आले...अधिवेशनाच्या सकाळी स्त्री-पुरुषांचे एक छोटेसे अनौपचारिक संमेलन भरले होते. तेव्हा रा. ब. डॉ. पी. सी. पाटील म्हणाले, "आज हा स्त्री-पुरुषांचा एकत्र मेळावा मी प्रथमच पहात आहे. तो पाहून मला आनंद होत आहे." त्यांच्या ह्या उद्‌गारावरून मराठा स्त्रियांच्या प्रगतीची कल्पना येण्यासारखी आहे. अधिवेशन ठरल्या दिवशी सुरू झाले. एका लांबच्या पडवीत कोपऱ्यात विठ्ठलराव शिंदे व गणपतराव शिंदे बसलेले दिसले. त्यांनी मला चिठ्ठी पाठवली, की "आम्हांला इथं काही ऐकू येत नाही...म्हणून मंडपात एकीकडे बसण्याची परवानगी मिळावी.".. तशी त्यांची सभेत बसण्याची व्यवस्था करण्यास मी सेक्रेटरीस सांगितले. स्टेजवर कुणीएक राणीसाहेब म्हणविणाऱ्या बाई बसल्या होत्या. त्या म्हणाल्या, "पुरुष इथे आले तर आम्हांला बसता येणार नाही."

ह्यावर आनंदीबाईंनी त्यांची समजूत "ती म्हातारी माणसे आहेत, त्यांना इतके दूरवरचे दिसणार नाही," असे काहीतरी सांगून काढलेली दिसते. तथापि, एकूण प्रसंगातून मराठा स्त्रियांची मानसिकता १९३८ सालीसुद्धा कशा प्रकारची दडपलेली होती ते लक्षात येते. ह्या

पार्श्वभूमीवर जनाक्कांचे पुरुष समाजात सहजपणे मिसळणे, कार्य करणे लक्षणीय वाटते.

ताराबाई शिंदे तर त्याही अगोदरच्या काळात होऊन गेलेल्या. जनाक्कांप्रमाणे त्याही शिक्षणाचे, सुधारणांचे केंद्र असलेल्या पुणे-मुंबई शहरांपासून दूरवर असणाऱ्या बुलढाणा गावातल्या.

त्या काळच्या मराठा स्त्रियांच्या स्थितीबद्दल आनंदीबाई शिर्के लिहितात, "पाटील असोत नाहीतर कुणबी असोत, साऱ्यांना 'देशमुख' म्हणवून घ्यायची हाव. त्यामुळे त्यांच्या स्त्रिया पडद्यात रहायच्या. कितीही गरिबी असो, मराठ्यांच्या स्त्रिया उघड्यावर कामाला जायच्या नाहीत. हीच त्यांची मोठेपणाची, खानदानीपणाची कल्पना.*" ज्या मराठा स्त्रिया अशा मानसिकतेत वावरत होत्या. त्यांच्यातल्याच ताराबाई एक. अर्धशतक पूर्वीच जन्मलेल्या. पण त्या शिकल्या होत्या, अवान्तर वाचन भरपूर करत होत्या. परिस्थितीचे निरीक्षण व विश्लेषण करत होत्या. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे, स्वतःच्या चिंतनातून एक अत्यन्त परखड व प्रभावी निबंध त्यांनी लिहून छापवला होता.

पं. रमाबाई जशा त्या काळच्या ब्राम्हणी स्त्रियांच्या पार्श्वपटावर वेगळेपणाने चमकून दिसतात, त्याचप्रमाणे ताराबाई गोषातल्या मराठा स्त्रियांच्या पार्श्वभूमीवर आपल्या कडक वाणीने व तर्कशुद्ध लिखाणाने नजरेत भरतात.

कालानुक्रमाने आपण प्रथम श्रीमती ताराबाई शिंदे व नंतर श्रीमती जनाक्का शिंदे ह्यांचे जीवन व कार्य, आजच्या स्त्री-मुक्ती विचाराचा संदर्भ मनात ठेवून, बघत जाणार आहोत.

* *

---

* सांजवात : पान २४९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध
वा. क्र. 3866
२६६२८
८।६।८२
ग्रंथ शाखा (स्थल क्र.)

प्रकरण १ ले

# पार्श्वभूमी

'ताराबाई शिंदे' ह्यांचा काळ अदमासे १८४० ते १९१० असा मानला जातो. त्यांच्या नावावर आज 'स्त्री-पुरुष तुलना' ह्या नावाचे फक्त एकच छोटेखानी पुस्तक उपलब्ध आहे. पण त्यात त्यांनी, शंभर वर्षांपूर्वी जे स्त्री-प्रतिष्ठेचे विचार मांडले आहेत, व ते ज्या परखडपणे व धीटपणे मांडले आहेत, ते पाहता स्त्री-पुरुष समानतेच्या जाणिवा त्या काळातही ह्या स्त्रीच्या मनात स्पष्टपणे रुजल्या होत्या हे लक्षात येते.

ताराबाई शिंद्यांचे नाव किंवा त्यांचे विचार १९७५ सालापर्यंत महाराष्ट्राला जवळ जवळ अज्ञातच होते. १९७५ साली प्रसिद्ध संशोधक व समीक्षक डॉ. स. गं. मालशे ह्यांना त्यांच्या वरील पुस्तकाचा अकस्मात शोध लागला व ते त्यांनी प्रदीर्घ प्रस्तावनेसह प्रकाशित केले. त्यामुळे ताराबाईंचे अस्तित्व आपल्या समोर आले.

ताराबाईंच्या काळातही त्यांचे नाव फारसे गाजलेले दिसत नाही. त्या काळातली वृत्तपत्रे चाळल्यास त्यात कुठेही - ज्योतिबा फुल्यांच्या 'सत्सार'चा अपवाद वगळता - ताराबाईंच्या ह्या पुस्तकाचा उल्लेख अगर त्यावरचा अभिप्राय आल्याचे दिसत नाही. ज्ञानोदयासारखी ख्रिस्ती वृत्तपत्रे, हिंदू धर्मविरोधी लेखनावर आवर्जून अभिप्राय छापताना दिसतात. पण त्या वृत्तपत्रांतही ताराबाईंच्या लेखनाविषयी काही उल्लेख आढळत नाही.

ह्या दृष्टीने मी स्वतः पूज्य अण्णासाहेब कर्व्यांचे धाकटे पुत्र श्री. भास्करराव कर्वे व त्यांच्या पत्नी सौ. कावेरीबाई कर्वे यांच्याशी बोलले. हिंगण्याच्या आश्रमातील नव्वदीच्या आसपासच्या सुशिक्षित स्त्रियांजवळ चौकशी केली. पुण्याच्या श्रीमती गंगूताई पटवर्धन (वय ९०) यांच्याशी बोलले. त्या स्वतः त्या काळातील सुधारक विचाराच्या समाजसेविका व स्वतः शिक्षण क्षेत्रात काम करत होत्या. आजही ह्या वयात त्यांचे कार्य चालूच आहे. पण ह्यांपैकी कुणीही पुण्यात रहात असूनही (ताराबाईंचे पुस्तक पुण्यातच छापले गेले होते) ताराबाई शिंद्यांचे नाव तरुण वयात ऐकलेलेही नव्हते असे दिसते.

ताराबाई शिंद्यांच्या लेखनाचा एकमेव उल्लेख सापडतो तो म. ज्योतिबा फुले यांच्या 'सत्सार'च्या दुसऱ्या अंकात. ताराबाईंच्या १८८२ साली प्रसिद्ध झालेल्या 'स्त्री-पुरुष तुलना'* ह्या पुस्तकावर ज्योतिबांचे पूर्वीचे एक सहकारी श्री. भालेकर यांनी टीका केली असावी. तेव्हा ज्योतिबा चिडून पं. रमाबाई व ताराबाई शिंदे ह्यांना शहाणपण शिकवू पहाणाऱ्या भालेकरांना उद्देशून सत्साराच्या प्रारंभीच्या दिंडीत म्हणतात--

ताराबाई पंडिता रमा यास । जाति दादा वैभव शिकविण्यास

स्वस्त्रियेते जरि ज्ञान दिले होय । रमा तारेशी तरिच शिकवू जाय ।

ह्या दोघींशी बरोबरी करण्याची, त्याना शहाणपण शिकविण्याची योग्यता तत्कालीन अनेक सुशिक्षित पुरुषांत नव्हती हे ह्यातून फुले सूचित करतात. पुढे ते म्हणतात--

"पंडिता रमाबाई पुण्यात येण्याच्या पूर्वी सौ. ताराबाई शिंदे, मुक्काम बुलढाणे, प्रांत वऱ्हाड, यांनी 'स्त्री-पुरुष तुलना' या नावाच्या पुस्तकात, बहुतेक भर्ते आपल्या स्त्रियांसमक्ष पाहिजेत त्या चावचेष्टा करून नीच कर्मे आचरू लागल्यामुळे, कित्येक कुलीन पतिव्रता स्त्रियांस अतिशय विषाद वाटून . . . त्यांचे मनात दुष्कर्मरूपी समुद्राच्या लाटा उद्भवतात, त्याचे निवारण व्हावे या प्रीत्यर्थ त्यांनी पुरुष मंडळीस, अति उत्तम बोध केला. तो "जिसतन लागे वहि तन जाने, बिज्या क्या जाने गव्हारारे"-- या प्रसिद्ध कवनाप्रमाणे थोडासा तिखट खरमरीत आहे खरा, पण तो बोध एका आडमुठ्या पत्रकारास रुचला नाही. . . . . या पत्रकाराची (भालेकर) समजूत ती किती ? याला स्वतः चि. ताराबाईसारखे शिस्तशीर लिहिता तरी येते कां ?" पुढे पं. रमाबाईंविषयी ते म्हणतात--

"पं रमाबाई यांजबरोबर यांस तोलून पहाता यांचे (भालेकर) वजन खंडीस नवटक्यासारखे भरणार आहे."[१]

ज्योतिरावांनी केलेली ही तुलना पहाता पं. रमाबाई व ताराबाई शिंदे ह्या दोघी त्या वेळच्या सुशिक्षित, कर्तृत्वसिद्ध स्त्रिया असाव्यात, तसेच दोघींत, स्त्री-उद्धाराची प्रेरणा जागृत झालेली असावी असे लक्षात येते.

ह्याच उल्लेखावरून संशोधक व समीक्षक डॉ. मालश्यांनी खूप परिश्रम करून ताराबाईंचा शोध घेतला. त्यातच अवचित त्यांना ताराबाईंचे 'स्त्री -पुरुष तुलना' हे एकमेव पुस्तकही हाती लागले. ते त्यांनी प्रदीर्घ प्रस्तावनेसह प्रसिद्ध केले. त्यामुळे ताराबाईंचे अस्तित्व महाराष्ट्राला ज्ञात झाले.

ह्या निबंधात ताराबाईंनी, त्या काळी स्त्री-पुरुषांमध्ये निर्माण झालेल्या पराकोटीच्या विषमतेबद्दल आपली चीड अत्यन्त सडेतोडपणे व्यक्त केलेली दिसते व पुरुषश्रेष्ठत्वाच्या

---

* पं. रमाबाईंचे 'स्त्री-धर्म नीति' हे पुस्तकदेखील ह्याच वर्षी प्रसिद्ध झाले. दोघींनीही, तत्कालीन स्त्रीच्या अवनत अवस्थेबद्दल निषेध व्यक्त केला असून, स्त्री-सामर्थ्य व स्त्री-प्रतिष्ठेचे सूत्र दोघींच्या लेखनात पायाभूत असलेले दिसते. तथापि दोघींच्या स्त्री प्रश्नाकडे बघण्याच्या व ते मांडण्याच्या पद्धतीत भिन्नता आढळते. ताराबाईंच्या तुलनेत पं. रमाबाईंची भूमिका या काळापर्यंत फारशी ठाम व जोरकस झालेली दिसत नाही.

कल्पनेवर हल्ला चढवलेला दिसतो. तत्कालीन स्त्रीच्या केविलवाण्या जीवनाचे चित्र रंगवून, तिला शास्त्र, कुटुंब, समाज ह्यांच्याकडून मिळणाऱ्या तुच्छ अपमानास्पद वागणुकीचा त्या अतिशय कडक शब्दात धिक्कार करताना दिसतात. त्या म्हणतात--

"स्त्रीधर्म म्हणजे काय ? निरंतर पतीची आज्ञा पाळणे, त्यानी लाथा मारल्या.... दुसऱ्या रांडा ठेवल्या, नवरुजी दारू पिऊन, जुवा खेळून, कफल्लक होऊन, चोरी करून, कोणाचा प्राण घेऊन.... लाच खाऊन जरी घरी आले तरी स्त्रियांनी आपले हे कोणी...... जसे काही कृष्ण महाराज गौळ्याचे दहीदूध चोरून चन्द्रावलीला कलंक लावून आलेत असे समजून परमात्म्यासारखीच यांची मोठ्या हासतमुखाने देवासारखी पूजा करावी.... हा स्त्री धर्म.. जर बायकोला नवराच देव तर नवऱ्याची वागणूक देखील देवाप्रमाणेच पाहिजे...... नवऱ्याने देखील त्यांजवर देवाप्रमाणे ममता करून त्यांचे सुखदुःख जाणावे की नाही ?.... नवरा कसाहि दुर्गुणी असला तरी त्याला देवाप्रमाणे मानून कोण वागेल बरे ?"[२]

ताराबाईंच्या शैलीतील धीटपणा व स्त्रीला बटीक मानणाऱ्या पुरुषांविषयीची चीड विशेष नोंद करण्यासारखी वाटते.

त्या काळी उच्चवर्णीयांच्या तुलनेत खूपच कमी शिक्षित असलेल्या समाजातल्या एका स्त्रीत ही विषमतेची जाणीव जागी झाली होती व तिचा स्पष्ट उच्चार करण्याचे धैर्य तिच्याजवळ होते ही घटनाही महत्त्वाची वाटते.

अशी ही त्या काळच्या संदर्भात अपवादात्मक धीट दिसणारी स्त्री घडली कशी ? तिच्यावर कुणाचा प्रभाव होता ? हिने आणखी काही लिहिले असले का ? तिच्या लेखनाचा समाजावर काही परिणाम झाला असेल का ? त्यावर टीका करण्याइतकेही महत्त्व समाजाने त्यांच्या लेखनाला का दिले नाही ?

असे अनेक प्रश्न मनात उभे राहतात.

अर्थात सध्या तरी ह्या सर्व प्रश्नांचा शोध श्री. मालश्यांच्या प्रस्तावनेच्या आधारे व पुस्तकातील विधानांच्या साहाय्यानेच घ्यावा लागतो.

श्री. मालश्यांनी खूप खटपट व बराच पत्रव्यवहार करून ताराबाईंचा पूर्वेतिहास तुटक स्वरूपात का असेना, गोळा केलेला आहे व तो प्रस्तावनेत नोंदवला आहे. त्यानुसार कै. ताराबाईंचे माहेरचे नाव शिंदेच होते. वडिलांचे नाव बापूजी हरि शिंदे. हे बापूजी हरि पुरोगामी विचारांचे असून महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक समाजाचे सुरवातीपासूनचे सभासद होते. हे शिंद्यांचे घराणे सधन व प्रतिष्ठित असून बुलढाण्यातल्या चार प्रसिद्ध वाड्यांपैकी एक वाडा त्यांचा होता. इतर तीन सधन वाडे ब्राम्हणांचे होते. तशात ताराबाई चार भावांतली एकटी बहीण. त्यामुळे वडिलांची खूप लाडकी. काळाचा विचार करता त्यांनी तिला शिक्षण चांगलेच दिलेले होते. मराठी, संस्कृत व इंग्रजी भाषांचे ताराबाईंना उत्तम ज्ञान होते, असे बुलढाण्याचे एक जुने रहिवासी श्री. कऱ्हाडे हे कळवतात. पुस्तक वाचतानाही ह्याचा प्रत्यय येतो. तो आपण पुढे पाहूच.

ताराबाईंचे वाचनही भरपूर व चौकस असावे असे त्यांच्या पुस्तकातील नाना प्रकारच्या संदर्भावरून लक्षात येते. तेपण आपण पुढे सविस्तरपणे पाहू.

मालशे सांगतात- "ताराबाईंच्या मनातून लग्नच करायचे नव्हते. पण त्यावेळचा जमाना व जनरीत ध्यानात घेऊन त्यांचे लग्न झाले. वडिलांनी घरजावईच शोधलेला दिसतो. पण ताराबाईंना संसारसुख लाभले नाही. मूलही झाले नाही." ताराबाई आपल्या निबंधात एके ठिकाणी अशा तऱ्हेने घरजावई करण्याबद्दल आपली प्रतिक्रिया नोंदवतात. त्या म्हणतात-

"कित्येक श्रीमंत गृहस्थ आपल्या लाडक्या लेकीचे फक्त लाडाकरिता व आवडीकरिता एखादे गरीबाचे मुलाबरोबर लग्न करून ते जोडपे जवळच बाळगतात. पुढे जोपर्यन्त ती उभयता अज्ञान व असमंजस असतात तोपर्यन्त बरे चालते. एकदा जरा चांगले समजू लागले म्हणजे ही बया श्रीमंताची, ऐष आरामात वागलेली, चतुर, हुशार, नि बाबा जन्मकरंट्याचे.... तेव्हां तिला तो न आवडून,.....रोज जे धिंडवडे होतात ते दृष्टीस पडतात. तो बापाचा लाड तिला जन्मभर कामी येतो का नाही बरे ?"[३]

श्री. मालश्यांच्या मते ह्या निवेदनातून ताराबाईंची स्वानुभूत व्यथाच मुखर झाली असावी.[४]

खानदानी घराणे व गोषा पद्धती, त्यामुळे समाजात मिसळणे एकंदरीत कमीच असे. कोर्ट-कचेऱ्यांच्या कामासाठी त्या घोड्यावर बसून जात. हातात काठी घेऊन शेताची राखण करीत असत. त्यांच्या अंगी लेखनादी सुप्त गुण बरेच असावे. पण मालशे म्हणतात- "समाजात चमकण्याआड येणारी पडदापोषी, व संसारिक जीवनात झालेली कुचंबणा यामुळे त्यांच्या अंगच्या गुणांचा प्रकाश पडावा तसा पडला नाही."[५]

"ताराबाई ठेंगणी ठुसकी बाई होती. ती डोळ्याला जाड भिंगाचा चष्मा लावी... स्वभावाने ती तामसी होती...... आम्ही मुले तिला फार भीत असू.. तिच्या पतीला आम्ही पाहिले नाही." असे वर्णन बुलढाण्याचे वकील श्री. पाठक--ज्यांनी ताराबाईंना बालपणी पाहिले होते ते- करतात.[६]

ताराबाईंच्या स्वभावातील तामसी उग्रपणा त्यांच्या लेखणीतही अनेकदा प्रगटतो. हा स्वभाव, वाट्याला आलेल्या असमाधानी जीवनामुळे बनत गेला असेल का ? असा मनात विचार येतो.

इथे मनात आणखी एक आश्चर्ययुक्त प्रश्न उभा रहातो , की ताराबाईंचे वडील पुरोगामी होते. लेकीला त्यांनी शिकवून बहुश्रुत केलेली दिसते. असे असता तिचा विवाह त्यांनी तिच्या इच्छेविरुद्ध जाऊन तिला पसंत नसलेल्या वराशी का करून दिला ? या बाबत श्रीमती विद्युत भागवत आपल्या लेखात म्हणतात--

"एकीकडे नव्या विचाराच्या प्रभावामुळे आपल्या मुलीला स्वतंत्र विचार करायला वाव द्यायचा व दुसरीकडे आपल्या हाताने तिला रीतिरिवाजांच्या चौकटीत बंदिस्त करून टाकायचे असा काहीसा दुटप्पी व्यवहार शिंद्यांच्या खाजगी आयुष्यात घडला होता."[७]

पण मला वाटते प्रत्येक काळातील सुधारकाला त्या त्या काळातील परिस्थिती व विचारांची झेप, ह्या संदर्भातच तपासायला हवे. त्याच्याही वागण्याला काळाच्या काही मर्यादा पडतातच, हे विसरून चालणार नाही.

"कित्येक श्रीमंत गृहस्थ लाडक्या लेकीचे लाडाकरता.... एखादे गरीबाचे मुलाबरोबर लग्न करून ते जोडपे जवळ बाळगतात."[८] ह्या ताराबाईंच्या उद्‌गारावरून एक शक्यता जाणवते. ती म्हणजे, आपल्या मुलीस ज्या लाडात व स्वातंत्र्यात आपण वाढविली ते कदाचित् दुसऱ्या घरी गेल्यावर लाभणार नाही म्हणून त्यांनी घरजावई आणला असावा. व घरजावई होण्यास सामान्यतः गरिबाघरचा व कमी कर्तृत्वाचा मुलगाच तयार होणे शक्य असल्याने ताराबाईंच्या वैवाहिक जीवनाचा खेळखंडोबा झाला असावा. शिवाय पुष्कळदा सद्‌हेतूने केलेले हिशेब (calculations) व निर्णय चुकतातही. ह्याबाबत पं. रमाबाईंच्या मोठ्या बहिणीचा केला गेलेला विवाह तसेच रखमाबाई राऊतांचे झालेले लग्न.... ही उदाहरणे आपल्या समोर आहेतच. अर्थात ताराबाईंची नाराजी त्यांच्या सुधारक वडिलांनी लक्षात घ्यायला हवी होती, हे निर्विवाद.

इथे जाता जाता आणखी एक विचार मनात येतो, की ताराबाईंचे मनाप्रमाणे लग्न झाले असते, व त्या संसारात रमल्या असत्या, त्या काळानुसार चार-सहा अपत्यांच्या आई झाल्या असत्या तर असे बेधडकपणे त्या लिहू शकल्या असत्या का ? असो.

ताराबाई बुलढाण्याच्या. त्यांचे हे पुस्तक पुण्यातील प्रार्थना समाजाच्या 'श्री शिवाजी' छापखान्यात छापले गेले. ह्याचा अर्थ त्यांच्या घराचा पुण्याशी व पुण्यातील सुधारक विचाराच्या लोकांशी चांगला संपर्क असावा.

"त्यांच्या पुस्तकाची दखल इतर कुणी घेतली नाही तरी ज्योतिराव फुले त्यांच्या लेखनाचे कौतुक करतात. एवढेच नव्हे तर चि. ताराबाई असा त्यांच्या जिव्हाळ्याचा उल्लेख करतात. ताराबाईंनी श्री. फुल्यांचे चरित्रही लिहिले असावे, कारण त्याबाबत त्यांच्या नातेवाइकांकडे पुढे विचारणा होत होती," -- असे श्री. मालशे म्हणतात.[९]

ह्या सर्व सूत्रावरून व लेखनावरून ताराबाईंच्या विचारांवर सुधारकी मतांचा विशेषतः ज्योतिरावांच्या मतांचा प्रभाव पडला असावा असे वाटते.

त्यांच्या जडणघडणीत, ज्योतिराव फुले यांचे विचार, भाषा, आक्रमक वृत्ती, व्यापक समानतेचा पुरस्कार ह्या सर्वांचा प्रभाव दिसतो.

त्यांचा सविस्तर विचार आपण पुढे करणार आहोत.

ताराबाईंच्या काळात स्त्रिया फारकरून शिकतच नव्हत्या.

घरच्या घरी थोडीफार अक्षर ओळख होई, ती धार्मिक पुस्तके वाचण्यापुरती. क्वचित कुणी पांढरपेशा बाईने लेखन केलेच तर फारतर पौराणिक गोष्टी, गाणी किंवा ओव्या इतकेच ते मर्यादित होते. मनोरंजन, करमणुकीचा प्रोत्साहक काळ अद्याप यायचा होता. तेव्हा मनात असा प्रश्न येतो, की अशा काळात अवतीभवती घडणाऱ्या अन्यायी घटनांविषयी आपण लिहावे, असे ताराबाईंना कसे सुचले असावे ? श्री. मालशेपण म्हणतात-- "एका मराठा बाईने, धार्मिक व पौराणिक स्वरूपाचे नव्हे तर सामाजिक ज्वलन्त प्रश्नासंबंधी--'स्त्री-पुरुष तुलने'-सारख्या प्रश्नावर....१८८२ साली एक दीर्घ निबंध लिहावा ही खरोखरच नवलाईची गोष्ट म्हटली पाहिजे."[१०]

* *

# संदर्भ सूची

१. समग्र फुले सत्सार नं. २ संपादक स. ग. मालशे, धनंजय कीर, १९६९: पृष्ठ २९५ ते २९८
२. स्त्री-पुरुष तुलना: ताराबाई शिंदे, पृष्ठ १ - २
३. प्रस्तावना: पृष्ठ २२
४. कित्ता : पृष्ठ ७-८
५. कित्ता : पृष्ठ ७
६. कित्ता : पृष्ठ ३
७. स्त्री-दास्याचा प्रश्न आणि सत्यशोधक समाज: विद्युत भागवत, सकाळ, २४.९.८८
८. प्रस्तावना: पृष्ठ २२
९. स्त्री-पुरुष तुलना : प्रस्तावना, मालशे, पृष्ठ १५
१०. कित्ता : पृष्ठ ४

प्रकरण २ रे

# ताराबाईंची भूमिका

ताराबाईंविषयी जी अल्पशी माहिती उपलब्ध आहे त्यावरून आपण ताराबाईंचे साधारण जीवन, वडिलांमुळे लाभलेले शिक्षण व ज्योतिरावांच्या विचारांचा परिचय व सर्वांतून त्यांची झालेली जडणघडण ह्याची एक स्थूल रूपरेषा पाहिली.

आता आपण त्यांच्या विचारसरणीचा मागोवा, त्यांच्या एकमेव उपलब्ध पुस्तकाच्या 'स्त्री-पुरुष तुलने'च्या आधारे घेणार आहोत.

प्रथम विचार करायचा तो ह्या प्रश्नाचा, की अशा प्रकारे पोटतिडिकेने लेखन करावे, असे ताराबाईंना का वाटले असावे ?

ह्याचे उत्तर त्या वेळी वृत्तपत्रात गाजलेल्या एका घटनेत सापडते. सुशिक्षित ताराबाई भोवतालचे स्त्रीचे जखडलेले जीवन पाहून अस्वस्थ होत असाव्यात. स्वतंत्रपणे ह्या अन्याय्य परंपरेविषयी विचार करत असाव्यात. तशात २६ मे १८८१ रोजी टाइम्स ऑफ इंडियात बातमी आली, की सुरत जिल्ह्यातील ब्राम्हण जातीतील एक विधवा स्त्री, 'विजयालक्ष्मी' हिने भ्रूणहत्या केली, म्हणून तिला फाशीची शिक्षा देण्यात आली. पुढे लोकांच्या व काही संस्थांच्या खटपटीमुळे ती कमी करत शेवटी तिला ५ वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा देण्यात आली.

ह्या बातमीवरून 'पुणे वैभव' सारख्या पारंपरिक वृत्तीच्या वृत्तपत्रांनी स्त्री-जातीविरुद्ध टीकेची झोड उठवली.

त्या काळी समाजमानसात स्त्रीची प्रतिमा ही जात्याच घातकी, उद्धट, निसर्गतः अनीतीकडे कल असणारी, चंचल, मूर्ख, परमार्थ मार्गातील अडचण अशी निर्माण केली गेली होती. एखाद्या स्त्रीकडून रूढींच्या अमानुष बंधनामुळे काही प्रमाद घडलाच तर संपूर्ण स्त्री-जातीला 'पुणे वैभव' सारखी सनातनी वृत्तीची वृत्तपत्रे झोडपून काढत असत. त्यातून ती स्त्री शिक्षित असेल तर मग विचारायलाच नको.

ह्या साऱ्यांबाबत मनात साठत आलेली चीड ह्या निबंधात विजयालक्ष्मी प्रकरणाच्या निमित्ताने ताराबाईंनी व्यक्त केलेली दिसते.

त्या आपल्या निबंधाच्या प्रस्तावनेतच म्हणतात--

"रोज पुरुषांचे साहस, धाडस व दगाबाजीची नित्य नवी भयंकर उदाहरणे दिसून येत असताहि तिकडे कोणीच लक्ष न देता स्त्रियांवरच सर्व दोषांची गोणी लादतात हे पाहून स्त्रीजात्याभिमानाने माझे मन अगदी खळवळून तळतळून गेले. त्यामुळे मला निर्भिड होऊन असे खडखडीत लिहिण्यावाचून रहावे ना."

वरील प्रसंगातून दोन-तीन गोष्टी लक्षात येतात.

सर्वांत पहिली गोष्ट म्हणजे ताराबाई जरी बुलढाण्यासारख्या लहानशा गावात रहात होत्या तरीपण मुंबई-पुण्याकडे प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तपत्रांचे बारकाईने वाचन करत होत्या. त्या काळी मध्यमवर्गाला वृत्तपत्र विकत घेणे परवडत नव्हते. तशी प्रथाही नसावी. मी स्वतः नव्वदीच्या आसपासच्या काही स्त्रियांजवळ विचारणा केली त्यावरून जाणवले, की गावात येणारी तुरळक पत्रे पुरुष वर्ग वाचत असे. बायकांनी वृत्तपत्र वाचणे अशिष्टपणाचे मानत. ह्याचा प्रत्यय रमाबाई रानड्यांच्या आत्मकथनातही मिळतो. त्या सांगतात--

"एकदा केरात सापडलेला इंग्रजी वर्तमानपत्राचा कपटा मी केर थांबवून वाचत उभे राहिले तर घरातील वडीलधाऱ्या बायका राग येऊन मोठ्याने ओरडून म्हणाल्या--तुझे हपीस माडीवर आहे. तिथे तुम्ही वाचा कि नाचा. आमचा अपमान केलात तर खबरदार"[१]

न्यायमूर्ती रानड्यांसारख्या सुशिक्षित उच्च वर्णातील घरात ही स्थिती, मग इतरत्र स्त्रियांच्या वाचनाबाबत काय अवस्था असेल ह्याची सहज कल्पना करता येईल. अशा ह्या रूढीप्रियतेच्या काळात ताराबाई वृत्तपत्रे वाचतात-- इतकेच नव्हे तर वृत्तपत्रातील घटनांबाबत त्या चिकित्सकपणे आपली मते मांडताना दिसतात, ही घटना लक्षणीय वाटते.

दुसरी गोष्ट जाणवते ती अशी, की त्यांच्याबाबतीत शिक्षणाने, वाचनशक्तीबरोबरच विचारशक्तीपण तीव्र केलेली दिसते. घडणाऱ्या घटनांचा त्या जागरूकपणे विचार व अन्वय जोडताना दिसतात.

तिसरी गोष्ट जाणवते ती ताराबाईंची वेगळी संवेदनशीलता ! त्या काळी स्त्रियांच्या वाट्याला असलेले पराधीन जीवन, अमानुष रूढींचा काच, त्यामुळे त्यांची होणारी केविलवाणी अवस्था-- ह्या सर्वांकडे ताराबाई एका वेगळ्या धारदारपणे पाहताना दिसतात. आणि पाहता पाहता स्त्रीजीवनाच्या सर्व समस्यांच्या गाभ्यालाच त्या भिडलेल्या दिसतात.

त्या काळातील बहुसंख्य उदारमतवादी सुधारकांचा, स्त्रीजीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा भूतदयावादी दिसतो. सती, सक्तीचे वैधव्य, केशवपन, इ. निष्ठुर रूढींचे उच्चाटन करून स्त्रियांना ह्या दुःखातून मुक्त करावे, शिक्षण देऊन पतीला अनुरूप सहचरी बनवावे अशी मानवतावादी आधारकर्त्याची (patronizing) त्यांची भूमिका दिसते. पण ताराबाई ह्या साऱ्या दुःखांना छेद देऊन, त्यांच्या मुळाशी असणाऱ्या पुरुष श्रेष्ठत्वाच्या अहंकारी वृत्तीवरच हल्ला चढवताना दिसतात.

त्यांच्या ह्या निबंधाचे सरळ दोन भाग दिसतात. पहिल्या भागात धर्म, रूढी, परंपरा ह्या नावांखाली पुरुषसत्ताक समाजाने, स्त्री-पुरुषांच्या बाबतीत दाखवलेली विषमता व दुटप्पीपणा ह्यावर त्या मारा करतात व दुसऱ्या भागात स्त्रियांना जी जी म्हणून दूषणे लावली जातात, जे जे

दोष त्यांच्यावर सतत लादले जातात–ते ते सर्व पुरुष वर्गातच कसे अधिक आहेत, हे त्या उदाहरणे देऊन, दाखले देऊन, नाट्यमय प्रसंग चितारून, कधी उपहास करून तर कधी तळतळाटाने पटवून देताना दिसतात.

त्यांना मूलभूत सूत्र सापडलेले दिसते. ते म्हणजे 'निसर्गतः स्त्री-पुरुष समानच आहेत,' व मग हे सूत्र घट्ट पकडून त्या हरेक मुद्याचे विवरण करताना दिसतात.

आपल्या प्रस्तावनेत सुरवातीलाच त्या स्पष्टपणे म्हणतात–

"सर्व गुणावगुण स्त्री-पुरुषात सारखेच आहेत, हे स्पष्ट करून दाखवावे म्हणून हा लहानसा निबंध मी देशभगिनींचा अभिमान धरून रचिला आहे."

प्रथम त्यांनी कौटुंबिक जीवनातील पतिपत्नी नात्यातील विषम तोलावर सरळ सरळ हल्ला केला आहे. त्यांच्या मते, "निसर्गतः स्त्री-पुरुष समान असूनहि स्त्रीवर आज गुलामीचे जीवन लादले गेले आहे. स्त्री ही गृहलक्ष्मी राहिली नसून गृहबंदीशाळेतील बटीक बनलेली आहे"[२] ह्याचे वर्णन करताना त्या पुढे म्हणतात–

"स्त्रिया निरंतर या संसारात नाना प्रकारचे कष्ट, हाल, तहानभूक, जाच, हाणमार सोसून फक्त एक तुमच्या गोड शब्दाच्या भुकेल्या असतात. तुम्ही कमावून आणणार पण त्याची पुढे सर्व व्यवस्था लावून, तुमचे मर्जीप्रमाणे वागून, .... हाडाचे मणी व रक्ताचे पाणि होईपर्यन्त कष्ट करून सदा तुमच्या मुखाकडे नजर"[३] असे असून त्यांच्या वाट्याला लाथाबुक्क्या, निंद्य विशेषणेच येतात. हे पाहून पुढे ताराबाई म्हणतात- " आजन्म बटकीप्रमाणे ताबेदारीत राहून.– ... घरातील सर्व मनुष्यांचे जे नाही ते सर्व बोलणे सोसून, सदोदित भाड्याच्या बैलाप्रमाणे राबून हरिण-सशासारखी रात्रंदिवस जनांची-घरच्यांची भीति बाळगून वागत असताहि स्त्रियांना एक शब्द बोलण्याची अगर चिमटीभर दाण्याची सत्ता नसावी काय रे ?"[४]

घर हे स्त्रीचे क्षेत्र मानले जाते पण त्या घरावर, त्यातील मालमत्तेवर स्त्रियांना हक्क नव्हता. ह्याचीपण ताराबाई खंत व्यक्त करतात. ही झाली एक विषमता, दुसऱ्या बाजूने पुरुषाला स्वैराचाराचे स्वातंत्र्य व स्त्रीवर मात्र अमानुष बंधने. समाज-रचनेतील ह्या असह्य पक्षपाताविरुद्ध तर ताराबाईंचे व्यक्तिमत्व पेटून उठलेले दिसते. एकाच वेळी दोन-दोन तीन-तीन बायका करायच्या, बाहेरख्यालीपणा करायचा, इंग्रजांच्या अनुकरणाने अपेयपान, अभक्ष्यभक्षण करायचे, गोवऱ्या स्मशानात गेल्यावर सुद्धा बायको मेली तर मिशीला कलप लावून लग्नाला उभे राहायचे, एवढे निरर्गल स्वातंत्र्य पुरुषांना, हे पाहून ताराबाई विचारतात–

"जशी स्त्री तसेच पुरुष. तुमच्यामध्ये मोठे अलौलिक गुण कोणते ? तुम्हीच कोण असे शूर म्हणून देवांनी तुम्हाला इतकी मोकळीक दिली ?..... नि आता इंग्रज बहाद्दराचे राज्यात तर तुम्ही, तरवार बहाद्दर तर नाहीच पण कलमबहाद्दर पण उरलेला नाहीत. सांप्रतच्या स्थितीत भाकरी बहाद्दर हे नाव तुम्हास साजते."[५]

जवळ कोणतेही खास कर्तृत्व नसले तरी संसारात पदोपदी जे पुरुषाचे वर्चस्व दिसते त्याचे कारणही ताराबाईंनी टिपलेले दिसते. "स्त्रिया बिचाऱ्या अज्ञानी, भाबड्या. जगाचा त्यांना अनुभव नाही, त्यामुळे शास्त्रे व रूढी जे काय सांगतात ते त्यांना खरे वाटते. आणि हे शास्त्रकर्ते - तरी कोण ? तेहि पुरुषच. बरं ज्या देवाचे भय घालायचे तोहि पुरुष" तेव्हा ह्या पुरुषसत्ताक

समाजाने पुरुषांना सोईस्कर अशा मूल्यकल्पना बायकांचे माथ्यात भरवून त्यांना दुबळे करून टाकले आहे. ह्याविषयी राग व्यक्त करताना ताराबाईंची लेखणी चांगलीच झणझणीत झालेली दिसते. त्या लिहितात-" तेव्हाचे शास्त्रकर्ते ऋषि तरी काय ? कोणी हरिणीचे पोटी झाले ते कोण शृंगऋषि, कोणी पाखरांचे पोटी झाले ते भारद्वाज, कोणी गाढवीचे पोटी झाले ते गर्दभऋषि, गायीचे पोटी झाले ते वृषभऋषि, तेव्हा त्यांनी आपले पशूप्रमाणे लिहून ठेवले झालं. ते गेले करून पण निस्तरणे आले स्त्रियांच्या कपाळी."[६]

पुराणकथांचा भाकडपणा त्या असा उघड करतात, तर देवकथांतले हास्यास्पदत्व कसे सांगतात पहा—

"विशाल बुद्धी देऊन परमेश्वराने तुम्हाला सर्व प्राणिमात्रांत श्रेष्ठ केले. त्या श्रेष्ठपदास शोभेल असे वर्तन तुम्ही करावे. पण छे ! ते कसे होईल ? यात श्रेष्ठ तुमचे ब्रम्हदेव-- ते तरी कुठे साधू आहेत ? ते तर तुमच्या पेक्षा सव्वाईच आहेत.

"शंकरानी तपश्चर्या सोडून भिल्लीणीच्या मागे धाव घेतली. विश्वामित्रांनी तर कुत्र्याचा अवतार घेतला. तेव्हांपासूनच तुम्हाला कुत्र्याची उपमा देतात. . . . "[७]

तत्कालीन पुरुषाच्या पशुतुल्य असंयमी वर्तनाचा सांधा त्या अशा तऱ्हेने जोडून घेताना दिसतात.

वैधव्य कल्पनेतली विषमतापण ताराबाई, ह्याच समानतेच्या मुद्यावरून नाकारताना दिसतात. त्या लिहितात-

"नवऱ्याआधी बायकोने मरावे किंवा नवऱ्याने बायकोआधी मरावे याचा तुमच्या बापदादांनी देवापासून काही दाखला आणला काय रे ? मरणे किंवा जगणे हे तर त्या सर्व शक्तिमान नारायणाचे हाती. . त्याला ह्या स्त्रियांनी काय करावे ?...... तर जसे एकदा सौभाग्य गेले. म्हणजे, स्त्रियांनी आपली तोंडे अगदी एखाद्या महान खुन्यापेक्षाहि महाजबर अपराध्याप्रमाणे काळी करून सर्व आयुष्यभर अंधारकोठडीत रहावे, त्याप्रमाणे तुमच्या बायका मेल्या म्हणजे तुम्हीही आपले तोंड काळे करून दाढ्यामिश्या भादरून यावत्-जन्मपर्यन्त कोठेही अरण्यवासात का राहू नये बरे ? एक बायको मेली की तिचे दहावे दिवशीच तुम्ही दुसरी करून आणावी असा तुम्हाला कोणत्या शहाण्या देवाने दाखला दिला आहे ?[८] . . नवऱ्यामागे अगदी सर्व सृष्टी व्यवहार सोडून हरि हरि..... करीत (बायकोने) बसावे तसे पुरुषाने का बसू नये ?"[९]

एकनिष्ठा जर मूल्य म्हणून स्वीकारायचे असेल तर ते उभयपक्षी लावले पाहिजे, हा ताराबाईचा दावा दिसतो.

व्यभिचारातील विषम न्यायपद्धतीबद्दलही त्या कडाडून लिहिताना दिसतात.

"बालविधवांवर लादलेले सक्तीचे वैधव्य, केशवपन ह्याचे दुष्परिणाम प्रत्येकच सहृदय माणसास दिसत असणार. तरुण वयात जर अशा एखादीचा पाय घसरला तर समाज तिलाच धारेवर धरतो. उजळमाथ्याने जगणे तिला अशक्य होऊन जाते. मग एखादी विहिर जवळ करणे, ते धैर्य न झाल्यास भ्रूणहत्येचे पाप शिरी घेणे, अन्यथा तीर्थक्षेत्री पळून जाऊन बाळ उकिरड्यावर टाकून, वाईट मार्गाने पोट जाळणे, हेच पर्याय त्या दुर्दैवी स्त्रीपुढे उरतात. आणि

ह्या सर्वाला जबाबदार असणारा पुरुष मात्र पुराव्याअभावी उजळमाथ्याने वावरू शकतो." ह्या अन्याय्य विषमतेविषयी ताराबाई म्हणतात—

"टाळी दोन्ही हाताने वाजते खरी, पण त्यातून उजवे हाताचा जोर जास्त असतो.[१०] तुम्हीच गोडगोड बोलून त्यांना फशी पाडता. रांडा ह्या तुम्हीच फसवून घराबाहेर काढलेल्या स्त्रियांपैकी असतात. कोणतीही स्त्री कशीही असो.... ती होऊन परपुरुषाचे गळ्यांत पडणार नाही. प्रथम तिला तुम्ही...... सृष्टीचा वारा दाखविता.[११]...... तिचे मन नानाप्रकारे मोहून,एकदा मनमोहन बनलात की ती तुम्हाला जीव अर्पण करते.... पण ही अतोनात प्रिती कोठपर्यन्त ? तुमचे मनोरथ पूर्ण होईपर्यन्त..... एकदा ती गर्भवती झाली.... की तुम्ही विंचवासारखे ढेकळाआड तोंड लपवीत फिरता.... .तू केलेस ते भोग, हा तुमचा जबाब...येथे काय पडले इंग्रज सरकारचे राज्य ! साक्षीवाचून पान हलणे नाही. पण अशा नाजूक कामात साक्ष मिळणे नाहीच."[१२] अंशा प्रसंगात स्त्रीच नेहमी फशी पडते व पुरुष पुराव्याअभावी सुटतो हा नेहमीचाच अनुभव आहे. पण ताराबाई एवढे म्हणून थांबताना दिसत नाहीत. उलट त्या सुचवतात- "यात सरकारदेखील अन्यायाचे दोषास पात्र होते. कारण जशी लाच घेणारास एकपट व देणारास दुप्पट शिक्षा लागू केली आहे त्याचप्रमाणे ह्या कामातदेखील त्यांनी सक्त कायदा करावा. ... पूर्वीचे रोमन लोकांत या कामास जबर शिक्षा देत असत. तर इकडे सरकार लक्ष देऊन पुरुषांची तोंडे फार लुबूलुबू करतात. त्या तोंडावर चांगले मोठे डाग देण्याची शिक्षा ठरवील तर पुरुषजातीस जबर दहशत बसेल."[१३]

'फक्त स्त्रियांसाठी पातिव्रत्य' ह्या कल्पनेतली विषमता जशी ताराबाईंनी नाकारलेली दिसते, त्याचप्रमाणे पुराणातील ज्या स्त्रियांचे पतिव्रता म्हणून दाखले दिले जातात त्यांच्या कथा- कहाण्यांतली विसंगतीपण ताराबाई निर्भीडपणे पुढे आणताना दिसतात. ती वाचताना ताराबाईंची निर्भयता जशी जाणवते त्याच बरोबर असेही जाणवते, की स्त्रियांची पराधीन अवस्था दूर करायची असेल तर, ज्या धर्मग्रंथांचा आधार घेऊन स्त्रियांना पराधीन व दुर्बल बनवले जाते, त्या धार्मिक ग्रंथांची चिकित्सा होणे आवश्यक आहे. मतलबी पुरुष वर्गाने त्यात घुसडलेले थोतांड उघड करून दाखवले पाहिजे, ही बुद्धिवादी भूमिका ताराबाईंनी घेतलेली दिसते.

स्त्रियांना व्यभिचारी, स्खलनशील म्हणणाऱ्या व त्यांच्या पातिव्रत्याची शंका घेणाऱ्या पुराणाभिमानी पुरुषांना त्या प्रश्न करतात—

"तुमच्या उड्या शास्त्रावर. पण येथे शास्त्र- पुराण- पोथ्या करणारे सुद्धा दांत-घशी पडतात. कसे म्हणाल तर-- शास्त्रकर्त्यांनी ज्या पूर्व युगांत झालेल्या पतिव्रता निवडून काढल्या त्यातून एक दोघी, तिघी तर दोषास पात्र असूनहि त्यांची तिकडे पहिले वर्गातच योजना केली हे कसे बरे ? आता द्रौपदी पांच नवऱ्यांची बायको असूनहि कर्ण महाराजांचे अंतर्यामी चिंतन करत होती कां नाही ? अहिल्या सुरेंद्राच्या अंकारूढ होऊन शिळा होऊन पडली. सत्यवती, कुंती ह्यांनी आपले कुमार दशेतच.... पुत्र प्रसवले तरी पटांत नांव.... वा रे देव ! वा रे ऋषि ! एकाच कडी एक.... तेव्हां नाही का एक गांधर्व विवाह होऊन सत्यवती व कुंती यांनी शांतनू व पाण्डुराजा बरोबर पाणिग्रहण केले ? मग तो नाही का पुनर्विवाह झाला ? तेव्हा जी पोरं

झाली. . . . ती पूज्यमान होऊन देव त्यांचे पाया पडू लागले. आता तसे पोर झाले की कोणी म्हणतो लेकावळा, कोणी म्हणतो खर्चा. . . . मोठे शास्त्रपुराण पारंगत झाले आणि भारतासारखे ग्रंथ केले म्हणून आईबापाहि त्यातच पावन केले का ?"[१४]

पुढे वालीची कथा अशीच उपहासाने सांगून त्या म्हणतात-

"ताराचे लग्न सुग्रीवाबरोबर लावू लागले तेव्हां ती बिचारी म्हणाली- 'महाराज हे कसे ? दीर म्हटला म्हणजे मुलासारखा . . . . तेव्हां रामचन्द्रांनी सांगितले की, काही चिन्ता नाही. तू धाकट्या दीराबरोबर पुनर्विवाह केलास तरी तुझे नांव पतिव्रतांमध्येच गणले जाईल.' "तेथे श्रीधर स्वामींनी लेखणीने दोन टाक अधिक मारले, की देवांनी केले त्याला हरकत नाही, मानवाने तसे करू नये. पण स्वामीला तेव्हां येवढे कसे कळले नाही, हा कित्ता पुढे सारे वळणशुद्ध वळवतील ? काय करतील हो. . . . सुग्रीवाचे राज्याभिषेकाचे गर्दीत द्रव्याच्या मोटा बांधण्याचे घांदलीत विसरले."[१५]

द्रव्यलोभी कीर्तनकार पुराणिक-साध्या भोळ्या स्त्रियांना वाटेल त्या कथा देवादिकांच्या नावे रंगवून कशा सांगतात, हे तर हास्यास्पदपणे ताराबाई दाखवतातच; पण एकूण आपल्या धार्मिक म्हणून आदराने वाचल्या जाणाऱ्या पुराण वाड्.मयात व त्यांनी दिलेल्या नीतिमूल्यांत किती दुटप्पीपणा भरला आहे हेपण नजरेस आणून देताना दिसतात.

मंदोदरीच्या संदर्भात त्या उपरोधाने म्हणतात—

"तेव्हां पतिवचन शिरसावंद्य. ते मान्य करून पतीचे इच्छित हेतू पूर्ण करण्याकरता दुसऱ्याची बायको फसवून आणावी त्याला काय हरकत ? हे अगदी निर्दोष पातिव्रत्य, असे समजून मंदोदरी बाईसाहेब गेल्या सीताबाईला बोध करून मन वळवायला . . 'वा रे देव ! धन्य त्या पतिव्रता."[१६]

असे अनेक दाखले देऊन शेवटी त्या म्हणतात—

"आता यांत थोडीशी आपल्या देवाची निंदा करू नये ती करणे भाग झाले. पण खऱ्याला काय ? जे समोर आले ते उघडे करून दाखवणे जरूर पडले."

थोडक्यात, मालशे म्हणतात तद्वत--"वर्तमानकालीन स्त्रीजीवन विषयक गैरसमजुतींचा संदर्भ घट्ट पकडून त्यांनी देवतास्वरूप मानल्या गेलेल्या थोर व्यक्तींच्या वर्तनावर चिकित्सेचे झगझगीत 'क्ष' किरण टाकले आहेत, व त्यातील विसंगतीच बहुधा उघड केली आहे."[१७]

त्या काळात वरिष्ठ वर्गातल्या स्त्रिया देखील पोथ्यापुराणातल्या कथा भाबड्या भाविकतेने वाचत व खऱ्या धरून चालत. त्यांची चिकित्सा करण्याचा अधिकार कुणी घेतलाच नव्हता. ह्या गतानुगतिक स्त्रियांपेक्षा ताराबाई एकदम वेगळ्या दिसतात.

अशा प्रकारे पातिव्रत्य ह्या मूल्यातील भोंगळपणा दाखवून ताराबाई त्याविषयी काही प्रश्न उभे करतात.

स्त्रीने नवरा जसा असेल तसा-- आपला म्हणून गोड मानून घ्यायचा तर मग पुरुषाने पण एकपत्नीव्रत का पाळू नये; हा त्यांचा पुढचा प्रश्न दिसतो. दोन-दोन बायका करून सवतिमत्सराच्या आगीत बायकांना जळवणाऱ्या नवऱ्यांना त्या स्पष्ट विचारतात—" फार दूर कशाला, तुमच्यातून कोणा एकाचे बायकोने त्याच्या देखत दुसऱ्या पुरुषाकडे जरा रोखाने

पाहिले की त्याचा काय विस्तवाप्रमाणे संताप होतो. तिला मारहाण होते. तिजवर किती जप्ती असते, तसे तुम्हास कां नसावे ?"[१८]

"तुम्हास नुसते पहाणे सोसत नाही तर तिचे उरावर ही जीवन्त जळती शेगडी तिला सोसेल का ?"

ताराबाईंचा पति-पत्नी नात्याबाबत दृष्टिकोन त्या काळाच्या संदर्भात वेगळा दिसतो. त्यांच्या मनातील 'पति-पत्नी नाते' हे दोघांच्या निष्ठा व प्रेम ह्या पायावर उभे राहिलेले दिसते. वस्तुतः त्याकाळी भारतीय जीवनसरणीत पति-पत्नी नातेसंबंधाचा पाया हा मुख्यतः कर्तव्य भावनेवर उभारलेला होता असे दिसते. पति-पत्नी नाते हे देव व भक्त किंवा मालक व सेवक अशा तऱ्हेनेच विकसित केले जात होते. त्या नात्यांत समान पातळीवरील प्रेमभावना हा घटक दुर्लक्षितच होता. तो विकसित व्हायला त्या काळच्या कुटुंबपद्धतीत फारसा वावही नव्हता, असे दिसते. कदाचित एकत्र कुटुंब पद्धतीच्या स्थैर्याला पति-पत्नीतील हे उत्कट प्रेम थोडेसे धोकादायकच वाटत असावे.अशा पार्श्वभूमीवर ताराबाई मात्र ह्या निबंधात पति-पत्नी नाते संबंधात अशा प्रीतीचा वरचेवर उलेख करताना दिसतात. सवतपणाने स्त्रीला वाटणारे दुःख वर्णन करताना त्या लिहितात–

" दोघींना (सवती) समसमान वागवणारे मुळीच सापडणार नाहीत. कारण दागदागिने वस्त्रप्रावरणात बरोबरी ठेवता येईल. पण एकसारखी दोघींवर प्रीती राहील कां ? कारण प्रीति काही आंबा, जांब नाही म्हणून वाटून घेता येईल. प्रीती ही केवळ दुधाप्रमाणे आहे. दूध एकदा नासले म्हणजे जसे त्याचे फिरून दूध होत नाही तशी ही प्रीती एकदा फाटली म्हणजे ती पुन्हा कधी जुळत नाही."[१९]

इथे त्या स्पष्टपणे पती-पत्नी नात्यामधली प्रेमभावना अध्याहृत धरताना दिसतात.

" स्त्रियांचे हृदय अति कोमल प्रीतीने भरलेले असते".[२०]

" स्त्रियांची प्रीती केवळ समुद्रासारखी खोल आहे".[२१]

" स्त्री तुम्हावर प्राणापेक्षा प्रीती करतेच ह्यात अंदेशा नकोच".[२२]

"स्त्री तुम्हावर सदा मनोधर्मापासून प्रीती करीत असताहि तुम्ही दुसरीवर नजर ठेवता." एके ठिकाणी तर त्या म्हणतात--" या जगात बायकोवर जसा नवरा प्रीती करील तशी आई वेगळी करून कोणि दुसरे करणार नाही."[२३]

ताराबाईंच्या ह्या वेळोवेळी केलेल्या विधानांवरून पति-पत्नी नात्यातील एक उत्कट प्रेमभावना त्यांनी कल्पिली होती असे दिसते, जी त्या काळात जीवनात फार दुर्मिळपणे व्यक्त होत असावी, असे वाटते.

स्त्री–पुरुष ही दोन अर्धुकं आहेत. त्यांच्या सहअस्तित्वानेच मानवी जीवनाला पूर्णत्व येते, अशी त्यांची धारणा असावी. कारण एके ठिकाणी त्या म्हणतात-

"हे सर्व सृष्टिमात्र त्या आदिमाया महाशक्तीने उत्पन्न करून या स्त्री जातीचे अंगी आपले सारखी चंचलता, सामर्थ्य देऊन हा संसाराचा गाडा तिलाच हाकण्यास लावले. . .अशी ही जाति एक प्रतिशक्तिच आहे. तिचे वाचून तुम्हास शोभा नाही. मोठेपणा, जय हे काहीच नाही. ज्या घरांत ती नाही ते स्मशानासारखे ओसाड दिसते. जेथे ती वास करील ती मोडकी तीन

वाशाची झोपडीसुद्धा एक मोठे शोभिवंत घवघवीत मंदिरच दिसेल !"[२४]

ह्या सर्व उद्‌गारांतून ताराबाई स्त्री-सत्तेची जाणीव ठसठशीतपणे मांडताना दिसतात. स्त्री-पुरुषांच्या मूलभूत कार्यकक्षा भिन्न आहेत व त्यानुरूप प्रवृत्तीप्रवृत्तीत निसर्गतः भिन्नता आहेत, हे त्या मानताना दिसतात. पण दोन्ही पक्ष सम-सामर्थ्याचे, समान उपयुक्ततेचे म्हणून परस्परपूरक आहेत. आणि म्हणून स्त्रीला तिची समान प्रतिष्ठा व पुरुषासारखे अधिकार मिळाले पाहिजेत. तिची कोणत्याही प्रकारची अवहेलना तिने स्वतःच खपवून घेता कामा नये. स्त्रीत्वाचा कोणताही न्यूनगंड तिच्यात असता कामा नये. स्त्रीत्व हे बंधन वा न्यूनत्व नसून तिचे ते सामर्थ्य आहे हे त्या पुन्हा पुन्हा सांगताना दिसतात.

वेगवेगळ्या संदर्भात त्यांनी काढलेले पुढील उद्‌गार पहा—

" जसा पुरुष तशी स्त्री किंवा पुरुष हे परस्पर आनंदासाठी परमेश्वराने निर्माण केले आहेत." [२५] किंवा "स्त्री ही अर्धांगी शक्ति आहे. पाहू बरे तुम्हाला अर्धांगवायू होऊन अर्धे शरीर जर गेले तर मग एका हाताने तुम्ही काय कराल ?" [२६] किंवा " ईश्वराने जोडा स्वेच्छेनेच नेमिला आहे. पहा पक्ष्यापासून तो निर्जिव झाडाझुडुपांत देखील त्याने स्त्री जाती निर्माण केली आहे. प्रत्येक गोष्टीला, जिनसेला दुसरा त्याचा जोडीचा मुकाबला असतो. जोडीवाचून कोणतेच काम नाही." [२७]

"पुरुषाला अनेक पत्नी करण्याचा अधिकार असेल तर स्त्रीला अनेक पती का करता येऊ नयेत ? किंवा बायकोने सति जायचे तर पुरुषाने पण का जाऊ नये ?" [२८] असाही सवाल त्या रोखठोकपणे उभा करतात. काही ठिकाणी पुढे जाऊन त्यांनी स्त्रिया ह्या पुरुषापेक्षा संसारात जास्त श्रेष्ठ आहेत असे पण म्हटले आहे.

" नवऱ्याचे प्राण परत आणायला एक सावित्री तरी गेलेली दिसते पण आपल्या पत्नीच्या साठी स्वर्गात तर काय पण त्या वाटेवर कोणी पुरुषाने पाऊल तरी ठेवलय कां ?" [२९] असे त्या विचारतात. पुढे तर त्या म्हणतात, की संसाराचा गाडा ओढायचा तर पुरुष मेलेला परवडतो पण बाई नाही हे सांगताना त्या लिहितात—

" तुमच्यापेक्षा ती सती गेल्याने फार नुकसान होईल. कसे म्हणाल, तर ती मेली म्हणजे तिच्यामागे तिची लहानलहान मुले असतात त्यांना कोणी सांभाळावे ? अरे, म्हण आहे 'घोडे फेरता बाप मरावा पण रहाटाने सूत कातणारी आई मरू नये.' बाप जर मेला तर ती आई पाहिजे तसे दुःख सोसून मुलांना पोशील पण तुम्ही आज ती मेली की उद्या दुसरी करून त्या मुलांस देशोधडी करता. याकरिता बायकोच्या आधी तुम्हालाच त्या कुंडात टाकावे !" [३०]

ताराबाईंचा हा युक्तिवाद वाचताना वाटते, की स्त्रीसमानतेच्या दाव्यातील त्या स्त्रीजातीच्या जणू वकीलच झालेल्या आहेत.

आतापर्यन्त आपण ताराबाई शिंद्यांनी स्त्री-पुरुष समानतेविषयी मांडलेले विचार पाहिले. स्त्रियांची स्थिती सुधारायची तर प्रथम ह्या पुरुषवर्चस्वाच्या भावनेचा बीमोड व्हायला हवा, हे इतक्या स्पष्टपणे तत्कालीन कोणत्याही सुधारकाने जाणलेले दिसत नाही व ते करण्याचा इतका प्रभावी प्रयत्नही कुणी केलेला दिसत नाही.

तो करताना ताराबाईंची भाषा अनेकदा आक्रमक झालेली दिसते. त्याबद्दल श्री. मालशे

म्हणतात–

"समाज रचनेतील पक्षपाताविरुद्ध ताराबाईंचे व्यक्तिमत्व इतके पेटून उठले, की हा आक्रोश काहीसा आक्रस्ताळ्या व रासवट स्वरूपात प्रगट व्हावा हे नैसर्गिकच !"[३१]

पुरुषवर्चस्व झुगारण्याच्या इतकेच शिक्षणाचे महत्त्व पण ताराबाईंनी ओळखलेले दिसते. त्या लिहितात–

"स्त्रियांना निरंतर बंदिवानासारखे गृहतुरुंगात कैदी करून ठेवलेत व जिथे तिथे आपलीच चढती कमान करून राव बनलेच.... त्यांना ना विद्या ना कुठे जाणे येणे"....[३२]

"तुम्ही असे अट्टल हुशार कोल्हे. तरी इंग्रज सरकारचे राज्य झाल्यापासून स्त्रियांना विद्यादान देऊन त्यांची मने नेहमी सर्व मानसिक व व्यावहारिक प्रसंगात धैर्याने रहाण्यास पुष्कळ तऱ्हेने बळकट झाली आहेत. त्यामुळे त्याचे हृदयात जे अज्ञान वसत होते ते जाऊन त्यांना आता आपले बरेवाईट, कोणाशी कसे वागावे, हा संसाराचा गाडा कसा हाकावा, स्वधर्म, पातिव्रत्य याविषयी चांगले समजू लागले व यामुळे आपले भरतखंडाची स्थिती काही दिवसांनी अगदी बदलून जाईल."[३३]

शिक्षणाचा अर्थ व उपयोग ताराबाईंच्या दृष्टीने काय होता हे वरील परिच्छेदातून स्पष्ट होईल. शिक्षण अर्थार्जनासाठी व पर्यायाने समान प्रतिष्ठेसाठी- हा आजचा विचार ताराबाईंच्या मनोविश्वात डोकावलेला दिसत नाही. उलट त्या अधिक मूलभूतपणे संसाराची अर्धी जबाबदारी पेलणारी म्हणून स्त्रीची समान प्रतिष्ठा गृहीत धरताना दिसतात व ही जबाबदारी शिक्षणाने स्त्री अधिक समर्थपणे पार पाडू शकेल, असा विश्वास व्यक्त करताना दिसतात.

स्त्रियांची आजची दयनीय स्थिती पालटायची असेल तर पुरुष श्रेष्ठत्वाची कल्पना मोडून काढणे, स्त्री-पुरुष समानतेचा आग्रह धरणे, स्त्रियांनी शिक्षण घेणे ह्या गोष्टींबरोबरच ताराबाई आणखी एका गोष्टीचा आग्रह धरताना दिसतात व ती गोष्ट म्हणजे कायद्याची मदत. स्त्रियांवरील अत्याचार दूर करणारे कायदे–मग ते परकीय राज्यसत्तेने केलेले असले तरी– अत्यंत आवश्यक आहेत असे त्यांचे मत दिसते.

त्या काळी वरवर उदारमतवादाचा आव आणणारे, इंग्रजांचे अंधानुकरण करणारे, तथाकथित सुधारक अनिष्ट रूढींबाबत कायदा करण्याचा विचार पुढे येताच 'परकी सरकारला आम्ही आमच्या धर्मात हात घालू देणार नाही. आमच्या सुधारणा आम्ही करू' असा युक्तिवाद पुढे करत.

तेव्हा अशा दांभिक धर्मरक्षकांना उद्देशून ताराबाई लिहितात–

"..... कोणी या दीन विधवांचा कैवार घेऊन यांचा पुनर्विवाह करावा असे पत्र लिहून सरकारासही विनंती केली. त्यावरून 'वैभव' रावास फार राग आला व इंग्रज सरकारने आमचे धर्मसंबंधी कामात अगदी हात घालू नये म्हणून बरीच ओरड केली. वैभवराव दुसरे तिसरे कोणी आहेत असे नाही, ते तरी पुरुषच."

आमचे धर्मात हात घालू नये, म्हणणारे तत्कालीन धर्माभिमानी इंग्रजांचे खाणेपिणे, वेषभूषा, रीतिरिवाज ह्यांचे सरासर अनुकरण करण्यात मात्र धर्मभ्रष्टता मानत नव्हते. त्याविरुद्ध आरडाओरड करत नव्हते. अशा धर्ममार्तंडांना ताराबाई विचारतात-

"त्यांच्यासारखे पोषाख करू लागलात..... त्यांचे जे भोजन म्हणजे मांसाहार व मद्य यांचा तर यथेच्छ उपभोग घेत आहात व त्यांचे सारिखे नित्य करण्यास झटत असताहि त्यांनी धर्मात हात घालू नये म्हणता ? आता धर्म तो कोणता राहिला आहे ?... त्यांच्यासारखे विजार, स्टॉकींग बूट घालून... तोंडात चुट्टा धरून... अभक्ष्य भक्षून, जी नाही ती अनन्वित कर्मे करून पुनः आम्ही धर्मरक्षक आहोत असे म्हणण्यास तुम्हास कांही लाज वाटत नाही काय रे ?- ..... पंचगव्य प्रायश्चित्त दिल्याने व एक नाही शंभर आंघोळी करून अंगास गोमूत्र लावल्याने तुमचे अभक्ष्य साठवलेले आतडेसुद्धा धुवून निघाले कां ? आता येथे कोठे धर्म रडतो ? तेव्हां या धर्मात सरकारने हात घालून, तुम्ही जो बाटली मधामृताचा खर्च करिता......तुमच्या भक्ष्यस्थानी..... अनेक पशुपक्ष्यांची आहुति पडते ते सरकार बंद करील.. तर किती चांगले होऊन धर्माचे रक्षण होईल बरे ?"[३४]

"अरे ज्यांनी तुमच्या देशास देशाची व मनुष्यास मनुष्याची कळा आणून.. दाखविले, पूर्वी तुम्ही माणसेच होता पण विद्याहीन मूर्ख. मारावे नि मरावे हेच तुम्हास ठाऊक. मराठेशाहींत जे बंड होते ते बंड मोडून तुम्हास विद्यादान कोट्यावधि रुपये खर्चून दिले, नानाप्रकारचे कलाकौशल्य, कायदेकानून..... कचेऱ्या दरबार करून स्वस्थता राखली......तुमच्या करता हे सारे सुखोपचार केले.... त्यांनी या धर्मात हात घालून अबलास सबला करून त्यांना तुमच्या या पोकळ धर्मरूपी यातनेतून न सोडवावे तर मग कोण सोडवील बरे ?[३५] .. पारखा पाय घराला अपाय हे म्हणणे अगदी रास्त आहे व ते कबूलही केले असते. पण केव्हा की जर या लोकांची कोणतीच चाल न घेता स्वधर्मासच अनुसरून वागता तर मग या दुर्दैवी विधवांना कधीच सुदैव प्राप्त होणे नाही, असे समजून त्या उगीच बसल्या... पण आता काय सगळाच मनु बदलून गेला आहे."[३६]

स्वतः आपल्या धर्माला विसरलेल्या ह्या पुरुषांना बायकांनी मात्र आपला सनातन पातिव्रत्य धर्म टिकवावा अशी अपेक्षा करण्याचा कोणताही नैतिक अधिकार नाही, असेच ताराबाई सूचित करत असाव्यात.

सुधारकांचा दुसराही एक वर्ग त्या काळी अस्तित्वात आला होता. स्त्रियांच्या परिस्थितीत सुधारणा व्हायला हवी, हे त्यांना मान्य दिसते. त्यासाठी सभा, चर्चा, भाषणे वगैरेपण ते घडवून आणत होते. पण प्रत्यक्ष कृती मात्र फारशी होतानां दिसत नव्हती, अशा बोलक्या सुधारकांची थट्टा व उपहास करायला पण त्या कचरताना दिसत नाहीत. अशा सभांविषयी त्या लिहितात–

"सभा भरली म्हणजे तेथे काय मोठी शालजोडी, लफ्फेदार पागोट्याचा झोक लावून डौलाने जाऊन पल्लाभर सुपारी, दहा गाडे विड्याची पाने, हार-तुरे, एक हौदभर गुलाबी अत्तराचा नाश करून घरी यावयाचे एवढेच काय ते. दुसरे काही नाही. अशा तुमच्या पोकळ सभा तर आज तीस-पस्तीस वर्षांपासून चालल्या आहेत. उपयोग काय ? तुम्ही तुम्हाला आपल्या ठिकणी धन्य मानून घ्या. पण पाहू गेले असता अजागल स्तनाप्रमाणे निर्जिव आहात !"[३७]

स्त्रियांना सतत तुच्छ लेखण्याकडे सोकावलेल्या तत्कालीन पुरुषवर्गाच्या दुटप्पी व पोकळ वागण्यावर टोला हाणण्याची एकही संधी ताराबाई सोडताना दिसत नाहीत.

स्त्रियांची परिस्थिती खरोखर सुधारायची असेल तर बदलत्या काळाला अनुसरून, वाईट रूढींच्या निराकरणासाठी ब्रिटिश कायद्याची मदत घेणे मुळीच चुकीचे नाही, असे जरी ताराबाईंचे मत असले तरी कायदे नेहमीच पुरेसे पडतात असे नाही ह्याचीपण त्यांना जाणीव दिसते. कायद्यातील, साक्षीपुराव्यांच्या आवश्यकतेमुळे स्त्री-पुरुष चोरट्या संबंधात पुरुष सटकून जाऊ शकेल व स्त्रीला न्याय मिळू शकत नाही, ही कायद्याची मर्यादापण त्यांनी बोलून दाखवली आहे.[३८] तरीदेखील एकंदरीत कायद्याची मदत उपयुक्त आहे, असा त्यांचा पं. रमाबाईंसारखाच दृष्टिकोन दिसतो. केशवपन बंदी कायद्याला विरोध करणाऱ्या पुणे वैभव-पत्रकर्त्याला उद्देशून त्या लिहितात–

" वैभव राव म्हणतात, की. . . . . विधवांच्या केशवपनाविरुद्ध कायदा केला तर बावनखणी सारख्या शेकडो गृहशाला व विजयालक्ष्मी थाटासारखे खटले तोडण्याकरता सरकारला अनेक नवी नवी कोर्टे तयार करणे प्राप्त होईल. तर बावनखणी सारख्या गृहशाला बांधण्याऐवजी सरकारास एकेकीकरिता एक एक लहानसे गोजिरवाणे घरच बांधावे लागेल व तुमच्याकरिता (पुरुष) बरीक टोलेजंग कारागृह करणे भाग पडेल !"[३९] पुनर्विवाहित स्त्रीच्या सुखी गृहजीवनाचे स्वप्न रेखाटणारा तो संपूर्ण परिच्छेदच वाचनीय आहे. पुरुषांच्या कामांध मुजोर वर्तणुकीचे वाभाडे काढून विधवा विवाह व केशवपन बंदी कायद्याचा त्या जोरदार पुरस्कार करताना दिसतात. विधवांना पुन्हा सौभाग्य मिळवण्यास धर्माने सुद्धा विरोध केलेला नाही असाही एक युक्तिवाद ताराबाई करताना दिसतात. सावित्रीचे उदाहरण देताना त्या लिहितात-"मागे कधी काळी कोणी तरी एखादी स्त्री आपले नष्ट झालेले अगर यमाने नेलेले सौभाग्य परत मागण्यास ब्रम्हदेवाजवळ गेली होती. तेव्हा तिला त्या सृष्टिनिर्मात्या 'भगवंतानी'--कोणत्याहि स्त्रियेस पुन्हा सौभाग्य तिचे हयातीत मिळणार नाही– असा काही दाखला (नियम) तरी दिलेला तुमच्या भारतात सापडतो काय ?"[४०]

सावित्रीला वैधव्य आल्यावर परमेश्वराने पुन्हा सौभाग्य दिले असे पुराणे सांगतात तर मग इतर विधवांना तो हक्क धर्माच्या नावाखाली नाकारण्याचा अधिकार नाही असा ताराबाईंचा युक्तिवाद दिसतो.

मात्र स्त्री-पुरुष समानतेचा मुद्दा जरी ताराबाई पुन्हा पुन्हा सिद्ध करत असल्या, तरी त्या पं. रमाबाईंप्रमाणे ठाम व्यक्तिवादी भूमिका घेताना दिसत नाहीत. "आपल्याला आवडेल त्या क्षेत्रात पुरुषाच्याप्रमाणे कर्तृत्व करण्यास स्त्रीला मोकळीक हवी". . . . .असा व्यक्तिवादी समानतेचा विचारही त्या मांडताना दिसत नाहीत. मातृत्व आणि गृहिणीपद ह्या तिच्या नैसर्गिक भूमिका आहेत, अशीच त्यांची स्त्रीविषयक भूमिका दिसते. आपल्या निबंधाचा शेवट करताना त्या लिहितात–

"पुरुष सदाचारी झाल्यास जगात आनंदी आनंद होऊन... घरोघर पातिव्रत्याचे निशाण उंच उडून, चन्द्राला देखील लज्जा आणील.... स्त्रियांनी आपल्या दृढ निश्चयाचे बळाने सदा अन्तर्बाह्य निर्मळ राहून पुरुष जातीस लाजवून खाली पहाण्यास लावावे. या वेगळे त्यांच्या लक्ष्मी ह्या नावास साजण्याजोगे दुसरे भूषण नाही. सदा पतिव्रता सदाचरणी बाण्याने दोन्ही कुलांत बिजलीप्रमाणे चमकत रहाण्याकरता, मुलाबाळांसुद्धा लक्ष्मीच्या पूर्ण वैभवात नांदवून

सौभाग्याचा मळवट कपाळी भरून संसाराचा शेवट गोड होण्याकरता जगन्नियंत्या परमेश्वराची प्रार्थना करून हा निबंध संपविते !"

ह्यातून त्यांची स्त्रीजीवनाच्या साफल्याविषयीची कल्पना काय होती हे स्पष्ट दिसते.

पातिव्रत्य हे मूल्य त्या मानताना दिसतात. शील हे स्त्रीचे भूषण आहे, हेपण त्या सांगताना दिसतात. संसार हे तिचे क्षेत्र आहे हा थोडासा पारंपरिक विचारही त्या मान्य करताना दिसतात.

तथापि, ह्या संसारात तिला सन्मान व प्रतिष्ठा असली पाहिजे, तिचे महत्त्व, श्रेष्ठत्व पुरुषवर्गाने जाणले पाहिजे, हा स्त्री-पुरुष समानतेचा मूलभूत विचार त्यांनी आग्रहाने मांडलेला दिसतो.

स्त्री व पुरुषाचे निसर्गदत्त कार्य व कर्तव्य वेगवेगळे असले तरी दोन्ही गोष्टी आपापल्या ठायी समान महत्त्वाच्या व परस्परपूरक आहेत. तेव्हा दोन्ही पक्षांनी परस्परांविषयी समान आदर ठेवला पाहिजे, समान निष्ठा जपल्या पाहिजेत, समान हक्क व समान बंधने स्वीकारली पाहिजेत अशी ताराबाईंची भूमिका दिसते.

स्त्रियांची बाजू घेऊन पुरुषवर्गावर ताराबाईंनी आपल्या लेखणीने जरी आसूड ओढले असले तरी स्त्रियांकडे त्या कोणत्याही स्वप्नाळू आदर्शवादी दृष्टीने बघताना दिसत नाहीत. स्त्रियांचे मूल्यमापनही त्या खूपशा वस्तुनिष्ठपणे करताना दिसतात.

" या जगातील सर्व स्त्रिया प्रखर सूर्याच्या तेजाप्रमाणे सतेज, अन्तर्बाह्य गंगाजलाप्रमाणे निर्मळ आहेत असे मुळीच नाही."[४१] अज्ञान, मूर्खपणा, अंधश्रद्धा, चंचलता, लबाडी, मत्सरीपणा, इ. अनेक दुर्गुण त्यांच्यातही दिसून येतात हेपण त्या नाकारताना दिसत नाहीत.

पण त्यांचा ह्याबाबतचा युक्तिवाद दोन प्रकारचा दिसतो. एकतर हे दुर्गुण स्त्रियांत जेवढ्या प्रमाणात दिसतात, त्याच्या कितीतरी पट अधिक ते पुरुषांत असतात व हे त्यांनी उदाहरणे देऊन सप्रमाण दाखवून दिले आहे.

दुसरा त्यांचा युक्तिवाद असा दिसतो, की ह्यातले बरेचसे दुर्गुण त्यांच्यामध्ये येण्याला कारणीभूत आहे ती पुरुषप्रणित मूल्यव्यवस्था, व स्त्रियांच्या वाट्याला आलेली असहाय्य निराधार परिस्थिती. त्यामुळे ह्या दोषांचे खापरपण पुरुषाच्याच माथी बसते. अतएव स्त्रियांना नावे ठेवण्याचा, हीन लेखण्याचा कोणताही अधिकारी पुरुष वर्गाला नाही.

ह्याविषयी पुरावे देताना एकेठिकाणी त्या विचारतात—

" स्त्रिया अविचार कर्माचे नगरच तर स्त्रियांचेच हातून अविचार घडतात ? आणि तुम्ही पाजी, बेईमान, केसानी गळा कापणारे जे तुम्ही.... अरे तुम्ही महापढीक शहाणे... . तुमच्या हातून न भूतो न भविष्यति असे अविचार घडत असताहि तुम्ही मोठे विचारी म्हणवता. याला काय म्हणावे ?"[४२]

" स्त्री कितीहि बेशरम असू द्या-- ती आपणहून परपुरुषाच्या गळ्यात पडणार नाही. प्रथम तिला तुम्ही आपला थोडासा दुर्गुण दाखवून एकदा सृष्टीचा वारा दाखविलात म्हणजे पुरे. मग तिला पुढे दुर्गुण शिकवण्याकरता पंतोजी नको..... कोणीहि स्त्री अगर पुरुष, ज्या मार्गात अथवा व्यापारात पडतो तो देखत देखत शिकत शिकत त्यात हुशार, निपुण होतो. ज्या मालाचा

खप होतो तो माल तयार करण्याकरता जो तो झटतो. पण त्याच मालाला कोणी फुकट न पुसते तर तो माल कोणीच तयार न करते. तसे तुम्ही रांडांकडे न जाता, लग्नकार्यात, दलशे, पानसुपारी प्रसंगी शेकडो रुपये देऊन चाहून न आणता..... तर त्यांचा इतका फैलाव झाला असता का ?. ... एकदा दुर्गुणाचा वारा लागला म्हणजे कोणतेहि साहस पुरुष किंवा स्त्री करतेच !"[४३]

"जे दोष स्त्रियांचे अंगी आहेत ते पुरुषांत अजिबात नाही काय ? जशा बायका लबाडी करितात तसे पुरुष करीत नाहीत का ? चोरी, शिंदळकी, खून, दरोडे, दगाबाजी, सरकारी पैसा, लाच खाणे, खऱ्याचे खोटे यातून एकहि अवगुण पुरुषात नाही काय ?"

"स्त्री अशिक्षित असल्यामुळे हरएक प्रकारचे संशय त्यांचे मनात वास करतात. तरी त्यांच्या मनातला संशय फक्त त्यांच्या संबंधापुरताच मर्यादित असतो. पण तुमच्या मनातले संशयाचे चक्र जर पाहू गेले तर तुमची मने देशी-परदेशी, मानसिक-व्यावहारिक दगाबाजीने संभ्रमित असतात.

"आज अमक्या सावकारास अशी थाप देऊन त्याचे जवळून एक हजाराचा तोडा उपटावा, अमूक एक जहागिरदारास असे कळवून हजार पाचशे हबकावे. आज साहेबाला असे सांगून अमूक खटल्याचा निकाल अमूक तर्फे करावा....."[४४]

अशा प्रकारे पुरुषांच्या लबाडीचे वर्तमानातील सज्जड पुरावे देत स्त्रियांवरील आरोपाचे खंडण त्यांनी केले आहे.

स्त्री हीच स्त्रीची शत्रू असते. त्यांच एकमेकींचा छळ करतात, असा युक्तिवाद अनेकदा सासू-सून संदर्भात आजही केला जातो. पण सासूच्या सुनेशी असणाऱ्या वर्तनाला, पुरुषप्रधान समाज व्यवस्थेने शिकवलेली मूल्यव्यवस्था व स्त्री म्हणून दिलेली प्रतिष्ठा-शून्यताच कारणीभूत असते. हे आज जाणवणारे सत्य ताराबाईंनी त्या वेळीच जाणले असावे असे वाटते. एका वेगळ्या संदर्भात त्या सांगतात—

"स्त्रियांचा स्वभाव हेवेखोर व भोळा असल्याने... संतति, संपत्ति व नवऱ्याची प्रीति संपादन करण्याकरता त्या काय काय करतील सांगता येत नाही.... कानफाटे बैरागी, भोंदू स्त्रियांना फसवतात. शनिवारी काळोख्या रात्री न्हाऊन वस्त्ररहित अकरा मारुतिचे दर्शन घे... अशा प्रकारचे थोतांड ऐकून त्यावर भरवसा बसून, अशाप्रकारचे साहस फक्त 'मुलाच्या आशेने व नवऱ्याची मर्जी आपणाकडे निरंतर रहावी' ह्या हेतूने करतात."[४५]

त्या काळी स्त्रियांना नवरा व मूल असणे हे दोनच आधार सामाजिक व कौटुंबिक प्रतिष्ठेसाठी व सुखप्राप्तीसाठी उपलब्ध होते. तिची व्यक्तिगत हुशारी वा कर्तृत्व ह्याला स्वतंत्रपणे किंमत नव्हती. विधवा, परित्यक्ता किंवा वांझ असलेल्या स्त्रीच्या जीवनाला पोतेऱ्याइतकी किंमत नव्हती. सहाजिकच मूल व्हावे म्हणून ' विशेषतः मुलगा ' व नवरा आपल्या अंकित असावा म्हणून स्त्रिया बुवाबाजी, जादूटोणा, मंत्र तंत्र इ. वाटेल त्या अंधश्रद्धांना बळी पडत असत.

हे वास्तव ताराबाई वरील उद्‌गारांतून सूचित करत आहेत असे दिसते. पुढे त्या म्हणतात—

"त्या मूर्ख अज्ञानी आहेत. तुमच्या सारख्या अट्टल शहाण्या असून मनाप्रमाणे सर्व सुखात असूनहि जर असे करत्या तर मग त्यांना दोष देणे बरोबर होते !"

स्त्रियांवर चंचल, स्खलनशील असल्याचा आरोपही नेहमी केला जातो. त्याबाबत ताराबाई म्हणतात- "सकल दोषांचे निधान प्रथम तुम्हीच. तुम्हीच स्त्रियांस दोषपात्र होण्यास कारणीभूत होता. कित्येक बाप आपल्या नक्षत्रासारख्या दहा-अकरा वर्षांच्या मुली ऐंशी- नव्वद वर्षाचे श्रीमंत म्हाताऱ्यास रुपयाची थैली घेऊन..... नवरा मेला तरी...... खाईल पिईल. पैशाची चिंता नाही...... म्हणून बेधडक देता. मग तिने नवरा मेल्यावर कोणाचे बळावर तरुणपणाचे प्रज्वलित इंगळ पदरांत वागवून दिवस काढावे बरे ? कोणी सवतीवर मुली देतात. पण सवतीसारखे स्त्रियांस निरंतर काट्याप्रमाणे सलणारे दुसरे शस्त्रच नाही. कोणाला लेकी फार असल्याने आल्या वरास देतो. मग तो कसा का असेना. कोठे नवरा कुरूप, दुर्गुणी, हीनवर, अतिशय जाच, मार, खाण्यापिण्याचे हाल करणारा असला तरी त्याच्या स्वाधीन करतात.... तेव्हां ह्या अशा कारणामुळे स्त्रिया निघून गेल्या तर दोष त्या बापाचा की लेकीचा ?"[४६]

स्त्रियांच्या मूर्खपणाबद्दलही त्या लिहितात-- " स्त्रिया केवळ गोठणातील म्हशीप्रमाणे मूर्ख. त्यांना ना लिहिणे ना वाचणे. का ईश्वराने त्यांना काहीच बुद्धि दिली नसेल कां ?"[४७] स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवून वर मूर्ख म्हणून हिणवणाऱ्या पुरुषवर्गाला त्या म्हणतात--

" स्त्रिया अविचारी असूनहि तुमच्यापेक्षा बऱ्या. तुम्ही शहाणे आहात खरे, पण इकडे कारागृहांत जाऊन पहावे तो पाय ठेवण्यास जागा मिळत नाही. इतकी तेथे आपल्या देशबांधवाची दाटी. कोणी खोट्या नोटा केल्या म्हणून, कोणी लाच खाल्ली म्हणून, कुणी कुणाची बायको पळवून नेली म्हणून, कोणी बंडात सामील, कोणी कोणाला विषप्रयोग केला, कोणी राजद्रोह केला, कोणी खोटी साक्ष दिली, खून केले, तोतये राजे बनून लोकांस गंडविले-- ही अशी मोठीमोठी विचाराची कामे केल्यावरून सरकारने तुम्हाला मोठ्या आदराने त्या सुंदर बंदिशाळेसारख्या रंगमहालात जागा दिली. पण असे अविचार कोणते स्त्रियांचे हातून घडतात बरे ? तुमची दोन--तीन हजार मंडळी-- त्यांत फार झाले तर शंभर देखील बायका निघणार नाहीत.[४८]

अशाप्रकारे, युक्तिवाद करून ताराबाई, पुरुष हा दुर्गुणात स्त्रियांच्या पेक्षा जास्त पुढे असल्याचे दाखवून पुरुष श्रेष्ठत्वाच्या अहंकाराला शह देताना दिसतात.

हे करताना पुरुषांच्या मानसिकतेची, समाजातील त्यांच्या व्यवहारांची, व्यवसाय़ातील कपटकारस्थानांची, जी जाण ताराबाई दाखवतात ती विशेष नोंदवावीशी वाटते.

ताराबाईंची स्त्रीविषयक समानतेची भूमिका ही अशी वस्तुनिष्ठ व अनुभवसिद्ध पायावर उभी असलेली दिसते.

* *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
नि बंध
वा. क्र. ३४८८
२८६२१०
८/७/०२
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# संदर्भ सूची

१. आमच्या आयुष्यातील आठवणी : रमाबाई रानडे, पृष्ठ, ४१-४२
२. स्त्री-पुरुष तुलना: प्रस्तावना, मालशे, पृष्ठ ५
३. कित्ता : पृष्ठ १५
४. कित्ता : पृष्ठ १६
५. कित्ता : पृष्ठ ७-८
६. कित्ता : पृष्ठ ५
७. कित्ता : पृष्ठ ३६
८. कित्ता : पृष्ठ ८
९. कित्ता : पृष्ठ १०
१०. कित्ता : पृष्ठ २२
११. कित्ता : पृष्ठ २७
१२. कित्ता : पृष्ठ ३२
१३. स्त्री-पुरुष तुलना : पृष्ठ ३२
१४. कित्ता : पृष्ठ ३
१५. कित्ता : पृष्ठ ३
१६. कित्ता : पृष्ठ ४
१७. कित्ता : पृष्ठ ९
१८. कित्ता : पृष्ठ २१
१९. कित्ता : पृष्ठ २१
२०. कित्ता : पृष्ठ ३३
२१. कित्ता : पृष्ठ ३३
२२. कित्ता : पृष्ठ ३४
२३. कित्ता : पृष्ठ २०
२४. कित्ता : पृष्ठ ३६

२५. कित्ता : पृष्ठ ८
२६. कित्ता : पृष्ठ ३६
२७. कित्ता : पृष्ठ ६
२८. कित्ता : पृष्ठ २०
२९. कित्ता : पृष्ठ ८
३०. कित्ता : पृष्ठ २०
३१. कित्ता : पृष्ठ २३
३२. कित्ता : पृष्ठ ८
३३. कित्ता : पृष्ठ १२
३४. कित्ता : पृष्ठ १२
३५. कित्ता : पृष्ठ १४
३६. कित्ता : पृष्ठ १३
३७. कित्ता : पृष्ठ ६
३८. कित्ता : पृष्ठ ३२
३९. कित्ता : पृष्ठ १४
४०. कित्ता : पृष्ठ ८
४१. कित्ता : पृष्ठ १८
४२. कित्ता : पृष्ठ १८
४३. कित्ता : पृष्ठ २७
४५. कित्तां : पृष्ठ १७
४५. कित्ता : पृष्ठ २५-२६
४६. कित्ता : पृष्ठ २०-२१
४७. कित्ता : पृष्ठ १८
४८. कित्ता : पृष्ठ १८-१९

प्रकरण ३ रे

# ताराबाईंचे कर्तृत्व

आतापर्यन्त आपण ताराबाईंची स्त्रीविषयक भूमिका काय होती, ह्याचा त्यांच्या निबंधाच्या आधारे, आराखडा मांडला.

आता ह्यापुढे त्यांच्या कर्तृत्वाचे स्वरूप काय ? त्यांचे वेगळेपण कशात आढळते, ह्याचा थोडासा शोध घ्यायचा आहे.

ह्यादृष्टीने आपल्याला उपलब्ध असलेली माहिती विचारात घेता, प्रथम जी गोष्ट जाणवते ती ही, की स्त्रीसमानतेचा हिरिरीने त्यांनी आपल्या निबंधातून पुरस्कार केला असला तरी त्या पं. रमाबाईसारख्या कृतिशील (activist) स्त्री मुक्तिवादी दिसत नाहीत. त्यांनी स्त्रियांच्या काही चळवळी सुरू केलेल्या वा काही मंडळे, संस्था स्थापन केलेली ऐकिवात नाही.

त्यांना स्वतःला वैवाहिक जीवनात सुख नव्हते असे जाणवते. पण त्यांनी स्वतः नवरा सोडलेला दिसत नाही. ते धैर्य पुढे रखमाबाईंनी दाखवायला आणखी काही वर्षे उलटावी लागली. पण त्यांच्या काळाच्या संदर्भात विचार करता, स्त्री जातीच्या दुःखाची इतक्या मूलभूतपणे व तर्कशुद्धपणे मीमांसा करणे, तिच्या दुःखाला कारणीभूत होणाऱ्या पुरुषवर्गाचा तीव्र शब्दांत धिक्कार करणे, असा झणझणीत भाषेतला निबंध छापणे ह्या गोष्टीदेखील कृतिशीलतेचाच एक प्रकार मानता येईल.

प्रस्तावनेतील– "मी सर्वदा स्वजाती कल्याणार्थ झटून, त्यांचे मनात सदाचरणाचे बीजारोपण करीन", ह्या शेवटच्या वाक्यातून त्यांनी शब्दनिष्ठ चळवळीचा वसा घेतलेला दिसतो.

"झांशीच्या राणीसारख्या फार नकोत पण एक चार-पाचशे स्त्रियांना निःसंग होऊन हातात संगिनी घेऊ द्यात. मग पहा तुमची दुर्दशा कशी उडेल ती, मग चुलीजवळ सुद्धा लपण्यास जागा मिळणे कठीण."[१]

इंग्रजी राज्यात स्वतःला कलमबहाद्दर समजणाऱ्या पण ताराबाईंच्या मते भाकरी बहाद्दर

असणाऱ्या, भेकड पुरुषांना उद्देशून ताराबाईंनी म्हटलेल्या ह्या वाक्यातून स्त्रीशक्ती जागृत करून अन्यायाविरुद्ध उभे ठाकण्याची प्रेरणा त्या देत आहेत असे वाटते.

प्रस्तावनेतील आणखी एक वाक्य फार बोलके आहे. त्या म्हणतात—

"तुम्ही (पुरुष) एकसारखे दगाबाज, कपटी आहात. एकमेकांचे झाकून नेता. ते उघडे करून दाखविण्याला याच्याहि पेक्षा कडक जर दुसरे शब्द अगर भाषा असती तर ती देखील लिहिली असती !"

ताराबाईंच्या निबंधाची भाषा खूपच आक्रमक व झणझणीत आहे हे आतापावतो लक्षात आले आहेच. भाषेच्या बाबतीत शालीनतेच्या, कुलीनतेच्या पारंपरिक मर्यादा, त्यांनी झुगारून दिलेल्या दिसतात. 'मी स्त्री - अमुक शब्द माझ्या तोंडी कसा शोभेल ?' हा संकोच त्यांच्या लेखनात नाही. नालायकाला नालायक, नादान, भेकड कोणतेही विशेषण जाहीरपणे त्या लावताना दिसतात. पण सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे पुरुषांच्या कामुकतेबद्दलही ह्याच धीटपणाने लिहिताना दिसतात.

व्यसनी व्यभिचारी नवऱ्यांस तुरुंगात टाकावे हे सांगताना त्या म्हणतात—

"त्या विशाल चिरेबंदी कोटात ह्या व्याघ्ररूपी, कामांध, मद्यप्राशनाने धुंद व मांसाहाराने तुंद झालेल्या बोकडास नेऊन साठवील तर सरकारास थोड्या खर्चात लक्षावधी नरपशूपासून कामे घेता येऊन... खजिना भरण्याची एक पर्वणीच येईल.[२] पुरुषाच्या प्रबळ कामवासनेला घुबड सुध्दा अप्सरा वाटते.[३] तुम्ही आपले मदोन्मत्त कामगज कर्दळीवनात सोडून पायाखाली तुडवू नका."[४] पुरुषांच्या लंपट, मस्तवाल वृत्तीचे वर्तन अशा शब्दांत करताना वाचणारे काय म्हणतील... हा संकोच त्यांना वाटलेला दिसत नाही. इतकी त्यांची ह्या तीव्र लेखनाच्या गरजेवरची निष्ठा पक्की दिसते.

चार पुरुष एकत्र जमले असता कशी कपटं रचित असतात, कशी असभ्य भाषा वापरत असतात- त्याचेही निःसंकोच वर्णन त्या करतात. त्या लिहितात—"पाच-सहा मूर्ति एके ठिकाणी मिळालात म्हणजे काय. काहो ते फलाणे आताशी मामलतीचा फारच डौल दाखवतात, एकदा नक्शा खाली होईल तर बहार आहे. ते अमके राव आताशी बरेच जमलेत. गाढवीच्याला खायला मिळत नव्हते पण आता शिंदळीचा दोन घोड्यांच्या बग्गीत फिरतो."[५]

ताराबाईंचा हा बेधडकपणा त्या काळच्या स्त्रियांत दुर्मिळ दिसतो.

स्त्रीच्या लैंगिक गरजांकडेही ताराबाई अशाच निरोगी धीटपणे पहाताना दिसतात. पुनर्विवाहाचा पुरस्कार करताना त्या म्हणतात—

"अहो पुनर्विवाह न करण्याची चाल महान रोगाप्रमाणे अनेक ठिकाणी अनेक जातीत पसरली आहे. त्यामुळे... स्त्रिया वैधव्याचे असह्य दुःख कसे कसे भोगीत असतात व त्यापासून कसे कसे अनर्थ होतात, याची कल्पनासुद्धा करिता येत नाही. कारण मनोनिग्रह करून मनुष्य वस्तीत राहून स्त्रीधर्मरक्षण होणे नाही... एक केशवपन केले व दुसरे कुंकू पुसून सर्व सौभाग्य हिसकून घेतले म्हणून काय झाले ? सर्व बाह्य प्रकारांनी नागवले तरी अंतर कोण नागवेल ?"[६]

स्त्रीच्या नैसर्गिक कामना अमानुष रूढींच्या दाबाखाली दडपून टाकू पाहणाऱ्या पुरुष

वर्गाला त्यांनी असा अगदी सरळ व तर्कशुद्ध सवाल केला आहे. शरीरसुखाची इच्छा पुरुषांप्रमाणे स्त्रीलाही तितकीच महत्त्वाची असते. हा त्या काळातल्या दृष्टीने 'अवाच्य' वाटणारा मुद्दा ताराबाई अगदी सरळपणे प्रतिपादन करताना दिसतात !

स्त्रीच्या दैहिक गरजा समाजाने त्या काळांत संपूर्णपणे दुर्लक्षिलेल्याच होत्या. त्याकडे ताराबाई लक्ष वेधतात. त्या म्हणतात—

"पुरुषाविरहित स्त्रियांस तरी कसे सुख होईल बरे ? जी तुमची दशा तीच तिची ! तिलाहि किती मोठ्या ऐश्वर्यात, एकटी ठेवा म्हणजे पहा तिची कशी दशा होते ती !"[७]

स्त्रीच्या एकनिष्ठतेबाबतही त्या अतिशय व्यावहारिक प्रश्न उभा करतात-

"तुम्ही तिला रोज पाहिजे तशी वाटेल त्याप्रमाणे वागवून पुनः तिने नेकीनेच रहावे असे म्हणाल तर कसे होईल ? मग बरी किंवा वाईट वागणूक स्वाभाविकच उत्पन्न होते. तुम्हास एक लुच्चा भेटला तर तुम्ही दसपट लुच्चे होता की नाही ?"[८]

स्त्रीला घरात वाईट वागणूक असेल तर तिचे मन घराबाहेर घोटाळणे स्वाभाविक आहे. इतका व्यवहारी विचार ताराबाई धीटपणे मांडताना दिसतात. आणखी एके ठिकाणी त्या दैहिक आकर्षणाबाबत स्त्री-पुरुषांची तुलना करताना म्हणतात- "स्त्री अशी तुमच्यासारखी एकाला हात व दुसऱ्याला लाथ देणार नाही. ती एकच धरील. पण ते तिच्या मनासारखे मात्र पाहिजे. तसे नसेल तर उगीच कशी जरी भूक लागली तरी काट्या भरणार नाही. पण तुम्ही वेळ पडली तर अगदी कुरूप घुबडसुध्दा सोडणार नाही."[९]

ह्याहूनही पुढे जाऊन त्या स्त्रीच्या नैसर्गिक भुकेचे कसे समर्थन करतात ते पहा—"श्रीमंत वा राजे अतिशय दुर्वर्तन करणारे असून वर्ष-वर्ष सहा-सहा महिने त्यांना घरची राणी किंवा बायको इचे दर्शनच नसते. ह्यामुळे बायकांना किंवा राण्यांना सुख म्हणून अगदी नसते. मग त्यांनी काय करावे ? तेथे त्या सदा ऐश्वर्यात. खाण्यापिण्याचे तर पहाणे नकोच. मग त्यांनी त्या कुसुमचापास कोणत्या रीतीने आवरून धरावे ? आई जेवू घालीना बाप भीक मागू देईना असे जेव्हां होते तेव्हां त्या मग डुकरीसारखे शेतखान्यातून तोंडे खुपशितात. या दोषास कारणभूत तुम्हीच."[१०]

नैसर्गिक वासनांचे अस्तित्व—त्यांच्या पूर्तीची गरज व त्या अनैसर्गिकपणे दाबल्यास अनीतिकारक वर्तन होणे स्वाभाविक आहे. हे स्त्री-पुरुषांत दोघांतही सारखेच आहे. एवढा sex बाबतच धीट पुरोगामी विचार १९ व्या शतकात एक स्त्री मोकळेपणाने मांडते, ही गोष्ट खरोखर आश्चर्यकारक वाटते. कारण तो काळ म्हणजे पेशवाई अस्तंगत झाल्यानंतरचा काळ. 'शिमगा झाला पण कवित्व मागे उरले', अशी थोडीशी अवस्था झाली होती. एकीकडे कसबिणी, कलावंतिणी, तमासगीर, देवदासी वगैरेंच्या द्वारे पुरुषांचा अनैतिक देहभोग राजरोस चालू होता. तर दुसरीकडून संतवाङ्मयाच्या प्रभावामुळे व नैतिकतेच्या कृत्रिम अतिरेकाने लैंगिक गरजा ह्या सर्वस्वी त्याज्य व लज्जास्पद मानल्या जात होत्या. त्याविषयी मध्यमवर्गीय समाज तर अतिशय गुप्तता बाळगीत असे. त्याविषयी चर्चा तर असंभाव्य गोष्ट मानली जात होती. अशा काळात ताराबाई ह्या गोष्टींची जाहीरपणे आवश्यकता प्रतिपादन करतात. तीसुद्धा अगदी धीट

शब्दांत, ही गोष्ट खरोखरच विस्मयकारक वाटते.

वैवाहिक नात्यात समान अपेक्षा त्या गृहीत धरतात. त्या म्हणतात-

"तुम्हाला जशी वाईट कुरूप, दुर्गुणी, घाणेरडी, गावंढळ बायको आवडत नाही, तसा बायकोला तरी या मासल्याचा नवरा आवडेल कां ? जशी तुम्हाला बायको चांगली पाहिजे तसा तिला चांगला नवरा नको कां ?"[११] वेश्यांबाबतही त्यांचा दृष्टिकोन निरोगी व व्यवहारी आहे. त्या म्हणतात–

"कसबिणी वेगळ्या करा. त्यांची गोष्ट निराळी. त्यांचा तो एक व्यापाराच झाला. त्या यजमानांचे मर्जीप्रमाणे न वागल्या तर उद्या उपाशी मरतील !"[१२]

ह्या सर्व उताऱ्यांवरून ताराबाई लैंगिक संबंधाकडे तत्कालीन गुप्ततेचा बुरखा झटकून वास्तववादी व समानतेच्या नजरेने बघून मनमोकळेपणाने चर्चा करताना दिसतात.

ताराबाईच्या लेखनातून जाणवणारे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी स्त्रीतील 'मादी'-पणाचा पण स्वच्छपणे स्वीकार केलेला दिसतो. त्या लिहितात–

"स्त्री जात हीच मूर्तिमंत मोहिनी आहे. स्त्री ही नखशिखान्त मोहनाने भरलेली आहे. तिचे प्रत्येक अवयव, तिचा आवाज, चालणे-बोलणे यांत पावलोपावली ती दुसऱ्याचे मन आकर्षून घेणारा लोहचुंबक आहे. तिला पहाताच जशी मधमाशी मोहळाला लुब्ध होते तसेच पुरुष मात्र तिला लुब्ध होऊन भुलून जातात. यांत स्त्रियांचा काय दोष बरे ?"

पुरुषाला निसर्गतः वाटणारे हे स्त्रीत्वाचे आकर्षण ही तिची एक नैसर्गिक शक्तीच आहे. त्या शक्तीच्या बळावर ती पुरुषाला संसारात बांधून ठेवते.

एके ठिकाणी ताराबाई लिहितात–"एकट्याने तुम्ही प्रपंचाचे शेत नांगरू शकाल का ? स्त्रीविरहित अगदी संन्यस्त वृत्तीने एक-दोन महिने तरी राहू शकाल कां ? स्त्री जर तुम्हासोबत नसली तर तुम्हाला जोड्याजवळ देखील उभे करण्यास तुमचे काका, बाप मागे सरतात... प्रत्यक्ष रामचंद्रजींचे देखील सीताविरहित, अगस्तीने दर्शन घेतले नाही. कारण प्रत्यक्ष शक्तीच ... रावणाने नेली... प्राणघातक शस्त्रांनी तुम्ही कदाचित जय धार्जिणा कराल पण ही यःकश्चित अबला हिच्या एका नेत्र कटाक्षाने तुमचे सर्व शौर्य, तेज, वीरश्री गळून जाऊन लागलेच तिच्यापुढे कुत्र्यासारखे पाय चाटावयास धावता.... तेव्हां आता जास्त पराक्रमी कोण ?

"अशी ही स्त्री तुम्हाला जिकडून सुख होईल ते करण्यास सर्वदा तयार, तिला तुम्ही नाना प्रकारचे दोष देऊन पृथ्वीतलाचे तळी घालू पहाता याची तुम्हास काहीच लाज वाटत नाही का रे ?"[१३]

ताराबाईचा आणखी एक पैलू ह्या निबंधातून जाणवतो व तो म्हणजे अंधश्रद्धांविषयी त्यांनी उडवलेली टर

मुलं होण्यासाठी सांगितले जाणारे नवससायास (पान २६), चमत्कार करणाऱ्या साधु-महंतांची बुवाबाजी (पान २४), परदेशगमन, अभक्ष्य भक्षण, इ. करून पंचगण्याने शुद्ध होण्याचा दांभिकपणा, इत्यादींवर ताराबाईंनी ज्या उपरोधिक व खमंग शैलीत फटकारे ओढले आहेत, ते वाचून त्या काळातही बाई चिकित्सक व बुद्धिनिष्ठ भूमिकेवर बऱ्याचशा जाऊन

पोहोचल्या होत्या हे दिसून येते. त्याचे काही नमुने पहा–

"अरे गोसावी, फकीर, हरदास, ब्रह्मचारी, साधु, दुधाहारी, गिरीपुरी भारती, कानफाटे जोशी, जटाधारी, नंगे वनून... अंगास भस्म फासून व डोकीस जटा वाढवून, हे सर्व जग कपटाने भोंदीत फिरताना–हे कोण तर रामगीर बुवा, हे कोण शास्त्रीबुवा, हे कोण गणपतबुवा फलटणकर, महासाधु–हे नानकपंथी, काय बुवाची योग्यता ! किती सांगावी,... बुवा मंत्रदायक आहे, हे एकाने म्हटले म्हणजे पुरे. मग बुवाचे... प्रस्थ लांबत चालते... बुवा नित्य पंच-पक्वांनांचा खुराक खाऊन बोक्यासारखे ताजे बनतात... 'राधा'रूपी शिवहरी बुवांचे मुखात वसतो. नेत्रात या नूतन केतकीचे सुहास्य मुख व अंतर्यामी दामाजीचा निजध्यास लागून बुवा धड ना वेडे धड ना शहाणे होऊन जातात.[१४]

"हे कोण ब्रह्मचारी– तिकडून काशीहून आलेत... महाप्रतापी, बरोबर पालखी-मेणे, दहाबारा तुळतुळीत शिष्यमंडळी. एक सांगणार परवा उजाड गावच्या पाटलाला मूल नव्हते.. बुवानी विभूति दिली मात्र- झाला त्याला मुलगा... कोणाचा कसा का रोग असेना यांचे दर्शन झाले की - सर्व नाहीसे होते... असे एकाने सांगितले की मग पुढे 'वाढवा'. म्हणून या जगाला सांगणे नकोच,- पण बुवांचे अन्तर्यामी कोणी पाहील तर तेथे स्त्री व धन- यांच्या लोभाचे दोन प्रज्वलीत जाळ दृष्टीस पडतील."[१५]

"अरे गळ्यात तुळशीची माळ घालून... श्री विठ्ठलाचे गुण वर्णित हरदास म्हणजे प्रतिष्ठित भिकारी होऊन फिरता ना ?"

"अरे तुम्ही संन्यास दीक्षा घेता ना ?... भगवी वस्त्रे व हाती कमंडलू घेऊन हे जग प्राणीमात्र नारायणासारखे मानिता ना ? पण जेव्हां गंगाटाकी.... स्नान करून.... अंगास दोन शेर विभूति फासून... नारायणाच्या नामाचा जप करीत बसता तेव्हां घाटावरचे पहिले पायरीवर पायातील जोडव्यांचा आवाज झाल्याबरोबर तुमची नजर वरच्या साठाव्या पायरीवर का जाते ? त्यावेळेस तर गोमुखी हातातून पडून बुवांची एकच गडबड होऊन नारायण एकदम मुखातून पळ घेतात. मग स्त्रीरूपी नारायण बुवांचे मुखीत जाऊन बसतो."[१६]

ताराबाईंच्या चिकित्सक वृत्तीतील वेगळेपणाचा आणखी एक आविष्कार आपल्याला जाणवतो, तो त्यांनी केलेल्या तत्कालीन ललित साहित्याच्या स्त्रीवादी समीक्षेत.

आपल्या पुरुषप्रधान समाज व्यवस्थेत जे साहित्य निर्माण होते त्यातील स्त्रीचित्रण हे पुष्कळदा अवास्तव असते. पुरुषप्रधान संस्कृतीला जशी 'स्त्री' अपेक्षित असते तिचे उदात्तीकरण करणे, पुरुषाला सुखकारक होईल असे स्त्रीचे चित्र रंगवणे, असे प्रकार घडताना दिसतात आणि म्हणून त्यावर आक्षेप घेणे- अशा लेखनाची चिकित्सा करणे, असा दृष्टिकोन आपण 'स्त्रीवादी समीक्षा' ह्या प्रकाराने व्यक्त करतो.

आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे हीच भूमिका ताराबाईंनी १०० वर्षांपूर्वी तत्कालीन ललित साहित्याच्या संदर्भात घेतलेली दिसते.

ह्याचा सविस्तर विचार आपण पुढच्या प्रकरणात त्यांच्या वाचन व लेखनाच्या संदर्भात तपशिलाने करू.

ताराबाईंच्या उपलब्ध माहितीतून व लेखनातून दिसणारा त्यांच्या वैचारिक कर्तृत्वाचा आराखडा हा असा दिसतो.

* *

# संदर्भ सूची

१. स्त्री-पुरुष तुलना: पृष्ठ ९
२. कित्ता : पृष्ठ १५
३. कित्ता : पृष्ठ २३
४. कित्ता : पृष्ठ ३६
५. कित्ता : पृष्ठ २५
६. कित्ता : पृष्ठ १
७. कित्ता : पृष्ठ ६
८. कित्ता : पृष्ठ ११
९. कित्ता : पृष्ठ ३४
१०. कित्ता : पृष्ठ २१
११. कित्ता : पृष्ठ २२, २३
१२. कित्ता : पृष्ठ २८
१३. कित्ता : पृष्ठ ७
१४. कित्ता : पृष्ठ २३, २४
१५. कित्ता : पृष्ठ २४
१६. कित्ता : पृष्ठ २४, २५

प्रकरण ४ थे

# ताराबाई - एक व्यक्ती

आतापर्यंत आपण ताराबाईंच्या लेखनाच्या आधारे त्यांची, स्त्रीविषयक भूमिका काय होती, त्यांचे स्त्रीजीवनाच्या संदर्भात कर्तृत्व व वेगळेपण कुठे कुठे जाणवते ह्याचा विचार केला. आता शेवटी 'एक व्यक्ती' म्हणून त्या कशा दिसतात, ह्याचा थोडा शोध घेणार आहोत.

त्या काळच्या तुलनेत ताराबाईंच्या वाट्याला खूप वेगळे जीवन आलेले दिसते. वडिलांमुळे नुसते शिक्षणच मिळाले नाही, तर शिक्षणाने जाग्या झालेल्या वाचनाच्या आवडीला भरपूर खाद्यही मिळालेले दिसते. कोर्ट-कचेऱ्यांची कामे व शेतीवर देखरेख करण्याइतके मोकळे जीवन व कर्तृत्व दाखवण्याची संधी उपलब्ध झालेली दिसते. ज्या काळात नहाण आल्यावर बिनलग्नाची मुलगी घरात असणे पाप मानले जात होते, त्या काळात त्या अजिबात लग्न न करण्याचा विचार करत होत्या हेपण विशेषच दिसते. दुर्दैवाने त्यांना तो विचार अमलात आणता आलेला दिसत नाही. मात्र लग्न होऊनही त्यांच्या वैवाहिक जीवनाचा खेळखंडोबा झालेला आपण पाहिलाच आहे. परिणामतः त्या सांसारिक सुखाप्रमाणेच सांसारिक जबाबदाऱ्यांपासून मुक्त राहिलेल्या दिसतात. पण त्याचा फायदा असा झालेला दिसतो, की त्यांमुळे त्यांना आपले व्यक्तित्व जोपासता आले असावे. आपल्या आवडी, आपली मते, आपले विचार त्या घडवू शकलेल्या दिसतात व ते निःसंकोचपणे मांडण्याचे लेखनस्वातंत्र्य पण त्या उपभोगू शकलेल्या दिसतात. भोवतालच्या परिस्थितीचे व जन-जीवनाचे त्यांचे सूक्ष्म निरीक्षण व आकलन करून त्या सर्वांची स्वतंत्रपणे चिकित्सा करून, आपल्याला जाणवलेला निष्कर्षपण त्या धीटपणे मांडू शकलेल्या दिसतात. एकंदरीत स्त्री म्हणून संसारात आलेल्या अपयशाची भरपाई त्यांनी व्यक्ती म्हणून स्वतःचे स्वतंत्र व समर्थ अस्तित्व सिद्ध करून केलेली दिसते.

त्यांची महत्त्वाची आवड दिसते ती वाचनाची. त्यांनी भरपूर व विविध प्रकारचे वाचन केलेले दिसते. पं. रमाबाईंप्रमाणेच ताराबाईंची वाचनाची आवड स्त्रीशिक्षणापुरती मर्यादित दिसत

नाही. तत्कालीन इतर थोड्याफार शिकलेल्या स्त्रियांप्रमाणे त्यांनी रामायण, महाभारत, रामविजय, हरिविजय, पांडवप्रताप, जैमिनी अश्वमेध इत्यादी धार्मिक ग्रंथांचे वाचन केलेले दिसते. तथापि, त्यांनी ह्या ग्रंथांतून वेळोवेळी जे चपखल दाखले दिले आहेत, उपमा दिल्या आहेत, कहाण्या सांगितल्या आहेत व त्यांची चिकित्सा पण केली आहे ती पाहता ताराबाईंचे वाचन हे खूप सखोल, डोळस व जाणीवपूर्वक असावे असे दिसते.

त्याखेरीज त्या वेळची गाजलेली विविध वृत्तपत्रे पण त्या वाचत होत्या हे निबंधातील वेगवेगळ्या संदर्भांवरून लक्षात येते. त्यांना ह्या निबंधाची प्रेरणाही वृत्तपत्रातील बातमीने दिली हे आपण पाहिलेच आहे.

त्यांचा हा वैचारिक निबंध हे 'स्त्रीने केलेले पहिलेच वैचारिक लेखन असावे' असे श्री. मालशे म्हणतात.

असा वैचारिक निबंध लिहिण्याची ऊर्मी त्यांना झाली व त्यानुसार त्या आपले विचार मुद्देसूद व तर्कशुद्धपणे मांडू शकल्या. त्यावरून तत्कालीन समाजसुधारक लोकहितवादी, फुले इ. चे वैचारिक व सामाजिक निबंधपण त्या वाचत असाव्यात असे अनुमान काढता येते. फुल्यांच्या तिखट शैलीशी नाते सांगणारी त्यांची झणझणीत लेखनशैली व विचारपद्धती पाहता त्यांच्यावर फुल्यांच्या लेखनाचा बराच प्रभाव पडला होता हे जाणवते.

ह्या दोघांत वृत्तिसाम्य तर निश्चितच आहे. भाकड पौराणिक कथांकडे पाहण्याचा उपहासात्मक दृष्टिकोन, इंग्रजांनी कायद्याचे राज्य आणून स्त्रिया व गरिबांना शिक्षण उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांच्याविषयी कौतुकाचा दृष्टिकोन, इंग्रजांची आमच्या धर्मात ढवळाढवळ नको, अशा बहाण्याने सुधारणांना विरोध करणाऱ्या पत्रकारांविरुद्ध रोष हे पैलू दोघांतही समान दिसतात. त्यामुळे असे वाटते, की ताराबाईंनी ज्योतिबांचे लिखाण मनःपूर्वक अभ्यासले व पचवले असावे.

१९ व्या शतकातील अनेक पुरोगामी पुरुषांना म. फुल्यांची घणाघाती शैली व क्रांतिकारक विचार पचवता आले नव्हते. ती ताकद ताराबाई दाखवताना दिसतात. ह्या साधर्म्याबाबत डॉ. मालशे आपल्या प्रस्तावनेत म्हणतात—

"खास बायकी लकबी व शब्दप्रयोग सोडल्यास, ताराबाईंची भाषाशैली थेट महात्मा फुल्यांच्या शैलीसारखी वाटते."[१] ते शेवटी लिहितात-

'गत शतकांची पापे घोर' जाणवून, गेल्या शतकात लोकहितवादी, फुले, आगरकर व केशवसुत ही चार संतप्त व्यक्तिमत्वे उफाळून आलेली दिसतात. या चौघांची विशेषतः फुल्यांची धाकटी बहीण जणू ताराबाई शिंदे !"[२]

त्या काळातील किती स्त्रिया हे सुधारकी निबंध वाचत असतील ह्याबद्दल शंकाच आहे. पण ताराबाई ह्या स्त्रीत्वाच्या अनावश्यक पारंपरिक मर्यादा सोडून 'व्यक्तीपणा'च्या भूमिकेवर पोहोचल्या होत्या व एक व्यक्ती म्हणून भोवतालच्या परिस्थितीशी आवडीनुसार वाचनातून नाळ जोडत होत्या असे दिसते. त्यांची भाषापण बायकीपणाचे फार चोजले पुरवताना दिसत नाही.

मराठी प्रमाणेच संस्कृतशीही त्यांचा परिचय होता असे दिसते. म्हणूनच भर्तृहरीचा श्लोक तसेच 'न भूतो न भविष्यति', 'अमृतम् स्वामी गौरवम्'[३] इत्यादी संस्कृत वचने त्या सहजपणे वापरताना दिसतात. 'लव्ह बिगेट्स लव्ह' चे 'ममतेने ममता' हे सहज भाषांतर त्या करतात. तेव्हा त्यांच्या भाषालाघवाची ओळख पटते. श्री. मालश्यांनी ह्याची सविस्तर चिकित्सा केलेली आहेच. ह्या व्यतिरिक्त बिरबलाच्या कथेचा दाखला, ग्रीक, रोमन, मुस्लिम इत्यादी समाजांविषयीचे दाखले[४] त्या देतात तेव्हा मालशे आपल्या प्रस्तावनेत म्हणतात त्याप्रमाणे- 'त्यांच्या चौफेर वाचनाची साक्ष पटते.' पारंपरिक स्त्रीच्या साच्यातून सुटून त्यांचे शिक्षित मन स्वयंभूपणे वेगळ्या दिशांनी वाटचाल करताना दिसते. पुरुषाप्रमाणे नाना विषयांची आवड, नाना प्रकारच्या ज्ञान व माहितीची उत्सुकता त्यांच्या मनात जागी झालेली दिसते. घरची सघन परिस्थिती, वडिलांमुळे लाभलेले शिक्षण, मुलंबाळं नसल्याने संसाराच्या रगाड्यात त्या बुडल्या नव्हत्या, इत्यादी गोष्टी त्यांना अनुकूल ठरल्या असाव्यात. तरीपण ज्ञानाची तहान व भोवतीच्या जीवनाविषयी एक जागरूक आस्था त्यांच्या पिंडात असली पाहिजे. घोड्याला नदीपर्यंत नेता येते; पण तहान नसेल तर पाणी पाजता येत नाही. हा न्याय सर्वत्रच सार्थ आहे. ह्यातूनच त्यांची विचारशक्ती, तर्कशक्ती, निर्णयशक्ती व आत्मविश्वास आकार घेऊन उभा झालेला दिसतो. 'आत्मजाणीव' जागृत झालेली अशी एक वेगळी स्त्रीप्रतिमा त्या उभी करतात. पण समाजावर तिचा किती प्रभाव पडला ह्याचा मात्र काहीच पुरावा सापडत नाही.

ताराबाईंनी लोकहितवादींची सुधारणाविषयक शतपत्रे पण अभ्यासली असावीत असे वाटते. पुनर्विवाह, केशवपन इ. बाबत दोघांच्या विचारांत व युक्तिवादातही खूपदा साम्य आढळते.

उदा. लोकहितवादी आपल्या एका लेखात म्हणतात—

"ईश्वराने स्त्री व पुरुष सारखे उत्पन्न केले व उभयतांचे अधिकार समसमान आहेत, असे असता पुरुषांस पुन्हा विवाहाची आज्ञा आणि स्त्रियांस मात्र मनाई हा केवढा जुलुम !"[५] ताराबाईंनी हाच विचार अधिक खमंग शब्दांत मांडलेला आपण वाचलेला आहेच.

लोकहितवादी म्हणतात-

"स्त्रियांस थोडेसे जरी ज्ञान असते तर त्यांनी... जे पुनर्विवाह करू नये म्हणतात त्यांचे श्रीमुखात दिली असती. जर आपल्या देशात दहा स्त्रिया विद्वान असत्या व त्या विधवा झाल्या असत्या तर त्यांनी आपला पुनर्विवाह करण्याचे ठरवले असते. दुष्ट ब्राह्मणांचे तंत्रात त्या कधीही राहिल्या नसत्या."[६]

ताराबाई लिहितात—"झाशीच्या राणीसारख्या फार नकोत पण एक चार-पाचशे स्त्रियांना निस्संग होऊन हातात संगिनी घेऊ द्यात मग पहा तुमची दुर्दशा कशी उडेल ते !"[७]

स्त्रियांतील आत्मसामर्थ्य जागृत झाले तर त्या पुरुषाच्या जुलमाच्या जोखडाखाली कधीच राहणार नाहीत हा स्त्रीवादी विचार त्या मांडताना दिसतात.

त्या काळी पातिव्रत्याच्या पराकोटीच्या कल्पना ब्राह्मण स्त्रीवर लादलेल्या होत्या. त्यामुळे वैधव्य आल्यास सती जाणे किंवा विधवेचे खडतर, कष्टाचे व उपेक्षेचे जीवन तिला भोगावे

लागे. पुनर्विवाहाची शक्यता नव्हती. त्यामुळे तत्कालीन लोकहितवादींसारखे मानवतावादी सुशिक्षित सुधारक ह्या ब्राह्मण स्त्रीचे दुःख आपल्या लेखांतून वर्णन करून तिच्यावरील अन्याय दूर व्हावा असा विचार मांडू लागले होते. उदाहरणार्थ ते म्हणतात-

"पुनर्विवाह, जे इतर लोक करतात ते काय ब्राह्मणापेक्षा कमी आहेत ? किंवा इतर स्त्रिया पुनर्विवाह करतात. त्यांचं काय वाईट झालं आणि ह्यांचं, ब्राह्मण स्त्रियांचं काय भलं झालं ?"[८]

"ब्राह्मण लोकांत लग्नाची घाई करतात. दोन-चार वर्षांचे आत विपरित घडून भर्ता निधन पावतो. पुनरपि तिचा विवाह करत नाहीत. जामात मेल्याचे दुःख सर्वांहून ब्राह्मणांस अधिक."[९]

"या पृथ्वीवर ब्राह्मण जातीत स्त्रियांस दीनत्व विनाकारण प्राप्त होते. पुनर्विवाहाची चाल ब्राह्मण जातीत पडली असता मोठी सुधारणा होईल."[१०]

तथापि, वस्तुस्थितीविषयी ताराबाईंची जाण ह्या तत्कालीन उच्चवर्गीय सुधारकांपेक्षा अधिक व्यापक व वस्तुनिष्ठ दिसते.

थोडे पुढे जाऊन त्या आपल्या प्रस्तावनेत, ही दुष्ट प्रथा इतर अनेक जातींतही कशी पसरली आहे, ते विस्ताराने स्पष्ट करून सांगतात. त्या म्हणतात-

"पुनर्विवाह ब्राह्मणांतच होत नाहीत असे नाही. इतर दुसऱ्या मराठे कुळात तर ब्राह्मणापेक्षाहि पुनर्विवाह न होण्याची सक्ती दिसून येते... परभू, शेणवी, गुजराथी, भाटे, मारवाडी, मऱ्हाठे, देसाई, देशमुख, इनामदार, जहागिरदार, शिरके, महाडिक, जाधव, भोसले, माने असे अनेक आडनावांचे... जे मराठे मऱ्हाटशाईला मरतात त्या कुळांत तर ब्राह्मणापेक्षाहि पुनर्विवाह न होण्याची सक्ती दिसून येते. या लोकांचे घराण्यात तर प्राणांती असे होणार नाही. अशा उठून गेल्या तर जाऊ देतील. पण पुनः दुसरा नवरा कधीच करू देणार नाहीत."

उच्च समाजातील दुष्ट रूढी अनुकरणाने कशा झिरपत गेल्या आहेत, याचे ताराबाईंचे निरीक्षण अचूक दिसते.

या सर्व अनुभव व निरीक्षणांतून स्त्रीजातीविषयी एक सहवेदना त्यांच्या मनात जागी झालेली दिसते. त्या प्रस्तावनेत म्हणतात—"अमूक एक कूळ किंवा जाती ह्याकडे माझे लक्ष नाही."

रूढींच्या काचाने पिडलेल्या समस्त स्त्रीजातीच्या त्या प्रतिनिधी होऊ इच्छितात असे दिसते.

आधुनिक स्त्रीमुक्ती चळवळीची हीच भूमिका असल्याने तिचे नाते शंभर वर्षांपूर्वीच्या ताराबाईंच्या काळाशी अप्रत्यक्षपणे जुळलेसे वाटते.

अशा व्यापक वाचनामुळे, चिंतनामुळे ताराबाईंना सामाजिक वास्तवाबाबत एक वेगळेच भान आलेले दिसते. ह्या दृष्टीने त्यांच्या प्रस्तावनेतील एक परिच्छेद लक्षणीय वाटतो. प्रस्तावनेत त्या म्हणतात—"इंग्रज लोकांच्या चाली.... एका जातीतच घेतल्या असे नाही; सर्व जातींत, राजेरजवाड्यात पोषाखाच्या चाली बदलून गेल्या आहेत... नवऱ्यांनीच नवीन तऱ्हा घेतली तेव्हां बायकांही त्याचप्रमाणे करण्यास पाहू लागल्या....गळ्यात फक्त एक मंगळसूत्र घालतात...दागिन्याची लाज वाटून.... अगदी निव्वळ पार्वतीप्रमाणे ते लाल नाहीतर पांढरं

दोन सव्वा-दोन रुपयाचे पातळ (मिलचे) नेसून अंगात मलमलीची नाहीतर छिटाची चोळी घालून रहायची आवड वाटते."

वरवर पाहता हे बदल काही वाईट दिसत नाहीत; पण ताराबाई त्याकडे कशा वेगळ्या दृष्टीने पहातात ते पहा. त्या विचारतात-

"पूर्वीचे किनखापाचे ठाण, शिरपेच, मंदील, चंदेरी,दुपटे, पैठणी, नागपूरी धोतर जोडे, लालचटक नरम गादीचे चर्मी जोडे हे कोठे लपले आता?... शालू, पैठण्या गेल्या, धनवड-नागपूर, सोलापूर, अहमदाबाद ह्या पेठा लपल्या... तुमच्या ह्या भिकार चाळ्यांनी आपले स्वदेशी रोजगार बुडून, हरेक प्रकारचे व्यापारी व कसबी लोक उपाशी मरू लागले... लक्ष्मी दूर देशीचा रस्ता धरू लागली."

घरचा मीठ-मिरचीचा हिशोब जेमतेम करू शकणाऱ्या स्त्रियांचा तो काळ; त्या वेळी ताराबाई व्यापक देशहिताच्या दृष्टीने औद्योगिकरणातला धोका पुढे मांडताना दिसतात.* तेव्हा शिक्षण, वाचनाने त्यांचा विचारांचा पल्ला विकसित झाला होता हे लक्षात येते. पुढे त्या म्हणतात–

"आपापले धर्म, चाली, देशरिवाज न सोडता स्वदेशाभिमानी व्हावे व तुम्हाला विधवा स्त्रियांची व या गरीब कारागीर लोकांच्या मुलाबाळांची कनवळा येऊन तुम्ही आपल्या देशाकडे पुन्हा नजर फिरवावी... म्हणून हा लहानसा निबंध... सादर केला आहे."

इथे पं. रमाबाईंप्रमाणे, आपले राष्ट्रीयत्व न सोडता नवीन सुधारणा उचलण्याचे ताराबाईंचे धोरण दिसते.

ताराबाईंची राष्ट्रीय जाणीव आणखी एके ठिकाणी व्यक्त झालेली दिसते. पुनर्विवाहाचा पुरस्कार करताना त्या लिहितात–

"पूर्वी राजा मेला व त्याच्या पोटी पुत्रसंतान नसेल तर राणीच्या मनास जो आवडेल त्याच्यापासून वंशवृद्धि करावी... हा व्यभिचार नव्हे का?... असे करण्यापेक्षा दुसरे लग्न करण्याची जर चाल ठेवली असती तर त्या राज्याला दुप्पट बळकटी येऊन आज लक्षावधी लहान लहान मांडलिक राज्ये, जहागिरी, इनामे, देशमुख्या वगैरे बुडून आपला देश भिकारी झाला नसता. कित्येकांना औरस वारस नसल्यामुळे त्यांची सर्व जिनगी सरकारात जाऊन सरकार खजिन्यात पडली."[११]

एका बाजूला राष्ट्रीय जाणीव जशी दिसते तसेच दुसऱ्या बाजूने त्यांना लोकहितवादी, महात्मा फुले यांच्याप्रमाणे पाश्चात्यांच्या ऐहिक विजयाचे कौतुकपण वाटत होते असे दिसते. त्या स्पष्टपणे इहवादी नसल्या तरी भाकड पुराणकथांत गुंतून पडणे त्यांना मान्य नव्हते, असेही दिसते. एके ठिकाणी राज्यकर्त्यांचे वर्णन करताना त्या म्हणतात– "डोंगर फोडून,

* ताराबाईंनी मांडलेला हा स्वदेशी उद्योगधंद्याचा विचार वेगळ्या शब्दांत लोकहितवादी आपल्या शतपत्रांत मांडतात. "हल्ली इंग्रज लोक सर्व जिन्नस विलायतेतून आणतात. इकडील व्यापारी, कोष्टी वगैरे उपाशी मरतात. तर त्या विद्या इकडे आणून लक्षावधी जीवांचे हित करण्याचा उद्योग कोणी केला आहे काय?"

आगगाडीसारखा विशाल अग्निरथ, त्यातून जाण्यासारखे मार्ग पाडिले... पांडवांनी अज्ञातवासात फिरत असता लेणी कोरली असे म्हणतात. तरी ते पांडव, ती द्रौपदी पाहिली कोणी ? पण आता हे शककर्ते बरीक खरे पांडव आहेत. पोथीत... इंद्रजीताने हवन करून अग्नितून रथ काढला होता, असे श्रीधर स्वामीने लिहिले. पण तो रथ या सध्या चालू अग्निरथाप्रमाणे अगणित ओझे नियमित वेळी नियमित ठिकाणी वाऱ्यासारखा नेऊन पोचवीत नसेल. असे अनेक प्रकारचे अद्‌भुत चमत्कार जितके वर्णावे तितके थोडेच."[१२] ह्यातून ताराबाईंची विज्ञान प्रीती दिसते.

असा विज्ञानाचा वरदहस्त लाभलेल्या पुरोगामी पुरुष वर्गाकडून तरी स्त्रियांच्या उद्धाराचे काम व्हावे, अशी ताराबाईंची अपेक्षा दिसते. त्या म्हणतात-

"अरे तुम्ही अग्निसारखे महाप्रखर दैवत मुठीत आणून त्यापासून यंत्राद्वारे पाहिजे तशी कामे करून घेऊ लागला.... वायू हातात घरात येत नाही, त्याला तुम्ही आपल्या शक्तिसामर्थ्याने बसांत आणले.... असे बलाढ्य पराक्रमी तुम्ही असताना गरीब विधवा स्त्रियांना या लज्जेच्या दरीतून ओढून... सौभाग्यशाली करण्यास तुमच्याने पुढे होववत नाही का ?"[१३]

विज्ञाननिष्ठ नव शिक्षणाने, नवीन पिढी अधिक पुरोगामी विचारांची, मानवतावादी व धीट बनायला हवी; पण तसे तरुण पुढे येताना दिसत नाहीत, ह्याचे आश्चर्य व खेद ताराबाई इथे व्यक्त करताना दिसतात.

ह्या सर्व वैचारिक वाचन-चिंतनाच्या जोडीने, तत्कालीन ललित साहित्यपण त्या तितक्याच जागरूकपणे वाचत होत्या असे दिसते.

मराठी गद्य साहित्य निर्मितीला त्या काळी नुकतीच सुरवात झाली होती. इंग्रजी साहित्याचे अनुकरण करत रंजनपर कल्पित कादंबऱ्या लिहिल्या जात होत्या. अशांपैकी (१) लक्ष्मण मोरेश्वरशास्त्री हळबे यांचे 'मुक्तामाला' (१८६९), (२) ना. स. रिसबूड यांचे 'मंजुघोषा' (१८६८) ह्या गाजलेल्या कादंबऱ्या; (३) म. बा. चितळे यांचे संगीत 'मनोरमा' (१८७१) हे नाटक, तसेच (४) रामजी गणोजी डॉक्टर यांचे 'स्त्रीचरित्र' नामक कल्पनारम्य पुस्तक- इत्यादींची ताराबाईंनी आपल्या निबंधात, विषयाच्या ओघात समीक्षा केलेली दिसते. त्यांत त्यांच्या टीकेचा रोख मुख्यतः स्त्रियांच्या असंभाव्य, विपर्यस्त, अवास्तव चित्रणावर दिसतो.

'स्त्रीचरित्राच्या बोधरूप गोष्टी'- असे म्हणत कामुक कथा सांगणाऱ्या 'स्त्रीचरित्र' ह्या पुस्तकाविषयी त्या म्हणतात- "स्त्री चरित्र या नावाचे पुस्तकांत स्त्रियांचे 'साहस' कोणी एका भाग्यशाली पुरुषाने वर्णिले आहे* त्याला प्रमाण बारिक विचाराने पाहू गेले असता कोठेच मिळत नाही. राजाच्या मुली वा राण्या किती बंदोबस्तात कडक पहाऱ्यात असतात बरे ? पन्नास

---

*रामजी गणोजी डॉक्टर नामक लेखकाने हे कपोलकल्पित पुस्तक लिहिले आहे. वीरसेन राजपुत्राने पद्मावती उर्फ प्रिताई नामक स्त्रीला ह्या कथा (कामुक) सांगितल्या असून, लेखक त्यांच्याकडे येऊन ह्या कथा ऐकण्याचा हट्ट धरणाऱ्या स्त्रीस त्या सांगत आहेत अशी, कल्पना केली आहे. स्त्रियांच्या स्वैराचाराची वर्णने करणाऱ्या ह्या कथा असून शेवटी त्यात स्त्रियांना शिक्षा झाल्याचे दाखवून नैतिकतेचा आव आणलेला आहे.

दरवाज्यांवर कडक कडव्या शिपायांच्या चौक्या. ते सारे शिपाई का आंधळे होते ? एक-दोघांना द्रव्याच्या गुळण्या देऊन तोंड बंद करतील पण बाकीचे सारेच निमकहराम ? अरे, राजवाड्याबाहेरील उन्हदेखील ज्यांना ठाऊक नाही, ज्यांनी परपुरुषाचे तोंडदेखील जन्मात पाहिले नाही, त्या ते सर्व ऐश्वर्य सोडून कोण्या गोसाव्याकरता, कोण्या खासदाराकरता येवढे धाडस करून जातील ? छे ! असे कधीच होणार नाही... या स्त्री चरित्रात एक एक गोष्ट अशी बिभत्स व वाईट लिहिली आहे, की वाचणारासच लाज वाटते."[१४]

स्त्रिया ह्या जात्याच कुमार्गी, चंचल, मोहवश असतात असा भावार्थ या पुस्तकातून सूचित होतो. तो किती खोटा व एकांगी आहे ते त्या इथे स्पष्ट करतात. "पुरुष वाचकांच्या कामुक इच्छापूर्तिचे समाधान व्हावे याच हेतूने ह्या कथा लिहिल्या आहेत," असे मालशेपण आपल्या प्रस्तावनेत लिहितात.

ह्या लेखनामागच्या पुरुषी वृत्तीचा समाचार ताराबाईंनी घेतला आहे. वाचणाऱ्या पुरुष वर्गाला बरे वाटावे म्हणून स्त्रियांची विपरीत चित्रणे पुरुष करत असतात, ह्याचा त्यांना राग आलेला दिसतो. 'मंजुघोषा' ह्या कादंबरीविषयी त्या म्हणतात–

"मंजुघोषा ही सार्वभौम राजीची लाडकी कन्या. ज्या बापाने लहानपणापासून कंठातील कंठ्याप्रमाणे वागवले, त्या म्हाताऱ्या बापाच्या हातावर तुरी देऊन काहीच विचार न करता ती माधवाबरोबर पळून जाईल ? जाते वेळी म्हाताऱ्या बापाची मूर्ति तिचे नजरेसमोर उभी राहिली नसेल ? येवढी शहाणी, गुणसंपन्न, राजपुरुषाचे नावगाव याचा तपास न करता निघून जाईल ? वाचकहो गोष्ट किती खरी आहे तुम्हीच पहा !"[१५]

स्त्रियांच्या विपरीत चित्रणाविरुद्ध जसा त्यांनी आवाज उठवलेला दिसतो, तद्वत काल्पनिक असंभाव्य घटना रंगवण्याच्या लेखकाच्या रंजक व पलायनवादी वृत्तीचा पण त्या निषेध करताना दिसतात. मंजुघोषा कादंबरीतील नायक-नायिकेच्या, विमानाने पळून जाण्याच्या घटनेविषयी * त्या लिहितात–

"इंग्लिश लोकांनी पुष्कळ यंत्रे-तंत्रे केली, आगगाडी केली व विमानही केले; पण त्या विमानाचा वाटेल तसा उपयोग करून घेण्याची युक्ति त्यांनादेखील अजून साधली नाही. मग ते.. मंजुघोषेस पळवून नेण्याकरिताच कामी पडले असेल हे किती बरे अघटित आहे !"[१६]

"पुस्तकात शृंगार, विनोद, शोक हे तीन गुण असल्यावाचून रस भरत नाही हे खरे, पण ग्रंथकर्त्यांनी आपण जे काही लिहितो हे घडण्यासारखे किंवा पूर्वी कधीकाळी असे घडून आले होते किंवा नाही याचा आधी विचार करून मग पुढे ग्रंथ रचावा."

ताराबाई त्या काळातही 'वास्तववादाचा' साहित्यात आग्रह धरताना दिसतात.

---

*अलिकडील काळात लग्न हा एक यांत्रिक उपचार झाला आहे. विवाहामागचा पतिपत्नी मनोमीलनाचा, सुखाचा भाग एकीकडेच राहिला आहे. तो दर्शविण्यासाठी आपण ही कथा लिहितो आहोत, असे लेखक प्रस्तावनेत म्हणतो. त्यात कल्पनारम्यता आणण्यासाठी "चिनदेशीच्या पेकींग गावच्या डॉन नामक शिल्पविद्यानिपुण माणसाकडून" नायकाने एक विमान खरीदले असे दाखविले आहे.

'हळबे शास्त्रींच्या 'मुक्तामाला' या मराठीतील १ ली 'युगप्रवर्तक कादंबरी' म्हणून पुढे मानल्या गेलेल्या * कादंबरीविषयी पण त्या असाच आक्षेप घेताना दिसतात. मुक्तामाला ही कोणी सरदार कन्या एका दुष्ट अंमलदाराच्या तावडीत सापडून निबिड अरण्यात ठेवली जाते. तरीपण तिने स्त्रीधर्म सोडला नाही, असे वर्णन येते. 'ती आपणांस कैदेत असूनही कबूल होत नाही असे पाहून तिला अंमल देऊन रात्री पेटीत घालून पुरून टाकले'- पान १४३ असे वर्णन आहे. त्यावर ताराबाई विचारतात–

"हे ग्रंथकर्त्याने दर्शविले, हे झाले त्याचे. पण याचे उलट म्हणणे इतकेच की.... चिरेबंदी कोटात जर असा एखादा कामांध व्याघ्र गायीमागे लागला तर तो तिचे प्राण (अब्रू) घेतल्यावाचून राहील का ?... पुरुषाच्या शक्तीपुढे स्त्री केवळ मुंगीप्रमाणे दुर्बल आहे... तेथे पतिव्रता धर्म काय रडेल ?... तेव्हा अशा गोष्टी लिहिणे म्हणजे काय ? एखाद्या लहान मुलाला समजावणे आहे. नित्यक्रमावरून हे किती खोटे आहे हे सहज लक्षात येते."[१७]

इथे तत्कालीन 'अद्‌भुतरम्य' 'नावला'तील पुरुषप्रणित मूल्यांच्या रक्षणासाठी केल्या गेलेल्या अवास्तव लेखनावर ताराबाई अचूक बोट ठेवताना दिसतात. ह्या कादंबरीच्या ९ व्या आवृत्तीसाठी श्री. वा. ना. देशपांडे ह्यांनी प्रस्तावना लिहिताना कादंबरीत 'कलावादी' समीक्षा दृष्टीने बरेच दोष दाखवले आहेत. पण ही स्त्रीवादी दृष्टी दाखवलेली दिसत नाही.

'मनोरमा' ह्या नाटकाकडे त्या आणखी वेगळ्याच दृष्टिकोनातून पाहताना दिसतात. ह्या नाटकात चार प्रकारच्या स्त्रियांच्या कहाण्या आल्या आहेत. एक मनोरमा– अनुरूप वर मिळाल्याने सुखी झालेली. दुसरी गोदुबाई–नवरा म्हातारा म्हणून त्याची हेडसांळ करून त्याला तुच्छ लेखून... नवऱ्यामागे गुण उधळते व फजिती करून घेते. तिसरी गंगू– नवरा हीन असल्याने, पळून जाऊन पुढे अट्टल कसबीण बनते. व चौथी ठकू– वैधव्य आल्यावर पाय घसरून गर्भवती होते व पुढे सर्व सोहळे होऊन इस्पितळात संयोगजन्य रोगाने मरते असे दाखवले आहे. वस्तुतः नाटककाराचा हेतू, विषम विवाह, जरठ-कुमारी विवाह, पुनर्विवाह बंदी इ. सामाजिक रूढींमुळे काय काय अनर्थ होतात हे दाखवून, 'नाटक वाचल्याने मनावर सद्‌गुणांचा चांगला ठसा बसून त्याचा कित्ता घेण्याची उत्सुकता लोकांच्या मनात उत्पन्न व्हावी,'असा होता, असे प्रस्तावनेतील उल्लेखावरून व नाटकाच्या कथावस्तूवरून दिसते. नाटककार प्रस्तावनेत म्हणतात- "ह्यासाठीच पौराणिक कथा न घेता वास्तवातील आधारलेली कथा घेतली आहे." प्रत्यक्ष नाटकात विषम विवाहामुळे परिणामी बदफैली, वाममार्गी होत गेलेल्या स्त्रियांचे नमुने व त्यांची झालेली परवड, अधिकतर रंगवली आहे.

आता अशा घटना त्या काळी तुरळक घडतही असतील. पण नाटकात त्यांचे चित्रण असे होते, की वाचणाऱ्याला वाटावे, हे बहुसंख्य स्त्रियांचे चित्र आहे. स्त्रिया अशाच उठवळ, चवचाल, मोहवश असतात. अपवादाने घडणाऱ्या घटनांचे असे विकृत 'प्रोजेक्शन' करण्याच्या वृत्तीचा

* हरिभाऊ - डॉ. ल. म. भिंगारे. 'हिचे अनुकरण होऊन त्यानंतर बऱ्याच कादंबऱ्या लिहिल्या गेल्या म्हणून बहुधा ही कादंबरी युगप्रवर्तक मानली गेली असावी असे दिसते.'

ताराबाईंना राग आलेला दिसतो. त्या म्हणतात–

"हे इतके प्रकार सिद्ध करून दाखवले खरे पण नाटककर्त्यांनि स्वतःचा उपहास मात्र करून घेतला आहे... सगळ्यांच्याच घरी कोणाची बहीण, आई, सून, लेक विधवा असेलच की नाही ? तर एकीला बट्टा लागला म्हणजे सरसकट सगळ्याच त्यांत आल्या की नाही ? तेव्हा यात काय सार्थक झाले ?" पुढे त्या आणखीही एक मुद्दा उपस्थित करतात. त्या म्हणतात–[१८] "असे प्रकार होतात म्हणून पुरुष म्हातारपणी लग्न करणार नाहीत असे कधी होणार नाही, किंवा आईबाप मनोरमेसारखा मनाजोगा पति पाहून तेथेच (मुलीला) देतील आणि असे सर्वच प्रसंगांत घडेल हे कोणी पाहिले आहे ?"

"तसेच हीन वर म्हणून स्त्रिया निघूनच जातील हे पण अशक्यच आहे. कारण आज अशाच निघूनिघू जात्या तर हे सर्व जग या उनाड बायकांनी भरून गेले असते."

नवरे हीन असूनही बायका नाइलाजाने का होईना त्यांच्याशी एकनिष्ठ राहतात. तरी पुरुष स्त्रियांचे साहित्यात विकृत चित्रण करतात. असा खणखणीत स्त्रीवादी टीकेचा आवाज ताराबाईंनी उठवला आहे. श्री. मालशे आपल्या परीक्षणात म्हणतात–"कालमानाचा विचार करता कै. ताराबाईंची साहित्यिक जाण चांगलीच प्रगल्भ होती असे म्हणता येते. मराठीतील स्त्रीनिष्ठ (Feminist) समीक्षेचा हा पहिला सूत्रपात म्हणावा लागेल."[१९]

गेल्या ५-१० वर्षांत उदयास आलेल्या स्त्रीवादी समीक्षेचा प्रयोग ताराबाई १०० वर्षांपूर्वी करतात, हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. त्यांच्या स्वतंत्र व प्रगल्भ स्त्रीवादी पिंडाचे ते दर्शन वाटते. ताराबाईंनी पुराणकथांतील देखील स्त्री चित्रणाचा, ह्याच भूमिकेतून केलेला उपहास (मंदोदरी, कुंती) आपण पाहिलाच आहे. प्रसिद्धी माध्यमातून होणाऱ्या स्त्रियांच्या विपर्यस्त चित्रणाविरुद्ध आज मोर्चे, पुस्तकांच्या होळ्या होतात त्याचीच ही चिमुकली गंगोत्री वाटते. शेवटी असे म्हणावेसे वाटते, की पुरुषप्रधान व पितृसत्ताक व्यवस्थेचे राजकारण स्त्री कुचंबणेमागे कसे असते, हे स्पष्ट करून दाखवणे हे स्त्रीवादी समीक्षेचे एक प्रमुख कार्य असेल, तर ताराबाईंचे पूर्ण पुस्तकच संस्कृतीचा, स्त्रीवादी समीक्षादृष्टीने वेध घेत आहे. तत्कालीन समाजजीवनाचा, जीवशास्त्रीय, मानसशास्त्रीय, पौराणिक, सांस्कृतिक पाया नव्या नजरेने तपासत आहे. त्यासाठी त्यांनी पारंपरिक स्त्रीसुलभ भाषेची मांडणी पण नाकारलेली दिसते. प्रतिपाद्याच्या मागणीनुसार भाषा वापरलेली दिसते.

ताराबाईंचा हा निबंध वाचत असताना त्यांची समर्थ व बहुरुपी लेखनशैली सतत जाणवत राहते. तिच्यातून त्यांचे प्रगल्भ व ताठ व्यक्तिमत्व डोकावते. बोली भाषेच्या जवळ जाणारी, वाक्प्रचार व म्हणी ह्यांनी घरगुती वाटणारी, स्त्री- जीवनाशी संबंधित उपमा पेरीत जाणारी ही शैली, पुरुष वर्चस्व व स्वामित्व भावनेवर हल्ला करताना तितकीच रासवट, आक्रमक व प्रसंगी ग्राम्यरूपही धारण करताना आपण पाहिली आहे. उपरोध, उपहास, विडंबन, कोटीबाजपणा ह्यांच्या वापराने मध्येच मिस्किल रूप धारण करणारी हो शैली नाजूक, अवघड विषयांबाबत बोलताना संस्कृतप्रचुर होते व त्यामुळे एक भारदस्त डौल तिच्यात आलेला पण आपण पाहिला आहे.

मराठी गद्यलेखनाच्या निर्मितीच्या प्रारंभ काळातच ताराबाईंनी ग्रांथिक भाषाशैलीचा, शब्दयोजन सामर्थ्याचा, विविध प्रकारच्या वाक्यरचनांचा, भाषा अर्थानुरूप वाकवण्याच्या सामर्थ्याचा जो आविष्कार दाखवला आहे, त्यातून त्यांच्या विदग्धतेचा प्रत्यय मिळतो. कधी भाषणाचा थाट, कधी संवादाचे नाट्यरूप, कधी प्रत्यक्ष बोलण्याचा आव, तर स्त्रीच्या करुण स्थितीचे वर्णन करताना तळमळीचा व तळतळाटाचा आवेग, तर कधी हुबेहूब प्रसंगचित्रणाचे कौशल्य दाखविणारी ही निवेदन शैली मराठी गद्य लेखनाचे सामर्थ्य वाचकांना प्रतीत करून देताना दिसते. शब्दचित्रे रेखाटण्याच्या ताराबाईंच्या कौशल्याची काही उदाहरणे पाहू.

"अंगं गलितं पतितं मुण्डम्" अशी अवस्था झाल्यावरही लग्नाची लालसा बाळगणाऱ्या म्हाताऱ्या श्रीमंत विधुराचे हे शब्दचित्र पहा-

"बुवा ऐंशी वर्षाचे केवळ पाप्याचे पितर असले तरी जवळ जे भोजनभाऊ तोंडचोपडे असतील त्यांनी म्हणावे– छे महाराज आपण का म्हातारे झालात ? कौण म्हणतो त्याचे दांत पाडून टाकीन. केसांनी घात केला ना, सरकार उद्या जरा कलप थापा की झाले. दांताळवाडीचा पत्तासुद्धा राहिला नाही. याला कांही युक्ती काढा. बरे महाराज उद्या नामी दंतवैद्याकडून बत्तीशीच विकत आणतो... त्यात काय आहे... आताचे पंचविशीतले पोर का आपली बरोबरी करील ? छे हो महाराज, हे जुने हाड, नासके मिरे जोंधळ्याला हार जातील काय ? असे म्हटले म्हणजे झाले. महाराज फुगले. लागले चाळे करायला. टक्कलाभोवती शिल्लक राहिलेले दहा-बारा केस, पिंजलेल्या कापसासारख्या पांढऱ्याशुभ्र भोवत्या मिशांना दिवसातून तीनदा कलप, पागोटे लफ्फेदार, तरतरीत अंगरखा हाडकावर बळेच घालायचा, विडा कुटून उसनी हाडाची बत्तिशी लालभडक करायची, चालताना कापरे येत असले तरी हातात विलायती काठी घ्यायची, दहा वेळा पौष्टिक बदामी वड्या खाऊन शंभरदा आरशात पहात... ज्याला त्याला विचारायचे, काय रे, मी आता बरा दिसतो का ?"[२०]

भोंदू बैराग्यांची चित्रे आपण पाहिली आहेत. हे देशी साहेबाचे चित्र पहा–

"गाढवांनो तुम्हाला आपल्या पूर्वजापैकी कोणी पाहिलं... तर ही सृष्टी त्याला ओळखू सुद्धा येणार नाही... कसे म्हणाल तर पागोट्याकडे पहावे तर डोकीला टोपी नाहीतर काळे, पांढरे रुमालाचे दहा हात फडके, अंगात हाफजैकीट, घड्याळाच्या साखळीचा झोक... खाली पहावे तो विजार, पायात स्टाकिंग बूट– मग वाटते, हा कोणी मुसलमान, का पार्शी का साहेबाचा बबर्ची आहे. काहो हा आहे तरी कोण, विचारणे भाग होईल की नाही ? या पोषाखात बाळाचे चेहेरे काय खुलतात ! गोरा असेल तर काही तरी बरे दिसते पण कोळश्याचे भाऊ असले तर काय विचित्र सोंग दिसते."[२१]

जे सामर्थ्य लेखणीचे तसेच कसब बहुश्रुतपणात दिसते. पुरुष वर्गाच्या नाना व्यवहारांतील व नाना व्यवसायांतील वेगवेगळ्या लबाड्या, भ्रष्टाचार ताराबाईंनी इतक्या बारकाव्याने टिपला आहे, की त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीने वाचकाने चकितच व्हावे. इतका व्यापक अनुभव त्यांनी कसा मिळवला असेल असा प्रश्न मनात तरळल्याशिवाय राहत नाही.

आणखी एका गोष्टीचे नवल वाटते. ते म्हणजे 'स्त्री जात म्हणजे वाईट, क्षुद्र, मत्सरी, मूर्ख,

अबला, पुरुषांच्या तुलनेत तुच्छ इ.' गैरसमज त्या काळी पुरुषांच्याच मनात होते असे नाही तर स्वतः स्त्रियांच्या मनातही हे समज सततच्या संस्कारांमुळे व शिक्षणाच्या अभावामुळे घट्ट बसले होते. हे खोटे असावेत. खरेच आपण क्षुद्र आहोत का ? अशा शंका कुणाही स्त्रीच्या मनात येत नव्हत्या. निदान त्या व्यक्त झालेल्या आढळत नाहीत. मग युक्तिवादाने त्या खोडून टाकणे तर दूरच. तसे करण्यासाठी आवश्यक ते जगाचे ज्ञान, मनुष्य स्वभावाचे व्यापक निरीक्षण, जगरहाटीची माहिती, तर्कशक्ती सामान्य स्त्रियांत विकसित झाली नव्हती.

अशा काळात ताराबाईसारखी ब्राह्मणेतर समाजातील स्त्री हे सामर्थ्य मिळवून, तर्कशुद्धपणे व परखडपणे स्त्रियांची बाजू निबंधरूपाने मांडते, हेच विशेष वाटते.

शेवटी एक प्रश्न मनात उभा राहतो, की स्त्री- समस्यांचा इतका मूलभूत विचार ज्यात केलेला आहे, ज्यात पुरुषवर्चस्वाला रोकडे आव्हान दिले आहे, असे हे पुस्तक व त्याची लेखिका ह्या विस्मृतीच्या पडद्याआड इतक्या सहजपणे कशा लोटल्या गेल्या ?

ह्याचे उत्तर शोधताना बऱ्याच शक्यता जाणवतात. एकतर ताराबाई तत्कालीन सुधारणांचे व चळवळीचे जे क्षेत्र मुंबई-पुणे, त्यापासून दूर वऱ्हाडात बुलढाणा नामक गावात राहत होत्या, त्यामुळे त्यांचे नाव मागे पडले असण्याची शक्यता आहे. दुसरे म्हणजे, त्या ब्राह्मणेतर जातीतल्या होत्या आणि त्या काळात व नंतरच्याही काळात लेखन-प्रकाशन हे प्रामुख्याने वरिष्ठ वर्गाच्या हाती असल्याने, त्या दुर्लक्षित राहून गेल्या असाव्यात.

पण नवल असे वाटते, की परंपराभिमान्यांनी व उच्चवर्णीयांनी भले त्यांना विस्मृतीत लोटण्याचा प्रयत्न केला; पण फुल्यांनी ज्या पुस्तकाचे व त्यातील मुद्देसूद लेखनाचे एवढे कौतुक केले आहे, त्याबद्दल फुल्यांचे अनुयायी सत्यशोधक समाजातील लोकांनी पण ह्या पुस्तकाचे व त्यातील मूलभूत विचारांचे कौतुक कसे केले नाही ?

स्वतः ताराबाईंचे वडील पुरोगामी होते. लाडक्या लेकीला समाजमान्य चाकोरीबाहेर जाऊन त्यांनी शिकवलेले दिसते. स्वतंत्र विचार करण्याचे धारदार शस्त्र कमावण्यात तिला मदत केलेली दिसते. त्यांनीपण आपल्या लेकीविषयी, तिच्या लेखनाविषयी स्वतंत्र नोंद कशी ठेवलेली आढळत नाही ?

एक मराठा समाजातील स्त्री पुढे येऊन स्त्रियांच्या समस्यांचा इतका मूलगामी विचार मांडते, तेव्हा तिला सत्यशोधक समाजातील लोकांनी, सुधारणावादी उच्चवर्णीयांनी उचलून धरायला हवे होते. पण तसे झालेले दिसत नाही. पुरुषप्रधान मूल्यावस्थेत वाढलेल्या पुरुषांना ताराबाईंनी पुरुषी वर्चस्वाला दिलेले आव्हान व देवांपासून धर्ममार्तंडांपर्यंत सर्वांच्या कारस्थानांची केलेली चिरफाड पेलता आली नाही असे म्हणावे का ?

कारण काहीही असो पण ताराबाई कुणालाच झेपलेल्या दिसत नाहीत हे खरे. इथे श्रीमती विद्युत भागवत ह्यांनी आपल्या लेखात उभा केलेला विचार आठवतो.

'स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार करणाऱ्या सत्यशोधक समाजाने सत्यशोधक ताराबाईंना, (कार्यकर्त्या सावित्रीबाईंना) आपले सभासदही करून घेतलेले दिसत नाही.'

स्त्री कर्तृत्वाला मुक्त मनाने मान्यता देण्याची संवेदनशीलता, उदारमनस्कता भारतीय

पुरुषवर्गाला अद्याप परिचयाची झाली नव्हती का ?

तत्कालीन समाजाने ताराबाईंना उपेक्षिले तरीपण आज आपल्याला मोकळेपणाने कबूल करावेसे वाटते, की आजच्या स्त्रीमुक्ती चळवळीतील कितीतरी मागण्यांची 'पूर्व साद' ताराबाईंच्या ह्या छोट्या निबंधातून ऐकू येते. ह्या छोट्या निबंधातून तत्कालीन सर्वसामान्य स्त्रियांपेक्षाच नव्हे, तर तत्कालीन सुशिक्षित उच्चवर्णीय स्त्रियांपेक्षाही ही स्त्री किती वेगळी होती व किती पुढच्या काळाशी नाते जोडत होती हे लक्षात येते.

* *

ग्रा. क्र. 3866

# प्रास्ताविक

जनाक्का शिंदे ह्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे उर्फ अण्णासाहेब शिंदे ह्यांच्या भगिनी. त्यांच्याविषयी फारच अल्प लिखित माहिती उपलब्ध आहे. त्या जन्मभर भावाच्या जवळच राहून कार्य करत राहिल्या असे दिसते.

महर्षीच्या 'आठवणी व अनुभव' ह्या आत्मकथनात जनाक्कांविषयी स्थूल माहिती मिळते. त्याहून अधिक शोध घ्यावा म्हणून मी त्यांच्या नातेवाइकांच्या भेटी घेऊन मुलाखती घेतल्या. जनाक्कांच्या सहवासात आलेली जाणती माणसे आता ऐंशी-नव्वदीच्या घरात आलेली. स्मरणे ताण देऊन जागवावी लागली. ह्या प्रयत्नांतून आठवणींचे काही कण हाती लागले. अशा व्यक्ती म्हणजे महर्षींची मोठी सून श्रीमती लक्ष्मीबाई शिंदे, महर्षींचे शिक्षणतज्ज्ञ व लेखक जावई श्री. एकनाथराव घोरपडे, महर्षींच्या घरी बरीच वर्षं राहिलेले त्यांच्या नात्यातले श्री. अण्णासाहेब काळे (अण्णाप्पा), विचारवंत लेखक, वाई प्रार्थना समाजाचे अध्यक्ष व शिंदे कुटुंबाचे निकटवर्ती स्नेही श्री. रा. ना. चव्हाण, महर्षींच्या निराश्रित साहाय्यकारी मिशनच्या बोर्डिंगांत विद्यार्थी म्हणून काही काळ वास्तव्य करून राहिलेले व पुढे अहिल्याश्रमातच व्यवस्थापक म्हणून काम करणारे श्री. मधाळे गुरुजी, महर्षींच्या जिवलग बालमित्राची- विष्णुपंत देशपांड्यांची- मुलगी सौ. शकुंतला बाबाराव जमदग्नी, महर्षींचे वाई येथील सहकारी रा. कृ. बाबर इ. अनेक उतारवयातील व्यक्तींच्या भेटी घेतल्या. त्यांच्या पुसट आठवणींच्या साहाय्याने महर्षींनी रेखाटलेल्या आपल्या भगिनीच्या स्थूल रूपरेषेत जिवंतपणा जाणवू लागला.

ह्यांपैकी श्री. एकनाथराव घोरपड्यांची व श्री. रा. कृ. बाबरांची स्मरणशक्ती मात्र अद्यापि तल्लख असून शिक्षणक्षेत्रात वावरलेले असल्याने, उपक्रमाचे भान त्यांना नेमकेपणाने आले. त्यांच्याकडून खूपच उपयुक्त माहिती मिळाली. तसेच वाईचे श्री. रा. ना. चव्हाणांनी पण जनाक्कांविषयी अधिकृत म्हणता येतील अशी खूप टिपणे आवर्जून पाठवली. ह्याव्यतिरिक्त, महर्षींची नात सौ. सुजाताताई पवार व त्यांचे यजमान डॉ. गो. मा. पवार (कोल्हापूरच्या शिवाजी

विद्यापीठातील मराठी विभाग प्रमुख) ह्यांच्याशी भेट घेऊन चर्चा केली. त्यांच्याकडून फार महत्त्वाचे साहित्य उपलब्ध झाले. 'तरुण महाराष्ट्र' नावाच्या पुण्याहून निघणाऱ्या एका वृत्तपत्राच्या (पुढे ते बंद पडले) संपादकांनी - आनंद अवधूत मानकर- यांनी जनाक्कांच्या वृद्धापकाळी त्यांची मुलाखत घेऊन त्यांच्या आत्मकथनाचे सदर 'स्मृतिचित्रे' ह्या नावाने वर्षभर चालवले.

ही अत्यंत महत्त्वाची व अव्वल दर्जाची साधनसामुग्री पवार दांपत्याकडून उपलब्ध झाल्यामुळे, तसेच वाई येथील प्रार्थना समाजाचे अहवालही त्यांनी उपलब्ध करून दिल्यामुळे जनाक्कांच्या जीवनाविषयी बरेच काही म्हणता येईल असा विश्वास निर्माण झाला.

हे लेखन वाचून त्यावर काही बहुमोल सूचनापण श्री. पवारांनी मला केल्या.

जनाक्का शिंद्यांच्या व्यक्तिमत्वाचा व जीवनाचा शोध घेण्याच्या निमित्ताने मराठा समाजातील अशा अनेक नातेवाईक, सहकारी, परिचित मंडळींना भेटले. त्यांचे उदारमतवादी विचार, सेवाभावी जीवन व त्यांच्या सौम्य सहृदय जीवनजाणिवा अनुभवल्या आणि मनात विचार आला, प्रार्थना समाजाचे अस्तित्व आज जरी नाममात्र उरले असले तरी १९ व्या शतकातील संक्रमण काळात त्याने बहुजन समाजापर्यंत कितीतरी उदात्त, विशाल व सात्त्विक वृत्ती खोलवर रुजवल्या होत्या. कितीतरी जीवने सुसंस्कारित केली होती. सामाजिक परिवर्तनाला अनुकूल अशी वैचारिक भूमी तयार केली होती. सामाजिक बांधिलकीची भावना जागृत केली होती.

अशा तऱ्हेने सामाजिक परिवर्तनाला अनुकूल अशी महाराष्ट्राची मनोभूमिका घडवण्याच्या प्रार्थना समाजाने केलेल्या ऐतिहासिक कार्याचा हा समक्ष पुरावा आजही पाहावयास मिळाला.

ह्या सर्व मंडळींचे ऋण ह्या लेखनामागे भरपूर आहे. मुंबई विद्यापीठातील प्रमुख ग्रंथपाल श्री. टिकेकर यांनी सुबोधपत्रिकेचे त्या काळातील अंक उपलब्ध करून दिले, म्हणून त्यांचीपण मी ऋणी आहे.

छाया दातार तर ह्या लेखनामागच्या प्रेरकच आहेत. तेव्हा त्यांचे ऋण माझ्यावर आहेच.

ह्या लेखनाद्वारे १९ व्या शतकातील 'स्त्रीमुक्तीच्या' जाणिवेचा आकार थोडाफार स्पष्ट होऊ शकला, तर ह्या सर्वांच्या सहकार्याचे चीज झाले असे म्हणता येईल.

मात्र खेदाची गोष्ट म्हणजे, ज्या निराश्रित मिशनसाठी महर्षी व जनाक्कांनी रक्ताचे पाणी केले, जिथे आपल्या आयुष्यातील उमेदीचा कालखंड कार्यरत राहून व्यतीत केला त्या मिशनमध्ये मात्र अनेक हेलपाटे घालूनही मला काहीही माहिती वा कागदपत्रे, अहवाल मिळू शकले नाहीत !

* *

प्रकरण १ ले

# जडण घडण

जनाक्कांचा जन्म कर्नाटकातील 'जमखिंडी' ह्या ब्राह्मणी संस्थानाच्या गावी १८७८ साली 'शिंदे' घराण्यात झाला. हे घराणे त्या काळातील एक सधन व सुखवस्तू घराणे दिसते. जनाक्कांचे वडील बंधू महर्षी विठ्ठल रामजी शिंदे (अण्णासाहेब शिंदे) ह्यांनी आपल्या आत्मकथनात घरच्या समृद्ध वातावरणाचे वर्णन करताना लिहिले आहे–'लहान असताना हातात सोन्याची कडी, कमरेस सोन्याचा करदोटा, गोठ्यात धिप्पाड बैल, शेतात इमानी नोकर, घरात पाहुण्यांची व आश्रितांची नांदी.... घरी पुराणिक भजनी मंडळी, साधु-संत ह्यांची रीघ लागे...'[१]

जनाक्कांचे वडील हे एक त्या काळातील प्रभावी व्यक्तिमत्त्व दिसते. आपल्या वडिलांविषयी अण्णासाहेब आपल्या 'माझ्या आठवणी व अनुभव' ह्या आत्मकथनात 'माझे बाबा' ह्या सुरवातीच्या प्रकरणात लिहितात-- "वडील जन्माने मराठा असले तरी ब्राह्मणी संस्थानात वाढल्यामुळे व कोण्या एका शास्त्रीबोवांच्या जवळ लिहायला व हिशेब ठेवायला शिकल्यामुळे शिक्षणाचे व बहुश्रुत रहाणीचे वळण बाबांच्या अंगात इतके भिनले, की आजोबांच्या शेतकीचा अगर शिलेदारीचा बाणा त्यांच्यात मुळीच उरला नाही. फार काय पण त्यांच्या पोषाखातही ब्राह्मणी झांक दिसे."

जनाक्का शिंदे आपल्या वडिलांविषयी लिहितात–

"आमचे वडील लहान असताना घरच्या मळ्यातली फुले दफ्तरदार नावाच्या गृहस्थांच्या घरी पोहचवीत असत. दफ्तरदारांची मुले ओसरीवर अभ्यास करत असत. ते पाहून शिक्षणाविषयी त्यांच्या मनात कुतुहल व गोडी उत्पन्न झाली व ते हट्टाने शाळेत जाऊ लागले. त्याबद्दल त्यांचे वडील त्यांना रागवायचे–'शिकायला तू काय ब्राह्मणाचा मुलगा आहेस?' तरीपण वडील हट्टाने शिकले. शाळेत त्यांचा एक ब्राह्मण बालमित्र होता. त्याचे नांव अप्पा यादवाडकर. त्यालाच पुढे जमखिंडीकरांनी दत्तक घेतले व त्याचे नांव झाले 'अप्पासाहेब

पटवर्धन'. पण राजा झाल्यावरही ते आपल्या बालमित्राला विसरले नाहीत. आमचे वडील पुढे मुलकी परीक्षेत छान पास झाले व बिद्री गावी प्राथमिक शाळेत शिक्षक झाले. परंतु तापट व करारी स्वभावामुळे तिथे न पटून त्यांनी राजीनामा दिला. तेव्हा पटवर्धनांनी त्यांना आपल्या खाजगीत २० रु. पगारावर ठेवले. त्यांचे अक्षर फार सुंदर होते. शिक्षणाची आवड, चिकाटी, दीर्घोद्योग ह्यांमुळे त्यांनी ज्योतिष, वैद्यकी, धर्मशास्त्र वगैरेंचा अभ्यास केला. असत्याची चीड, मानी स्वभाव व तापटपणा ह्यामुळे त्यांचे इतरांशी खूप खटके उडत. तरीपण उदार अंतःकरणामुळे सर्वांस हवेहवेसे वाटत. वाचन खूप असल्यामुळे जातिभेदाबाबत त्यांचे उदार धोरण होते. त्यांच्या मित्रपरिवारात ब्राह्मणापासून महारापर्यंत अनेक मित्र असून ती सर्व घरी एकत्र जमत असत, एकत्र जेवत हे मी स्वतः पाहिले आहे. आमच्या घरी ब्राह्मण तर राहू द्यात पण कट्टर धर्माभिमानी जैन किंवा लिंगायतांनी देखील महार-मुसलमानांबरोबर जेवतांना कधीही दुजाभाव दाखवला नाही."[२]

जनाक्कांच्या लेखनातून त्यांच्या वडिलांच्या व्यक्तिमत्त्वाची जी ही बाजू दिसते त्याचे आणखी काही महत्त्वाचे पैलू अण्णासाहेबांच्या आत्मकथनातून लक्षात येतात.

ह्या दोनही भावंडांच्या पुढील जीवनात ह्या सर्व पैलूंचा खूप संस्कार झालेला आढळतो. म्हणून ते पैलू जरा विस्ताराने पाहू.

अण्णासाहेब आपल्या आत्मकथनात आपल्या वडिलांचे वर्णन करताना सांगतात–

"... ते स्वभावाने शीघ्रकोपी पण खुल्या दिलाचे, मृदू अंतःकरणाचे व धार्मिक होते. ते पंढरपूर भक्त होते. त्यामुळे त्यांनी बहुतेक मुलांची नावे भागवत संप्रदायातील ठेवली. माझे नाव विठ्ठल, पहिल्या मुलीचे नावही जनाबाई असे ठेवले. तिच्या पाठोपाठच्या बहिणींची नावे मुक्ताबाई, चन्द्राबाई व भावाचे एकनाथ असे होते." शेवटी ते म्हणतात–"एकंदरीत वारकरी पंथाच्या साध्या, उदार, प्रागतिक भागवत धर्माचा पगडा माझ्या वडिलांच्या मनावर व अकृत्रिम शीलावरही बसला होता. त्याचा ठसा बाबांनी व आईनी माझ्या ग्रहणशील हृदयावर आपल्या प्रत्यक्ष आणि पदोपदीच्या प्रेमळ आचरणाने उठविला आहे. ब्राह्म समाजाचा प्रचारक म्हणून मी आज वावरत आहे. ह्यात काही श्रेय असेल तर मोठा भाग ह्या समाजापेक्षा माझ्या वडिलांनी घालून दिलेल्या जिवंत आचरणाच्या धड्याकडेच जास्त आहे. उत्तरेकडील मराठ्यांतील पडदानशीन नखरा किंवा ब्राह्मणी जातिभेदाचा सोवळेपणा, ह्या दोन सामाजिक विषांची बाधा आमचे घरी दिसून आली नाही.... आधुनिक सुधारकांप्रमाणे जातिभेद मोडण्याची उठाठेव करण्याची आम्हांवर कधी पाळीच येत नसे. कारण तो जातिभेदाचा संस्कारच आम्हांवर घडला नव्हता."[३]

"बाबा मराठे जातीचे सरपंच असूनही आमचे घरी जातिभेदाची ढिलाई होती. उघडपणे आमच्या घरी सर्व जातींच्या पंक्ती बसत. बाबांची मानमान्यता सर्व जातींत असे. आमच्या घराण्यात हिंदू धर्माची जुनी परंपरा, आचारविचार आणि बाळबोधपणा रुजला होता, तरीपण ह्यापेक्षा विशेष गोष्ट म्हणजे.... केवळ कर्मठपणा, धर्मभोळेपणा, दंभ आणि दुराग्रहाचा पगडा आमच्या घरी आई-बाबांच्या वर्तनात मला केव्हाच दिसून आला नाही. ढोंगी साधूचे कपट

दिसून आल्यास.... सांप्रदायिक अतिथीचा स्वार्थी मतलबीपणा दिसून आल्यास बाबांचा निःस्पृहपणा उग्र रूप धारण करीत असे.... आईने व्रते जरी केली तरी.... त्यात हट्ट नसे. दोघांच्याही धर्मभावना साध्या.... निर्हेतुक होत्या.... त्यातच माझ्या भावी सामाजिक व धर्म सुधारणांचा उगम आहे...."[४]

जनाक्कांची आई अतिशय सात्त्विक व कष्टाळू स्त्री होती असे दिसते. तिचे वर्णन करताना अण्णासाहेब आत्मकथनातील 'माझी आई' ह्या प्रकरणात लिहितात–

"माझी आई अलगूरसारख्या लहान खेड्यात गरिबीत वाढल्यामुळे तिला लिहिता-वाचता येणे शक्य नव्हते. तरीपण घरचे वैष्णव ब्राह्मणाचे वळण, सात्त्विक राहणी, शाहाकार, घरकामात कष्टाळूपणा व हुशारी ह्या गुणांनी ती मंडित होती. आई-वडील दोघांची भाषा (आईची कानडी, वडिलांची मराठी) शुद्ध ब्राह्मणी वळणाची होती. आईचा गळा अतिशय गोड होता. मोठेपणीही ती गाणी ऐकवून, गोपी-कृष्णांच्या गोष्टी सांगून आम्हा भावंडांच्या दारिद्र्याच्या कठीण वेदना हळुवार करीत असे." त्यांच्या आईला सासरी खूप सासुरवास सोसावा लागलेला दिसतो. त्याविषयी अण्णासाहेब सांगतात–

"आमच्या आजीचा स्वभाव खाष्ट होता. तशात गरिबीमुळे तिची लग्न झालेली मुलगी आमच्याच घरी राहात असे. त्यामुळे सासूच्या कहरात नणंदेची भर पडे. घरी गाई, म्हशी, खिल्लारे, गडी ह्यांचा मोठा रयतावा, त्यामुळे सुरवातीला घरी वैभव असूनही दिवसभर राबावे लागे. हिंदू सासुरवासाची नाजुक कारणे इतकी आहेत की जुन्या वळणातील सर्व लोकांना सुद्धा त्याची मीमांसा करता येत नसे. भरीला २० बाळंतपणे, (त्यातली पाचच मुले जगलेली दिसतात) पंधरा मुलांचा पुत्रशोक आईला करावा लागला. माझ्यामध्ये पुढे स्त्रीदाक्षिण्य व हिंदु विवाहपद्धतीसंबंधी कायमची तेढ उत्पन्न झाली तिचे पहिले बीज ह्या आईच्या खडतर सासुरवासात होते."

पुढे सासूसासरे वारल्यावर त्यांच्या आईला स्वातंत्र्य मिळालेले दिसते. पण अण्णासाहेब सांगतात–'तोच अठराविश्वे दारिद्र्याने तिला गाठले.' कारण वडील हुशार व प्रामाणिक असूनही त्यांच्या तापट व अतिशय मानी स्वभावामुळे नोकरीत कुणाशी पटलेले दिसत नाही. व्यवहारातील भोळसटपणामुळे पैसे बुडत गेलेले दिसतात. अण्णासाहेब लिहितात–"व्याज घेणे पाप समजत व बिनव्याजी दिलेले कर्ज कोणी फेडलेले स्मरत नाही. १८७३ मध्ये वडिलांनी नोकरीचा राजीनामा दिल्यानंतर कोणताच किफायतीचा धंदा केला नाही. भरीला वारकरी पंथाचा नाद, काही काळ पडलेली व्यसनांशी गाठ इ. मुळे बाबांनी कर्जाखाली खानदानी घालवली. त्यांनी आम्हाला अन्नालाही महाग केले. आईची जोड व निर्बंध नसता तर बाबा आम्हाला टाकून बैरागी होऊन निघून गेले असते."[५]

पुढे ते म्हणतात–"इतके होऊनही मुलांचा कंटाळा, संसाराचा तिटकारा किंबहुना दुःखाचा किंवा निराशेचा एक उद्‌गारही आईच्या तोंडून आमच्या कानावर आला नाही. उलट दारिद्र्याच्या असह्य वेदना, नवऱ्याचा रागीट स्वभाव व मुलांचा जोजार सोसूनही आम्हा लहानग्यांना नेहमी आपल्या माहेरच्या सुखदुःखाच्या गोष्टी रसिकपणे सांगून आई आमची

गोड करमणूक करीत असे."[६]

जनाक्कांच्या आईविषयी एक फार बोलका मजकूर 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' ह्या विठ्ठल रामजी शिंदे ह्यांच्या पुस्तकात सापडतो. ह्या पुस्तकात पान २७५ वर 'अस्पृश्यता घालविण्याचा बिनतोड उपाय' ह्या शीर्षकाचे बाबू धोंडी वायदंडे ह्यांचे सुबोध पत्रिकेतले (१८-२-१९२३) पत्र पुनर्मुद्रित केले आहे. त्यात पत्रलेखक जनाक्का शिंद्यांच्या आईविषयी सांगतात—

"घरी अतिथी आल्यास तो कोणत्याही जातीचा असो, त्याचे ताट ह्या माऊलीने आपल्या हाताने धुवावे. हे व्रत त्यांनी शेवटपर्यंत चालविले. पंचवीस वर्षांपूर्वी जमखिंडीस असता एक दहा वर्षांची महाराची अनाथ मुलगी रा. विठ्ठलराव ह्यांनी घरी आणून ठेविली. तिचेही ताट यमुनाबाई स्वतः धूत असत. हा प्रकार शेजाऱ्यापाजाऱ्यांस उघड माहीत असूनही बाईच्या सात्त्विकपणाच्या जोरावर सर्वच खपून जात असे."

अशा तऱ्हेने दारिद्र्य कष्ट सोसूनही, त्यांच्या आईच्या स्वभावात कडवटपणा आलेला दिसत नाही. अण्णासाहेब म्हणतात तद्वत 'आईच्या ह्या संतोषी वृत्तीचा प्रभाव ह्या भावंडांवर पडलेला दिसतो.'

अशा ह्या माता-पित्यांच्या पोटी, दोन भावांच्या पाठीवर जनाक्कांचा जन्म झालेला दिसतो. जनाक्कांच्या जन्माविषयी व ह्या दोघा बहीणभावंडांच्या सम प्रवृत्तीविषयी अण्णासाहेब सांगतात—

"माझा भाऊ परशुराम ह्याच्या पाठीवर आम्ही चौघे मुलगेच झाल्यामुळे,*... जनाक्का जन्मल्यामुळे, ही आमच्या घरातली पहिलीच मुलगी. म्हणून जनाक्का ही आम्हां सर्वांची लाडकी होती. विशेषतः ती माझ्या बाबांची मोठी लाडकी होती. ती लहानपणी अंगाने गुटगुटीत, बुद्धीने चुणचुणीत, भांडखोर व बोलकी असे. दिवसातूनच काय पण तासातूनही आम्ही कितीदा तरी भांडत असू. कारण दोघांचाही स्वभाव तापट, हावरा, अधाशी, खोडकर व दोघेही आम्ही बाबांचे लाडके त्यामुळे आमच्या कागाळ्यांना सीमाच नसे. आमची वर्दळ आईकडे गेली, की स्वयंपाक घरातले काम सोडून तिने आम्हाला धमकावयाला सोप्यात बाहेर यावे. पण आईचा स्वभाव शांत व सहनशील असल्याने आम्हा दोघांनाही तिच्या रागाचा धाक मुळीच वाटत नसे. पण बाबांचा, नुसता त्यांच्या नावाचाही आम्हांस जबर धाक असे... ते बाहेर गेले, की आमच्या धांगडधिंग्याला सुरवात होई. माझा मोठा भाऊ माझ्या आईसारखा शांत व मवाळ होता. तो आमच्यात फारसा मिसळत नसे. धाकटी तानाक्का थोडी मोठी झाल्यावर आमचेबरोबर खेळावयास येई. पण ती फारच भोळसर असल्यामुळे आम्ही सांगू ते ते ती मुकाट्याने करी. पुढे १८८५ मध्ये माझा मोठा भाऊपण पटकीने वारला."[७]

एकंदर, इतर बरोबरीच्या भावंडांच्या निधनामुळे व प्रवृत्ती साधर्म्यामुळे, अण्णासाहेब व

---

* ह्या चार मुलांतील अण्णासाहेब सोडून इतर तिघे लवकरच दिवंगत झालेले दिसतात. मोठा भाऊपण पुढे १८८५ मध्ये पटकीने वारल्यामुळे पाठोपाठची ही दोघेच उरलेली दिसतात.

जनाक्का ह्या दोन भावंडांमध्ये बालपणापासून खूप जवळीक निर्माण झालेली दिसते व पुढे आयुष्यभर ती प्रसंगाप्रसंगाने सतत वाढत गेलेली दिसते. ती दोघं सतत एकत्र खेळलेली, वाढलेली दिसतात. त्यामुळे मातापित्यांचे अण्णासाहेबांवर जे परिणाम झालेले वर सविस्तर वर्णन केलेले आहेत, ते तसे जनाक्कांवरही झालेले असावेत.

अशा तऱ्हेने जुळलेल्या ह्या दोघा भावंडांच्या बालविश्वात तिसरी आईपण तितक्याच जवळिकीने सामील झालेली दिसते. अण्णासाहेब पुढे म्हणतात—"एकंदर आईच आमची खेळगडी असे. आम्हांला बाहेरच्या खेळगड्यांची गरजच लागत नसे."

अशा प्रकारे ऐश्वर्यातून कडोविकडीच्या दारिद्र्यात दोन्ही भावंडे सहज सामावून जात असताना, जनाक्का व त्यांचे दोन मोठे भाऊ ह्यांची लग्ने १८८२ साली, वयाच्या अनुक्रमे ४-९-१४ व्या वर्षी त्यांच्या वडिलांनी एकदम करून टाकलेली दिसतात. ह्या लग्नांविषयी अण्णासाहेब आपल्या आत्मकथनात सांगतात—

"ही लग्ने करण्यात बाबांचा फार अव्यवहारीपणा व अविचार दिसतो. माझे वय व माझ्या बहिणीचे वय अगदीच अक्षम्य होते... तशात कर्ज काढल्याशिवाय लग्ने होणे शक्य नव्हते. म्हणून बाबांनी आमचा राहता राहिलेला वाडा गहाण ठेवून कर्ज काढले."[८]

दोन्ही सुनांकडील मंडळी गरीब म्हणून लग्नखर्च जनाक्कांच्या वडिलांच्याच अंगावर पडलेला दिसतो.

जनाक्कांच्या लग्नाविषयी अण्णासाहेब पुढे लिहितात—

"माझ्या बहिणीचे सालंकृत कन्यादान केले. तिचे सासरचे घराणे आसंगीचे, चांगले खाऊन-पिऊन सुखी होते. व्याही गोपाळराव कामते सभ्य गृहस्थ व समजूतदार रयत होते. पण वराला लिहिता-वाचता येत नव्हते. कृष्णराव (वर) सुखवस्तू बापाचा एकुलता एक लाडका मुलगा वय माझ्याइतकेच म्हणजे आठ-नऊ वर्षांचे. गोपाळरावांची बायको स्वभावाने खाष्ट व मत्सरी होती.... ह्यांपैकी एकही स्थळ माझ्या आईला पसंत नव्हते. सर्व खर्च आम्ही करूनही व्याह्यांनी म्हणजे माझ्या व भावाच्या सासऱ्यांनी बाबांना लग्नात फार त्रास दिला."

ह्या आपल्या लग्नाबाबत जनाक्कांनी आपल्या मुलाखतीत मजेशीर वर्णन केलेले दिसते. त्या सांगतात—

"वयाच्या ५ व्या वर्षी माझे लग्न झाले. या वयात लग्न म्हणजे काय हे कसं समजणार ? एका मोठ्या सणासमारंभासारखीच गंमत वाटली. माझ्या एकटीचीच नव्हे, तर दोन्ही भाऊ व माझे पति यांचाही लग्न म्हणजे गंमत हा समज झाल्याने, तेही मजेत हसत बागडत होते. लग्नानंतर रीत म्हणून ५-६ दिवसांसाठी मला सासरी नेण्यात आले."[९]

अण्णासाहेब आपल्या आत्मकथनात पुढे ह्याविषयी सांगतात- "लग्नाचा धांगडधिंगा संपल्यावर आम्ही सर्व, बहिणींच्या सासुरवाडीला म्हणजे आसंगी गावाला गेलो. व्याह्यांची शेती मोठी व घरही प्रशस्त होते. बरोबर आमचे आई-बाबा नव्हते. मग व्याह्यांच्या घरी आम्हांला कोण दाबात ठेवणार ? आमच्या धुडगुशीला ताळच उरला नाही- अशा रीतीने आठ दिवस मेजवान्या झोडून मजा करून आम्ही परत जमखिंडीस आलो.

ह्याच आठ दिवसांत एकदा वाळत घातलेल्या कैऱ्या खाण्यावरून छोटी जनाक्का व तिचा अजाण नवरा ह्यांच्यात कसे भांडण जुंपले व इतरजण कशी गमंत वाटून हसत होती... ह्या प्रसंगाचे जनाक्कांनी गमतीदार वर्णन केलेले आढळते.

त्यानंतर दहा-बारा वर्षांच्या होईपर्यंत जनाक्का माहेरीच राहिलेल्या दिसतात. त्या सांगतात—

"माझे ज्या कृष्णराव कामतेशी लग्न झाले तो वडिलांच्या मित्राचाच मुलगा. आपला मुलगा उनाड... म्हणून त्यांनी सुनेला तरी शिकवा असे माझ्या वडिलांना सांगितले. त्यांना (गोपाळराव कामते) शिक्षणाचे कौतुक होते. म्हणून मला घरातच शिकवण्यात येऊ लागले. मित्राचा मुलगा (विठ्ठलराव) शिकतोय म्हणून मित्राबद्दलही त्यांना कौतुक वाटे."[१०]

जनाक्कांच्या वडिलांना पण शिक्षणाविषयी किती ओढ होती हे आपण मागे पाहिलेच आहे. अण्णासाहेब आपल्या आत्मकथनात वडिलांच्या ग्रंथप्रेमाविषयी सांगतात—

"- श्रीधर, महिपति, तुकाराम, ज्ञानेश्वर वगैरे मराठी कवी आणि प्रासादिक संतांच्या ग्रंथांचे पारायण माझे बाबा स्वतःच करीत असत. त्यांच्या संग्रही ह्या जुन्या पोथ्या बऱ्याच होत्या व त्या वाचून ते नेहमी इतरांस पुराणिकाप्रमाणे अर्थ सांगताना मी ऐकत असे. पुढे मी हे ग्रंथ वाचून आपल्या वर्गातील मुलांना त्याचा अर्थ सांगत असे. नल-दमयंती ह्या सुंदर काव्यातील कविता मी घरी माझ्या आईला व बहिणींना म्हणून दाखवून मोठ्या रसिकतेने त्याचा अर्थ सांगत असे."[११]

जनाक्कांच्या वडिलांचे हे शिक्षणप्रेम पुढे समाजाच्या अभ्युदयार्थ धडपडू लागलेले दिसते. त्याविषयी जनाक्का सांगतात—"मला सांगण्यास अतिशय अभिमान वाटतो, की जमखिंडीत पहिली मुलींची शाळा स्थापण्याचे कामी कुणी पुढाकार घेतला असेल तर तो आमच्या बाबांनीच. ह्यासाठी त्यांनी 'श्रीमंताचे'पण मन वळविले व शाळा स्थापनेला त्यांची मदत झाली. स्पष्टवक्तेपणा, निर्भीड वृत्ती आणि जे सदसद्‌विवेक बुद्धीला पटले ते फाडकन् बोलून दाखवणे, ह्या गुणांनी लोक बाबांकडे आदराने पहात. 'श्रीमंताच्या' आप्तांपैकी 'रास्ते' वगैरेंच्या मुली शाळेत धाडण्यात श्रीमंतानी स्वतः भाग घेतला. ब्राह्मणांच्या मुलीसुद्धा शाळेत घालायला लोक तयार नसत. घरी जाऊन पालकांची विनवणी बाबा करत असत. त्यावेळी पुष्कळदा सनातनी पालकांकडून हेटाळणी केली जात असे. तरीपण मनाचा तोल राखण्यात कौशल्य लागे.... हे काम बाबांनी अंगावर घेतले. कारण ते गावातले प्रतिष्ठित व वजनदार गृहस्थ होते.

"माझ्या जन्माच्या सहा-सात वर्षं आगोदर मुलींची शाळा स्थापन झाली होती. मी सहा वर्षांनंतर शाळेत जाऊ लागले तेव्हा पटावर मुलींची संख्या सतरा-अठराच असे. सात-आठ ब्राह्मण, तीन-चार मराठा, दोन-तीन मुसलमान, माळी, कोळी, वडार, महार वगैरेंच्या मुली बाबांच्या शब्दाखातर भरती होत. त्यांना वेगळे बसावे लागे. पण प्रत्यक्ष शाळेत पाच-सहाच मुली हजर असत. यावरून त्या काळाच्या समाजास स्त्रीशिक्षण कितपत मानवत होते ह्याची कल्पना येईल.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध
क्र. 3866
२६६२८
८/६/८२



"पण ह्या कामामुळे सासऱ्यांना माझ्या वडिलांविषयी फार आदर वाटे."[१२]

अशा तऱ्हेने वडिलांच्यामुळे जनाक्कांचे शालेय शिक्षण सुरू झालेले दिसते. त्यांच्या शिक्षणाविषयी अण्णासाहेब आपल्या आत्मकथनात सांगतात–

"त्यांच्या (वडिलांच्या) प्रागतिकपणाचे मोठे कौतुक करण्यासारखी गोष्ट म्हणजे त्यांनी आपल्या दोन्ही मुलींनाही शाळेत घातले.... मी जसा माझ्या हायस्कूलात अगदी पहिल्या अमदानीतला मुलगा तशा माझ्या बहिणी त्यावेळच्या मुलींच्या शाळेतल्या जवळ जवळ पहिल्याच विद्यार्थिनी होत्या. जनाक्का आणि तान्याक्का ह्या दोघी धाकट्या बहिणी. पहिली मोठी हुशार, सतेज दिसे. धाकटी मात्र अगदी भोळी आणि बुद्धीने मागासलेलो दिसे."[१३]

जनाक्कांचा हा 'सतेज'पणा त्यांच्या घरातील वागण्यातही जाणवतो. त्या मुलगी असल्याने शाळेत जात असल्या तरी त्यांना आईला घरकामात मदत करावी लागत असे, असे दिसते.

त्या २१-१-४९ च्या 'तरुण महाराष्ट्रातील' मुलाखतीत सांगतात–

"आई म्हणायची तू दुसऱ्याच्या घरी जाणारी. तुझा काय उपयोग? विठू शिकला तर म्हातारपणी बघेल तरी !.... मला झाडलोट, चुलीला सारवण, शेण गोळा करणे इ. कामे करावी लागत. म्हणून मग सणावाराला घरात काही गोडधोड केल्यास (मी जास्त काम करते म्हणून) मलाच जास्त वाढ असे मी आईला सांगे. मात्र शेण गोळा करून घरच्या जळणाचा खर्च वाचवते याबद्दल आईने तारीफ करताच मी फुशारून जाई."

पुढे त्या सांगतात–"घरी मला बाबा किंवा विठूअण्णा कोणीच शिकवत नसत. शाळेत जे शिक्षण होईल तेवढेच. शाळेत जाण्याचा प्रथम मला कंटाळाच येत असे. बाबाच उशीर झाल्यास पोहोचती करत. दादा जिनगर नावाचे एक म्हातारे मास्तर आम्हा मुलींना शिवणकाम, भरतकाम शिकवीत.... त्यांच्यामुळे मी भरतकाम-शिवणकामात वाकब झाले."

जनाक्कांचे शालेय शिक्षण सुरू होते. त्या वेळी त्यांच्या घरातील मोकळे खेळीमेळीचे वातावरणपण त्यांच्यावर संस्कार करत होते असे दिसते. अण्णासाहेब आपल्या आठवणीत सांगतात–

"....माझ्या बहिणीही शाळेत लिहिणे वाचणे, कशीदा काढणे वगैरे शिकत होत्या. दारिद्र्याने पाठ पुरविली तरी..... घरच्या धार्मिक व सामाजिक (उत्सव) परंपरेत खंड पडला नाही. एकादशी, शिवरात्र, नवरात्र, गौरी-गणपती सर्व थाटात चाले .... दिपवाळीत एकाच पैशाच्या फटाकड्या मी आणि माझी बहीण जनाक्का थांबून थांबून उडवीत असू...."[१४]

विठ्ठलरावांच्या मित्र परिवारात ब्राह्मणापासून महार-मांग-मुसलमानापर्यंत सर्व मंडळी असत व सर्वांना त्यांच्या घरात मुक्तद्वार असे, असे दिसते. ते सांगतात–"माझा कोणताही सोबती असो त्यावर पोटच्या मुलांप्रमाणे अकृत्रिम प्रेम करण्याची माझ्या आईबापांची तयारी असे"[१५] "माझ्या दोन बहिणी जनाक्का व तान्याक्का ह्या लहान अल्लड असत. त्याही आमच्या (मित्रांच्या) धांगडधिंग्यात सामील होत."[१६]

आणखीही एके ठिकाणी ते लिहितात–"माझ्या दोन लहान बहिणी माझ्या लहानग्या

मित्रांबरोबर लडिवाळपणे व मोकळेपणाने वागत."[१७]

अशा ह्या मोकळ्या वातावरणात व आईच्या प्रमळ सावलीखाली वावरताना ह्या दोघां बहीणभावंडांत अत्यंत जिव्हाळ्याचे नाते जडत गेलेले दिसते.

ह्या स्नेहबंधाविषयी अण्णासाहेब काय म्हणतात ते पाहू.

आत्मकथनात ते लिहितात--

"घरातील माझी मैत्रिण म्हणजे माझी धाकटी बहीण जनाक्का. ही आमची जोडी जन्मभर आहे. अगदी लहानपणी आमची गट्टी जमण्याचे किंवा फू होण्याचे हेलकावे घड्याळाच्या लंबकापेक्षाहि वारंवार होत असत. दर सेकंदास भांडणारी आम्ही भावंडे झोपेतच काय ती अलग होत असू. माझा वडील भाऊ आमचे भांडण मिटवीत असे. पण तो वारल्यावर जणू मिटवणारा कोणी नाही म्हणून की काय आमचे भांडणच मिटले. खरे पाहता माझा स्वभावच बदलला. माझ्या बहिणीवरच्या सात्त्विक प्रेमाचा वाढता प्रवाह संथपणे अखंड वाहू लागला. माझा शाळेतला अभ्यास, माझे वाचनाचे व्यसन, माझ्या भोवतालचा सोबत्यांचा गराडा ह्या सर्व विक्षेपाला न जुमानता मी माझ्या बहिणीशी खेळत असे. (आता मी आणि ती वृद्ध झालो आहो तरी आमच्या सहवासात खंड नाही.) .... नवरात्र आले की जनाक्काचा चिमुकला घट निराळा बसवणे, गणेशचतुर्थी आली की तिचा छोटा गणपती निराळा मांडणे, आषाढातला मंगळवार आला की तिची गुळव्वा * सजवणे, या नाना प्रकारची सजावट ती सासरी जाईपर्यन्त करण्यात मी मोठा आनंद मानीत असे. आमच्या ह्या बालमैत्रीचे कौतुक करून आमची आई आम्हाला उत्तेजन देत असे."[१८]

बहिणीसाठी तिच्या गुळव्वाचे (मंगळागौरीचा प्रकार) देऊळ बनवून सजवायचे, त्याच्यासमोर मातीचे दिवे लावून खेळायचे, चिखलाचा रेडा करून त्याच्या पाठीच्या खळग्यात कुंकवाचे पाणी भरून तो कापायचा... वगैरे सर्व बहिणीच्या जोडीने विठ्ठलराव मोठ्या हौशीने करताना दिसतात. पुढे ते सांगतात –

"दुसरे दिवशी बुधवारी गुळव्वाचे विसर्जन करावयाला आम्ही जनाक्काच्या मैत्रिणी घेऊन डोंगरात जाऊन संबंध दिवसभर खेळून येत असू. तेव्हा शिदोऱ्या, लाह्या-खोबरे ह्यांची लयलूट ! हे एक बाळ वनभोजनच. खरे पाहता हा खेळ मुलींचाच. मी गेलो म्हणजे मुली 'शेळ्यांत लांडगा आणि बायकांत दांडगा' असे म्हणून माझी टिंगल करीत. तरी पण जनाक्कासाठी ते सर्व सोसून तिच्या खेळाचे सुख मी भोगी. मी माझ्या वाचनातल्या गोष्टी व सहलीतील अनुभवही जनाक्काला वेळोवेळी सांगून तिला मी माझ्या ज्ञानाच्या व माहितीच्या पातळीवर ठेवण्याचा सतत प्रयत्न करी. जनाक्काचा प्रतियोगी सहकार असायचाच."

जनाक्कांच्या स्वभावाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू विठ्ठलराव आपल्या ह्याच वर्णनात करताना दिसतात. ते सांगतात—

---

* गुळव्वा ही एक कर्नाटकी ब्राह्मणेतर मुलींची मंगळागौरच म्हणायची. मातीचे देऊळ करून गुंजा, पांढऱ्या बिया वगैरे लावून ते सजवितात.

"लहर आली म्हणजे मी आईच्या घरकामालाही हातभार लावीत असे... खाण्याचे पदार्थ करायला माझी पुस्तके टाकून तिच्या पुढे मी इतका सुळसुळत असे, की जणू तिची मी एक सूनच.... जनीक्का मोठी कामचुकार असे. खायला मी आणि कामाला माझा मोठा भाऊ हा तिचा बाणा असे."

ह्या निर्भर बालपणाला आणखी एक सुखद अनुभव लाभलेला दिसतो. अण्णासाहेब म्हणतात–

"आमचे बाबा आम्हा सर्वांना घेऊन वर्षातून निदान एकदा तरी विशेषतः पावसाळ्याच्या अखेरीस कोठेतरी वनभोजनाला जात असत.... आमच्या घरच्या सर्व मंडळींना व आपल्या एकदोघा जिवलग मित्रांनाही बरोबर घेतल्याशिवाय त्यांना वनभोजन यथासांग झालेसे वाटत नसे. ह्या कल्पनेत आईची त्यांना पूर्ण सहानुभूति व साह्य असे. सगळा दिवस आमचा मोठा आनंदात जाई. ही रसिकता बाबांमध्ये कोठून आली ह्याचे मला आता आश्चर्य वाटते. ह्यामुळे मजमध्ये सृष्टिशोभेची व अवलोकन शक्तीची बीजे रुजली."

घरातील सर्वच मुलांवर वडिलांचा भाव असला तरी जनाक्का वडिलांची खास लाडकी दिसते. अण्णासाहेब सांगतात

"जनाक्का बाबांची विशेष लाडकी. क्षत्रिय घराण्यात लहानपणी मुलींना मुलांचाच पोषाख घालण्याची बऱ्याच ठिकाणीं चाल असे*[१९] अशां मुलींना वडील केव्हा केव्हा सभांतून व दरबारातून अशाच पुरुषी पोषाखात घेऊन जात असतात. जनाक्कांचा हा पोषाख व त्या वेळचे तिचे वाळसें बाबांना व आमच्या घरच्या सर्व मंडळींना फार आवडत असे. आम्ही मुलांनी कधी विजार घातली नाही. तरी पण जनाक्काला उर्फ आपल्या 'आईला' बाबांनी कोल्हापुरी पद्धतीची तुमान करून आवडीने घालावी ! आणि तिनेही ती घालून मोठ्या दिमाखाने आम्हापुढे यावे.

आमचे बाबा आपल्या मुलींना 'आई' म्हणून हाक मारीत असत**... परकीयांवर ह्या गोष्टीतील सहृदयतेचा परिणाम चटकन होई."

अशा तऱ्हेच्या मोकळ्या, कौतुकाच्या, जिव्हाळ्याच्या व संस्कारसंपन्न वातावरणात जनाक्का वाढताना दिसतात.

ह्याच सुमारास त्यांच्या शाळेतील काही खोड्या... त्यातून घडत जाणारे त्यांचे व्यक्तिमत्व त्यांच्या शालेय जीवनातील काही प्रसंगांतून सुद्धा वेगवेगळ्या रूपातून जाणवत राहते.

आपल्या मुलाखतीत त्यांनी असे काही प्रसंग सांगितले आहेत. त्या सांगतात–

"शाळेत दर शनिवारी पाटीपूजा असे. मुलं फुलं, उदबत्त्या, कापूर, हळद-कुंकू ऐपतीप्रमाणे आणीत असत. आमच्या घरी आई रोजच पूजा करी म्हणून फुले आणि उदबत्त्यांच्या बाबत

---

* श्रीमती आनंदीबाई शिर्क्यांनी आपल्या आत्मचरित्रात (सांजवात: पान ३३१) शेवटच्या प्रकरणात अशाच लाडाचा व पुरुषी पोषाख बालपणी घातल्याचा उल्लेख केलेला आढळतो.

** बंगाली लोकांत बाप मुलीला 'मा गो' (अग आई) असेच संबोधतात.

मीच सरस ठरे. म्हणून मला त्याचा भारी गर्व वाटे. एकदा घरातल्या उदबत्त्या संपत आल्या होत्या, म्हणून आईने 'उद्याच्या पूजेला लागतील, नेऊ नकोस,' म्हणून बजावले. 'मी मुलखाची हेकेखोर' त्यामुळे दुपारी आई आडवी झाली असतांना गुपचूप पेटवून शाळेत घेऊन गेले."[२०]

अर्थात कुणाच्या दृष्टीस पडले नाही तरी पेटवलेल्या उदबत्तीचा गंध जाणवतोच ! पण हे त्यांच्या बालबुद्धीला न जाणवल्याने त्यांची चोरी कशी उघडकीला आली व खोटे बोलणे व वडिलधाऱ्यांचे न ऐकणे ह्याबद्दल त्यांना कसा भरपूर मार खावा लागला ह्याचे वर्णन करून शेवटी जनाक्का सांगतात-'बाबांना खोटे बोलण्याची चीड व शिस्तीची फार चाड असे.'

जनाक्कांचा धीटपणा व सतेजपणा दाखवणाऱ्या काही आठवणी ह्याच मुलाखतीत आढळतात. त्यांपैकी एक-दोन पाहू. त्या सांगतात-

"आम्ही दुसरीत असताना आम्हाला एक वृद्ध मास्तर होते. फार वाईट शिव्या देत असत. मुलींना त्यांचा फार राग येई. पण करणार काय ? पण एकदा आम्ही गमंत करायची ठरवले. ते तपकीर ओढत. मधल्या सुट्टीत ते घोरत पडले असताना बाजूलाच डोक्याशी असलेली तपकिरीची डबी घेऊन, त्यांचीच तपकीर मी त्यांच्या दोन्ही नाकपुड्यांत कोंबली व लगेच दाराबाहेर धूम ठोकली. ते खूप संतापले.... पण मग मी कारण सांगून टाकले. जेव्हा पहावे तेव्हा तुम्ही शिवी देता. आम्हाला नाही खपत ती शिवी. म्हणून मी तपकीर तुमच्या नाकात टाकली. ऐकल्यावर ते शांत झाले. आणि म्हणाले 'मानी स्वभावाच्या राम बसाप्पाची मुलगी तू. कुळवाड्याची थोडीच आहेस, असली शिवी ऐकून घ्यायला.'.... पण तेव्हांपासून त्यांचे शिवी देणे बंद झाले." अशा तऱ्हेने जनाक्कांचे शिक्षण चालू असताना साधारण वयाच्या ७ व्या वर्षी त्यांना काही दिवसांकरता सासरी नेण्यात आल्याचे दिसते.

त्या सांगतात-"सासू तत्कालिन पद्धतिनुसार तट्टावर बसून माझ्या माहेरी आल्या व मला थोडे दिवसाकरता घेऊन गेल्या. सासरची सलय व्हावी व चांगलेचुंगले खाऊपिऊ मिळावे म्हणून आईने पण होकार दिला.... जत्रेसाठी कुठल्यातरी गावी निघावे तशी मी उत्साहाने निघाले. मी निघतांना आईवडील खिन्न का झाले ते मला कळेना.... तट्टावर बसून नणंदांसह खोड्या करीत मी गावी पोहोचले.... मी परक्या घरची लेक. गोपाळरावांची एकुलती एक सून म्हणून सारेजण माझे विशेष लाड करत. याचेच वैषम्य वाटून बरोबरीची नणंद लक्ष्मीबाई माझ्याशी धुसफुस करी.... क्षुल्लक कारणावरून एकमेकींचे केस उपटण्यापर्यंत भांडण होई. सासूबाई मध्ये पडून भांडण तोडीत असत. रात्री निजतांना आईची आठवण येऊन मी रडू लागले. कारण मला एकटं झोपण्याची सवय नव्हती. मग सासूबाईंनी जवळ थोपटून निजवले."[२१]

जनाक्का सांगतात त्याप्रमाणे प्रथम प्रथम त्या सासरी नणंदांबरोबर घरात, बागेत हुंदडत असत. मळ्यात जाऊन काकड्या, गाजरे, पेरू, चिंचा, बोरे खाण्यात त्या नणदांच्या पण पुढे असत. नवी सून बघायला लोक आले तर त्यांना मळ्यातून धरून आणीत व लोकांना सूनबाईंचे दर्शन घडवीत. त्या पुढे म्हणतात- "नमस्कार कसा तो मला ठाऊक नव्हता. आणि माझ्या त्या वयात कोणी तशी अपेक्षाही करीत नसत. उलट माझ्या बालीश वृत्तीचे कौतुकच होत असे...

माझ्या बंधूच्या सहवासात, घराजवळील झाडावर चढण्यास शिकले होतेच. तेव्हा मी झाडावर चढते हाच सासरी कौतुकाचा विषय असे.... रंगाने उजळ, लिहिण्यावाचण्यास शिकलेली आणि जमखिंडीतील प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या रामजीबुवांची मुलगी, सून म्हणून आणली ह्याचाच सासूबाई इतरांपुढे गौरवाने उल्लेख करीत असत."

ह्यानंतर जनाक्का पुन्हा माहेरी आल्या व मग १२ वर्षांच्या झाल्यावर सासरी गेलेल्या आढळतात. त्यांचे सुरवातीचे सासरचे कौतुकाचे जीवन आणि पुढे त्यात होत गेलेले कटु परिवर्तन ह्याचे जनाक्कांनी आपल्या मुलाखतीत तटस्थपणे विवरण केलेले दिसते.

जनाक्कांचे सासरी सुरवातीला जे कौतुक होत होते त्यामागे त्यांचे प्रतिष्ठित घराणे, उजळ सतेज रूप आणि धीट, मुक्त वागणे हे जसे होते तसेच किंबहुना त्याहूनही महत्त्वाचे असे आणखी एक कारण दिसते. त्या सांगतात–

"मी १२व्या वर्षी सासरी आले तेव्हा माझी ४ थी इयत्ता पूर्ण झाली होती. मला खूप कविता तोंडपाठ येत असत. घरी बाबांनी धार्मिक ग्रंथ वाचनाची सवय लावली होती. मला वाचनाची चटक लागली होती. विठूअण्णाची मराठी पुस्तके मी सहज वाची. वाचनाची आवड लागल्यामुळे आईने कामाला हाक मारली, की मला राग येई. पण सासरी आल्यावर कागदही बघावयास मिळत नसे... पण मराठी स्पष्ट बोलणारी, टापटीपीने पोषाख करणारी, स्वभावाने चुणचुणीत म्हणून... घरातील सर्वच मला नावाजत. माझ्या मामंजींना व सासूबाईंना मला कुठे ठेवू कुठे नको असे होऊन गेले होते. पहिले चार पाच दिवस तर माझ्या मामांनी व मामींनी (सासू-सासरे) माझे स्तोमच माजवले होते."[२२]

त्यांचा स्वतःचा मुलगा शिकत नव्हता. त्यामुळे घरचा कारभार स्वतः पाहू शकत नव्हता. ह्यामुळे त्यांना सुनेच्या हुशारीचे अप्रूप वाटले असावे, असे वाटते.

ह्याच मुलाखतीत पुढे त्या सांगतात–

"एकदा सकाळच्या प्रहरी मी माझ्या नणंदांसह... आडावर पाणी भरण्यास गेले असता वाटेत एक कागदाचा कपटा सापडला. तो मोडीत लिहिलेला होता. मला मोडी तितकेसे नीट वाचता येत नव्हते. तरी मराठी कुठेच वाचावयास मिळाले नाही म्हणून मोडी वाचनावरच मी माझ्या वाचनाची हौस भागवू लागले. माझ्या नणंदा माझ्या भोवती गोळा होऊन मी कसे वाचते इकडे टक लावून पहात होत्या. अर्जाच्या नकलेची भाषा अपरिचित. तरी देखील मी तो अडखळत का होईना पण नीट वाचला, तेव्हा आमच्या पाठीमागे माझ्या वाचनाकडे लक्ष देऊन ऐकत असलेल्या मामंजींनी मला पोटाशी धरून म्हटले, 'माझी बाळ ती. आता दिवाणजींची कशाला जरुरी ? माझी पोरच घरचा सगळा हिशोबटिशेब पाहील... कागदोपत्रीचा व्यवहार तिऱ्हाईत माणसाला राबवून करून घेण्यापेक्षा घरच्या माणसांवर सोपवलेला काय वाईट."

मोठ्यांकडून होणाऱ्या ह्या कौतुकामुळे हळूहळू त्यांचा मत्सर करणारी त्यांची नणंदसुद्धा त्यांना नावाजू लागलेली दिसते. मात्र जनाक्कांच्या ह्या अनिवार कौतुकाचा त्यांच्या पतीवर मात्र अनिष्ट परिणाम झालेला दिसतो. जनाक्का पुढे सांगतात–

"माझ्या स्तुतीची जिला चीड येई, माझी 'चहा' झालेली ऐकून मनातल्या मनात जी

चरफडत असायची... माझा मत्सर करायची अशी एक व्यक्ति होती व ती म्हणजे माझे पति."

नवऱ्याच्या ह्या मनोवृत्तीचे विश्लेषण करताना ह्याच अंकात जनाक्का सांगतात–

"माझ्याबद्दल तिरस्कार, द्वेष, मत्सर वाटायला तसे कारणही बलवत्तर होते. ते सुखवस्तु जमीनदाराचे एकुलते एक चिरंजीव. लाडात वाढलेले. शाळेत जायचा त्यांना कंटाळा... वडील रागावू लागले तर आई मध्ये पडून म्हणायची–

'माझ्या मुलाला काय कमी आहे... की त्याने येवढा धाक येवढ्या लहान वयात बाळगून शिक्षण घ्यावे ?'* त्यामुळे हे अगदी 'पोकळीत' राहिलेले. घरातल्या लाडामुळे शेफारून गेले व तसेच अक्षरशत्रू राहिले. मामंजी तर त्यांना दररोज हिणवीत. कठोर शब्दांनी उनाड वृत्तीची हेटाळणी करत. शिक्षण घेतले नाही म्हणून जिव्हारी लागेल अशी भाषा सतत वापरत असत. परिणामी हे मला टाळत... माझ्या मोडी वाचनाचे घरात कौतुक झाले तेव्हा त्यांना किती वैषम्य वाटले असेल ह्याची कल्पना येण्यासारखी आहे. ते तेव्हा अठरा-एकोणीस वर्षाचे होते. अंगाने धडधाकट, शेतात राबत, शेतीच्या कामावर देखरेख ठेवण्याइतके मोठे झालेले... तशात मामंजीचे शब्द कानावर जाताच मित्रांनी चिडवून जीव नकोसा केला.

'तुझी बायको ओसरीवर जमाखर्चाच्या वह्या घेऊन दिवाणजीचे काम पहाणार व तू मात्र ठोंब्यासारखा शेतात बैलांच्या शेपट्या पिरगाळीत रहाणार'.... पुरुषी अभिमान किती डिवचला जात असेल व माझ्याबद्दल त्यांच्या भावना किती वाईट होत चालल्या होत्या ह्याची कुणालाच कल्पना नव्हती. म्हाताऱ्याकोताऱ्यांनी वेळी अवेळी टर उडवावी तेव्हा त्यांना मेल्याहून मेल्यासारखे होत असणार यांत शंका नाही. ह्या कारणामुळे माझ्याबद्दल अढी त्यांच्या मनात निर्माण झाली ती कायमचीच. त्याचा परिणाम मला भोगावा लागला."

जनाक्कांचे सासर सुखवस्तू असले तरी चाळीस-बेचाळीस माणसांचे एकत्र कुटुंब, शेतीची कामे, घरातली अंगमेहनतीची कामे बायकांनीच करायची पद्धत असल्यामुळे सुरवातीला कौतुक झाले तरी हळूहळू सासर काय चीज असते ते जनाक्कांच्या लक्षात येऊ लागलेले दिसते. दिवसभर नानाप्रकारच्या कामाच्या रगाड्यांत त्या बुडून गेलेल्या दिसतात. नवऱ्याच्या मनातील राग पण अनेक प्रकारे जनाक्कांना जाणवू लागलेला दिसतो. त्याचे ह्याच अंकात जनाक्कांनी सांगितलेले एक-दोन प्रसंग पाहू. जनाक्का सांगतात–

"सासरी इतके अंग मोडून काम करावे लागे तरी माझा मूळच्या खेळकर स्वभाव काही गेला नव्हता. एकदा दुपारचे वेळी, मळ्यांत पाखरे हाकायची सोडून मी नणंदांस म्हटले–'चला आपण शाळा शाळा खेळ खेळू. मी आई होणार व तुम्हाला शाळेत पाठवणार.. मग मी मास्तर होणार.. आणि मास्तर जसे शिकवतात तसा धडा देणार' याप्रमाणे आमचा खेळ रंगात आला

---

* सुखवस्तू ग्रामीण समाजात ही विचारसरणी प्रचलित दिसते. महर्षींचे मित्र तेरदाळचे देशपांडे. त्यांची मुलगी सौ. शकुंतलाबाई जमदग्नी हाच अनुभव सांगतात. त्या म्हणाल्या, 'आमच्या घरची श्रीमंती. पण आमचे भाऊ फार शिकले नाहीत. आई त्यांना रागावून शाळेत पाठवू लागली तर आमची आजी म्हणायची– 'अग ही आई का कोण ? मुलाला शिकायला दूर पाठवते ?'

होता. तेवढ्यात माझा नवरा तेथे आला. खूप रागावला. माळ्यावरून बहिणींना उतरवून घेऊन निघून गेला... जाताना माळ्याची शिडी मुद्दाम काढून टाकली व खुनशीपणाने म्हणाला, 'काम सोडून शाळा शाळा काय खेळता ? येवढी शाळेची हौस तर मग इथं कशाला झक मारायला यायचं होतं ? रहायचं होत आपल्या घरी शाळा शिकत... वगैरे"

जनाक्का तशाच एकट्या माळ्यावर रडत बसल्या. मग बाजूनं जापाऱ्या गड्याच्या मदतीनं त्या उतरून घरी गेल्या. पण त्या म्हणतात–

"तेव्हा मला कामचुकारपणा केला म्हणून रागावले येवढेच वाटले; पण शाळेचा खेळ खेळल्याने त्यांचा मत्सरभाव भडकत होता हे मला त्या वयात कसे कळणार ?"

एकदा जनाक्कांना भावाचे (शिंदे) पत्र आले. त्या वेळी वि. रा. शिंदे मॅट्रिक होऊन पुण्याला कॉलेजात शिकत होते. भावाचे पत्र त्यांच्याजवळ देऊन, सासऱ्यांनी त्यांना उत्तर लिहिण्यास सांगितले. शिंद्यांवर जनाक्कांच्या नवऱ्याचा राग दिसतो. जनाक्का सांगतात–"कारण ते दोघं बरोबरीचे. विठूअण्णांचे उदाहरण देऊन मामंजी ह्यांना सतत बोलत असत. त्यामुळे त्यांना माझा मत्सर व अण्णांचा राग येत असे. त्यामुळे मी पत्र लिहायला बसले तर ह्यांनी मागून येऊन कागद ओढून फाडून टाकला. संध्याकाळी घरी आल्यावर मामंजीनी पत्र लिहिले का म्हणून विचारले.... मी काय सांगणार ? माझ्या डोळ्यातून आसवांची धार वाहू लागली...."

पुढे बायकोकरवी खरा प्रकार काय झाला तो सासऱ्यांना कळल्यावर ते खूप रागावलेले दिसतात. पुन्हा कागद आणून देऊन त्यांनी जनाक्कांना पत्र लिहायला सांगितले. पण पुन्हा नवऱ्याने फाडून टाकलेले दिसते. शेवटी हातात काठी घेऊन सासऱ्यांनी जनाक्कांना समोर बसवून पत्र लिहवून घेतलेले दिसते. जनाक्का पुढे सांगतात–"परिणामी बाप-लेकांत तेढ उत्पन्न झाली. दोघांची खूप भांडणे होत. सासूला माझी कीव यायची पण लेकाकडे पण त्यांचा जीव ओढायचा. ते दोन-दोन दिवस घरी येत नसत... तशात मी चवदा वर्षाची झाले तरी 'मोठी' झाले नव्हते.... हे तरुण वयात आलेले. उमेदीचे. आधीच माझ्याविषयी अढी.... तशात ही अडचण भरीला. अशिक्षित, हलकट लोकांची संगत लागलेली. त्यामुळे व्हायचे तेच झाले !"

अशा प्रकारे घरातील मानसिक व शारीरिक कुचंबणा व न्यूनतेची सतत टोचणी ह्यामुळे जनाक्कांचे पती बाहेरख्याली होत चाललेले दिसतात. एका महार पोरीशी केलेल्या अशा भानगडीत संपूर्ण महार वस्ती चवताळून कुऱ्हाडी पाजळून त्यांना मारण्यासाठी सिद्ध झाली होती असे दिसते. जनाक्कांच्या सासऱ्यांच्या कानावर ह्या गोष्टी जाताच त्यांना अतिशय राग व दुःख झाले. पण शेवटी लेकाच्या गुन्ह्याची क्षमा मागण्यासाठी ते रात्रीचे रात्री महारवाड्यात गेलेले दिसतात. जनाक्का सांगतात–"महारवाड्यात जाऊन त्या चवताळलेल्या महारांपुढे उभे रहात ते म्हणाले, 'माझ्याकडे पहा. जी काय शिक्षा तुम्हाला करायची असेल ती तुम्ही मला करा. .. जवळपास मी काठीसुद्धा आणलेली नाही.'.. मामंजींना पहाताच महार बुचकळ्यात पडले. काठ्या टाकून ते मामंजींच्या पाया पडले. म्हणू लागले, तुम्ही आम्हाला देवासारखे पण आम्ही तरी हा प्रकार कुठवर सहन करायचा ?"[२३]

जनाक्का पुढे सांगतात– असे प्रसंग घडले की सासूबाई वैतागून मला म्हणायच्या , जना

तुझं पुढं कसं होईल ग ? एकदा विहिरीत पडून मरून का जात नाहीस ? म्हणजे सुटशील तरी एकदाची !"

मुलाच्या बदफैलीपणामुळे महारवाड्यात घडलेला आपला दुलौंकिक पाहून जनाक्कांच्या सासऱ्यांना धक्का बसलेला दिसतो. 'आजपर्यंत आपण नेकीने सचोटीने राहून जी प्रतिष्ठा मिळवली ती धुळीस मिळालेली पाहून ते उदास झाले व घराबाहेरच जास्त राहू लागले, पण ह्यापासून धडा घेण्याच्याऐवजी हे अधिकच स्वैर व बैलगाम वागू लागले.' असे जनाक्का सांगतात.[२४]

ह्याचे प्रत्यंतर म्हणजे, त्यांनी जवळच राहणाऱ्या एका तरुण स्त्रीच्या घरातील सारी जत्रेला गेल्याची संधी साधून तिच्या अब्रूवर धाड घातलेली दिसते. तिचा म्हातारा चुलत सासरा तेवढा घरी होता. त्याच्या लक्षात हा प्रकार येताच त्याने खोलीला बाहेरून कडी घातली व कुऱ्हाड पाजळू लागला. जनाक्का सांगतात–

"माझ्या चुलत सासऱ्यांना हे कळताच त्यांनी धावत जाऊन म्हाताऱ्याची समजूत काढून ह्यांना वाचवले. ते वेळेवर न पोहोचते तर ह्यांचा खूनच पडता. पण माझे कुंकू बळकट म्हणून तो प्रकार घडला नाही."*

ह्या सर्व लाजिरवाण्या प्रकारानंतरही जनाक्कांच्या पतीला शरम वाटलेली दिसत नाही. उलट ते जीव वाचविणाऱ्या काकालाच तोंड टाकून बोललेले दिसतात. जनाक्का पुढे सांगतात– "मामंजीच्या अंगावर ओरडत ते म्हणू लागले–तुम्ही मला कोण बोलणार ? तुम्हाला स्वतःला दोन-दोन बायका आहेत, मग मला पण दुसरी का नको ? मी काय कुणाचे घोडे मारलंय ? मामंजीना हा प्रकार कळल्यावर ते खूप संतापले. ह्यांना त्यांनी बेदम मारले; पण झाल्या प्रकाराबद्दल पश्चात्तापाऐवजी त्यांचा बेतालपणा, बेमुर्वतखोरपणा हद्दीच्या बाहेर जाऊ लागला."

शेवटी तर जनाक्कांच्या पतीने घरातच एक बाई आणून ठेवलेली दिसते. त्यांना खरेतर दुसरे लग्नच करायचे होते. पण त्यांच्या वागणुकीचा गावात बभ्रा झालेला. कोणी मुलगी देईना. पहिल्या बायकोत दोष नाही म्हणून आईवडील पण ह्या दुसऱ्या लग्नाच्या विरुद्ध दिसतात. त्यामुळे ह्याच अंकात जनाक्का सांगतात "त्यांच्या मनातला हा बेत जमेना. देवो दुर्बल घातकः ह्या न्यायाने, ह्या सर्वांचा राग माझ्यावर निघू लागला. आईने काहीतरी करावे म्हणून तिच्यावर ते दडपण आणू लागले. हळू हळू तिचा आधार पण सुटू लागला."

बायकोपासून सुटका मिळवण्यासाठी जनाक्कांच्या पतीने दोन अघोरी मार्ग पण चोखाळलेले दिसतात. एकदा घरातीलच राम्या महाराला, संध्याकाळी शेतातून परतताना जनाक्कांच्या अब्रूवर घाला घालण्यासाठी लालूच दाखविलेली दिसते. पण तो बालपणापासून घरात राहिलेला. 'आपल्याच्यानं हे वंगाळ काम होणार नाही', असे सांगून तो नोकरी सोडून

---

* हा शेवटचा अभिप्राय जनाक्का वयाच्या सत्तरीनंतर दिलेल्या मुलाखतीत सांगत आहेत. नवरा कितीही बदफैली असला तरी तो आपल्या कुंकवाचा, सौभाग्याचा धनी असतो. आणि म्हणून तो जगला पाहिजे, हा संस्कार जनाक्कांच्या मनावर पण शेवटपर्यंत टिकून राहिलेला असावा का ?

निघून गेलेला दिसतो.

दुसऱ्यांदा गावातील बेरडांना जनाक्कांना मारण्यासाठी सुपारी दिलेली दिसते. पण ते देखील बधलेले दिसत नाहीत. ह्याविषयी ह्याच अंकात जनाक्का म्हणतात- "मारामाऱ्या, खून करणारे नीच बेरडसुद्धा खुनाची सुपारी घेण्यापूर्वी पूर्ण चवकशी केल्याखेरीज दुसऱ्याच्या वचनात स्वतःला बांधून घेत नाहीत."

नवरा मुलगा व सून ह्यांच्या संघर्षात सासूची अवस्था जणू कात्रीत सापडल्यासारखी झालेली दिसते. त्यांचेही वर्तन बदलू लागलेले आढळते. जनाक्का सांगतात-"पूर्वी मी निःशंकपणे त्यांच्या आधारावर रहात होते. त्याच आता तुटकपणे वागू लागल्या. 'जीव का देत नाहीस ? म्हणजे सुटशील तरी एकदाची. तुला मरण कसं येत नाही ?'– असे वरचेवर मला म्हणू लागल्या. 'घर फिरले की घराचे वासेपण फिरतात' ह्या न्यायाने सासूची वागणूक बदलल्यावर नणंदापण बदलल्या. आवाक्याबाहेरची कामे करवून घेऊ लागल्या. जेवले की न जेवले ह्याकडेही कानाडोळा करू लागल्या. लहान वय, सांगितले काम निमूटपणे करावे, देईल ते खावे, नेसवतील ते नेसावे अशी माझी स्थिती झाली. दिवसभराच्या श्रमाने मी थकून जाई."

नवरा बेफाम झालेला. सासरा हतबल नि सासू साऱ्यामुळे वैतागलेली– अशी जनाक्कांभोवतीची स्थिती झालेली दिसते. तशात एकदा जनाक्कांच्या हातून दूध उघडे राहिले व त्यात रात्री मांजर पडली. सकाळी ती फुगून वर आलेली पाहिल्यावर जनाक्का भ्रमिष्ट झाल्या आहेत, असे पसरविण्यास सुरवात केलेली दिसते. जनाक्का सांगतात–

"माझ्या हातून घडणाऱ्या प्रत्येक चुकीबाबत असा निष्कर्ष काढून वेळी अवेळी मी वेडी आहे असे म्हणावयास सुरवात केली. मला जीव अगदी नकोसा झाला होता. एकदा तर मी जीव द्यायला विहिरीवर गेले देखील होते; पण एका पोक्त बाईने मला वाचविले."

ह्या सर्वांवर शेवटी तोडगा म्हणून जनाक्कांना माहेरी पाठवलेले दिसते. निघताना नवऱ्याने हरकत घेऊन त्यांचे दागिने पण नेऊ दिलेले दिसत नाहीत.

ह्या घटनेविषयी अण्णासाहेब शिंदे आपल्या आठवणीत लिहितात–

"जनाक्कांची सासू मोठी खाष्ट बाई होती आणि नवरा फार अविचारी व उर्मट होता. ह्या सासूचा व नवऱ्याचा छळ जनाक्कांच्या सासऱ्याला प्रत्यक्ष आवडत नव्हता. पण त्याचे घरी अशा बाबतीत चालत नसे.... घरी पडेल ते सर्व काम जनाक्का एखाद्या मोलकरणीप्रमाणे जरी बिनबोभाट करीत असे, तरी तिच्या सासूला ते खपत नसे. जनाक्कांच्या जीवाला अपाय घडण्याचे प्रसंग वरचेवर येऊ लागले. गोष्ट इथवर आल्याने मला ह्या प्रकरणात हात घालावा लागला. घरची गरिबी, माझ्या कॉलेजच्या खर्चाची ओढाताण अशा स्थितीत मी जनाक्कांची

*ह्या काळात वि. रा. शिंदे पुण्यास कॉलेजात शिकत होते. रानडे, भांडारकर, आगरकर आदी सुधारकांच्या भाषण-लेखनाच्या प्रभावाखाली होते.इंग्रजीच्या अध्ययनाने व वाचनाच्या आवडीने मिल्ल, स्पेन्सर आदींच्या विचाराने भारलेले होते हे त्यांच्या आत्मकथनातून दिसत राहते.

काय व्यवस्था करणार? पण त्या वेळी माझ्या सुधारणेच्या मताला आणि सामान्यतः स्त्रीजातीसंबंधी कारुण्यालाही पूर येत होता.* अशा वेळी प्रत्यक्ष माझ्या बहिणीवर, तिची वागणूक इतकी पवित्र व स्वभाव सहनशील असूनही, असा प्रसंग आलेला पाहून मी बेभान झालो... मी माझ्या आईबाबांना तिला एकदम आमचे घरी आणावयाचा आग्रह केला. आमचे बाबाही मानीच होते.... मागचा पुढचा जास्त विचार न करता आमच्या आलगूरच्या मामांना बहिणीला आसंगीहून आमचे घरी आणण्याला पाठवून दिले. त्यामुळे जनाक्कांच्या सासूला व नवऱ्याला आयतेच फावले. त्यांनी जनाक्कांचे सर्व दागिने कांढून घेऊन नेसलेल्या फाटक्या लुगड्यानिशी तिला पाठविली. त्यानंतर आम्ही जनाक्काला अखेरपर्यंत आसंगीला कधीच पाठवले नाही. अगदी लहानपणीच जनाक्का अशी आपल्या सासरला कायमचीच अंतरली आणि केवळ अविवाहित अशी आमचे घरी राहिली.

"ह्यापुढे काही दिवसांनी जनाक्काचा सासरा गोपाळराव हा तिला न्यावयाला आला; पण तिला सासरी कोणत्याही प्रकारे सुख लागण्याची आशाच नव्हती. उलट तिच्या जीवालाच अपाय घडण्याची भीति होती. म्हणून आम्ही तिला पाठवली नाही. गोपाळरावालाही विशेष आशा वाटत नव्हती म्हणून तो बिचाराहि जास्त आग्रह न करता निमूटपणाने आल्या पावलीच परत गेला. ह्या सर्व प्रकरणाला मीच कारण होतो. म्हणून जनाक्काच्या पुढच्या सर्व आयुष्याची जबाबदारी माझ्या कोवळ्या शिरावर पडली." [२५]

महर्षींनी जनाक्कांच्या सासूचे केलेले मूल्यमापन व स्वतः जनाक्कांनी तिचे घडवलेले दर्शन- ह्यातील फरक नोंदवण्यासारखा आहे.

पुढे लवकरच जनाक्कांच्या नवऱ्याने जेव्हा दुसरे लग्न केले, तेव्हा पण त्याला जनाक्कांच्या सासऱ्यांनी विरोध केलेला दिसतो. इतकेच नव्हे तर जनाक्कांच्या वडिलांनी पण ह्या लग्नाला विरोध करावा, आपला त्यांना पाठिंबा राहील असे त्यांनी सांगितलेले आढळते. पण अण्णासाहेब शिंद्यांचे असे मत पडलेले दिसते, की जिथे तिचा नवरा तिला नांदवून घेत नाही तिथे आपण हरकत घेऊन काय उपयोग ? आणि त्यामुळे सर्वजण स्वस्थ राहिलेले दिसतात.

जनाक्कांच्या मुलाखतीनुसार, त्यांनी सासरी परत नांदायला जावे असे त्यांच्या वडिलांना वाटत होते. ते अण्णासाहेबांना म्हणत–

"अरे बाबा, एक वेळ हत्ती पोसवेल पण लग्न झालेली, नवरा हयात असलेली मुलगी घरी ठेवणे अशक्य आहे. सासरी असले प्रकार नेहमीच होत असतात. म्हणून काही कुणी आपल्या मुली कायमच्या घरी आणत नाहीत. तू चार बुकं शिकून आलास तेव्हा कानात वारा शिरल्यासारखे वागू नको. ज्याच्याशी जन्माची लग्नाची गाठ त्याच्याकडे तिला पाठवूया."[२६]

---

* वि. रा. शिंद्यांची हुशारी व धडाडी ह्यामुळे त्यांच्या आईवडिलांवर त्यांचे चांगलेच नैतिक वजन पडत असावे असे दिसते. ते स्वतः एके ठिकाणी लिहितात- (आठवणी व अनुभव, पान ८५) 'सातव्या इयत्तेत असताना माझ्या बुद्धिवादाची पूर्वचिन्हे थोडीशी माझ्या वर्तनात दिसू लागली होती. त्यामुळे त्यांनी माझी धाकटी बहीण मुक्ताबाई हिच्या विवाहाची घाई (जनाक्काप्रमाणे) केली नाही...'

जनाक्कांचे वडील बाणेदार व स्वाभिमानी व समाजाची भीड न बाळगणारे असे होते, हे आपण पाहिले आहे. तरी देखील मुलीच्या लग्नाबाबत त्यांच्या मनावर पारंपरिक मूल्ये व समजांचा पगडा बराच दिसतो. भावनेच्या भरात व सुशिक्षित हुशार मुलाच्या प्रभावामुळे* त्यांनी सुरवातीला जरी लेकीला परत माघारी आणण्यास संमती दिली तरी मागाहून अशी लेक घरी ठेवून घेणे त्यांच्या इतर अनेक बाबतींत पुरोगामी असणाऱ्या मनालाही डाचत होते, असे जाणवते. पण जनाक्का सांगतात–"विठू अण्णाने वडिलांना उत्तर दिले, की जनाला तिचा नवरा वागवून घेण्यास तयार नाही.... जनाच्या जीवावर उठलाय.... त्रासाला कंटाळून ती जीव देण्यास निघाली होती.... शिवाय आता त्याने दुसरे लग्न करून टाकलय, अशा स्थितीत तिचा नवरा आपणहून तिला नांदवण्यास घेऊन जाण्यासाठी आला तरच मी पाठवीन. एरवी जीवात जीव असेपर्यंत मी तिला अंतर देणार नाही."

हे सांगून जनाक्का पुढे म्हणतात–

"अशा रीतीने मी एकदा माहेरी आले ती कायमचीच !"

ह्या निर्णयाबाबत जनाक्कांच्या व्यक्तिगत भावना काय होत्या हे नीटसे स्पष्ट झालेले नाही. मागे 'कुंकू बळकट' असल्याचा जो त्यांचा उद्‌गार आलेला आहे त्यावरून लग्नबंधनाविषयी त्यांच्या धीट मनावरही पारंपरिक दडपणे होती की काय असा प्रश्न मनात उभा राहतो.

ते काहीही असो पण भावाचा खंबीर निर्णय त्यांनी पण स्वीकारलेला दिसतो.

जनाक्कांच्या अशा रीतीने माघारी येण्याविषयी घरात थोडीशी चर्चा झाली. जमखिंडीसारख्या कोपऱ्यातल्या लहानशा गावात तर उलटसुलट चर्चा माजायला हवी होती; पण गावकऱ्यांनी फारशी नाराजी व नापसंती दर्शवलेली दिसत नाही. ह्याविषयी कारणे सांगताना जनाक्का म्हणतात–

"विठूअण्णांची हुशारी, संभाषण चातुर्य, सुधारकी भाषणे, ब्राह्मणी भाषा ह्याचा सर्व गावकऱ्यांवर फार प्रभाव होता. शिवाय माझ्यावर सासरी झालेला अनन्वित छळवाद लक्षात घेता मी सासरी परत जावे वा नाही ह्याविषयी त्यांच्या मनातही संभ्रम होता."[२७]

जनाक्कांच्या आईवडिलांच्या प्रामाणिक, सहृदय व खानदानी आचरणामुळे त्यांच्याविषयी पण गावात आदर होता असे दिसते.

अर्थात् ह्यामुळे गावकऱ्यांनी ह्या घटनेविषयी मुग्धता स्वीकारलेली दिसते. जनाक्कांची मनःस्थिती मात्र आपल्या भवितव्याविषयी साशंक झालेली दिसते. सासरची माणसं आपल्याला हक्काने नेण्यास आली तर भाऊ त्यांना कोणत्या बळावर आडकाठी आणू शकेल ? अशी त्यांना धास्ती वाटत होती असे दिसते. त्या पुढे म्हणतात–

"जबरदस्तीने मुलीला नांदण्यासाठी नेत असल्याची कैक उदाहरणे मी पाहिली असल्याने अण्णाच्या निर्धारात राम आहे, असे काही केल्या वाटेना. माझे विचार मी अण्णापुढे बोलून दाखवत असे. पण ते जी उत्तरे देत ती मला पटत नव्हती. त्यामुळे केव्हा ना केव्हा सासरी जावे लागणार असे भय मला वाटे."

सुदैवाने त्यांना सासरी हक्काने नेण्यासाठी पुन्हा कुणी आलेले दिसत नाही. उलट घरची

परिस्थिती आणखीनच बिघडल्यामुळे व शिक्षणासाठी पुण्यास राहणाऱ्या विठ्ठलराव व इतर मित्रांचे जेवणाखाण्याचे हाल होत असल्यामुळे त्यांनी आपापली कुटुंबेच पुण्यात आणण्याचा निर्णय घेतलेला दिसतो.

अण्णासाहेब सांगतात–"१८९५ च्या मे महिन्याच्या सुट्टीत गोविंदराव व मी आपापल्या कुटुंबातील कोणास तरी पुण्यास आणून कायमचे घर करून रहाण्याचा विचार करत होतो... आम्हाला खाणावळीच्या जेवणाचा कंटाळा आला होता... पण हेच एक साधे कारण नसून... स्त्रीनातलगांना स्त्री-शिक्षण व प्रवासाचा लाभ देण्याचा सुधारकी हेतुही आमच्या तरुण रक्तात सळसळत होता. ह्याला कारण हरि नारायण आपटे ह्यांच्या कादंबऱ्या !

"अशा संधीस माझ्या बहिणीवर प्रसंग ओढवून ती कायमची माहेरी आली.... ह्याच सुमारास जमखिंडीस दुष्काळ आला, वडील भावाच्या मृत्युमुळे आईने हाय खाल्लेली. ह्याचवेळी जमखिंडीच्या यजमानांनी आमच्या बाबांना नोकरीवरून कमी केले... अशात मी, बहीण व आई यांना घेऊन पुण्यास शिकावयास आलो."[२८]

अशा तऱ्हेने भावाच्या दृढ निर्धारामुळे जनाक्कांचे शिक्षण ६-७ वर्षांनंतर पुन्हा सुरू झालेले दिसते. पण सुरवातीला त्यांना शाळा प्रवेशासाठी बराच त्रास झालेला दिसतो. अण्णासाहेब शिंदे ह्यांनी ह्या खटपटीचे सविस्तर वर्णन आपल्या आठवणीत केलेले आहे. (पान १०४) त्यावरून थोडक्यात असे दिसते, की विठ्ठलरावांना पुण्याची माहिती व शिक्षणाची व्यवस्था तो वेळ पावेतो फारशी माहीत नसल्यामुळे, सदाशिव पेठेत ख्रिस्ती मिशनची एक प्राथमिक शाळा असल्याचे कळल्याने त्यांनी प्रथम जनाक्कांना त्या शाळेत घातले. जनाक्कांच्या कथनानुसार तेथील शिक्षण मोफत होते, हापण शाळा निवडीमागे हेतू असावा असे दिसते. पण त्या शाळेतील छुपा धर्मप्रसार लक्षात आल्यावर सहा महिन्यांतच जनाक्कांना तिथून काढण्यात आलेले दिसते.

त्याच सुमारास पं. रमाबाईंची 'शारदासदन' ही शाळा लष्करात चालत होती. तिला बोर्डिंगची व्यवस्था होती. त्यामुळे तिथे जनाक्कांची सोय झाल्यास राहणे व शिक्षण दोन्ही प्रश्न सुटतील असे विठ्ठलरावांना वाटले असावे व म्हणून ते पं. रमाबाईंना भेटावयास गेले. त्या प्रसंगाचे सविस्तर वर्णन विठ्ठलरावांच्या आत्मकथनात (पृष्ठ १०४) वाचावयास मिळते. त्यावरून पं. रमाबाईंनी घातलेल्या अनेक अटींवरून, त्यांना मुली ख्रिस्ती धर्माच्या प्रभावाखाली आणावयाच्या आहेत, अशी अण्णासाहेबांची खात्री झालेली दिसते. ते पं. रमाबाईंना म्हणतात–"तुमच्या शिक्षणाने मुलगी आपखुशीने व अक्कल हुशारीने ख्रिस्ती होऊ लागल्यास निदान मी तरी अडथळा आणणार नाही; पण तिच्यावर, तिला नकळत जबरी तर राहोच पण भुलभुलावणी होऊ लागली तर ते मी सहन करणार नाही. बेहत्तर आहे अशी तुमची अटीतटीची मदत न मिळाली तरी !"

परिणामी जनाक्कांना शारदासदनात ठेवण्याचा विचार बारगळलेला दिसतो.

त्यानंतर विठ्ठलरावांनी श्री. अण्णासाहेब कर्व्यांच्या हिंगणे येथील शाळेत जनाक्कांसाठी खटपट केलेली दिसते. पण तिथेही यश आलेले दिसत नाही.

"ब्राह्मणेतरांच्या मुलींना आश्रमांत घेण्याचा हा काळ नाही, असे प्रो. अण्णासाहेबांनी सांगितले,व माझ्या बहिणीला आश्रमात घेण्याचे साफ नाकारले. त्यामुळे माझी निराशा झाली. तत्कालीन महाराष्ट्रात एक सुधारणा करताना दुसऱ्या सुधारणेला कसा अडथळा येई ह्याचे हे उदाहरणच आहे," असे विठ्ठलराव आपल्या आठवणीत (पृष्ठ१०५) नमूद करतात.

ह्या घटनेविषयीची जनाक्कांची प्रतिक्रिया जरा विस्तृत व लक्षणीय आहे. त्या म्हणतात-

"विधवा व अनाथ स्त्रियांच्या शिक्षणार्थ जरी ही संस्था स्थापन झाली होती तरी तो काळ स्त्री-शिक्षणास अनुकूल नसल्याने बहुसंख्य सनातन धर्माच्या रूढीप्रिय जनतेचा स्त्री-शिक्षणास म्हणावा तसा पाठिंबा तर लांबच राहो पण साधी सहानुभूति देखील नव्हती. हो समाज परिस्थिती लक्षात घेऊन अण्णासाहेब कर्व्यांनी ब्राह्मणेतर मुलींना आश्रमांत घेण्याचा काळ अद्याप आलेला नाही असे उत्तर दिले."[२९]

शेवटी जनाक्कांची हुजुरपागा ह्या प्रसिद्ध शाळेत सोय झालेली दिसते. पण तिथेही अनेक अडचणींना तोंड द्यावे लागलेले दिसते. ह्याविषयी अण्णासाहेब म्हणतात-

"जमखिंडीस तिच्या ३-४ मराठी इयत्ता झाल्याच होत्या. इंग्रजी पहिल्या इयत्तेत तिचे नाव घालण्यास कोणतीच हरकत नव्हती. पण हिंदू विवाहित स्त्री म्हणजे कोणत्या भयंकर तुरुंगात असते ह्याची मला कल्पना नव्हती. शाळेचे अधिकारी चि. जनाक्काच्या नवऱ्याची तिच्या शिकण्यास परवानगी मागू लागले. तिचे येथवर शिक्षण झाले हेच तर, तिच्यावर नवरा जिवंत असून वैधव्याचा असला प्रसंग गुदरायचे कारण झाले, वगैरे माहिती मला कष्टाने सांगावी लागली... त्या वेळी हुजुरपागेत मिस भोर नावाची हुशार शिक्षकीण व मिस हरफर्ड नावाची युरोपिअन बाई मुख्याध्यापिका होती. त्या दोघींना जनाक्काचा कळवळा आला. उच्चवर्णीय हिंदु लोकांत घटस्फोटाचा कायदा नाही. आणि काही झाले तरी घटस्फोटाची नुसती कल्पनाही चि. जनाक्काजवळ काढण्याची माझी छाती नव्हती. इतका तिच्या तेजाचा व पवित्रतेचा परिणाम घरात आम्हा सर्वांवर घडत असे. मिस भोरकडे माझे जाणे येणे होऊ लागले. माझी सुधारणेची मते व बाणेदारपणा पाहून तिचा आम्हा भावंडांविषयी अनुकूल ग्रह झाला. नवऱ्याच्या हरकतीची जबाबदारी मी घेतली व तिला शाळेत प्रवेश मिळाला. पुढे जनाक्काला मुधोळच्या राजेसाहेबांची मराठा मुलींकरता असलेली दहा रुपये दरमहाची स्कॉलरशिप मिळाली व माझी अंशतः सोय झाली."[३०]

ह्या शाळा प्रवेशाबद्दलची ही हकीगत आपल्या मुलाखतीत सांगून शेवटी जनाक्का सांगतात-

"अण्णाची स्त्री-शिक्षणाबद्दलची उत्कटता, मला रूढाचाराविरुद्ध माहेरी ठेवून घेण्यात त्यांनी दाखवलेले अपूर्व धाडस,... लक्षात घेऊन जनाबाईने माहेरचे शिंदे आडनाव लावून घेतल्यास शाळेत प्रवेश मिळणे सोपे जाऊन, तिचा पुढील शिक्षणक्रम सुरळीत चालेल, असा अभिप्राय अमेरिकन मिस हरफर्ड व ख्रिश्चन मिस मेरी भोर या बायांनी दिल्यामुळे मी शिंदे आडनाव लावून घेतले, ते कायमचे !"[३१]

स्त्री-शिक्षणाला त्या काळी नुकतीच सुरवात झालेली होती. लोकमत स्त्रियांच्या

शिक्षणाला फारसे अनुकूल नव्हते. त्यामुळे शाळेत जाणाऱ्या मोठ्या मुलींना पुण्यातील टवाळ लोक कसा त्रास देत असत ह्याचे वर्णन 'हुजुरपागेचा इतिहास प्रगतीपथावर' -- लिहिताना वेणूताई पानशांनी सुरवातीच्याच प्रकरणात सविस्तर दिलेले आहे. तोच अनुभव जनाक्कांना पण आलेला होता. त्या पुढे लिहितात-"मी पालकरांच्या* वाड्यातून शाळेला जात असता रस्त्यावरील टवाळ लोक... कधी माझ्या पोषाखाबाबात, कधी डोक्यावरून पदर घेण्याच्या पद्धतिबाबत टीकात्मक शब्द उच्चारताना आढळत. आधीच मी खेड्यातून नुकतीच शहरात आलेली, शहरी वागणुकीशी अपरिचित असलेली, तशात माझी गोल नेसण्याची पद्धत, पुस्तके पदराआड उराशी कवटाळून, सर्वांग लुगड्याने लपेटून, खालच्या मानेने, अनवाणी जाण्याच्या पद्धतिकडे गांव कुटाळांच्या नजरा लागलेल्या पाहून, कशाला ह्या पुण्यात आले असे होऊन जाई."

या बाबतीत जनाक्का भावाजवळ जेव्हा तक्रार नेत तेव्हा अण्णासाहेब मायेने त्यांची समजूत काढून धीर देताना दिसतात. ते सांगत-"असल्या गोष्टीकडे जितके कमी लक्ष पुरवशील तितके बरे. कोणतीही नवीन गोष्ट दिसली की तिकडे एकसारखे बघण्याचा लोकांचा स्वभावच असतो. पण हळूहळू तीच गोष्ट नजरेस पडू लागल्याने लोकांना ती पहाण्याचे कारण उरत नाही."[३२] जनाक्का पुढे सांगतात-

"हुजुरपागेत पूर्वी घोडे ठेवले जात. त्याच ठिकाणी मुलींची शाळा झाल्यामुळे माझ्यासारख्या मोठ्या वयाच्या मुली शाळेत रांगेने, पुढे शिपाई मागे मेट्रन अशा थाटात जाऊ लागल्या की टवाळ लोक 'ह्या पहा घोड्या चालल्या' असे मोठ्याने म्हणत. केवळ पुरुषच नव्हे तर चांगल्या पोक्त बायका देखील तोंडाआड पदर धरून टवाळी करण्यास कचरत नसत. मला पाहून म्हणायच्या, 'काय घोडी वाढली आहे, अन् अंगावर पदर काय लपेटून घेतलाय् जणू काय बाईला हीवच भरलंय'.... पुढेपुढे ह्या टीकेचा सराव झाला व ती आम्ही मनावर घेत नसू."

जनाक्कांचे शिक्षण सुरू झाले. खरंतर त्यांचे ४ थी पर्यंतचे शिक्षण झाले होते. पण पुण्याला तिसरीपासूनच इंग्रजी शिकवीत असल्यामुळे जनाक्कांना पुन्हा तिसरीत बसावे लागले. जनाक्का सांगतात-

"पंडित नावाचे एक म्हातारे मास्तर तिसऱ्या इयत्तेवर शिकवण्यास येत असत. हे शिक्षक फार सज्जन वृत्तीचे व कळकळीने शिकवणारे होते. त्यामुळे मी सहा महिन्यांतच अभ्यासात हुशारी दाखवून चवथ्या इयत्तेत जाऊ शकले."

आपल्या घरातील स्त्रियांना शिक्षणाबरोबरच जग पाहण्याची संधी मिळावी ही वि. रा. शिंद्यांची इच्छा होती हे आपण मागे पाहिलेच आहे. त्यानुरूप त्यांनी आपल्या आई व बहिणीला पुणे शहरातील पर्वती, चतुश्रृंगी, बंडगार्डन, मंडई वगैरे स्थळे दाखवून आणलेली दिसतात.

* त्या वेळी वि. रा. शिंदे आपल्या मित्रांसह व कुटुंबीयांसह पालेकरांच्या वाड्यात बिऱ्हाड करून होते. पुढे जनाक्का हुजुरपागेच्या वसतिगृहात राहायला गेलेल्या दिसतात.

बाजारातील रोजची गर्दी, मंडईजवळचा मोठा गणपती, बंडगार्डनचा धबधबा वगैरे पाहून खेड्यातून आलेल्या शिंद्यांच्या आईला खूप आश्चर्य व समाधान झालेले जनाक्कांच्या वर्णनावरून दिसते. मंडईतल्या अनेक भाज्यासुद्धा पूर्वी कधी पाहिलेल्या नसल्याने ह्या दोघींना खूप कुतूहल वाटलेले दिसते. जनाक्का सांगतात—

"लाल चेंडूसारखा दिसणारा टमाटो, हत्तीच्या पायासारखा दिसणारा सुरण वगैरे पाहून आम्हाला खूप आश्चर्य वाटले. अण्णाला आम्ही खूप प्रश्न विचारत होतो. आम्हाला मंडई दाखवताहेत हे पाहून मंडईतील पुणेरी लोक विस्मयाने आमच्याकडे पहात होते... त्यावेळी आगगाड्या नुकत्याच सुरू झालेल्या होत्या. शिवाय हे पदार्थ नवीन म्हणून आमच्याकडील कर्नाटकी बाजारपेठेत त्याला विशेष मागणी नसे... यत्किंचित भाज्यांबद्दल ही स्थिती तर पाव हा पदार्थ मला अगदीच नवीन होता. एकदा अण्णांनी तो खाण्यासाठी घरी आणला असता, माझी थट्टा करण्याच्या हेतूने ती कापसासारखी वस्तू खाण्यास दिली असे समजून मी ती फेकून दिली."[३३]

अशा प्रकारे सभोवताली दिसणाऱ्या कितीतरी नवनव्या गोष्टींनी आपल्याला कसे चक्रावून टाकले ह्याचे गमतीदार वर्णन जनाक्कांनी आपल्या ह्या मुलाखतीत केलेले दिसते. सायकलवरून तोल सांभाळत जाणारा मनुष्य पाहिल्यावर तो पडेलबिडेल की काय म्हणून आपल्याला कशी धास्ती वाटली ह्याचेही वर्णन आपल्याला वाचायला मिळते. जनाक्का पुण्यात आल्या तेव्हा त्यांचे अनुभवविश्व किती मर्यादित व भाबडे होते ते इथे जाणवते.

तिसरीची परीक्षा झाल्यावर सुट्टीत ही मंडळी जमखिंडीस गेली असताना प्लेगमुळे बराच काळ त्यांना तिकडेच रहावे लागलेले दिसते. इकडे पुण्यास ते राहात असलेला वाडा सोजिरासाठी रिकामा करून द्यावा लागल्यामुळे परत आल्यावर रहाण्याचा प्रश्न उद्‌भवला. तेव्हा जनाक्कांच्या वर्गातील एका मुलीनं (पार्वतीबाई कावतकर) वडिलांना सांगून आपल्या वाड्यातील जागा ह्या भावंडांस दिली. तिथे आलेले कटू अनुभव जनाक्कांनी ह्याच अंकातील मुलाखतीत सांगितले आहेत. अण्णासाहेबांनी आपल्या रोजनिशीत पण त्या आठवणी नोंदवल्या आहेत. जनाक्कांच्या व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकण्याच्या दृष्टीने त्या महत्त्वाच्या वाटतात. म्हणून त्या जरा विस्ताराने पाहू. जनाक्का सांगतात—

"मैत्रिणीची आई मालकिणीच्या तोऱ्यात वागत असे. मी तिला कामात मदत करावी अशी तिची अपेक्षा असे... आर्जवी स्वरात तर राहूच द्या, पण निदान सभ्यपणाने किंवा मर्यादा राखून जर ती मला मदतीला बोलावती तर मी आनंदाने तयार झाले असते. पण मालकिणीच्या तोऱ्यात उद्दामपणे सांगितलेली कामे करण्यास मी तिला स्पष्टपणे नकार दिला. हेच एक कारण तिला माझ्याशी धुसफुस करायला पुरेसे झाले होते." अण्णासाहेब पण आपल्या रोजनिशीत नोंद करतात.

"आज आमच्या वाड्याच्या मालकाची गृहस्थिती अवचित समजली. मी आजपर्यंत हे कुटुंब फार कुलीन व सुशील मराठ्याचे असेल असे समजत होतो. पुढे जनाबाईंची चांगली सोय जमेल अशी आशा वाटत होती. आल्यापासून आम्ही दोघांनी सर्व कुटुंबाच्या माणसांस

लावून घेऊन राहण्याचा यत्न केला. पण हळूहळू निराशा झाली. आपण श्रीमंत आहोत ही गोष्ट त्यांच्या ध्यानात वाजवीपेक्षा जास्त ठसली होती. त्याचा जनाक्काला राग येई."[३४]

ह्याच मालकिणीने जनाक्कांना आपल्या मुली-नातींबरोबर आग्रहाने हळदी-कुंकवास कसे नेले व ह्या अगत्यात जनाक्काला 'नात संभाळणारी मोलकरीण' भासवण्याचा कसा कावा होता, तो प्रसंगही जनाक्कांनी ह्या मुलाखतीत सांगितला आहे. शेवटी त्या सांगतात–"मला त्या बाईंचा कावा लक्षात आला आणि म्हणून त्यांच्या नातीला त्यांच्या मुलीच्या हातात देऊन घरात शिरता शिरता मी मोठ्याने म्हटले, मुलाला घेण्यासाठी तुमची मोलकरीण तानू हिला का आणले नाहीत ?"

जनाक्कांच्या ह्या मानी स्वभावामुळे मालकीणबाई अधिकच असहकाराने वागत गेलेली दिसते.

ह्या वास्तव्यात जनाक्कांना विविध प्रकाराने मनस्ताप सोसावा लागलेला दिसतो. त्यांच्या मासिक अडचणीच्या वेळी तर जेवणाखाण्याचे खूपच हाल होत असत असे दिसते. मालकिणीला आपल्या मुलीने पण जनाक्कांना स्वयंपाकाला थोडीशीही मदत केलेली खपत नसे. वर लोकांच्या शंकाकुशंका, अनुदार टोमणे ह्यामुळे बराच त्रास सोसावा लागलेला दिसतो. ह्याची सविस्तर नोंद अण्णासाहेबांच्या रोजनिशीत आढळते. ते लिहितात–

"सकाळी कॉलेजमधून घरी येत असता चि. जनाक्का वाटेतच भेटली... चर्या खिन्न व कंठ दाटला होता. परत येताना घराच्या मालकिणीने जे तिच्याशी हलकट वर्तन केले... ज्यासाठी तिला इतका राग व वाईट वाटले... ते ती सांगू लागली. जनाक्का विटाळशी. आज दुसरा दिवस... पुण्यास राहिल्यापासून ही पाळी म्हणजे आमच्या उद्विग्नतेचीच पाळी... मनाजोगती मोलकरीण नाही. जरी एखादीला आणले तरी ती थोड्याच दिवसांत आपले गुण उधळते. एकतर अशी खमंग भेटली की तिने जनाक्का व माझे भलतेच नाते असावे अशी कुटील कल्पना करून घेऊन... आपल्या शीलास योग्य पण जनाक्कांच्या पवित्र कानावर कधी न आलेले उपदेश जहर ओतिले. बिचाऱ्या जनाक्काला कोण असह्य वेदना झाल्या असतील... त्या भोळीला असला घाणेरडा उपदेश नुसता ऐकूनही जी लज्जा वाटत होती.... की दोन दिवस ही गोष्ट मला तिच्याने कळवणे देखील झाले नाही... तेव्हापासून असल्या हलकटाकडून काम करून घेणे जीवावर येई.... जनाक्का फाजीलपणे विशेष कोणाशी सलगी ठेवीत नाही. त्यात मालकिणीकडे तर ती फारच कमी जात असते म्हणूनच ती कदाचित रागवली असावी.... जनाक्काला फार वाईट वाटले होते. मी तिची समजूत काढली. जगात असलीच माणसे फार असतात.... तेरदाळच्या देशपांड्यांप्रमाणे आपलेपणा जोडणारे सर्व मिळत नाहीत. म्हणून वाईट वाटून घेऊ नको... आज घडलेल्या अनुभवाचे चांगले स्मरण ठेव. म्हणजे असल्या प्रसंगी तू अधिक धैर्याने, शांततेने वागशील."[३५]

शेवटी अण्णासाहेब म्हणतात, "पुस्तकातल्या धड्यापेक्षा अशा अनुभवांनी मिळालेल्या धड्याची मातब्बरी किती जास्त असते हे जनाक्काला लक्षात येत गेले."

वरील मनस्तापाच्या जोडीने इतरही अनेक प्रकारच्या अडचणींना तोंड देत ही

बहीणभावंडं आपापले शिक्षण नेटाने साधत होती, हे अण्णासाहेबांच्या रोजनिशीतील नोंदीवरून लक्षात येते.

६ जून १८९८ ला अण्णा लिहितात–

"चि. जनाक्काची शाळा प्लेगमध्ये बंद होण्याच्या पूर्वी जनाक्कास आठच दिवस जमखिंडीस जावे लागले. त्यामुळे तिची आठ महिन्याची स्कॉलरशीप बुडाली. तिला बोर्डिंगात घेईनात. मला परीक्षेला जाण्याची घाई.... आजूबाजूस प्लेगच्या केसेस होऊ लागलेल्या.... अशा प्रसंगी तिला मागे एकटीला सोडवेना.... म्हणून घेऊन गेलो."

पुढे लिहितात–"जनाक्का चौथ्या इयत्तेची परीक्षा गेल्या सप्टेंबरात पास झाली होती. तिचा नंबर पहिला-दुसरा इतक्यात असे. तरीपण तिला ५ व्या इयत्तेत घातले नाही याबद्दल तिला फार वाईट वाटत आहे. मलाही मदरची फाजील नियमबाह्यता व सारासार विवेकशून्यता याची फार चीड आली आहे. पण इलाज नाही."

१० जून १८९८ ला अण्णासाहेब लिहितात–

"लग्नाकरता आमचे वाड्यात जमखिंडीचे वऱ्हाड उतरले आहे. बरीच पुरुषमाणसे आहेत. आम्हाला किंचित स्थानान्तर करावे लागले आहे. चि. सौ. जनाक्काची निजण्याचीही बरीच अडचण आहे."

अशा अडचणी अनेक येत असल्या तरीपण जनाक्कांना भावाचा प्रेमळ सहवास, त्याच्या मित्रमंडळीतील चर्चा, गप्पा यांचा आनंदपण लाभत होता, असे दिसते. अण्णासाहेबांच्या ह्या काळातील रोजनिशीत दोघांनी मिळून दूरवर फिरायला जाणे, निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घेणे ह्याचा अनेकदा उल्लेख आढळतो. ३-४-९८ ला ते लिहितात–

"संध्याकाळी मी व जनाक्का बंडगार्डन्सवर सासने यांस भेटावसास गेलो होतो... मग जवळच्या टेकडीवर सांबाच्या देवळात गेलो... टेकडीच्या माथ्यावर शहराकडे तोंड करून ७ ॥ पर्यंत बसलो.'

४-६-९८ ला ते लिहितात–

"कळसकर यांना मेजवानी झाली. स्वयंपाक कळसकर, दाजीबा ह्युल्याळ, मी व जनाक्का इतक्यास पुरेसा असा, पहिल्या दोघांनी केला."

ह्या कंपूत, जनाक्का ह्या एकट्या स्त्री असूनही, स्वयंपाकाचे काम सहजपणे त्यांच्याकडे गेले नाही ही गोष्ट आश्चर्याची वाटते.

१५-४-९९ ला ते लिहितात –

"संध्याकाळी मी व जनाक्का बरेच लांब फिरावयास जात असू. दोघांना एकमेकांपासून अशा फिरण्याने फार आनंद होत असे."

ह्यानंतर लवकरच जनाक्का हुजुरपागेच्या बोर्डिंगात रहायला गेलेल्या दिसतात. तरीपण भावाबहिणीचें प्रेम व सहवास यात खंड पडलेला आढळत नाही.

ह्या शिक्षण कालातील सुट्टयांमध्ये, जनाक्कांना विठ्ठलरात त्यांच्या मित्रांसह काढलेल्या दूरदूरच्या सहलींमध्ये आवर्जून सहभागी करून घेताना दिसतात.

१८९९ च्या एप्रिलमध्ये अण्णासाहेबांचे मित्र गोविंदराव सासणे ह्यांच्या आग्रहावरून त्यांनी पन्हाळा, पावनगड, विशालगड अशी मोठी सहल केलेली दिसते. जनाक्कांना अर्थातच बरोबर घेतले होते. रोजनिशीतील एप्रिल १८९९ मधील अनेक टिपणांतून ह्या सहलीचे व जनाक्कांचे उल्लेख आढळतात.

"जनाक्का पुण्याहून शिरोळपर्यंत एकटीच आली... बोर्डिंगच्या अन्नाचा कंटाळा आल्याने जनाक्कास अन्नच जाईना. तिला शक्तीही फार कमी होती. वाईट वाटले."

"जनाबाईची दोन-तीन महिन्यांची स्कॉलरशीप बुडवून घेतली व काही दिवस शाळा चुकवली. ह्या सर्वांचे मुख्य कारण 'पन्हाळा पहाणे' हे होय... बुरुजावरून खालची लांडग्यांची टोळी पाहून जनाक्कास मजा वाटली."

"ज्योतिबाच्या यात्रेस जाताना अर्ध्या वाटेवर दशम्या खाल्ल्या... उरलेले ओझे डोंगरावर उगीच ने-आण न करता एखाद्या झाडावर गर्द पालवीत टांगून ठेवावे, अशी युक्ती जनाक्काने सुचविली... परत येताना शिदोरी जशीच्या तशी मिळाली."

"पांडवदरीस जनाक्कासह चालत गेलो... मला व जनाक्कास उदास वाटू लागले. म्हणून चिंतामणराव, मी व जनाक्का झाडीत फिरावयास गेलो. एका जांभळीच्या झाडाखाली बसून जनाक्काने गोड आवाजात काही भक्तिपर पदे गाईली. झाडाच्या जमिनीस टेकलेल्या एका लांब फांदीवर बसून झोके घेतले."

अशा प्रकारे भावाच्या प्रेमामुळे पुरुषांच्या मेळाव्यात मुक्तपणे सहविहाराचा व निसर्ग सान्निध्याचा आस्वाद जनाक्कांना लाभलेला दिसतो.

ह्यावेळी जनाक्का हुजुरपागेच्या बोर्डिंगात राहू लागल्या होत्या. तेथील जीवनानुभवांचा, शिस्तीचा, शिक्षणाचा त्यांच्या व्यक्तिमत्वावर फार मोठा संस्कार झालेला पुढील जीवनात दिसून येतो. तथापि, त्या अनुभवांकडे वळण्यापूर्वी आपण जनाक्कांच्या जीवनातील ह्याच काळातील आणखी एका प्रभावी घटकाचा आढावा घेणार आहोत.

ह्या काळात जनाक्का आणखी एका वेगळ्या जीवनाला व विचारव्यूहाला सामोऱ्या गेलेल्या दिसतात. आणि ते म्हणजे प्रार्थना समाजात प्रवेश! ह्याविषयी स्वतः जनाक्का म्हणतात—

"प्रार्थना समाजाची त्याकाळी नुकतीच स्थापना झालेली होती. त्यामुळे तो चर्चेचा विषय होऊन राहिला होता.... आम्हा मुलींमध्ये त्याविषयी साधकबाधक चर्चा चालत असे. वास्तविक पहाता आमच्या अण्णांच्याही आधीपासून मीच प्रार्थना समाजात जाऊ लागले होते."…. त्याचे कारण सांगताना त्या सांगतात— "पुण्यात प्रथम मला ज्या ख्रिश्चन शाळेत घातले होते तिथे ख्रिश्चन धर्माचा प्रचार वेळी अवेळी माझ्यापुढे करण्यात येत असे. त्यामुळे ख्रिश्चन धर्माविषयी एक प्रकारची शिसारी आल्यासारखे झाले होते.... शाळेतल्या ख्रिस्ती शिक्षकिणी उठल्या बसल्या, कारण नसता, आमच्या दैवतांना, सदाचारांना, धर्ममतांना, इतकेच नव्हे तर पोषाख पद्धतीला, भोजन पद्धतीला हीन समजून हेटाळणी करत. त्यामुळे ख्रिस्ती धर्मातील आत्यंतिक धर्मनिष्ठा व आमच्या हिंदु धर्मातील बुरसट रूढ कल्पना, यापेक्षा प्रार्थना

समाज काहीतरी बरा असावा असेच त्यावेळी माझ्या मनाला प्रामाणिकपणे वाटू लागले."[३६]

प्रार्थना समाजाविषयी अनुकूल ग्रह झाल्यामुळे तेथे जाण्याबद्दल जनाक्कांनी नेहमी-प्रमाणे वडील भावाचा सल्ला घेतलेला दिसतो. त्यावेळी विठ्ठलराव कॉलेजात शिकत होते. रानडे, गोखले, आगरकर वगैरे समाजसुधारकांची भाषणे ऐकून धर्माबाबत आपल्या मित्रमंडळींशी चर्चा करत असत. पुढे जनाक्का सांगतात - "त्यांच्या मित्रांशी होणाऱ्या चर्चा मी ऐकत असे. ह्यावेळी ते काहीसे नास्तिक बनत चालले होते*.... कोणत्याच धर्मावर त्यांचा विश्वास राहिला नव्हता. म्हणून त्यांनी प्रथम नाखुशी दर्शविली. पण मग माझ्या इच्छेच्या आड न येता त्यांनी मला समाजात जाण्यास अनुमति दिली. त्याप्रमाणे मी, लिंबाबाई, त्रिवेणीबाई भाटवडेकर, छोटुबाई तावडे, जानकीबाई पानसे, कावेरीबाई उल्लाळ अशा ५-६ जणींनी प्रार्थना समाजात जाण्यास सुरवात केली."

वि. रा. शिंदे ह्याविषयी आपल्या आठवणींत लिहितात -

'२९ मे १८९८ रोजी आम्ही प्रार्थना समाजातील उपासना पहाण्यास गेलो होतो. पुण्याच्या मंदिरातील उपासना मी आज प्रथमच पाहिली. गेल्या डिसेंबरात मुंबईच्या प्रार्थना समाजातील उपासना पाहून मला तितकेसे बरे वाटले नव्हते.... इथली उपासना पाहून माझ्या मनात मोठा पूज्यभाव उत्पन्न झाला... का. बा. मराठे ह्यांच्या प्रार्थना व व्याख्यान ह्यांनी माझे मन फार वेधले.... माझी बहीण चि. जनाक्का आपल्या मैत्रिणींबरोबर प्रार्थनेसाठी हुजुरपागेतून आली होती. तिलाही ही उपासना फार आवडली. तिला दर रविवारी उपासनेस जावेसे वाटले. मलाही तसेच वाटले. आम्हा दोन्ही भावंडांचा हा स्वतंत्र झालेला निश्चय पाहून माझा उत्साह अधिकच दुणावला.'

अर्थात सुरवातीला हे जाणे जनाक्का म्हणतात तसे 'धर्मसाधने'करता नसून केवळ 'नाविन्याच्या औत्सुक्यापोटी' होत असावे असे दिसते. पण पुढे पुढे डॉ. भांडारकरांच्या सारख्या विद्वानाच्या उपासना ऐकून.... समाजाबद्दलची गोडी त्यांच्या मनात नकळत उत्पन्न झाली असे त्या सांगतात. अण्णासाहेबांची पण अशीच अवस्था झालेली दिसते. ते सांगतात-

"समाजाच्या उत्सवास मी रोज जाऊ लागलो.... कोटकरांच्या उपासना प्रेमळ असून गहिवर आणणाऱ्या होत्या... न्या. मू. रानडे आणि सर्वांत अधिक उठावदार म्हणजे प. पू. गुरुवर्य डॉ. भांडारकर यांचाही समागम घडू लागला.... या सर्व वृद्धमंडळींनी.... तारुण्याचा आडमुठेपणा.... उच्छृंखलपणा.... या भोवऱ्यातून माझी सुटका करून शुद्ध उदार धर्माच्या शांत प्रवाहात मला आणून सोडले."[३७]

हळूहळू प्रार्थना समाजाच्या उपासनांचा प्रभाव जनाक्कांच्या मनावर किती दृढ होत गेला ह्याचे प्रत्यंतर महर्षी शिंद्यांच्या रोजनिशीतील नोंदीवरून लक्षात येते. ३१ जुलै १८९८ ला ते

*आपल्या आठवणीत स्वतः विठ्ठलराव सांगतात- (पृष्ठ ९९) 'जमखिंडीतल्या आमच्या वाड्यातल्या देवघरांत बसून... शिवलिंगावर श्रावणसोमवारी सहस्रदळे वाहिल्याशिवाय तोंडात पाणी न घेणारा मी पुण्यात आल्यावर आगरकरांचे लेख आणि मिल्ल-स्पेन्सरचे प्रत्यक्ष ग्रंथ वाचून.. नास्तिक बनलो.'

लिहितात—

"आता दर रविवारी प्रार्थनांस जाण्याची आम्हाला सवय किंबहुना चटकच लागली आहे. .. जनाक्काचा भाव तर अगदी दृढ बसला आहे. प्रार्थनेत ती अगदी तल्लीन होऊन जाते.... आज तर ती परमानंदाने डुलत होती.... जनाक्काची श्रद्धा बळावत आहे. तिची श्रद्धा, आनंद, अनन्यभाव पाहून मला अमोघ आनंद होत आहे. ता. २९ मे पासून ती काय ते दोनदाच गेली नाही. ते ही विटाळशी होती म्हणून.... प्रथम जेव्हा गेली नाही ते दिवशी रात्री निजली असता 'सकळ मनुज मंदिरात भाव धरुनि या हो'- असा भक्त मंडळाने तिचे कानांत टाहो फोडल्याचा तिला भास झाला व ती खडबडून उठली. तेव्हापासून समाजात तिचे मन जडले. जणू देवाने तिला हात धरून नेले. काय ती भाग्यवान. पापाचा लेशही तिला आता शिवणार नाही. पण अद्यापि आम्ही समाजाचे सभासद झालो नाही."

पुढे काही दिवसांनी अण्णासाहेब प्रार्थना समाजाचे सभासद झाले. पण तसा स्पष्ट उल्लेख जनाक्कांच्या सभासदत्वाविषयी आढळला नाही. तथापि ज्याअर्थी पुढे आयुष्यभर त्या प्रार्थना समाजाच्या उपासना करीत आल्या, समाजातर्फे अनेक कार्य करीत होत्या तेव्हा त्यांनी पण दीक्षा घेतली असावी असे वाटते !

जनाक्कांच्या घडणीतील महत्त्वाचे घटक—आई-वडील, घरातले वातावरण, भावाचे वैचारिक जग, पुण्यातील रहिवास व प्रार्थनासमाज—हे आतापर्यंत आपण पाहिले. आता शेवटचा महत्त्वाचा घटक म्हणजे हुजुरपागा शाळेतील संस्कार. ते आता विस्ताराने पाहू या.

ह्यासाठी आपल्याला प्रामुख्याने जनाक्कांच्या मुलाखतीचाच आधार घ्यावा लागणार आहे.

साधारणपणे १८९६ ते १९०५ हा जनाक्कांच्या आयुष्यातील हुजुरपागा कालखंड म्हणता येईल. ९७-९८ च्या अधेमधे त्या हुजुरपागेच्या बोर्डिंगात रहावयास गेलेल्या दिसतात. ह्या ७-८ वर्षांतील अनेक अनुभव व आठवणी जनाक्कांनी आपल्या तरुण महाराष्ट्रातील - २९.४.४९ च्या मुलाखतीत नोंदवलेल्या आहेत. त्यापैकी शाळेत जाताना समाजाकडून झालेली अवहेलना आपण पाहिलीच आहे. त्यानंतर सर्वांत पहिली आठवण जनाक्कांनी नोंदवली आहे, ती शाळेतील 'मदर'च्या कडक शिस्तीची. तिची स्वच्छता, टापटीप ह्याचे वळण कसे कडक असे हे सांगताना त्या म्हणतात—

"तिला शाळेत कुठेही साली, बिया चोयट्या इतस्ततः फेकणे, बारीक शाईचे डाग पडणे हे काही खपत नसे. आम्ही खेड्यातून आलेल्या. ह्या सवयी आमच्या अंगात मुरलेल्या. त्यामुळे त्या वर्गात जरा घाण वा डाग दिसल्यास शिक्षकांना व वसतिगृहात मेट्रनना रागवत, ओरडत. त्यांची खरडपट्टी काढत. आम्हाला पण शिक्षा, दंड होई."

मदर जरी कडक शिस्तीच्या होत्या तरी एरवी मनाने प्रेमळ पण असाव्यात असे दिसते. नाताळात मुलींना मेवामिठाई, फळे त्या वाटत, तेव्हा टेबलावर सर्व पदार्थ ठेवून मुलींनी एकेकीने येऊन हवे ते घेऊन जायचे अशी पद्धत असे. ती आत बसून मुलींचे निरीक्षण करत असे. त्यामुळे काय घ्यावे किती घ्यावे, काय बरे दिसेल हे चटकन न उमगून मुलींचा कसा

गोंधळ उडे ह्याचे मजेदार वर्णन करून शेवटी जनाक्का म्हणतात—

"चहा, पाव, लोणी, केक हे पदार्थ अगदीच नवे असल्याने ते कशा पद्धतीने खावे ह्याचा गोंधळ उडे व शिक्षिका गालातल्या गालात हसत."

शाळेतील ह्या कडक शिस्तीच्या वातावरणाचा जनाक्कांच्या एकूण जीवनावर खूपच प्रभाव पडला असावा असे दिसते. त्यांच्या नातेवाइकांच्या जेव्हा मी ह्या लेखनाच्या निमित्ताने मुलाखती घेतल्या तेव्हा बहुतेकांनी, 'त्या खूप शिस्तीच्या व टापटिपीच्या होत्या. कडक पण प्रेमळ होत्या....' असे अभिप्राय व्यक्त केले आहेत. कोल्हापूरच्या श्रीमती शकुन्तलाबाई जमदग्नी (विठ्ठलरावांच्या जिवगल मित्राची— विष्णुपत देशपांडे तेरदाळ— ह्यांची कन्या) म्हणाल्या- 'त्या आमच्याकडे येत तेव्हा आम्हा भावंडांना इंग्रजी शिकवीत. आधीच आम्हाला शिकायचा कंटाळा. तशात जनाक्का खूप कडक.... त्यामुळे आम्हाला त्यांची भीती वाटायची. आम्ही पळून जायचो. मात्र शिकवताना, कोण हुशार आहे, कोण पटकन शिकतो ह्याविषयीचे त्यांचे बारीक निरीक्षण असायचे !'

ह्याच काळातील शाळेतील एका शिक्षकाची आठवण जनाक्कांनी सांगितली आहे. प्रसंग.... त्यांचे वर्णन, पद्धत, वापरलेली शैली व त्यातून जनाक्कांचे दिसून येणारे व्यक्तिमत्व ह्या सर्वच दृष्टीने ही आठवण मला लक्षणीय वाटते. त्या सांगतात—

"इंग्रजी चवथ्या इयत्तेत आम्हाला जोशी नावाचे पोक्त पण तऱ्हेवाईक स्वभावाचे मास्तर होते. ते आम्हाला वेणा, गोदे- अशा एकेरी नावाने हाका मारीत असत. आम्ही बऱ्याच मुली तेव्हां वीस-एकवीस वयाच्या होतो. आम्हाला ते आवडत नसे. पण मांजराच्या गळ्यात घाट कुणी बांधायची ? आम्ही आपापसांत खूप चरफडत असू. शेवटी मला एक उपाय सुचला. ते आमच्या अभ्यासाच्या वह्या तपासून देत असत. अशाच एका कोऱ्या वहीवर मी माझे 'जना' एवढेच नाव दिसेल न दिसेल अशा बेताने शक्यतो बारीक अक्षरांत काढून त्यापुढे 'बाई' शब्द मोठ्या अक्षरांत तांबड्या शाईने काढला. वह्या वाटताना त्यांनी ही वही कोणाची म्हणून विचारले. कोणीच बोलेना म्हणून त्यांनी पुन्हा पुन्हा विचारण्याचा सपाटा लावला. मी मुद्दाम गप्पच राहिले. मग त्यांनी 'जना' हा शब्द हलक्या आवाजात उच्चारून बाई शब्द मोठ्याने उच्चारला. बाई शब्द उच्चारताच, मी जागेवरून उठून वही घेण्यास गेले असता मास्तर म्हणाले; ' स्वतःच्या नावामागे बाई म्हणवून घेण्याची इच्छा आहे वाटतं ?' मी चटकन् उत्तर दिले, की 'हो मास्तर, माझेच नव्हे तर इतर मुलींची नावेपण बाई म्हणून उच्चारली जावी अशी माझी इच्छा आहे.' तेव्हापासून ते मास्तर मुलींना एकेरी नावाने हाक न मारता बाई शब्द मोठ्याने म्हणून हाका मारू लागले. पुढे मदरच्या कानावर हा प्रकार गेला. तेव्हा तिने सर्व शिक्षकांना बोलावून मुलींना एकेरी हाक न मारता पुढे बाई लावून हाक मारावे, असे स्पष्ट सांगून टाकले."[३८]

सुदैवाने हे प्रकरण मास्तरांनी मनास लावून घेतलेले दिसत नाही. तरीपण एकदा त्यांनी संधी साधून त्याचे उट्टे काढलेले दिसते. त्यांविषयी जनाक्का पुढे सांगतात—"क्रमिक पुस्तकातली, 'देवे केला उपकार । स्मरा मनी निरंतर' ही अभंगातली ओळ माझी मैत्रीण जेव्हा

वाचत होती तेव्हा तिला थांबवून, माझ्याकडे हेतूपूर्वक नजर टाकीत मास्तर म्हणाले, 'चुकलात कावेरीबाई, 'देवे केला उपकार। स्मरा मनी रविवार' असे म्हणा म्हणजे बरे होईल.' आम्ही रविवारच्या प्रार्थनेला जातो हे त्यांना माहीत होते. त्यावरून त्यांनी हा टोमणा मारला होता."

पुढे ह्याच मास्तरांच्या जवळच्या नात्यातल्या एक विधवा स्त्री, जनाक्कांबरोबर प्रार्थना समाजात जायला लागून पुढे केवळ पुनर्विवाहासाठी त्यांनी समाजाची दीक्षा घेतली असे जनाक्का म्हणतात.

"मिस हरफर्ड सुपरिंटेंडेंट असताना, नव्या येणाऱ्या मुली व जुन्या मुली यांची खेळीमेळीने समरसता वाढावी म्हणून नाना प्रकारचे खेळ, उपक्रम केले जात होते असे दिसते. अशांपैकी राजाराणीचा खेळ हा एक गमतीचा उपक्रम दिसतो. जुन्या मुली राजाराणी बनत. दोन खुर्च्यांवर चादर टाकून त्यावर राजाराणी बसत असत, दोन खुर्च्यांच्या मध्ये रिकामी जागा असे. नव्या मुलींना एकेकीला राजाराणीला भेटायला बोलवत... मग राणी प्रेमाने त्या मुलीला मध्ये बसायला सांगे. ती बसू लागली, की राजाराणी उभे रहात व इतर उभ्या असलेल्या जुन्या मुली फटकन चादर काढून घेत व ती मुलगी दोन खुर्च्यांच्या मध्ये पडे. तिची थोडी फजिती होई पण संकोच दूर होई.* जनाक्का सांगतात—"माझी जेव्हा पाळी आली तेव्हा बसण्यापूर्वी मी मागच्या मागे चाणाक्षपणे खुर्ची चाचपून पाहिली. ती हाताला लागेना तेंव्हा मला गंमत कळून गेली." पुढे जनाक्का सांगतात-

"मिस हरफर्ड मदर म्हणून होत्या तोपर्यंत असे खेळ चालत. (म्हणजे १९०० इ. स. पर्यंत) पुढे सोराबजी मदर झाल्यावर हा खेळ थिल्लर वाटून बंद झाला असावा. कारण त्या गंभीर प्रकृतीच्या होत्या."[३९]

हुजुरपागेतील जीवनाच्या, तेथील लक्षात राहण्याजोग्या मुलींच्या अनेक आठवणी, व्यक्तिचित्रणे जनाक्कांनी आपल्या ह्या मुलाखतीत रंगवलेली दिसतात. त्यातील काही आपण पुढे त्यांचे 'लेखनकौशल्य' शोधताना पाहू. परंतु त्यातील एका मुलीची कहाणी जनाक्कांच्या व्यक्तिमत्वाशी खूपच निगडित असल्यामुळे ती आपण विस्ताराने पाहू.

जनाक्का म्हणतात –

"अपंग, अत्यंत गरिबीत वाढलेल्या, जुन्या वळणातल्या हिंदू मुलीचे आयुष्य किती कष्टमय, लाजिरवाणे व परावलंबी असते ह्याची कल्पना आता येणे शक्य होणार नाही. अशा एका मुलीच्या स्मृतींना मी माझ्या हृदयात आंतरिक कळकळीने जतन करून ठेवले आहे. तिच्या अगतिक व दुर्दैवी जीवनाचे मला नेहमीच कुतुहल वाटत आले आहे. विठूअण्णाचे जिवलग मित्र कोल्हापूरचे वासुदेवराव सुखटणकर ह्यांची ही बहीण शांता सुखटणकर. एकदा प्लेगच्या काळात, शाळा-कॉलेज बंद झाली असताना, जमखिंडीस जाण्याऐवजी गोविंदराव सासण्यांच्या आग्रहावरून अण्णांनी मला कोल्हापूर, पन्हाळा ह्या भागाकडे सहलीला नेले.

*ह्या खेळांचे सविस्तर वर्णन, वेणूताई पानसे लिखित 'प्रगतिपथावर' ह्या नावाच्या हुजुरपागेवरील माहितीवजा पुस्तकातही आढळते.

पन्हाळ्यास सुखटणकरांच्या बहिणीकडे आम्ही दोन दिवस राहिलो. तिच्या बाळंतपणाला तिची आई व धाकटी बहीण जमखिंडीहून आलेली होती. एक दिवस कोठीच्या अंधाऱ्या खोलीत मी गेली असताना ही नाजूक गोरी, रेखीव पण अंगाची वळकटी होऊन लटलटत पडलेली धाकटी बहीण मला दिसली. वयाच्या अकराव्या बाराव्या वर्षी नवज्वर व पक्षघात होऊन हिंडत्याखेळत्या मुलीची अशी अवस्था होऊन गेली होती. तिची ती केविलवाणी स्थिती पाहून खूप वाईट वाटले. पुढे सुखटणकरांचे वडील वारल्यावर आईचे केशवपन व्हायला नको व जननिंदा तर टाळायची म्हणून त्या दोघी आमच्या घरी जमखिंडीस सहा- सात महिने राहिल्या होत्या. केशवपन लेकाच्या सुधारकी मतांसाठी केले नाही, तरीपण ती गोष्ट त्यांच्या मनाला बरीच लागून राहिली होती. वरकरणी दाखवत नसत पण आत ती कुढत होती. उपासतापासाने देहदंड करीत खंगत चाललेली. दुसऱ्याच्या घरी रहाण्याचे दुःख होतेच."

जनाक्का पुढे सांगतात–"एक दिवस तिच्या आई वारल्याचे कळले तेव्हा त्यांच्या निधनापेक्षा मला शांतीच्या पुढील असहाय्य, परावलंबी, लाजिरवाण्या जीवनाची भयानकताच अधिक जाणवू लागली.... थोड्याच दिवसांत वासुदेवरावांची गाठ पडताच, शांतेला हुजुरपागेत ठेवल्यास कसे ? असे मी सुचवले. त्यावर त्यांनी, परवानगी कोण देणार ? जबाबदारी कोण उचलणार ? अशी शंका उपस्थित केली. मी चटकन म्हणाले, 'डॉ. भांडारकर तुमच्यापैकीच आहेत.... तेच शाळेचे अध्वर्यु आहेत. त्यांना विचारून पहा. परवानगी मिळाली तर पुढे सारी जबाबदारी माझ्याकडे लागली. तुम्ही चिंता सोडा."[४०]

जनाक्कांच्या ह्या सूचनेनुसार खटपट होऊन शांताला हुजुरपागेत ठेवण्यास परवानगी मिळालेली दिसते. दिलेल्या शब्दाप्रमाणे जनाक्का तिची सर्व सेवा करत होत्या असे दिसते. तिला मसाज करायचा, बागेत हिंडवायची, हातापायाच्या दुर्बल स्नायूंत जोर यावा व कामाचा जितका सराव पडेल तितका घडवावा म्हणून तिच्या बरोबरीने दळणकांडण करीत. पण त्यांच्या ह्या धडपडीमुळे सर्वांनी त्यांना मूर्खात काढले असे त्या सांगतात. पुढे त्या म्हणतात -

"माझ्या स्वतःच्या जीवनाचा मी प्रथमपासून विचार करीत आले आहे. इतर मुलींच्या जीवनक्रमाशी माझे जीवन ताडून पहाण्याची मला सवय लागली होती. इतरांच्या सुखदुःखाशी माझ्या सुखदुःखाची मी तुलना करत असे.... त्यामुळे शांतेचे जीवन किती लाजिरवाणे, कष्टतर व दुःखपूर्ण आहे ह्याची मला कल्पना आली. आपल्यापेक्षा दुर्दैवी मुलींचे जीवन आठवून मन उदास झाले. तिच्याकरता काहीतरी करावे हीच विचाराची दिशा ठरू लागली. ... जो तो म्हणे हा नस्ता उपद्व्याप सोडून दे."

जनाक्कांच्या ह्या अंतस्फूर्तीने घेतलेल्या सेवाकार्याविषयी सगळ्यांच्याच मनात नाराजी दिसते. जनाक्का स्कॉलरशिप घेऊन शिक्षण पुरे करीत असता आपला अभ्यास संभाळून असण्याऐवजी शांतेची नस्ती भानगड त्यांनी घेतल्यामुळे शाळेच्या सुपरिंटेंडंट मिस सोराबजी त्यांच्यावर नाराज झालेल्या दिसतात. आईवडिलांना पण जनाक्काचे करणे पसंत नव्हते, असे दिसते. विठ्ठलराव तुलनात्मक धर्मशिक्षणासाठी त्यावेळी परदेशी गेलेले. मैत्रिणींनी तर त्यांना हेटाळणीच्या स्वरात मूर्खातच काढलेले. जनाक्का म्हणतात–" (सर्वांची कुचेष्टा ऐकून) मला

पण वाटे चुकलं तर नाही आपलं ? शांतेची जबाबदारी आपल्या हातून नीट पाळली गेली नाही तर माझी काय गत होईल ? पण शांतेची निरपराध केविलवाणी मुद्रा डोळ्यापुढे तरली, की माझ्या मनातील घायकुते विचार नाहीसे होऊन मला हुरूप येई.... थोड्याच दिवसांत माझ्या श्रमाचे चीज होऊन.... शांता आपली कामे स्वतःच करू लागली. न अडखळता चालू लागली. ... पूर्वीपेक्षा स्पष्ट बोलू लागली. पुढेपुढे तर इतकी सुधारली की हुशारीने वर्गातल्या परीक्षेत वरचा नंबर काढू लागली. अक्षर तर इतके वळणदार व सुंदर असे, की नमुना म्हणून वर्गशिक्षक सर्वांना दाखवीत असत. शिवणकामातही प्रशंसनीय प्रगती केली होती."

जनाक्कांच्या कष्टाला इतके अपूर्व फळ आलेले पाहून मिस सोराबजींचा पण राग निवळलेला दिसतो. इतका की शाळेचं भूषण म्हणून ह्या दोघींना त्या शाळेत येणाऱ्या पाहुण्यांना आवर्जून दाखवू लागलेल्या दिसतात. एकदा सयाजीराव गायकवाड शाळेला भेट देण्यासाठी आले असताना त्यांना जनाक्कांची ओळख करून देऊन त्यांचे कर्तृत्व सांगण्यात आले. त्यांना खूप कौतुक वाटलेले दिसते. 'आपण ज्या होतकरू विद्यार्थ्यास इंग्लंडला पाठविण्यास आर्थिक सहाय्य केले* त्याची बहीण देखील लोकोपयोगी कृत्य करण्यास तत्पर आहे तर', असे उद्गार त्यांनी लेडी सुपरिंटेंडंट जवळ काढलेले दिसतात.

जनाक्का पुढे म्हणतात– "ह्या साऱ्या स्तुतिवर्षावापेक्षा, शांतेच्या जबाबदारीतून मी सहीसलामत एकदाची पार पडले याचाच आनंद मला अधिक झाला. अद्यापदेखील तसेच समाधान वाटते."

दुर्दैवाची गोष्ट म्हणजे जनाक्कांचे हे समाधान देवाला पाहावलेले दिसत नाही. ह्या शांताला 'क्षय' हा त्या काळच्या दृष्टीने भयानक असलेल्या रोगाने गाठलेले दिसते. नाइलाजाने साऱ्यांपासून तिची फारकत होऊन उपचारार्थ तिला रास्तापेठेतील एका घरात ठेवले गेले. जनाक्का पुढे सांगतात–

"मिस सोराबजींची ती लाडकी पण कठोर मन करून त्या तिला भेटायला जात नसत** व आम्हाला पण (लागण होईल या भीतीने) तिच्याकडे जाऊ देत नसत.... रविवारी प्रार्थना समाजात तिचे भाऊ तिला टांग्यातून घालून आणत असत. शांतेचा टांगा आल्याचे कळताच- मी उपासना चालू असतांना मध्येच उठून तिला भेटायला रस्त्यावर जाई. एका भेटीत मी तिला सांगितले, 'शांते धीर सोडायचा नाही बरं. मरूबिरू नकोस नाहीतर बघ. मेलीस तर चांगलीच ठोकून काढीन.' माझ्या बोलण्यावर शांतीसकट सर्वजण खूप हसले."

जनाक्कांनी कितीही धीर दिला तरी शांताचा रोग वाढतच गेलेला दिसतो.... तिचे केस कापायचे ठरले. जनाक्का सांगतात–"तिच्या आजारपणात खूप कष्ट घेऊन मसाज करून,

* विठ्ठलराव धर्मशिक्षणासाठी जेव्हा मँचेस्टरला गेले तेव्हा सयाजीरावांनीच त्यांना पूर्वी शिक्षणासाठी दिलेले पैसे माफ करून वर प्रवासखर्चासाठी दीड हजार रुपयांची मदत दिली. (माझ्या आठवणी व अनुभव: पृष्ठ ११४)

** त्या काळी क्षय रोग हा बरा न होणारा व विलक्षण संसर्गजन्य मानला जात असे व त्याप्रमाणे पुढे तो जनाक्कांच्या बहिणीला झालाच.

निराश न होता मी तिचे केस वाढवले होते.... हेवा वाटावा इतके ते सुंदर झाले होते. आता ते कापायचे ठरले होते. निदान मला त्याचे शेवटचे दर्शन घडावे म्हणून तिने आग्रहाने मला बोलावणे पाठवले. भाऊ बोलावायला आला. आता ती थोड्याच दिवसांची सोबतीण होती."

मिस सोराबजींना जनाक्कांच्या तब्येतीची काळजी होती, म्हणून त्या जनाक्कांना शांताकडे पाठवायला राजी नव्हत्या असे दिसते. शेवटी एका अटीवर त्या तयार झालेल्या दिसतात. त्यांनी सांगितले, 'जनाबाईंना प्लुरसीचा विकार आहे. हृदयाच्या विकाराने त्याच आजारी आहेत हे ध्यान्यात ठेवा आणि फक्त दहा मिनिटेच जनाबाई शांताजवळ रहातील असे करा.

जनाक्का पुढे सांगतात–"मी ठरल्याप्रमाणे परत येईन याची शाश्वती नसल्याने सूचना पढवून त्यांनी गड्याला बरोबर पाठविले.... मी शांतेकडे आले. ती बसली होती. तिच्यासमोर टोपलीत तिचा केशसंभार ठेवलेला होता. दृष्य पाहून माझे डोळे घळाघळा वाहू लागले. उर भरून आला. आम्ही दोघी मूक वृत्तीने परस्परांच्या भावनांचा अंदाज घेत होतो. तिने मला जवळ बोलावून पाठीवरून हात फिरविण्यास सांगितलं. मग क्षीण आवाजात म्हणाली, 'जनाक्का, मागे तुम्ही मला ताकीद दिली होतीत की, मरू नकोस.... मेलीस तर ठोकून काढीन. आता मी तुमचे ऐकत नाही.... मरायच्या अगोदर ठोकून घ्या पाहू.... ठोकून ठोकूनच मला इतक्या सुस्थितीत आणून सोडलीत.... पण नशीबच माझे फुटके तेव्हा आता ठोकून घ्या.' माझेच वाक्य- पण किती जिव्हारी लागलं मला त्या वेळी. अजूनही आठवणीनं मन उदास होतं !"

जनाक्कांच्या जीवनात हा प्रसंग घडत होता त्या वेळी त्यांचे वडील बंधू विठ्ठलराव इंग्लंडला गेले होते हे आपण पाहिलेच. भावाच्या ह्या धर्मशिक्षणासाठी इंग्लंडला जाण्याबद्दल जनाक्कांची प्रतिक्रिया काय होती तीपण त्यांनी ह्या मुलाखतीत स्पष्ट केली आहे.

त्या सांगतात–

"हुजुरपागेच्या ठराविक ठशाच्या वातावरणातून मनाला विरंगुळा वाटावा ह्याच उद्देशाने मी प्रार्थना समाजात जात होते. धार्मिक प्रवृत्ती होती अशातला भाग नाही....बंधू विठ्ठलरावांची पण समाजासंबंधी अशीच वृत्ती असावी असा माझा तर्क होता. म्हणून घरची गरिबी अहोरात्र सतावित असता एलएल.बी. चे शिक्षण अर्धवट सोडून बॅरिस्टरीऐवजी तौलनिक धर्माभ्यासासाठी विलायतेत जायचे व आल्यावर ब्राह्मो समाजाचे आजीव प्रचारक व्हायचे त्यांनी ठरवले. दाढी राखू लागले. त्यामुळे मी संत्रस्त होऊन गेले. कुठे रे. टिळकांसारखा अण्णांनी ख्रिश्चनधर्म स्विकारला तर काय घ्या, हाही विचार भंडावून टाकू लागला. मी त्यांना एकटे गाठून शहानिशा करण्याचे ठरवले. त्यांची खूप समजावणी केली. त्यावर त्यांनी सांगितले, की हरिभाऊंच्या 'मी' कादंबरीच्या नायकाप्रमाणे मी समाजसेवेचे व्रत घेणार आहे. ...पण मला त्यांचे ते समर्थन मुळीच पटले नाही... पण काय करणार ? अखेरपर्यंत ते स्वतःच्याच विचाराने वागले... मला मात्र शाळेत बोलाबाला होऊन प्रसिद्धि मिळाली."[४१]

विठ्ठल रामजी शिंदे १९०१ मध्ये धार्मिक अभ्यासासाठी म्हणून मँचेस्टरला गेले. तिकडे नाना देश फिरून तेथील धर्ममतांचा तौलनिक अभ्यास करून ते १९०३ मध्ये भारतात परतले.

आल्यावर त्यांनी आपली आत्यन्तिक सुधारक तत्त्वे व त्यांची सडेतोड पद्धतीने मांडणी करायला सुरवात केल्याने गावात पूर्वी ते जरी लाडके होते तरी आता लोकमत क्षुब्ध होऊ लागले. तशात एका महाराच्या मुरळी सोडलेल्या मुलीला वाचवून घरी आणून ठेवून तिचे शिक्षण सुरू केल्याने जीर्णमतवादी समाज क्षुब्ध होऊ लागला व त्यामुळे आई, वडील, बहिणीं-सकट सर्व बिऱ्हाड त्यांनी मुंबईस प्रार्थना समाजाच्या जागेत आणून ठेवले, असे दिसते.

जनाक्कांची धाकटी बहीण चंद्राक्का बालपणापासून प्रकृतीने अशक्त होती हे आपण पाहिले आहे. तशांत आता मुंबईची कोंदट हवा व मध्यंतरी थोडे दिवस क्षयी शांताबाई सुखटणकरचा झालेला सहवास* ह्यामुळे तिलापण क्षयाची बाधा झालेली दिसते. ह्या वेळी जनाक्का हुजुरपागेत इंग्रजी ६ व्या इयत्तेत शिकत होत्या. ह्याच अंकात त्या सांगतात- "ह्याच सुमारास मीहि आजारी झाले. मदरला भीती वाटू लागली, की शांताने मलाही क्षयाचा प्रसाद दिला असावा. पण माझा आजार प्लुरसीचा होता. मला दोन-तीन महिने अंथरुणावर पडून रहावे लागले. परीक्षा जवळ आली होती... मी डॉक्टरांच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष करून चोरून अभ्यास करत होते. त्यामुळे ६ वी ची परीक्षा मी वरच्या नंबराने पास झाले."[४२]

पण हा ताण जनाक्कांना झेपलेला दिसत नाही. त्या पुन्हा आजारी झालेल्या दिसतात. त्यामुळे त्यांचे आईवडील, भाऊ कोणाची इच्छा त्यांनी पुन्हा शाळेत जावे अशी नव्हती. पण जनाक्का मॅट्रिकचे वर्ष असल्याने हट्टाने पुन्हा बोर्डिंगात दाखल झालेल्या दिसतात. पण दोन-तीन महिन्यांत त्यांची तब्येत खालावलेली दिसते. ह्याच अंकात पुढे त्या सांगतात– "शाळेचे डॉक्टर वाडिया ह्यांनी मदरला कळवले, की यापुढे या मुलीला अभ्यास करू देणे योग्य नाही. हिची फुफ्फुसे फार कमजोर झाली आहेत. पूर्ण विश्रांतीची गरज आहे. त्यामुळे मदरचा नाईलाज झाला. पुण्याचे हार्ट स्पेशालिस्ट डॉ. मोदी ह्यांचे औषध घेऊन पाहिले. त्यांना अण्णांबद्दल फार आदर होता. अस्पृश्योद्धाराला खूप मदत करणारा उदार मनाचा हा पार्शी डॉक्टर. त्याचेपण मत पडले, की अभ्यासाचा ताण मला झेपणार नाही. शाळा बंद ठेवावी... चंद्राक्काच्या अकाली निधनाने अण्णांचे मन फारच हळवे झाले होते. त्यामुळे माझ्या बाबतीत धोका पत्करण्यास ते तयार नव्हते. म्हणून त्यांनी मला शाळा सोडून मुंबईस परत नेले.

"अशा रीतीने १९०५ सालच्या पहिल्या सहामाहीतच मी माझ्या आवडत्या हुजुरपागेसच नव्हे तर पुढच्या साऱ्या अभ्यासक्रमास कायमची अंतरले."

ह्याविषयी अण्णासाहेब आपल्या आत्मवृत्तात थोडा वेगळा तपशील मांडताना दिसतात. ते म्हणतात–

" चंद्राबाईच्या तब्येतीला उतार पडेना म्हणून तिला अहमदनगरच्या कोरड्या हवेत न्यावे लागले... वृद्ध आईबाप बरोबर होतेच. इकडे मुंबईत सौभाग्यवतीची तब्येत अधिकाधिकच

* "शांता सुखटणकरला क्षय झाल्यावर काही दिवस जमखिंडीस हवापालटासाठी म्हणून आमच्या घरी ठेवले होते. तेव्हा चंद्राक्का नेहमी तिच्या सहवासात व शुश्रूषेत असल्याने व पुढे मुंबईच्या कोंदट हवेत आल्याने तिला दोन्ह रोग जडला." (आठवणी : १७२)

बिघडत चालली होती. तशात तिसरा मुलगा वारला. म्हणून जनाक्कास मुंबईस आणावे लागले. तिलाही त्याचवेळी प्लुरसीची व्यथा जडली."

विठ्ठलराव व जनाक्का ह्या दोघांनी आपापली आत्मकथने आयुष्याच्या खूप उतार वयात लिहिलेली असल्याने तपशिलात असे बारीकसारीक घोटाळे झालेले दिसतात.

तथापि एवढे खचित कळते, की जनाक्कांच्या स्वतःच्या व घरच्या लोकांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे हुशार विद्यार्थिनी असूनही जनाक्कांना हातातोंडाशी आलेला मॅट्रिकच्या पदवीचा घास सोडून द्यावा लागलेला दिसतो.

येथपर्यन्त आपण जनाक्कांची जडणघडण कशी होत गेली, त्यांच्या अवतीभवतीचे वातावरण कसे होते, कशाकशाला तोंड देत त्या शिकल्या, कुणाकुणाचे पाठबळ मिळत गेले व त्या स्वतः स्वतःला कशा घडवत गेल्या हे पाहिले.

इथून त्यांच्या कर्मयोगी जीवनाला सुरवात झालेली दिसते. तेव्हा त्याचा तपशील पुढील प्रकरणात पाहू.

* *

निबंध
वा. क्र. 38164
२६६२८
८/६/०२

# संदर्भ सूची


१. माझ्या आठवणी व अनुभव: भाग १, २ व ३, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, १९५८
२. स्मृतिचित्रे: जनाक्का शिंदे, तरुण महाराष्ट्र, ७.१.४९
३. माझ्या आठवणी व अनुभव: १, २ व ३, विठ्ठल रामजी शिंदे, पृष्ठ ८०-८१
४. कित्ता : पृष्ठ ७९-८०
५. कित्ता : पृष्ठ १६, १९, २१
६. कित्ता : पृष्ठ २४
७. कित्ता : पृष्ठ २३
८. कित्ता : पृष्ठ २७
९. स्मृतिचित्रे: जनाक्का शिंदे, तरुण महाराष्ट्र, ७.१.४९
१०. कित्ता : ३१.१२.४८
११. माझ्या आठवणी व अनुभव: भाग १,२ व ३, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, पृष्ठ ४५
१२. स्मृतिचित्रे: जनाक्का शिंदे, तरुण महाराष्ट्र, ७.१.४९
१३. माझ्या आठवणी व अनुभव: कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, पृष्ठ ८३
१४. कित्ता : पृष्ठ ३२-३३
१५. कित्ता : पृष्ठ ४९
१६. कित्ता : पृष्ठ ५३
१७. कित्ता : पृष्ठ ८२
१८. कित्ता : पृष्ठ ६०-६१-६२
१९. कित्ता : पृष्ठ ८३
२०. स्मृतिचित्रे: जनाक्का शिंदे, तरुण महाराष्ट्र, २१.१.४९
२१. कित्ता : ७.१.४९
२२. कित्ता : ४.२.४९

२३. कित्ता : ४.२.४९
२४. कित्ता : ४.३.४९
२५. माझ्या आठवणी व अनुभवः कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, पृष्ठ ९६-९७
२६. स्मृतिचित्रेः जनाक्का शिंदे, तरुण महाराष्ट्र, ४.३.४९
२७. कित्ता : ११.३.४९
२८. माझ्या आठवणी व अनुभवः भाग १, २ व ३, विठ्ठल रामजी शिंदे, पृष्ठ १०३
२९. स्मृतिचित्रेः जनाक्का शिंदे, तरुण महाराष्ट्र, २५.३.४९
३०. माझ्या आठवणी व अनुभवः कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, पृष्ठ १०५
३१. स्मृतिचित्रेः जनाक्का शिंदे, तरुण महाराष्ट्र, २५.३.४९
३२. कित्ताः २५.३.४९
३३. कित्ताः १.४.४९
३४. महर्षी वि. रा. शिंदे यांची रोजनिशीः संपादक डॉ. गो. मा. पवार, २८.३.१८९८
३५. तत्रैवः पृष्ठ १६, १६.४.१८९८
३६. स्मृतिचित्रेः जनाक्का शिंदे, तरुण महाराष्ट्र, १३.५.४९
३७. माझ्या आठवणी व अनुभवः कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, पृष्ठ ११०-१११
३८. स्मृतिचित्रेः जनाक्का शिंदे, तरुण महाराष्ट्र, १३.५.४९
३९. कित्ताः २०.५.४९
४०. कित्ताः ३. ६.४९, १०.६.४९
४१. कित्ताः १७.६.४९
४२. कित्ताः १७.६.४९
४३. माझ्या आठवणी व अनुभवः कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, पृष्ठ १७३

प्रकरण २ रे

# संन्यस्त कर्मयोगिनी

१९०५ मध्ये जनाक्का शालेय शिक्षणाला रामराम ठोकून मुंबईला आल्या. सुरवातीला घरातील आजारपणामुळे घरातच होत्या तरी लवकरच त्या स्वतःच्या तब्येतीसाठी हवापालट म्हणून भावाबरोबर (प्रार्थना समाजाचे प्रचारक म्हणून ते गावोगावी हिंडत असत.) नगर, सातारा, कोल्हापूर वगैरे गावी फिरलेल्या दिसतात. त्या सांगतात– "ह्या फिरतीमुळे प्रचाराचे काम कसे चालते हे बघण्याची संधी मिळाली. अनेक लोकांच्या ओळखी झाल्या. नगर, सातारा वगैरे ठिकाणी समाजाच्या शाखा स्थापन झाल्या होत्या तिथे रानडे, भांडारकर, चंदावरकर वगैरे मंडळी हजर राहून उत्सव साजरा करीत."[१]

ह्या मंडळींच्या सहवासाबरोबरच प्रार्थना समाजामुळे जनाक्कांच्या अंगातील गायन गुणाचा सहजपणे विकास होत गेलेला दिसतो. जनाक्कांचा गळा फार गोड होता असे अण्णासाहेब आपल्या रोजनिशीत नमूद करतात. (२६.४.९९) पुढे ते आपल्या आत्मकथनात लिहितात–

"उपासनापद्धतीत या क्रांतिकाळात एक महत्त्वाची भर पडली. सिंध, पंजाब प्रांतांतून भजनाची रसिक मंडळी राममोहन आश्रमात (प्रार्थना समाजाच्या) येऊन रहात तसेच बंगालहून तरुण... ब्राह्मसमाजाचे सभासद मुंबईत शिक्षणासाठी येऊन रहात. त्यात प्रबोधकुमार दत्त नावाचे प्रसिद्ध गायक होते. त्यांच्यामुळे प्रार्थना समाजाच्या उपासनेपूर्वी.... अर्धा तास भजन म्हणण्याची प्रथा पडली... ह्यात द्वा. गो. वैद्य ह्यांच्या पत्नी गुलाबबाई व त्यांच्या भगिनी कृष्णाबाई जव्हेरे आणि विशेषतः मराठी पद्ये म्हणण्यामध्ये माझी बहीण श्रीमती जनाक्का यांचा पुढाकार असे.... प्रबोधकुमार दत्त ह्याचा आमच्या घरी खूप लळा पडला.... त्याच्याकडून श्रीमती जनाबाईंनी बंगाली भाषेची आणि विशेषतः संगीताची बरीच माहिती करून घेऊन आपल्या इकडील संगीतात त्याचा प्रसार केला."[२]

महर्षी शिंद्यांचे सहकारी श्री. व्ही. के जोग ह्यांचे पुत्र श्री. व्ही. जोग म्हणाले की 'जनाक्का

भक्तिपर पदांना स्वतः चाल देत असत.' वाई ब्राह्म समाजाच्या चौथ्या वार्षिक उत्सवाचे वेळी जे नंगर संकीर्तन झाले त्याचे वर्णन करताना श्री. रा. कृ. बाबर लिहितात– "सर्व रस्ता स्त्री-पुरुषांनी फुलून गेला होता. भगिनी जनाक्का शिंदे यांनी 'मन एकबार हरि बोल हरि बोल'– हे बंगाली पद्य आपल्या मंजूळ वाणीने म्हटले. सर्व समुदाय तल्लीन झाला. या पद्याच्या तालावर महर्षी शिंदे नाचत होते."[३]

१९०७ साली जनाक्का विठ्ठलरावांबरोबर मंगरूळ गावच्या ब्राह्म समाजाच्या शाखेला भेट देण्यास गेलेल्या दिसतात. हे गाव कोपऱ्यातील छोटेसे असले तरी इथला समाज खूपच कृतिशील व चैतन्यपूर्ण होता असे दिसते. ह्या भेटीविषयी अण्णासाहेब लिहितात–

"…. एक महिना अत्यन्त सुखासमाधानाने आम्ही ह्या बाळबोध समाजाची सेवा केली. (उपासना, भाषणे, प्रवचने इ.) ती त्याने गोड करून घेतली. विशेषतः आम्हां दोघा भावंडांना या प्रांताची कानडी भाषा येत असल्याने या समाजातली लहानथोर मंडळी आम्हाशी अगदी आपुलकीने बिलगली. आम्हांपासून त्यांना लाभ झाला की त्यांच्या पासून आम्हांला झाला हे निवडून सांगणे कठीण आहे."[४]

अशाच एका प्रार्थना समाजाच्या (मुंबई) मेळाव्यात बी. बी. केसकरांची ओळख झालेली दिसते. ते प्रार्थना समाजाचे निःसीम उपासक असून विठ्ठलरावांचे मित्र होते. त्यांनी जनाक्कांना सुचवले, की 'मुंबईच्या कोंदट हवेत, उगीच रिकामी बसून राहण्यापेक्षा पनवेलास म्युनिसिपल शाळेत जागा पत्करावी. तिथली हवापण कोरडी आहे. तिथले मामलेदार श्री. तेंडुलकर त्यांच्या ओळखीचे असून, ते म्युनिसिपल बोर्डाचे चेअरमन आहेत.'

हे सांगून जनाक्का पुढे म्हणतात– "म्हणून मला पनवेलास नोकरी मिळाली. वेळ जावा म्हणून आपण ही नोकरी घेतलीय ही भावना बद्धमूळ झाल्याने ह्या नोकरीविषयी मी फारशी उत्सुक नव्हते. कामाची जबाबदारी अशी मला वाटत नसे. ६ वी पास, गायन, शिवण वगैरे विषय अवगत म्हणून एकदम २५ रुपये पगारावर माझी नेमणूक झाली होती. त्यामुळे इतर शिक्षकांत कानामागून आली आणि तिखट झाली अशी भावना निर्माण झाली."[५]

गाव नवा, ओळखी पाळखी नाहीत, म्हणून अण्णासाहेबांच्या घराशी जमखिंडीपासून घरोबा असलेले व आता विठ्ठलरावांबरोबर मुंबईच्या प्रार्थना समाजात काम करणारे त्यांचे मित्र श्री. सय्यद अब्दुल कादीर यांनी आपल्या ओळखीच्या एका मुस्लिम गृहस्थाच्या शेजारी भाड्याच्या घराची व्यवस्था करून देऊन त्या गृहस्थांचा जनाक्का व त्यांच्या आईवडिलांशी परिचय करून दिलेला दिसतो.

जनाक्का पुढे सांगतात– "आमचे बाबा खेड्यात राहूनही सुधारकी वृत्तीचे होते. जातिभेद पाळत नसत. तेव्हां पनवेलास जातिभेद कुठून पाळणार? आम्हांला तर त्यात काही विशेष वाटतही नसे. हिंदू असून, खेड्यातली असूनही इतक्या उदार मताची ही माणसे आहेत हे पाहून शेजाऱ्यांना फार नवल वाटे. ते आमची बडदास्त ठेवीत. आमची स्वैपाकाची व्यवस्था, शिधा वगैरे पण बघत. कारण मी आजारी होते. आईबाबा मुलीच्या मृत्युने खचलेले होते. हे गृहस्थ

(मुसलमान) सज्जन व सुखवस्तू होते."

ह्या शेजाऱ्याच्या मुलीच्या लग्नातला गमतीदार गोंधळ जनाक्कांनी छान रंगवला आहे. पण तो आपण पुढे जनाक्कांची 'लेखनसृष्टी' बघताना पाहू.

पुढे लवकरच जनाक्कांची नेमणूक म्युनिसिपल मुलींच्या प्राथमिक शाळेत हेडमिस्ट्रेस म्हणून झालेली दिसते.... शाळेत मुलींची संख्या ६० पर्यंत असावी व बहुसंख्य मुली उच्च वर्गाच्याच होत्या असे दिसते. शाळेत हेडमिस्ट्रेस व एक म्हातारा मराठा जातीचा शिक्षक असे दोघेच शिक्षक होते असे दिसते. ते म्हातारे शिक्षक बालवर्ग व १ल्या इयत्तेचे वर्ग घेत. उरलेले वर्ग जनाक्का घेत होत्या असे दिसते.

त्याच वेळेस विठ्ठलरावांचे मित्र बी. बी. केसकर यांनी आपली विधवा बहीण भागिरथीबाई हिला शिक्षण मिळावे म्हणून जनाक्कांकडे पाठवून दिले होते, असे दिसते. त्या आपल्या आई व मुलासह जनाक्कांच्या शेजारीच राहात होत्या.

भागिरथीबाई फार सालस व मेहनती, अभ्यासू असल्याने त्यांनी अभ्यासात बरीच प्रगती करून दाखविली.... असे जनाक्का सांगतात. पुढे आपल्या राहात असलेल्या वाड्याचे तपशीलवार वर्णन करून नंतर जनाक्का लिहितात–

"आम्ही सुधारक वृत्तीचे, जातिभेदातीत मतप्रणालीचे. तशात आमच्या शेजारच्या मुसलमान गृहस्थाच्या मुलीच्या लग्नात.... आम्ही जेवण केले.... वगैरे गोष्टींमुळे गावातल्या सनातनी वृत्तीच्या रूढीप्रिय लोकांच्या डोळ्यावर आम्ही तेव्हांच आलो होतो. आमच्या सुधारकी वर्तनावर त्यांच्याकडून होणारा टीकाप्रवाद आमच्या कानांवर अधूनमधून येत होते. पण असले टीकाप्रवाद ऐकण्याची सवय अंगवळणी पडल्याने.... आम्हांला विशेष क्षिती वाटली नाही."[६]

ह्याच परिस्थितीत विठ्ठलराव अस्पृश्यांसाठी नुकत्याच स्थापन केलेल्या संस्थेच्या प्रचारार्थ पनवेलला आलेले दिसतात. जनाक्का पुढे सांगतात–

"आमचे अण्णा नुकतेच इंग्लंडला जाऊन विद्याविभूषित होऊन आलेले म्हणून त्यांच्याबद्दल एक प्रकारचे आदरयुक्त कुतुहल निर्माण झाल्याने.... त्या व्याख्यानास खूप गर्दी लोटली होती. पण अण्णांनी व्याख्यानात जातिभेदावर जी झोड उठवली,.... निर्भीड विचार मांडले.... अस्पृश्योद्धारार्थ स्थापन केलेल्या संस्थेची माहिती दिली....त्यामुळे जुन्या समजुतीच्या लोकांना त्यांच्याबद्दल वाटणारे कुतुहल नष्ट होऊन त्याची जागा तिरस्काराने घेतली... दुसरे दिवशी आमचे घरील चहापानाचे समारंभास गंगाधर सुभेदार नावाचे महार व मुसलमान जातीचे डॉक्टर हजर होते. झाले, या जाहीर चहापान समारंभाने तर... आगीत तेल ओतल्यासारखे झाले. अण्णा आपले काम संपताच निघून गेले पण लोकक्षोभाची झळ आम्हाला सोसावी लागली."

ह्याचा परिणाम गावातील कर्मठ लोकांनी जनाक्कांच्या कुटुंबावर बहिष्कार टाकण्यात झालेला दिसतो. घरी कामे करणाऱ्या व पाणी आणून देणाऱ्या मोलकरणीने लोक मला त्रास

देतात असे म्हणून जनाक्कांचे काम करणे सोडलेले दिसते. सार्वजनिक नळावरही ह्यांना पाणी भरण्यात हरकत होऊ लागलेली दिसते.

विठ्ठलराव आपल्या आत्मकथनात सांगतात–

"१९०६-७ च्या सुमाराला जनाक्का पनवेलला म्युनिसिपल शाळेत मुख्य शिक्षक ह्या नात्याने काम करत होती. सुधारक म्हणून तिला तिथे फार विरोध होऊ लागला... प्रार्थना समाजाची तत्त्वे लोकांस समजावून दिल्यास गैरसमजूत कमी होऊन विरोध कमी होईल या आशेने मी पनवेलीस गेलो.... (आमच्या भाषणांचा) पनवेलच्या वरिष्ठ वर्गावर थोडाबहुत परिणाम झाला आणि चिरंजीव जनाक्काच्या मुलींच्या शाळेत मुलींची हजेरी पण सुधारली. अशा स्थितीत बाबांनी.... महारास चहापानाला बोलावल्यामुळे.... लोकमताला पुन्हा... इतका ऊत आला की.... घरची मोलकरीण काम सोडून गेली. बाबांना हजामतीची पंचाईत पडली.....प्रागतिक सज्जन मामलेदार बेंदूरकर... म्युनिसिपालटीतल्या सभ्य मुसलमान गृहस्थांचे सहाय्य न मिळते तर चि. जनाक्काला नोकरी सोडून मुंबईस परतावे लागले असते."[७]

जनाक्का सांगतात–

"बाबा मुंबईला जाऊन हजामत करवून घेत पण पाण्याची तर मोठीच पंचाईत होऊन राहिली. पण... शेजारच्या मुसलमान डॉक्टरने.... जरूरी असल्यास माझ्याकडून पाणी घेऊन जावे असे सांगितले. मालकीण ब्राह्मणबाई असून चार पुस्तके शिकलेली, बराच प्रवास केलेली, समंजस प्रवृत्तीची बाई असल्याने अण्णांच्या व्याख्यानाचा तिच्या मनावर अनुकूल परिणाम झाल्याने.... आमची अडचण लक्षात येताच ती स्वतः होऊन माझ्याकडे आली. 'आपल्या वाड्यातील विहिरीचे पाणी मी स्वतः तुम्हास पोहोचते करीन... चिंता करू नका. हे असेच चालायचे.... थोडे दिवस चालेल. मग सारे ठीक होईल. असल्या गावगुंडीला भीक घालू नका. बाईमाणूस म्हणून धीर सोडू नका', असे तिने उद्गार काढलेले मला अजूनही आठवतात. तिचा मुलगा पुरुषासारखा पुरुष असूनही लोकमताला भिऊन आमच्या घरी पाणी देण्यास आपल्या आईला विरोध करीत असे. पण त्या बाईने मुलाच्या विरोधाला बिलकुल भीक न घालता आपले वचन अखेरपर्यंत पाळले."[८]

ह्या त्रासाविषयी जनाक्कांनी जेव्हा आपल्या भाऊला (विठ्ठलरावांना) कळविले तेव्हा त्यांनी त्यांना नोकरी सोडून निघून येण्याविषयी कळवलेले दिसते. कारण एकतर केवळ हवाबदलासाठी त्यांनी पनवेलीस ही नोकरी स्वीकारली होती. शिवाय ते लिहितात–

"आपल्या संस्थेत तुझी फार जरूरी आहे. अस्पृश्यांच्या स्त्रियांत जागृती करण्यासाठी तुला पुढे मोठेच कार्य करावे लागणार आहे. अस्पृश्य मुलींकरता ज्या मुलींच्या शाळा संस्थेतर्फे निघणार आहेत त्यासाठी तुझी जरूरी आहे."

जनाक्कांनी ह्या बाबतीत, ज्यांच्या साहाय्याने त्यांना नोकरी मिळाली होती त्या म्युनिसिपल शाळेचे चेअरमन श्री. तेंडुलकर यांना, विठ्ठलरावांचे पत्र दाखवून सल्ला घेतलेला दिसतो. त्यांना विठ्ठलरावांचे म्हणणे जरी रास्त वाटले तरी एवढे वर्ष पूर्ण करून मग नोकरी

सोडणे बरे, असा त्यांनी सल्ला दिलेला दिसतो.

मध्येच नोकरी सोडून देण्याने काय फायदा होणार आहे ? उलट लोकमताला भिऊन तुम्ही नोकरी सोडून गेलात असे व्हायचे. हे त्यांचे मत जनाक्कांना पटून त्यांनी भावाला तसे कळवून पुन्हा शाळेच्या कामात पूर्ववत लक्ष घातलेले दिसते.

ह्याविषयी जनाक्का ह्याच अंकातील मुलाखतीत सांगतात–

"माझी प्राथमिक शाळा होती.... पटावर जरी मुलींची संख्या ७९ असली तरी हजर मुलींची संख्या कमी असे.... बालवर्गात व पहिलीत मुलींची संख्या बरीच असे पण दुसरीत ४, तिसरीत २ व चवथीत अवघी एक मुलगी असे. (तरीपण).... शिक्षणाच्या कामाचा अनुभव नसता मी माझी जबाबदारी कशी पार पाडेन अशी धाकधूक मनात होतीच. पण जात्यावर बसले की ओवी सुचते या उक्तीप्रमाणे मी माझी जबाबदारी नीटपणे पार पाडू लागले. असे माझे मलाच कळून येऊन आत्मविश्वास वाढला. वर्ष अखेरीस माझ्या वर्गातल्या मुलींचे पेपर्स गावातल्या मुलांच्या हायस्कूलच्या हेडमास्तरांकडे तपासावयास गेले. गंमत अशी, की हेच गृहस्थ आमच्या बहिष्काराच्या मूळाशी होते. शिवाय माझी हेडमिस्ट्रेसच्या कामावर एकदम नेमणूक झाल्याचेही वैमनस्य त्यांच्या मनात असल्याने वार्षिक परीक्षेत माझी पुरतीच कसोटी पहाणार हे निश्चित ठरून गेले होते."

पण जनाक्कांची भीती खोटी ठरून त्यांच्याकडे असलेल्या दुसरी ते चवथीच्या सर्व मुली परीक्षेत उत्तम तऱ्हेने पास झालेल्या दिसतात. जनाक्का म्हणतात–

"शाळेची जबाबदारी मी नीट पेलल्याचा खराखुरा आनंद माझ्यापेक्षाही कुणाला झाला असेल तर तो श्री. तेंडुलकरांना व मला मदत करणाऱ्या मालकिणीला. मुलांच्या शाळेचे हेडमास्तर– ज्यांनी आमच्याशी सतत विरोध केला– त्यांनादेखील माझे कौतुकच वाटले. त्यांच्या हायस्कूलमधील इंग्रजी पाचवीचे गणित व संस्कृत ह्या विषयांच्या प्रश्नपत्रिका काढण्याचे काम त्यांनी मजवर सोपवले.... ह्या कसोटीला देखील मी उतरलेले पाहून त्यांचा माझ्या बद्दलचा दुराग्रह नाहीसा झाला. शेवटी आम्ही जेव्हा शाळा सोडून मुंबईस जावयास निघालो तेव्हां पावसाळ्यात वहातूक बंद आहे असे म्हणून मचव्यातून मुंबईस जाणे भाग पडले. तेव्हां त्यांनी मुंबईपर्यंत आमची सोबत करून आम्हांस सुखरूप मुंबईस पोहोचवले. झाल्या प्रकाराचे वैषम्य मनात न ठेवण्यास सांगून मोठ्या कळकळीने आमचा निरोप घेतला."

अशा तऱ्हेने आपल्या पहिल्या वहिल्या नोकरीला रामराम ठोकून जनाक्का मुंबईस येऊन आपल्या भावाच्या अस्पृश्योद्धाराच्या कामात सहभागी झालेल्या दिसतात.

विठ्ठलराव आपल्या आत्मकथनात ह्याविषयी म्हणतात–

"कामासाठी माणसे मिळवण्याचा प्रयोग मी स्वतःच्या घरापासून केला... म्हणून मी प्रथम माझी भगिनी श्रीमती जनाबाई, मातोश्री सौ. यमुनाबाई व पिताजी ती. रामजीबुवा ह्यांना कार्यास बोलाविले.... उपासनेच्या वेळी भजन करणे, प्रसंग विशेषी गोरगरिबांचा समाचार घेणे, वगैरे प्रार्थना समाजाच्या कामी मला त्या आगोदरच मदत करीत होत्या. तेच काम ह्या मिशनमध्ये

वाहून घेऊन करण्यासाठी मी त्यांना आपल्या कायमच्या नोकरीचा राजीनामा देण्याची विनंती केली. आणि ती त्यांनी मान्य केली.... जिथे मुले तिथे आम्ही.... ह्या हिंदू नियमाप्रमाणे माझे आईबाप माझ्या मागे आले. आम्ही सांगू ते काम, ठेवू ते स्थळ असा त्यांचा निर्धार झाला."[९]

१९०६ मध्ये अस्पृश्यांच्या उद्धारासाठी म्हणून विठ्ठलरावांनी निराश्रित साहाय्यकारी मंडळी (Depressed Class Mission) नांवाची संस्था स्थापन केली होती. तिच्या द्वारे अस्पृश्य वस्तीत जाऊन त्या मंडळींत समानतेची भावना रुजवणे, मुलांसाठी शाळा काढणे, औषधोपचार करणे, वस्त्या स्वच्छ करणे इ. अनेक कामे सुरू केलेली दिसतात. जनाक्का ज्या वेळी ह्या संस्थेत येऊन कामे करू लागल्या त्या वेळच्या परिस्थितीचे व कामाचे स्वरूप आपल्या मुलाखतीत सांगताना त्या लिहितात–

"मी संस्थेत गेले त्या वेळी ग्लोब मिल जवळच्या शाळेतील मुलांची संख्या जेमतेमच होती.... मुंबईतील सुधारक वृत्तीच्या चार-दोन सधन व्यक्तींचे सहाय्यावरच शाळेची स्थापना झाल्याने शाळेचे बहुतेक काम घरच्या माणसांकरवीच पार पाडण्यात येत असे– सामाजिकदृष्ट्या हीन दर्जा असलेले, आर्थिकदृष्ट्या पराकाष्ठेचे निष्कांचन आणि म्हणूनच शैक्षणिकदृष्ट्या व स्वच्छतेच्या बाबतीत यांचा दर्जा बराच खाली असल्याने त्यांच्यात शिक्षणाच्या प्रसाराबरोबरच नैतिक व शारीरिक स्वच्छतेसंबंधी.... जागृति करण्याचे ध्येय ठेवले होते."

"मुलांचे पालकांना शिक्षणाबद्दलची तितकीशी उत्सुकता वाटत नसल्याने केवळ घरात मुलांची कटकट नको याच हेतुने मुलांना शाळेत पिटाळीत. त्यामुळे.... हजेरी अनियमित असे. यासाठी प्रत्येकाच्या घरोघरी जाऊन मुले बोलावून आणावी लागत. मुलींना आंघोळी घालून त्यांचे केस विंचरण्याचे, उवा काढण्याचे काम माझ्या बहिणीकडे असे. घरोघरी जाऊन कोणी आजारी पडल्यास त्यास मोफत औषधोपचार करणे, सहानुभूतिपूर्वक त्याच्या घरगुतीबाबतची चौकशी करून योग्य ती सल्लामसलत देणे.... त्यांच्याकडे जाऊन भजनाचे कार्यक्रम करणे, किंवा पोथी-पुराणे सांगणे.... तक्रारी निवारण्यास मदत करणे, वगैरे प्रचारकी थाटाचे काम माझ्याकडे व श्री. सय्यद ह्याजकडे सोपवले होते.... ग्लोब मिल जवळची ही वस्ती इतक्या गलिच्छ जागेत होती की ढोपराइतकी घाण तुडवूनच वस्तीत प्रवेश करावा लागे. पावसाळ्यात तर आमचे हाल विचारूच नये.... अस्पृश्यांची वस्ती म्हणून म्युनिसिपालटीचे लक्ष नसल्याने महिनोन् महिने घाण पडून राहिल्याने, नाकास पदर लावूनच वस्तीत प्रवेश करावा लागे. तशात– तिथे कातडी कमावण्याचा कारखाना असल्याने.... दुर्गंधी कमालीची असे. अशा दुर्गंधीचा असह्य ताप सहन करून आम्ही त्यांच्या वस्तीत घरोघरी जात असू याचे प्रथम त्यांना कुतुहल वाटे. पण स्वच्छता ठेवा, अमके करा तमके करू नका... ही आमची भुणभुण त्रासदायक होऊनच की काय त्यांना आमचे आगमन पुढे पुढे रुचेनासे झाले म्हणूनच स्वच्छतेचे पाठ देताना किंवा इतर बाबतींत सल्लामसलत देताना आम्हाला कमालीचा संयम राखून व धोरणा धोरणानेच प्रचारकार्य करावे लागे."[१०]

ठाण्याचे डॉ. संतुजी लाड नावाचे एक पोक्त डॉक्टर शाळेत नियमाने येऊन विनावेतन औषधोपचार करत होते. त्यांच्या हाताखाली काम करण्याने जनाक्कांना हिवताप, डोळे येणे, खरूज आदी त्वचारोग वगैरेंबाबतचे औषधोपचार माहीत झालेले दिसतात. त्या पुढे सांगतात–

"मी अस्पृश्यांच्या वस्तीत जाताना, एका पिशवीत क्विनाईनच्या गोळ्या, खरजेचे मलम, डोळ्यात घालण्याचे औषध... लहान मुलांच्या सर्दीतापावरील औषधे घेऊन जात असे. बेलाफुलाला गाठ म्हणतात त्याप्रमाणे माझ्या औषधोपचारांनी गुण येताच मोठी माणसे, विशेषतः म्हाताऱ्याकोताऱ्या स्त्रियादेखील माझ्यापुढे आपल्या प्रकृतीच्या तक्रारी दाखल करीत."

"अस्पृष्य वर्गात रोगाचे प्रमाण कमाल मर्यादेपर्यंत पोचल्यावरच डॉक्टरकडे येण्याची सुबुद्धि होई.... स्त्रीवर्गाच्या रोगावर तर त्या स्त्रिया प्रथमपासून लाजेने कुणापुढे वाच्यता करीत नसत. अगदीच निरुपाय होई तेव्हा घरगुती उपाय माहीत असलेल्या म्हाताऱ्या बायकांकडून उपाययोजना करीत. यासाठी मला ह्या स्त्रियांकडे जाऊन आत्मीयतेने त्यांच्या प्रकृतीची चौकशी करून, आजारी असल्यास त्यांच्या इच्छेविरुद्ध रोगाची माहिती घ्यावी लागे व उपचार सांगावा लागे. असे करताना त्यांच्या रूढ उपचाराचा फोलपणा कथन करणे वाजवी असल्याने, त्यांच्या रूढ-श्रद्धांना धक्का बसून त्या माझ्याकडे साशंक होऊन बघत. अशा स्थितीत आधुनिक औषधोपचाराबद्दल त्यांचे अनुकूल मत तयार करण्यासाठी.... मला जे तोंड फाटेपर्यंत वक्तव्य करावे लागे त्याची कल्पनाच केलेली बरी."

परंतु जनाक्कांच्या ह्या खटपटीला यश येऊन, काही स्त्रिया रोगमुक्त झाल्याचे दिसताच, बऱ्याच स्त्रिया त्यांच्या शाळेत जाऊन औषधोपचार घेऊ लागल्याचे दिसते. पण ह्यामुळे, 'त्यांना फसवून जडीबुटी किंवा मंत्रतंत्रासारख्या थातुरमातुरावर पोट भरणाऱ्या भोंदू लोकांनी' ह्या मंडळींविरुद्ध अस्पृश्य लोकांत, ख्रिश्चन लोकांप्रमाणेच हे लोकपण जात व धर्म बाटवणारे आहेत, असा गैरसमज पसरविण्यास सुरवात केलेली दिसते.

ह्याबद्दल जनाक्का ह्याच अंकात सांगतात–

"असले गैरसमज दूर व्हावे यासाठी आम्हाला अस्पृश्य स्त्रियांना शाळेत बोलावून आणून चैत्रगौरी, संक्रांतीसारख्या प्रसंगानिमित्त हळदी-कुंकवासारखे समारंभ घडवून आणावे लागत... आमचे बरोबरीने (समानता) वागण्याचे धोरण त्यांच्या मनावर बिंबावे म्हणून... समारंभात उच्चवर्गाच्या ब्राह्मण-मराठे वगैरे बायकांस देखील बोलावून आणावे लागे. उच्चवर्गाच्या बायका सुधारक वृत्तीच्या व सुशिक्षित असल्याने त्या कार्याचे धोरण व महत्त्व ओळखून, बुद्धिपुरस्सर हजर राहून समारंभ साजरा करीत."

एकीकडे उच्च वर्गातील अधिकाऱ्यांच्या बायका आपली उच्चता, मानमान्यता सोडून समारंभात भाग घेत तर अस्पृश्य स्त्रिया मात्र आपल्या जातीतील पोटभेद कसे पाळीत, महार स्त्रिया मांग वा चांभार स्त्रियांना कसे तुच्छ लेखत; किंवा सुखवस्तु मांग स्त्रिया नटूनथटून येऊन, आपल्याला वरचढ समजणाऱ्या महार स्त्रियांचा तोरा उतरवण्याची कशी खटपट करीत व

ह्यातून जी धुसफूस होई ती मिटवताना कसे नाकीनऊ येत ह्याचेपण अनुभव कथन जनाक्कांनी इथे केलेले आढळते. भंगी जातीच्या स्त्रियांना अशा समारंभात येऊ देण्यास महार, मांग स्त्रिया एकत्रित विरोध करीत.... तर एकाच महार जातीतील, सुखवस्तू स्त्रिया, सैनिकांच्या पत्नी, रस्ते झाडणाऱ्या वा चिंध्या गोळा करणाऱ्या महार स्त्रियांच्या बरोबरीने बसण्यास तयार होत नसत. हा जनाक्कांचा अनुभव एकूणच भारतीय मानसिकतेतील जातिभेद कल्पनेवर प्रकाश टाकणारा दिसतो.

अशा तऱ्हेने भावाच्या जोडीने जनाक्कांचे अस्पृश्योद्धाराचे काम चालू असतानाच, एक आणखी नवे कार्यक्षेत्र त्यांच्यापुढे उघडलेले दिसते. त्याचे असे झाले, की त्या काळी सामाजिक सुधारणेचे वातावरणच महाराष्ट्रात तयार झाले होते. अनेक सुधारक अनेक अंगांनी सुधारणेसाठी धडपडत होते. अण्णासाहेब कर्व्यांच्या अनाथ-महिलाश्रमाचा बराच बोलबाला व कौतुक लोकांत निर्माण झाले होते. अशा वेळी, सुरतेचे प्रागतिक विचारांचे डिस्ट्रिक्ट जज्ज दयाराम गिडुमल यांनादेखील स्त्रियांच्या उन्नतीसाठी काहीतरी कार्य करावे अशी तळमळ वाटू लागली होती. निराश्रित सहाय्यकारी मंडळींचे नाव त्यांच्या कानावर गेले होते. म्हणून त्यांनी विठ्ठलरावांना बोलावून अस्पृश्य महिलांच्या सेवेसाठी काय करता येईल असा प्रश्न केला. विठ्ठलराव सांगतात–

"ती भेट मी कधी विसरणार नाही.... त्यांनी अत्यंत आपलेपणाने कवटाळून डोळ्यांत आसवे आणून विचारले.... मी सांगितले– ह्या हतभागी भारतामध्ये पुरुषांपेक्षा महिलांची स्थिती अत्यंत दुर्बल व केविलवाणी आहे, हे मी जाणून आहे. माझ्याप्रमाणेच माझ्या घरातल्या मंडळींना ही जाणीव असल्याने माझी त्यागी बहीण आणि पूज्य माता ह्यांनी आपले पाठबळ दिले आहे..... ह्या अस्पृश्य महिलांच्या सेवेसाठी आम्ही निराश्रित सेवासदन या नावाखाली स्वतंत्र शाखा काढू."[११]

अशा रीतीने दयाराम गिडुमल ह्यांच्या मदतीने २१ मे १९०७ रोजी वरील सदनाची स्थापना होऊन* जनाक्कांवर त्याची जबाबदारी आलेली दिसते.

जनाक्का ह्याबद्दल आपल्या मुलाखतीत सांगतात–

"ह्या सदनाचे हेतू खालीलप्रमाणे ठेवण्यात आले. वरिष्ठ वर्गातील जे कोणी स्त्रीपुरुष ह्या कामास वाहून घेण्यास तयार होतील त्यांना तयार करणे (प्रशिक्षण) .... त्यांना अस्पृश्यांच्या गरीब स्त्रियांमधून कामे देणे,.... तेव्हा सदन निघाल्यावर त्याच्या कार्याची प्रमुख जबाबदारी ओघानेच मजकडेच येऊन पडली.... पुढे मग श्रीमती वेणुताई, द्वारकाबाई, व कल्याणीबाई सय्यद... या स्त्रिया कामांत तयार झाल्यावर त्यांच्यावर हळूहळू जबाबदारीची कामे सोपवण्यात आली. या स्त्रियांना सदनाच्या कामात शिकवून तयार करणे, व त्याच वेळी सदनाचे आणि मिशनचे काम अविरतपणे करीत रहाणे, या गोष्टी मी एकसमयावच्छेदेकरून कशा पार

---

*ह्याच साली व दयाराम गिडुमल ह्यांच्याच प्रेरणेने व मदतीने मुंबईस श्रीमती रमाबाई रानडे ह्यांच्या अध्यक्षतेखाली 'सेवासदन' ही आणखी एक संस्था स्थापन झालेली दिसते.

पाडल्या ते माझे मीच जाणे."[१२]

ह्या निराश्रित सेवासदनामार्फत बरेच वेगवेगळ्या प्रकारचे उपक्रम हाती घेण्यात आलेले दिसतात. विठ्ठलराव आपल्या आत्मकथनात पुढे सांगतात–

"सणाचे दिवशी सामाजिक मेळे होत. त्यांत अस्पृश्यवर्गीय स्त्री-पुरुष वरिष्ठ वर्गातल्या स्त्री-पुरुषांत समानतेने भाग घेत.... भजन समाज उघडण्याचे दिवशी... शाळेतील मुलांना व्हिक्टोरिया गार्डनमध्ये फिरवून आणून मिठाई वाटण्यात आली.... वडीलमाणसांना घारापुरी लेणी दाखवून आणण्यात आली.... तेथे प्रितीभोजन झाले... गावातील लोकांपासून जुने-नवे कपडे गोळा करून गरीब लोकांस वाटण्यात आले. गरीब बायांसाठी विशेषतः कुमारी व विधवांसाठी शिवणकामाचा वर्ग सुरू करण्यात आला. आजाऱ्यांची शुश्रूषा करण्यासाठी आणि बाळंतपणात मदत देण्यासाठी सदनातील स्त्रियांना शिक्षण देऊन तयार करण्यात आले... या कामासाठी निराश्रित महिला समाज ही निराळी संस्थाच जनाबाईने काढली. या महिला समाजाचा वार्षिकमहोत्सव... लेडी चंदावरकर यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. या महिला समाजाची कामे भायखळा व परळ या दोन ठिकाणी स्वतंत्रपणे चालत. घरोघर भेटीला जाऊन समाचार घेण्याचे काम वर्षभर चालत होते..." सौ. रुक्मिणीबाई सय्यद यांनी वाचलेला रिपोर्ट पुढील प्रमाणे आहे.... 'घरातील वर्ग सुमारे ६ महिने चालले. गेल्या वर्षी एकंदर १३ बायकांची प्रसूति करण्यात आली. पुष्कळांना दवाखान्याचा लाभ देण्यात आला. पोलीस कमिशनरकडून बेवारशी मुले व बायका मिळून ५ झाली. त्यांची निगा ठेवण्यात आली... ह्या कामातून मुनष्य स्वभावाचा जो अनुभव आला तो महत्त्वाचा वाटला.'

अशा प्रकारचे मनुष्यस्वभावाचे अनुभव जनाक्कांनी वर्णिले आहेत. पण ते आपण पुढे पाहू. पण ह्या अनुभवांतून, गिरणीत १२ तास काम करणाऱ्या माणसांना आपली पोटची मुले व जराग्रस्त आईबाप यांच्या जोपासनेस वेळ मिळत नाही हे अनुभवास येऊन अशांची सेवा हेच सदनाचे मुख्य काम झालेले दिसते. ह्यासाठी सर्व शिंदे कुटुंब अस्पृश्यांच्या वस्तीत घाणेरड्या चाळीत जाऊन राहिलेले दिसते. तथापि अज्ञ अशा अस्पृश्य समाजाकडून मात्र त्यांच्या हेतूविषयी सुरवातीला नाना शंकाकुशंका घेतलेल्या दिसतात. जनाक्का आपल्या ह्याच मुलाखतीत म्हणतात–

"औषधोपचार करताना डॉक्टरबद्दल जेवढी कृतज्ञताबुद्धि व सहानुभूती रोग्याला असते. त्याहीपेक्षा कमी कृतज्ञताबुद्धि समाजकार्यकर्त्यांना दाखविली जाते. बहुधा सामाजिक कार्यकर्ते प्रथम प्रथम लोकांच्या हेटाळणीलाच कारणीभूत होतात. मग अस्पृश्यांच्या स्त्रियांत प्रत्यक्ष काम करताना मजसारख्या स्त्रीला त्यांच्याकडून भिती, उपहास, हेटाळणी, तिरस्कार, शिव्याशाप सहन करावे लागले असतील याची कल्पनाच केलेली बरी....ख्रिस्ती लोकांनी.... धर्मप्रसाराचा हेतू बाळगून ही कामे चालवल्याने आमच्या सदनाचे कार्यपण... त्याच हेतूनुसार चाललेले आहे, अशी समजूत अस्पृश्य स्त्रियांनी करून घेतल्यास नवल नाही. अशी समजूत न व्हावी या दृष्टीने आम्ही त्यांच्यात काम करताना हिंदुधर्मातील कथाकीर्तने, संक्रांतीसारखे सण मुद्दाम घडवून आणीत असू.... तरीसुद्धा सदनाच्या कार्यकर्त्यांवर ख्रिस्ती असल्याचा

आरोप उघड उघड करीत."

ह्या संदर्भातले जनाक्कांनी सांगितलेले ह्याच अंकातील काही अनुभव बघण्यासारखे आहेत.

"एकदा एका निराधार, अंथरुणास खिळलेल्या अस्पृश्य वृद्धेची शुश्रूषा करण्याचे काम जनाक्कांनी अंगावर घेतलेले दिसते. त्या रोजी तिची पाठ शेकण्यास घरी जाऊ लागल्या तेव्हां ती बाई त्यांना म्हणाली– बाई तुमचे उपकार आहेत. पण माझ्या चुलीला शिवू नका. तुम्हा ख्रिस्ती बायांनी माझी चूल बाटविल्यास माझ्या जातीचे लोक.... मला वाळीत टाकतील."

शेवटी जनाक्का लिहितात– "ऐकताच मी आश्चर्याने थक्क झाले. शेवटी मुकाट्याने एका अवाक्षरानेही तिला न दुखावता माझ्या घरचा स्टोव्ह.... नेऊन स्वीकृत कार्य करावे लागले."

त्यांचा दुसरा एक अनुभव असा– राही नावाच्या एका वृद्ध व जखमांनी मरणोन्मुख झालेल्या स्त्रीला दवाखान्यात नेऊन उपचार करणे प्राप्त असल्याने जनाक्कांनी जे. जे. हॉस्पिटलात दाखल केले. दुसऱ्या दिवशी तिच्या समाचारास त्या गेल्या तेव्हां कळले की तिच्या दारुड्या व आधुनिक औषधोपचारांविषयी विकृत विचारसरणी असलेल्या मुलाने तिला हॉस्पिटलात आल्याबद्दल शिव्यांची लाखोली वाहून, थोबाडीत मारून घरी परत नेले. पण हा दारुडा मुलगा गाडीखाली चेंगरून मेल्याचे कळताच ती बाई, "बाळा माझ्या तोंडात मारायला तरी पुन्हा येरे" असा हंबरडा फोडून पुत्रशोक करू लागली. जनाक्का पुढे म्हणतात–

"हे अपूर्व वात्सल्य पाहून मला बरीच उद्विग्नता भासली. पुत्रशोकातच तिचा रात्री शेवट झाला तेव्हां माझे मन दुःखातिशयाने भरून गेलेले होते."

पुढे त्या सांगतात–

"पुष्कळ स्त्रियांना बाळंतपणात फार नाजूक उपचार करण्याची पाळी येई.... शुश्रूषेची जबाबदारी सदनातील स्त्रियांवर पडत असे. एनीमा वगैरे नवीन उपचाराचे काम आल्यास जुन्या मताच्या रोग्यांना आवरणे फार कठीण होई. अशा वेळी ते फार बिभत्स शिव्या देत निघून जात."

जनाक्कांच्या ह्या अनुभवांचे वर्णन करणारे एक पत्र ५ जुलै, १९०८ च्या सुबोध पत्रिकेत वाचावयास मिळते. विठ्ठलरावांचे एक निष्ठावान सहकारी, व प्रार्थना समाजाचे सहकुटुंब कार्यकर्ते श्री. अब्दुल सय्यद कादर या पत्रात म्हणतात–

"ह्या सदनाला वरिष्ठ वर्गाची सहानुभूति नाही... त्यामुळे पैशाची मदत मिळत नाही.... नाना अडचणी येतात.... अशा अडचणींतून लोकांची सहानुभूति मिळवून कामास आरंभ करावा तर खालच्या जातीचे लोक अशा संस्थांचा उपयोग करून घेण्यास तयार नसतात. ते आपल्या मुलांस शाळेत पाठवत नाहीत.... त्यांना असे वाटते, हे कोणीतरी ख्रिस्ती असले पाहिजेत. किंवा आपल्यापेक्षा खालच्या जातीतले तरी असले पाहिजेत. कारण वरच्या वर्गातील कोणीही आम्हाशी इतक्या कळकळीने व सलोख्याने वागणार नाही.... सदनातील स्त्रिया जेव्हां ह्यांच्या घरी उपदेश वा माहिती देण्यासाठी जातात तेव्हां त्यांस बसावयास जागादेखील कोणी

देत नाही. इतकेच नव्हे तर.... त्यांच्याशी बोलतही नाहीत.... बोलल्याच तर, पुन्हा कधी येऊ नये असे बोलून छळ करीत. शाळेत मुलांस स्नान करून येण्यास वारंवार सांगितले तरी उपयोग होत नाही. तेव्हां स्नान करण्याची मुलांस सवय लागावी म्हणून मी व सदनातील बायांनी दर शनिवारी, रविवारी मुलांस स्नान घालण्यास सुरवात केली, तर त्याचा परिणाम म्हणजे मुले घरीच राहू लागली.... कारण विचारता उत्तर मिळे, की— तुम्ही आमच्या मुलांना स्नान घालून बाटवता*.... अशा मूर्ख लोकांच्या हितासाठी झटण्यास एखाद्या संस्थेस उत्तेजन तरी कसे यावे ?" ह्याच सुमारास रमाबाई रानड्यांनी आपल्या 'सेवासदना'द्वारे समाजकार्य सुरू केले होते. त्या सेवासदनाची व ह्या सेवासदनाची पार्श्वभूमी, कार्याचे क्षेत्र, अडचणी, विरोध, मदत ह्यांतील प्रचंड तफावत पाहण्यासारखी आहे.

निराश्रित सेवासदनाच्या द्वारे वरील प्रकारचे कार्य करत असतानाच आणखी दोन वेगळ्या प्रकारची कार्यक्षेत्रे तयार झालेली दिसतात. त्यांपैकी एक म्हणजे सदनाद्वारे अस्पृष्य मुलांसाठी वसतिगृह चालू करणे. त्याविषयी विठ्ठलराव आपल्या आत्मकथनात लिहितात—

"या सदनाच्या कार्यातून मिशनच्या कामाच्या ज्या मुख्य अंगाची निष्पत्ती झाली त्या सर्वांत महत्त्वाचे काम म्हणजे परळ येथील वसतिगृह होय... अस्पृश्याची मुले दिवसातून फार तर ५ तास शाळातून राहून बाकीचा काळ जोपर्यंत आपल्या मागासलेल्या समाज स्थितीत घालवितात तोपर्यंत त्यांच्या नैतिक जीवनाचा विकास होणार नाही. म्हणून वसतिगृहाची जरुरी होती... पण दिवसाच्या शाळेत येण्यास ज्यांची तयारी नाही ते आपल्या आईबापांस सोडून, गावाला सोडून मुंबईत कसे येणार ? पण निराश्रित सेवासदनाचे कार्य तीन वर्षं चालल्याने हे ध्येय साध्य होण्याची चिन्हे दिसू लागली."

ह्या तीन वर्षांत मुलांना जेवणाव्यतिरिक्त जास्तीत जास्त वेळ सदनाच्या शाळेत ठेवून त्यांना स्नान, कपडे, पुस्तके, खेळाची उपकरणे, प्रशस्त पटांगण इ. पुरवून घरापेक्षा शाळाच त्यांना अधिक प्रिय वाटेल असे प्रयत्न केलेले दिसतात.[१३]

जनाक्का ह्या वसतिगृहावर देखरेख ठेवण्याचे कठीण काम अनेक वर्षं करीत होत्या असे दिसते.

जनाक्कांनी केलेले दुसरे कार्य म्हणजे, आज ज्या प्रश्नाला फार व्यापक महत्त्व प्राप्त झाले आहे, त्या देवदासींच्या प्रश्नाला निराश्रित सदनाने त्याकाळीच हात घातलेला दिसतो.

ह्या बाबतीतला आपला पहिला अनुभव जनाक्कांनी आपल्या मुलाखतीत सांगितला आहे. त्या म्हणतात—

"खालच्या वर्गात मुरळी सोडण्याची चाल त्यावेळी जारी असे. मदनपुऱ्यात आमच्या

---

* ख्रिश्चन धर्मात धर्मान्तर विधी करताना (बाप्तिस्मा) डोक्यावर पवित्र जल शिंपडण्याचा विधी असतो. तसेच हे काहीतरी आहे असे लोकांना वाटे व त्यात चूक काहीच नाही. खुद्द जनाक्कांना, विठ्ठलरावांनी समाजकार्याला स्वतःला वाहून घेण्याचे व धर्मशिक्षण घेण्याचे ठरविले तेव्हा हे धर्मान्तर करणार की काय अशी भीती वाटली होती.

शाळेत येणाऱ्या एका मुलीला मुरळी सोडणार आहेत असे कळताच सदनातील भगिनी चार समजुतीच्या गोष्टी सांगण्यास त्या मुलीच्या आईकडे गेल्या. आपल्या धर्मात हात घातल्याबद्दल तिला अत्यंत संताप येऊन, पुन्हा माझ्या दारात पाऊल टाकू नका, असे त्या मुलीच्या आईने दरडावून सांगितले आणि आपल्या मुलीला शाळेतून काढून घेतले."[१४]

मात्र अशा अनुभवांनी ही मंडळी खचून गेलेली वा कार्यविन्मुख झालेली दिसत नाहीत. उलट त्यांनी 'प्रोटेक्शन ऑफ द चिल्ड्रेन्स सोसायटी' नावाची एक संस्था काढली होती.* तिच्या द्वारे, अल्पवयीन बेवारशी मुले, कचऱ्यात टाकलेली अनौरस अर्भके, फूस लावून आणल्या गेलेल्या तरुण मुली सदनात आणल्या जात होत्या व अशा मुलामुलींना योग्य शिक्षण देऊन उत्तम नागरिक करण्याचे काम सदनाद्वारे केले जात होते असे दिसते. पुष्कळदा जागेअभावी अशा मुलामुलींना पंढरपूरच्या अनाथ बालकाश्रमात पाठवले जात होते, असेही दिसते. श्री. वि. रा. शिंदे आपल्या आत्मकथनात ह्या बाबत सांगतात–

"अशा पतित स्त्रियांना चांगल्या देखरेखीखाली ठेवून त्यांची उन्नति करण्यासाठी सांताक्रुझ येथे प्रसिद्ध दयाराम गिडुमल यांच्या आश्रयाखाली एक आश्रमही चालला होता. या आश्रमाची देखरेख भगिनी जनाबाई शिंदे यांनी काही दिवस चालविली होती."[१५]

हा आश्रम 'मालाड'ला असल्याचे श्री. शिंदे आपल्या आत्मकथनात एका प्रसंगवर्णनात सांगतात. तो प्रसंग असा–

"भगिनी जनाबाई मालाड येथील निराश्रित स्त्रियांसाठी दयाराम गिडुमल यांनी काढलेल्या आश्रमात काही काळ सुपरिंटेंडन्ट होत्या. (१९०८) हा आश्रम अगदी जंगलात होता. आजूबाजूस मैलभर मनुष्यवस्ती नव्हती. रखवालदार भय्यापण बाहेर रहाण्यास धजावत नव्हता.. एका रात्री एक भयंकर लांडगा आश्रमाच्या दाराशी येऊन उभा राहिला. भय्याची गाळण उडाली तो आत येण्यासाठी गयावया करू लागला.. स्त्रिया भीतीने मोठमोठ्याने किंचाळू लागल्या.. आवाजाने लांडगा निघून गेला.. दुसरे दिवशी दयाराम भाईंना निराळी व्यवस्था करणे भाग पडले."[१६]

कदाचित ह्या प्रसंगानंतर तो आश्रम मालाडहून सांताक्रुझला हलवण्यात आला असावा !

ह्या पतित स्त्रियांसाठी जनाक्का जे काम करत होत्या त्याचा ह्याच अंकातील एक अनुभव त्यांच्याच शब्दांत पाहूया. जनाक्का सांगतात–

"आमच्या मिशनचे हितचिंतक व शेतकी कॉलेज प्रमुख डॉ. मॅन ह्यांच्याकडून मुरळी सोडण्यात आलेली एक मुलगी सदनात पाठवण्यात आली.** तिला अंग भरून रोग जडला

*१९०८-९ च्या सुमारास ही संस्था स्थापन झाली. लॉर्ड बिशप ऑफ बॉम्बे तिचे अध्यक्ष असून, तिच्या चार सेक्रेटरींपैकी वि. रा. शिंदे एक होते. अडचणीत सापडलेल्या मुलामुलींना शोधून आणण्याचे कामी रहिमततुल्ला खान नावाच्या इसमास वेतन देऊन नेमले होते.

** वाममार्गाला, फसवून वा फूस लावून नेल्या जाणाऱ्या मुलींना वाचवून आणण्याचे काम डॉ. मॅन ह्यांच्या देखरेखीखाली पुण्यात एक संस्था करत होती.

होता. तिची कुठेच सोय होत नसल्याने अखेरचा उपाय म्हणून ही मुलगी सदनात पाठवली गेली. पण सदनात मुलाबाळांनी भरल्या जागेत ही रोगग्रस्त मुलगी ठेवणे धोक्याचे होते. म्हणून मिशनच्या चालकांनी भायखळा येथील आमच्या शाळेजवळच एक स्वतंत्र खोली घेऊन तीत त्या मुलीसह मी राहू शकेन अशी व्यवस्था केली. मुलगी फारच आडदांड व हूड स्वभावाची असल्याने सदनातील इतर कार्यकर्त्या भगिनींऐवजी तिची जबाबदारी माझ्यावर टाकण्यात आली."

ह्या मुलीविषयी विठ्ठलराव सांगतात– "जनाबाईला ह्या मुलीसाठी स्वतंत्र खोली घेऊन रहावे लागले. मुलगी फार आडदांड स्वभावाची होती. बरेच दिवस तिने फार त्रास दिला. तथापि, तिला तसेच शिकवून बरी केल्यावर, ती चांगली शिकल्यावर तिचा योग्य स्थळी विवाह करून देण्यात आला. ही मुलगी महाराची होती. ही हल्ली निजाम हैद्राबाद येथे शिक्षकीण आहे."[१७]

ही मुलगी जनाक्कांकडे आली त्या वेळी त्यांची आई स्वर्गवासी होऊन २-३ दिवसच झाले होते, असे दिसते. आईच्या मृत्यूचे दुःख कमी व्हावे ह्या हेतूनेच विठ्ठलरावांनी जनाक्कांना सुतकाचे दहा दिवस देखील घरी न ठेवता, ही जबाबदारी दिली असे जनाक्का म्हणतात. जनाक्कांच्या वडिलांना व इतरांना पण इतक्यातच जनाक्कांवर हे काम सोपवणे योग्य वाटत नव्हते. पण आपल्या नेहमीच्या करारी व कर्तव्यनिष्ठ स्वभावानुसार अण्णांनी आपणाला, 'तू सामाजिक कार्यकर्ती आहेस, हे ध्यानात आण. सामाजिक कार्याचे वाण घेतलेल्या व्यक्तीला आपल्या व्यक्तिगत भावनांना तिलांजली देऊन ध्येयसिद्धीची पूर्तता करणे हेच महत्त्वाचे कठोर कर्तव्य कोणत्याही परिस्थितीत पार पाडायचे असते' असा उपदेश केल्याचे आपल्याला अजून आठवते. असे जनाक्का म्हणतात. पुढे त्या म्हणतात–

"घरी बायको तापाने फणफणत असो की तान्हा मुलगा आजाराने आसन्नमरण असो,.. मुसळधार पाऊस असो की भर दुपारचे रणरणीत ऊन असो.... पोट भुकेने वखवखलेले असो की पक्वान्नाचे जेवण जेवल्यावर डोळ्यावर झोपेची झापड आली असो.... परिस्थितीला न जुमानता अण्णा आपले काम करण्यास नेहमीच तत्पर असत.... अशा जाज्वल्य ध्येयनिष्ठेने आमच्या समोर वागत. मग आम्ही देखील आमच्या मनोभावना दूर ठेवून... सामाजिक कार्य करू लागलो यात नवल नाही." अण्णासाहेबांचे जावई, ए. के. घोरपडे सांगत होते, की 'जनाक्का अशा देवाला सोडलेल्या देवदासींना संघटित करून लग्ने करून व्यवस्थित राहण्याचा उपदेश करीत. त्यांनी एकदा एका अशा मुरळीचे मन वळवून लग्नाला तयार केले, व मग विठ्ठलरावांना बोलावणे पाठवले.'

वाट चुकलेल्या अशा तरुण मुलींना आधार देताना एकदा जनाक्कांच्या प्राणावरही बेतण्याची घटना घडलेली दिसते.

प्रार्थना समाजाच्या पंढरपूरच्या आश्रमात पाय घसरलेल्या वा बलात्कारित विधवा येऊन बाळंत होत असत. पुढे सहा महिन्यांनी मूल मागे ठेवून त्यांनी दुसरीकडे निघून जावे, अशी प्रथा दिसते. एकदा एका ब्राह्मण विकेशा विधवेला जायला कुठेच जागा नव्हती म्हणून आश्रम

चालकांनी विठ्ठलरावांना गळ घातली. मिशनमध्ये जागा नसल्याने ती शिंद्यांच्या घरीच राहिलेली दिसते. तिला मिशनच्या कामात वा डॉक्टरांच्या हाताखाली नर्सच्या कामात तयार करण्याचा शिंद्यांचा बेत असावा. तिच्या संमतीने तिला केस वाढवू दिलेले. जनाक्का सांगतात,– "बाई मोठी मनमिळावू, तत्पर, शिवणकाम आत्मसात केले. मुलांच्या जोडीने अक्षर ओळख करून घेतली. हुशारी व अंगच्या कर्तबगारीवर चांगली कार्यकर्ती झाली. निरलस काम व मुलांत मिळून मिसळून त्यांना शिकवण्यात निष्णात झाली. पुढे एका चांभार कार्यकर्त्याच्या प्रेमात पडली. तो विवाहित होता... आणि सदनावर त्याचा दुष्परिणाम होण्याची शक्यता होती. अशा आन्तरजातीय विवाहांनी सनातनी लोक सुधारकांवर निंदेची झोड उठवीत... लोकांत गवगवा होऊन मिशनच्या स्विकृत कार्यात व्यत्यय येई.* पुन्हा अण्णा प्रार्थना समाजाचे म्हणून ते आपल्या सुधारकी मतांचा प्रसार व्हावा म्हणून अशा विवाहांना फूस लावतात, असाही ठपका येण्याची शक्यता; म्हणून असले प्रकार घडल्यास वेळीच आळा घालावा अशी अण्णांची सूचना होती... पण त्यामुळे ती ब्राह्मण बाई माझ्यावर रागावली. न सांगता त्या गृहस्थाचे घरीच जाऊन राहिली. तिला समजावून परत आणले. त्या गृहस्थाने पण संयम राखून तिला दाद दिली नाही. तो राग तिने माझ्या प्लुरसीच्या आजारात'विष'असे लिहिलेल्या बाटलीतले औषध देऊन काढला... वेळीच एका वृद्ध पारसी डॉक्टरने औषधपाणी करून मला वाचवले. मग तिने चूक कबूल करून क्षमा मागितली. मग तिला पुण्याच्या मिशनमध्ये पाठवली. तिथे ती एका विवाहित महाराशी पळून जाऊन विवाहित झाली. सुदैवाने पुण्यात बभ्रा झाला नाही. हिचे नाव कृष्णी !"[१८]

आणखी पण अशा अनुभव कथा– जनाक्कांनी सांगितल्या आहेत; पण त्या आपण पुढे त्यांच्या लेखन संदर्भात पाहू.

निराश्रित सेवासदन व निराश्रित मिशनद्वारे चाललेल्या जनाक्कांच्या ह्या सेवा कार्यात त्यांना पुण्यातील अनेक प्रतिष्ठित व देशी-विदेशी स्त्रियांचे सहकार्य लाभलेले दिसते. लेडी म्यूर मॅकेंझी, लेडी चंदावरकर, सौ. लक्ष्मीबाई रानडे, सौ. साताबाई सुखठणकर वगैरे अनेक स्त्रियांनी कमिटीत सामील होऊन, कृतीने, आर्थिक मदतीने– कार्याला पाठिंबा दिल्याचे वर्णन विठ्ठलरावांच्या आत्मकथनात (पृष्ठ २३०) आढळते.

विठ्ठलरावांच्या जोडीने जनाक्कांनी आणखी एका कामात सहभाग घेतलेला दिसतो. खेड्यापाड्यांतून शिमग्याला स्त्रियांच्या नावाने असभ्य बोंबा मारतात. शिंदे व जनाक्का यांनी प्रचार करून काही ठिकाणी तरी हा प्रकार थांबवण्यात यश मिळविले. त्या ऐवजी पौर्णिमेस विविध खेळ व स्पर्धा घेण्याची प्रथा सुरू केली, असे एकनाथराव घोरपडे सांगतात.[१९]

ह्याचवेळी जनाक्कांचे प्रार्थना समाजाचे काम पण चालू होते असे दिसते. ५ जून, १९१० च्या सुबोध पत्रिकेच्या अंकात, 'अहमदनगर येथील प्रार्थना समाजाच्या उत्सवातील विशेष

---

* ह्याच कारणामुळे १०-१२ वर्षांपूर्वी कर्व्यांनी जनाक्कांना आपल्या महिलाश्रमात घेण्यास नकार दिला होता. तेव्हा विठ्ठलरावांची फार निराशा झाली होती.

गोष्टी' ह्या नावाने विस्तृत वृत्त आले आहे. त्यात बातमीदार लिहितो,

"... समाजकार्याविषयी स्त्रियांमध्ये जागृति झाल्याशिवाय कांही होणार नाही असे जाणून त्या उत्सवाचे प्रसंगी मुंबईहून उत्सवासाठी गेलेल्या श्रीमती जनाबाई, सौ. शान्ताबाई खरे, श्रीमती सुशिलाबाई वैद्य यांनी स्त्रियांचा मोठा मेळा घेण्याचे ठरविले....त्याप्रमाणे २१ मे– शनिवारी स्त्रियांचा मेळावा भरला. निराश्रित सहाय्यकारी मंडळींच्या निराश्रित सदनाच्या द्वारे, महार, मांग इ. त्याज्य मानलेल्या गरीब लोकांच्या घरी जाऊन, हालअपेष्टा व अपमान सोसून, स्त्री वर्ग प्रेमाने कायकाय कामे करत आहे ते जनाबाईंनी वर्णन करून सांगितले.

२२ तारखेला अस्पृश्य वर्गाच्या शाळेचे हेडमास्तर पांडोबा डांगळे ह्यांनी आपल्या शाळेच्या इमारतीत अस्पृश्य वर्गाच्या सुमारे १०० बायकांना हळदीकुंकवास बोलाविले. प्रथम सुशिलाबाईंनी दिलरुबा वाजविला... मग सौ. जनाबाई शिंदे यांनी, मुंबई मुक्कामी अस्पृश्य वर्गाच्या स्त्रियांकरता चार-पाच ठिकाणी चैत्रमासाचे हळदीकुंकवाचे प्रसंग वरिष्ठ वर्गातील स्त्रियांनी किती उत्तम रीतीने साजरे केले, आजवर हीन मानलेल्या वर्गासंबंधी सर्व समजूतदार पुरुषांनाच काय पण स्त्रियांनाही किती मनापासून कळकळ वाटते आहे, अशा संधीला अस्पृश्य वर्गातील नगर येथील श्री. पांडोबा डांगळेंसारखे उत्साही पुरुष स्वजातीयांसाठी जे श्रम करीत आहेत, त्यांना हातभार लावणे ह्यातच अस्पृश्य स्त्रियांचे खरे पातिव्रत्य आहे व अशानेच निराश्रित सहाय्यकारी मंडळींच्या श्रमाचेही सार्थक होणार आहे, वगैरे गोष्टी थोडक्यात व सोप्या भाषेत समजावून दिल्या... सर्वांनी मोठ्या प्रेमाने चहा घेतला... भगिनींनी स्वहस्ते हळदीकुंकू, भिजाणे, फळे वाटली... एकमेकींशी ओळख व समाचाराच्या गोष्टी झाल्या... शेवटी पद म्हणून त्या अनपेक्षित व अश्रुतपूर्व समारंभाची परिसमाप्ति झाली."

अस्पृश्य समाजात जागृती घडवून त्यांना स्वतःच्या पायावर उभे करताना वरिष्ठ वर्गाविषयी त्यांच्या मनात तेढ वा दुही उत्पन्न होऊ नये, हे विठ्ठलरावांचे धोरणच जनाबाईंच्या उक्तीतून व्यक्त होताना दिसते. वरिष्ठ वर्गाच्या सहानुभूतीने व मदतीने अस्पृश्यांचा उद्धार घडवून आणण्यात देशाच्या एकतेच्या दृष्टीने, फायदा आहे, हे शिंद्यांप्रमाणे जनाबाईंचे पण मत दिसते.

जनाक्कांनी हे स्पृश्यास्पृश्य स्त्रियांचे भरवलेले संमेलन नगर जिल्ह्यात प्रथमच घडत असावे, असेही बातमीदाराच्या शेवटच्या वाक्यावरून वाटते.

२२ मे, १९१० च्या सुबोध पत्रिकेतही माझगाव येथे भरलेल्या अस्पृश्यांच्या (मुसलमान, ख्रिश्चन, सामील असलेल्या) जंगी सभेत जनाबाईंचे भाषण झाल्याचा उल्लेख आहे.

संस्थेचे व प्रार्थनासमाजाचे धोरण आत्मसात करून जनाक्कांनी भाषणे देऊन त्या तत्त्व-धोरणांचा प्रचार करण्यास स्वतंत्रपणे सुरवात केलेली दिसते.

१९०८ मध्ये मुंबई प्रांताचे कनवाळू गव्हर्नर सर जॉन क्लार्क ह्यांच्या कन्येने– मिस व्हॉयलेट क्लार्क ह्यांनी–निराश्रित सहाय्यकारी मंडळींच्या मदतीसाठी पुण्यात संगीताचा जलसा करून बरीच रक्कम मिळवून दिल्याचा उल्लेख सापडतो.[२०]

जनाक्कांचे जावई श्री. एकनाथराव घोरपडे ह्यांनी आपल्या मुलाखतीत जनाक्का व व्हॉयलेट क्लार्क यांनी महाराष्ट्रात असे अनेक एकत्र जलसे करून, कोल्हापूरच्या अस्पृश्य मुलांच्या वसतिगृहासाठी पैसे उभे केले, असे मला सांगितले.

तथापि ह्याला लिखित पुरावा मला कुठेही आढळलेला नाही. कदाचित ह्या जलशातच जनाक्कांनी मिस क्लार्कना सहाय्य केले असण्याची शक्यता आहे. कि. ह. तोडमल ह्यांनी आपल्या 'महर्षी शिंदे' ह्या पुस्तकात व्हॉयलेट क्लार्क ह्यांनी जलसा केला, त्या पैशांतून पुढे कोल्हापूरला वसतिगृह बांधण्याचा उल्लेख केला आहे.

प्रार्थना समाजाच्या गावोगावच्या उत्सवांना तसेच मिशनच्या प्रांतोप्रांतीच्या परिषदांना, वार्षिकोत्सवांना जनाक्का विठ्ठलरावांच्या जोडीने हजर असत असे दिसते. बातमीपत्रातून शिंद्यांच्या जोडीने त्यांच्या उपस्थितीचा उल्लेख केलेला आढळतो. १७ मार्च, १९१२ च्या सुबोध पत्रिकेत (पृष्ठ ७) नि. स. मंडळींचा जानेवारी व फेब्रुवारी महिन्याचा अहवाल आला आहे. त्यात लिहिले आहे-

"पुरुषांकरिता दर पंधरवड्याला परळ येथील शाळेत व्याख्याने देण्यास गेल्या महिन्यात पुन्हा सुरवात केली आहे. स्त्रियांसाठी पुराणे, किर्तने करविणे व त्यांना उपयुक्त विषयासंबंधी चार शब्द सांगण्याचे काम सौ. कल्याणीबाई (सय्यद)* व जनाबाई यांनी केले."

सदनाच्या अशा वेगवेगळ्या प्रकारच्या कामांचे अहवाल, सुबोध पत्रिकेच्या ह्या काळातील अंकांतून सापडतात.

जनाक्कांच्या कामाचे क्षेत्र हळूहळू मुंबई, पुणे परिसराच्या पलीकडे विस्तारत चाललेले दिसते. विठ्ठलराव आपल्या आत्मकथनात सांगतात-

"भगिनी जनाबाई ह्या ३ नोव्हें. १९१२ रोजी वऱ्हाडात हिंडून तेथील परिस्थिती पाहून फंड जमविण्यासाठी दौऱ्यावर निघाल्या. अमरावती, यवतमाळ, धूंगाव, रामसौर, खामगाव, मलकापूर, धुळे वगैरे ठिकाणी फंड जमवून त्या मुंबईस परत आल्या** ....पुढे यवतमाळ येथे एक अस्पृश्य वसतिगृह स्थापण्यात आले. त्याची व्यवस्था भगिनी जनाबाई यांच्याकडे सोपवून त्यांना तिकडे पाठवण्यात आले. कोल्हापूरचे रा. जी. के. कदम वकील ह्यांनाही त्यांच्या मदतीस देण्यात आले होते."[२१]

दयाराम गिडुमल यांच्या मदतीने ३ वर्षांसाठी स्थापन झालेले निराश्रित सेवासदन मुदत संपल्यावर बंद पडल्याने जनाक्कांसकट त्यांतील कार्यकर्त्यांना वेगवेगळ्या कामावर पाठवलेले दिसते. संस्थेची कामे वाढत होती पण मदत बंद झाली होती. त्यामुळे इतरांचे वेतन

---

* शिंद्यांचा हा तरुण बालमित्र प्रार्थना समाजातला व नि. स. मिशनमधला सहकारी... सारस्वत मुलीशी लग्न केले होते.

** म. कर्व्यांच्या अनाथ बालिकाश्रमासाठी त्यांच्या पत्नीची बहीण पार्वतीबाई आठवले यांनीपण गावोगाव हिंडून असाच फंड गोळा केला होता, त्याचे स्मरण होते.

बंद करणे शक्य नव्हते. पण जनाक्का घरच्याच म्हणून त्यांना जे अल्प वेतन मिळत होते तेही बंद करण्यात आलेले दिसते. विठ्ठलराव लिहितात–

"शिक्षकिणीची कायमची नोकरी सोडून त्या मिशनमध्ये आल्या होत्या. पण आता त्यांचे काम मात्र वाढले होते आणि अल्पवेतनहि बंद झाले, त्यामुळे मोठी खाजगी आपत्ति ओढवली." [२२]

पुढे एके ठिकाणी ते लिहितात–

"माझ्या घरी मी आणि जनाबाई एवढीच काय ती मिळवती माणसे.... काम अमर्याद... मिळकत मर्यादित आणि अनिश्चित.... अशा स्थितीत घरच्या माणसांचे हाल होणे सहाजिकच होते.... आईबाबा वार्धक्यातही महारवाड्याच्या गलिच्छ वस्तीत राहून, अस्पृश्यांच्या पोरक्या पोरांचे संगोपन आनंदाने करत होते... हितचिंतकांकडून जे कपडे येत त्यांतल्या चांगल्या लुगड्यांतून कापून परकर, पोलकी, अंगडी, टोपडी वगैरे आई काटकसरीने करी. वडील हिशोबाचे कटकटीचे काम करीत."[२३]

तथापि वैयक्तिक आर्थिक विवंचनेपेक्षा संस्थेच्या आर्थिक चणचणीचा प्रश्न शिंदे मंडळींना महत्त्वाचा असल्याने निधी जमवण्याचा नाना प्रकारे यत्न केला जात होता असे दिसते. त्यात जनाक्कांच्या निराश्रित महिला समाजाच्या सभासदांनी एक अभिनव उपक्रम केलेला दिसतो. १९०९ साली संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईच्या टाऊन हॉलमध्ये एक जंगी सभा आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी विठ्ठलराव सांगतात–

"...चालू संधीचा फायदा घेऊन... निधि जमवण्यासाठी... ह्या स्त्रियांपैकी टाऊन हॉलचे तिनही दरवाज्यावर.. दोघी दोघी उभ्या राहून, आपली शाल पसरून... बाहेर जाणाऱ्या प्रत्येकास काहीतरी देणगी टाकण्याचा आग्रह करू लागल्या... सारा जमाव जणू कैद झाल्यासारखा देखावा दिसत होता. पण कोणीही तक्रार न करता उलट ह्या बायांचे कौतुक करून आपखुशीने शालीत देणग्या टाकू लागले."* ह्यात त्या वेळचे मुंबईचे पोलीस कमिशनरही सापडलेले दिसतात. त्यांच्या खिशात काहीच पैसे नव्हते. तेव्हा लक्ष्मीबाई रानड्यांनी त्यांना कागद, पेन्सिल देऊन रकमेचा आकडा टाका म्हणजे सुटका होईल असे सांगितले व त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी रक्कम मिळवलेली दिसते.[२४]

दुसरा एक प्रयत्न म्हणजे 'रूपी फंड' योजना अमलात आणलेली दिसते. १०-१५ स्वयंसेवकांचा गट, त्यावर एक कॅप्टन अशी योजना दिसते. जनाक्का अशा एका गटाच्या कॅप्टन होत्या व विठ्ठलरावांच्या पत्नी त्या गटात एक स्वयंसेवक म्हणून रुपया फंड गोळा करताना दिसतात. आपल्या आठवणीत विठ्ठलराव सांगतात–

".... सौ. रुक्मिणीबाई शिंदे यांनी स्वयंसेविका म्हणून एकंदर ५६० रु. जमवले. त्यांच्या

---

* पुण्यात रमाबाई रानड्यांनी आयोजिलेल्या फॅन्सी फेअरच्या वेळी स्त्रिया स्टॉलवर उभ्या राहून पुरुष प्रेक्षकांना वस्तू विकत घेण्याचा आग्रह करीत. त्यावर केसरीत पत्राद्वारे किती अशिष्ट आरोप केले गेले त्याची आठवण होते.

कॅप्टन 'भगिनी जनाबाईनी,' ह्या कामी सौ. रुक्मिणीबाईना बरीच मदत केली."[२५]

ह्याच्याच जोडीने घरोघरी जाऊन धान्य गोळा करण्याचा धान्य फंड, कपडा फंड वगैरे उपक्रमांची धडपडपण ही मंडळी करताना दिसतात.

अण्णासाहेब सांगतात—

"१९१२ साली मिशन स्थापनेला अर्धे तप पूर्ण झाले. ह्या सहा वर्षांच्या काळात मिशनने महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर, कर्नाटक, काठेवाड, कोकण, मध्यप्रांत वगैरे प्रांतांत अस्पृश्यांसाठी शाळा, वसतिगृहे वगैरे स्थापून अस्पृश्यांच्या प्रश्नाबाबत जागृति निर्माण केली. तेव्हा आता पुणे येथे 'मध्यवर्ती आश्रम स्थापन करावा व सनातनी पक्षाला हलवून पहावे' म्हणून एक अखिल महाराष्ट्र परिषद भरवण्यात आली." [२६]

ह्या परिषदेचे आयोजन, आखणी अतिशय शिस्तबद्ध व भव्य प्रमाणात केलेली दिसते.

ह्याच परिषदेत तिसऱ्या दिवशी जी खास स्त्रियांची सभा भरविण्यात आली होती, तिला श्रीमती रमाबाई रानडे अध्यक्षा म्हणून आल्या होत्या आणि मिशनच्या कार्याचे त्यांनी स्वानुभवातून मनःपूर्वक कौतुक आपल्या भाषणात केले होते. ते आपण त्यांच्या चरित्रात पाहिलेच आहे. ह्या परिषदेत वरिष्ठ व अस्पृश्य जातींची सहभोजने चालत त्यात, बाहेर न जेवण्याचा आपला परिपाठ मोडून रमाबाई जेवलेल्या दिसतात.

८ जून, १९१३ च्या सुबोध पत्रिकेत मिशनचा प्रदीर्घ अहवाल इंग्रजी व मराठीत आला आहे. त्यात वरील परिषदेसाठी वेगवेगळ्या जिल्ह्यांतून ३०० महार, मांग, ढोर, भंगी समाजातले प्रतिनिधी आले असून त्यांच्यांत सवर्ण मंडळी कशी मिसळत होती ह्याचे वर्णन करून झाल्यावर मराठीत म्हटले आहे—

"मुंबई, पुणे येथे मिशनची कामे वाढली आहेत... जनाबाई शिंदे ह्यांनी विद्यार्थ्यांचे वसतिगृह चालवले आहे... मुंबईत तर आता वसतिगृहांत अधिक मुले घेण्याची सोय उरली नाही... निराश्रित सहाय्यकारी मंडळींचे काम वाढणारे खरे पण निराश्रित मंडळींकडूनच अडथळा येतो. एका बेवारशी मुलाला पोलिसांनी मंडळींच्या हवाली केला होता. त्याचे शिक्षण होत आले होते... तेवढ्यात त्याला न्युमोनिया झाला. शिक्षकांनी रात्रीचा दिवस करून त्याला मृत्युच्या दाढेतून वाचवला... हवा फेर करण्यास पुण्यात पाठविण्यात आले... तेथे एक अपरिचित आजी उपस्थित झाली... तिने मुलाला पळवून नेले. अशा अनेक अडचणी येत असतात."

मुलांच्या वसतिगृहात अशा कटु अनुभवांना जनाक्कांना सामोरे जावे लागलेले दिसते. तथापि अधूनमधून त्यांच्या कार्याची पावतीपण त्यांना लाभलेली दिसते.

१८ मे, १९१३ च्या सुबोध पत्रिकेत, ५ व्या वऱ्हाड महार परिषदेबाबत एका वैदर्भीय निराश्रिताचे पत्र पहावयास मिळते. तो लिहितो—

"ह्या परिषदेत परळ येथिल निराश्रित सहाय्यकारी मंडळीच्या बोर्डिंगांतील मुलांची भाषणे झाली. त्यांचा स्वच्छ व नीटनेटका पोषाख, नम्रपणाची वागणूक, व चांगल्या प्रौढ

वयाच्या माणसांना शोभणारी त्यांची भाषणे ह्या सर्वांचा परिणाम त्यांच्या जातबंधूवर चांगला झाला. कितीही सोवळा ब्राह्मण झाला तथापि त्याची त्या मुलांना अस्पृश्य लेखण्याची छाती होणार नाही.... ह्याचे सर्व श्रेय नि. स. मंडळीस आहे."

या परिषदेचा अहवाल वाचून इन्दूरचे महाराज तुकोजीराव होळकर प्रभावित होऊन त्यांनी २०,००० रु. देणगी मिशनला दिलेली दिसते. त्यात मुंबई सरकारच्या ८७,००० रु. ची भर पडून विठ्ठलरावांच्या इच्छेप्रमाणे पुण्यात मिशनच्या मालकीचा मध्यवर्ती आश्रम, विद्यार्थिगृह, शाळा वगैरे उभे होण्याची शक्यता निर्माण झालेली दिसून येते. "भोकरवाडीत विठ्ठलरावांनी जी जागा निवडली व मिळवली तिचे वैशिष्ट्य म्हणजे महात्मा ज्योतिराव फुल्यांनी अस्पृश्यांसाठी १ ली संस्था तिथेच काढली होती."[२७]

पुढे ती बंद पडली होती. फुल्यांनी सत्यशोधक समाज स्थापन केला त्याच वर्षी विठ्ठलरावांचा जन्म झाला होता. त्यामुळे जणूकाही फुल्यांचे बंद पडलेले काम आणि सत्यशोधक समाजाच्या तत्त्वांची ज्योतच शिंद्यांनी पुन्हा प्रज्वलित केली असे म्हणता येईल.

दुर्दैवाने पहिले महायुद्ध १९१४ साली सुरू झाले, त्यामुळे जागा व पैशाची व्यवस्था होऊनही आश्रमाचे काम मागे पडले व पुढे १९१९ साली युद्ध संपल्यावर मग ते पूर्ण झाले, ह्या नव्या अहिल्याश्रमाच्या वसतिगृहात पण जनाक्कांनी सुपरिंटेंडंट म्हणून शेवटपर्यंत (१९२३ ऑक्टोबर मध्ये शिंदे बंधुभगिनीने आश्रमातून अंग काढून घेईपर्यंत) काम केलेले दिसते.

वसतिगृहात येणारी मुले बहुजन समाजातली, क्वचित वयाने वाढलेली. अशा मुलांवर देखरेख ठेवताना जनाक्कांना काय अनुभव आले असतील ? असा प्रश्न मनात येतो.

जनाक्कांचे स्वानुभव-कथन अपूर्ण राहिलेले असल्याने, प्रत्यक्ष त्यांच्याकरवी काहीच माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. अहिल्याश्रमात स्वतः विद्यार्थी म्हणून काही काळ राहिलेले व पुढे मिशनमध्ये सेक्रेटरी झालेल्या श्री. मधाळे गुरुजींजवळ मी ह्या बाबत विचारणा केली. त्याबाबत ते कळवितात- (१७-७-१९९१ चे पत्र)

"वसतिगृहातील मुले ग्रामीण भागातील अस्पृश्य वर्गातील शिक्षणाभावी गरीब व संस्काररहित, वयानेही थोडी मोठी अशी होती. जनाक्कांना त्यांच्यावर देखरेख करताना शिस्तीबाबत व इतर अडचणीही येत असत. अशा वेळी जनाक्का त्यांना न रागावता त्यांची समजूत घालत असत... छडीचा वगैरे उपयोग कधीही करत नसत... न ऐकल्यास अण्णासाहेबांकडे पाठविले जाई. ते योग्य त्या शिक्षा करत. पण... धर्माच्या नावाखाली देवाचे किंवा पापपुण्याचे भय घालण्याचा त्या उपयोग करीत नसत... जेवणाच्या वेळी त्या स्वतः हजर रहात असत." अण्णासाहेब व जनाक्का १९२३ मध्ये मिशन सोडून गेल्यावर हे वसतिगृहपण बंद पडल्याचे श्री. मधाळे गुरुजींच्या ह्या पत्रावरून दिसते.

१९१३ ला मिशनचे मुख्य ठाणे पुण्यास आले. विठ्ठलराव व जनाक्कांचा कामानिमित्त फिरतीचा काळ वजा जाता, मुख्य निवास पुण्यातच असे, असे दिसते. पुण्यात त्या काळात

अनेक आघाड्यांवर नाना प्रकारच्या चळवळी, उपक्रम, सतत चालू असत. अशा काही उपक्रमांतही मिशनच्या कामाव्यतिरिक्त जनाक्का सहभागी होताना दिसतात.

१९१८ साली मुंबईत इन्फ्लुएंझाची मोठी साथ सुरू झाली होती व तिचा झळ पुण्यालाही लागलेली दिसते.

त्याबाबत विठ्ठलराव आपल्या आठवणीत सांगतात–

"म्युनिसिपालटीकडून इन्फ्लुएंझा मिक्चरच्या मोठमोठ्या बाटल्या भरून आणून आम्ही पुणे लष्करात गरीब लोकांच्या घरोघरी ते पाजू लागलो. माझ्या घरची मंडळी बहुतेक आजारी झाली. थोडेसे बरे वाटल्यावर ती औषधे वाटण्याची कामे करीत."[२८]

ए. के. घोरपडे आपल्या मुलाखतीत सांगतात, की 'जनाक्कांनी विठ्ठलरावांबरोबर फ्लूच्या साथीत तर काम केलेच पण मद्यपान बंदीच्या चळवळीतही त्यांनी झोपड्यांतून फिरून मद्यपानाविरुद्ध स्त्रीवर्गात प्रचार केला व विरोध करण्यासाठी त्यांना जागृत करण्याचा प्रयत्न केला. ते न आवडून काही महार पुरुष, ह्या ख्रिस्ती बाईला घरात घ्यायचं नाही, अशी बायकांना तंबी देत.'

पण ह्या सर्वांहून एका अतिशय महत्त्वाच्या उपक्रमात जनाक्कांनी सक्रिय सहभाग घेतलेला दिसतो. आणि तो उपक्रम म्हणजे मुलींच्या सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची चळवळ हा होय.

१९१९ साली पुण्यात सक्तीच्या शिक्षणाविषयी मोठी चळवळ झालेली दिसते. पुणे म्युनिसिपालटीतर्फे मुलांचे प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याबाबत पुढाऱ्यांत प्रयत्न चालू होते. मुलांच्या जोडीने मुलींनाही सक्तीचे शिक्षण ताबडतोब चालू केले पाहिजे– ह्यासाठी पुण्यातील महिला मंडळे, रमाबाई रानड्यांच्या नेतृत्वाखाली सेवासदन, इतर सुधारक पुढारी, विठ्ठलराव शिंदे आदींनी चळवळ उभारून जनजागृती केलेली दिसते. ह्या घटनेचे तपशीलवार वर्णन रमाबाई रानड्यांचे नातू श्री. मा. श्री. विद्वांस यांनी आपल्या रमाबाई रानड्यांच्या चरित्रात केलेले दिसते. ते लिहितात–

"हा वादग्रस्त प्रश्न म्यु. कौन्सिलमध्ये १२ फेब्रुवारी १९२० रोजी चर्चेसाठी घेतला जाणार होता... मुलींनाही प्राथमिक शिक्षण सक्तीचे झाले पाहिजे.... ह्याबद्दल असणारा आग्रह– लोकांच्या आणि म्यु. कौन्सिलच्या नजरेस आणावा– ह्या हेतूने पुण्यातील पूर्वभाग आणि पश्चिम भाग यातील स्त्रियांनी दुपारी ३ वाजता एक प्रचंड मिरवणूक काढली.... पश्चिम भागातील स्त्रियांच्या मिरवणूकीचे नेतृत्व श्री. रमाबाई रानडे यांनी केले.... आणि पूर्व भागातील मिरवणुकीचे नेतृत्व जनाक्का शिंदे यांनी केले. त्यांची गाठ बुधवार चौकात पडली. हा छबिना बघण्यास त्या दिवशी रस्त्याच्या दोन्ही बाजूस हजारो लोक उभे होते."[२९]

विठ्ठलरावांचे एक चरित्रकार व त्या काळातील एक शिक्षणतज्ज्ञ व सुधारक कृष्णराव बाबर यांनी आपल्या 'कर्मवीर विद्यार्थी' ह्या चरित्रपुस्तकात ह्याच घटनेचा आढावा घेताना रमाबाई रानड्यांच्या छबिन्याचा तपशील पूर्ण देऊन...'दुसरा छबिना पूर्वेकडून ताबूत

स्ट्रीटमधील डी. सी. मिशन मधून आला' एवढेच लिहिलेले आढळते.

यातील जनाक्कांच्या नावाचा अनुल्लेख अनवधानाने झाला म्हणायचा, की एकतर स्त्री व त्यातून मराठा समाजातली– म्हणून तिच्याकडे दुर्लक्ष करण्याची त्या काळच्या समाजाची ही वृत्ती मानायची ? श्री. ह. कि. तोडमल यांनीपण आपल्या 'महर्षी शिंदे' ह्या चरित्रात ह्या चळवळीच्या वृत्तात जनाक्कांचा उल्लेख केलेला नाही. या मिरवणुकीसंबंधी सुबोध पत्रिकेतील (२२ फेब्रु. १९२०) एका स्फुटात लेखक म्हणतो–

"मुलींच्या सक्तीच्या शिक्षणाविषयी खुद्द स्त्रियांमध्ये किती जागृति झाली आहे हे ता. १२ रोजी निघालेल्या स्त्रियांच्या जंगी मिरवणुकीतील दोन हजार स्त्रियांचा समूह पाहून (कळते) कोण तो उत्साह ! दोन हजार स्त्रिया भर रस्त्यामधून पुण्यासारख्या ठिकाणी हातात पताका घेऊन रस्त्यातून फिरतात– लोकांकडून विडंबना करून घेतात त्या सर्व केवळ मौजेसाठीच काय ?.... अशा आस्थेचे चीज करण्याऐवजी काही पुणेकर त्यांची विडंबना करण्यात धन्यता मानत आहेत."

'स्त्रियांच्या मिरवणुकी' ही गोष्ट त्या काळी नवीनच होती. तशात बहुजन समाजातील स्त्रियांना ह्या नवीन प्रसार माध्यमासाठी तयार करायचे, आणि तेही ज्याची चवही त्यांना अद्याप मिळाली नव्हती– अशा शिक्षणाच्या मागणीसाठी, ह्यासाठी जनाक्कांना बरीच धडपड करावी लागली असावी. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची निकड अस्पृश्य स्त्रियांना जास्त आहे. कारण अग्रक्रमाने शिक्षण मिळवणे ह्याची परंपरा व परिस्थिती अस्पृश्यांतच नव्हती तिथे अस्पृश्य स्त्रियांना कोण शिक्षण देणार ? सक्तीचे शिक्षण झाल्यास त्यांच्या प्रगतीचे मार्ग आपोआप उघडणार होते. हे जाणवल्यामुळे जनाक्कांनी ह्या मिरवणुकीत सक्रिय सहभाग घेतलेला दिसतो.

१९२० साली पुणे व नगर जिल्ह्यांत फार मोठा दुष्काळ पडलेला दिसतो. ह्या दुष्काळात हजारावर मांग जातीची माणसं अहिल्याश्रमाच्या (D.C.Mission) मैदानात दाखल झालेली दिसतात. सुरवातीला ह्या भुकेल्या आजारी माणसांना मिशनने मदत देण्यास सुरवात केली, पण ती अपुरी ठरल्याने, मिशनने म्युनिसिपालिटीच्या मदतीने कमिटी स्थापून फार मोठ्या प्रमाणावर मदत कार्य सुरू केलेले दिसते. त्यात जनाक्कांनी अन्नधान्य, कपडालत्ता स्वयंसेवकांकरवी गोळा करून आणणे, दुष्काळग्रस्तांना वाटणे, आजाऱ्यांची शुश्रूषा करणे वगैरे कामे केलेली दिसतात.

विठ्ठलराव आपल्या आठवणीत लिहितात–

"१५-३-२१ रोजी धान्यवाटप बंद करून .... अहवाल वाचनानंतर (मदत) कमिटी बरखास्त करण्यात आली. सदर कमिटी आणि शेठ तेरसी यांचे, त्याच प्रमाणे दुष्काळग्रस्त आजाऱ्यांना तपासून.... रोज दोन तास मोफत काम करणारे डॉ. यमकनमर्डी आणि त्यांचेबरोबर नर्सिंगचे काम करणाऱ्या भगिनी जनाबाई.... यांचे आभार मानण्यात आले."[३०]

निराश्रित सहाय्यकारी मंडळींच्या स्वतःच्या वस्तू हळूहळू उभ्या होत होत्या. आणि

दुर्दैवाने त्याचवेळी जागृत होत चाललेल्या अस्पृश्य मंडळींत असंतोष व दुरावा निर्माण होऊ लागलेला दिसतो. शिंदे हे वरिष्ठ जातीचे.... आपण आपल्या पायावर उभे हवे.... ह्या संस्थेत आपले स्वराज्य हवे.... अशा कल्पना निघू लागलेल्या दिसतात.

परिणामतः १९२३ मध्ये विठ्ठलरावांनी संस्थेच्या सर्व अधिकारपदाची सूत्रे खाली ठेवलेली दिसतात. ते लिहितात–

"फक्त मिशनचा संस्थापक ट्रस्टी येवढाच माझा अधिकार उरला. माझ्या व माझ्या बहिणीच्या अल्प वेतनाची नेमणूकही मी सोडली. आणि आम्ही पुन्हा एकवार उघडे पडलो."[३१]

अशा प्रसंगात जनाक्का आपल्या भावाला कशी साथ देत ह्या विषयी रा. ना. जाधव टिपणात म्हणतात–

"जनाबाई पाठची वहीण. तिने पाठराखण केली. मुंबई प्रार्थना समाज सुटल्यानंतर व अहिल्याश्रम सुटल्यानंतर, असे दोन वेळा शिंदे कुटुंब एकापरि निराश्रित होऊन रस्त्यावर आले. दोन्ही वेळी घडी बसविण्याच्या कामी जनाबाईंचे साह्य झाले. अहिल्याश्रम सोडावा लागला त्या वेळी अण्णासाहेब विचारात पडले. तेव्हा 'विठू तू पुरुषासारखा पुरुष खाली मान का घालतोस ?' असे सांगून जनाबाई त्यांना धीर देत असे मी ऐकले आहे."

मिशनच्या कामातून मुक्तता झाल्यावर दोघा बहीणभावंडांनी ब्राह्मो समाजाच्या कामाकडे पुन्हा आपला मोहरा वळविलेला दिसतो. ब्राह्मो समाजाच्या कामानिमित्त, उत्सवानिमित्त शिंद्यांचे भारतभर भ्रमण सुरू झाले. पुष्कळदा जनाक्कापण बरोबर जात असत असे दिसते.

विठ्ठलराव आपल्या आत्मकथनात सांगतात–

"दक्षिण भागात.... ब्राह्म समाजाचे काम चालू होते.... पण अनुभवशील व वाहून घेतलेला.... प्रचारक नव्हता.... आता मी मोकळा झाल्याने.... ब्राह्म समाजाने (कलकत्त्याच्या) माझी प्रतिनिधी म्हणून निवड केली.... मिशनच्या कामासाठी ह्या प्रांतात वेळोवेळी येणे जाणे होते.... म्हणून मुंबईस.... बंधुकडे पत्नी व दोन मुले ठेवून, भगिनी जनाबाई व धाकटा मुलगा रवीन्द्र यांस घेऊन १९२४ एप्रिलात मंगळूरास आलो."[३२]

इथे काही दिवस ब्राह्म विचारांच्या प्रचारात गेले नाही तोच त्रावणकोर संस्थानाच्या व्हायकोम गावी, अस्पृश्यांवरील कडक निर्बंधांविरुद्ध सत्याग्रह सुरू झाला व विठ्ठलराव तिकडे गेलेले दिसतात. (अस्पृश्यता हे माझ्या ब्राह्म प्रचाराचे मुख्य अंग आहे असे ते म्हणत.) तिथून जवळजवळ वर्षभर ते वेगवेगळ्या कामानिमित्त पुणे; बेळगाव, गोवे वगैरे हिंडत होते. त्या वेळी जनाक्का मंगळूरासच वास्तव्य करून एकट्या राहिलेल्या दिसतात. त्या काळात त्यांनी तिथे कोणते कार्य केले, उपासना चालवल्या, भगिनीवर्गात काही जागृती केली का ? वगैरे विषयी माहिती मिळवण्याचा खूप प्रयत्न केला. मंगळूर येथील ब्राह्म समाज हा अजूनही कार्यरत असलेला भारतातील एक ब्राह्म समाज आहे. पण दुर्दैवाने तिथे जुने अहवाल मिळाले नाहीत. त्या वेळची मंडळी पुढे मद्रासला गेली तेव्हा ते अहवाल नेले असावेत असे कळले. त्या

काळातील तिथे निघणाऱ्या 'स्वदेशाभिमान' नावाच्या कानडी वृत्तपत्रातून तुरळक नोंदी श्री. गो. मा. पवारांनी प्रयत्नांनी मिळवल्या, ज्यात महर्षी शिंद्यांच्या प्रवचनांचा उल्लेख आढळतो. जनाक्कांविषयी मात्र उल्लेख आढळले नाहीत. २ ऑगस्ट व १६ ऑगस्ट १९२४ च्या अंकात महिला समाज मंदिरात महर्षी शिंद्यांची स्त्रियांसाठी व्याख्याने झाल्याचा उल्लेख आढळतो. तिथे जनाक्कांचा सहभाग असण्याची शक्यता आहे. पण वृत्तपत्रांनी त्याची नोंद घेतलेली दिसत नाही.

मंगळूरहून १९२५ मध्ये परतल्यावर, विठ्ठलरावांनी बहुजन समाजात ब्राह्म धर्माच्या बुद्धिवादी विचारांचा प्रसार करण्यासाठी कौटुंबिक उपासनेचा नवा उपक्रम सुरू केलेला दिसतो व आजवरच्या सर्व उपक्रमांप्रमाणे ह्या नव्या उपक्रमातही जनाक्कांनी भावाला खूप मदत केलेली दिसते. ह्याविषयी विठ्ठलराव आपल्या आठवणीत सांगतात–

"इंग्रजी आणि संस्कृत न जाणणाऱ्या आणि खेड्यात रहाणाऱ्या लोकांसाठी ब्राह्म समाजाकडून विशेष प्रयत्न होणे फार मुश्किलीचे होते.... म्हणून पुणे येथे तूर्त एक कौटुंबिय योजना मी करू लागलो. या कामी भगिनी जनाबाईचे फार प्रोत्साहन मिळाले. जगताप, शिंदे, जेधे वगैरे... मराठा समाजाचे पुढारी धार्मिक बाबतीत प्रागतिक विचाराचे होते... ह्या मंडळींच्या घरी मी आणि भगिनी जनाबाई जाऊन रविवारी आणि इतर सुट्टीच्या दिवशी ब्राह्म धर्माच्या कौटुंबिक उपासना चालवू लागलो. बायकामुलांस समजतील अशी सोपी भजने व भक्तिपूर्ण प्रवचने मंडळींना आवडू लागली."[३३]

रा. कृ. बाबर म्हणतात– "शिवाजी हायस्कूल मधील कौटुंबिक उपासनेसाठी भगिनी जनाक्का व माझी आई स्त्रिया जमवण्याचे काम करीत असत."[३४]

बहुधा भजनाचे काम जनाक्कांनीच उचलले असावे असे वाटते. ह्या उपक्रमाला कौटुंबिक उपासना मंडळ असे नाव देऊन १९२६ जूनला त्याची रीतसर स्थापना झालेली दिसते. त्याचा मुख्य उद्देश– अस्पृश्यांच्या कुटुंबात जाऊन सोप्या भाषेत धर्मातीत मानवतावादाची शिकवण देणारी उपासना करणे, स्पृश्य-अस्पृश्य एकत्र सहली, भजने, प्रार्थना, भोजने करणे असा दिसतो. जनाक्कांनी अशा अनेक कौटुंबिक उपासना चालविलेल्या दिसतात. ही मंडळी बुद्धजयंती, ख्रिस्तजयंती देखील त्या त्या धर्मातील मान्यवर माणसे बोलावून– साजरी करताना दिसतात.

१९२७ साली उपासनेतील भजने मुलामुलींना शिकविण्यासाठी ५ महिने जनाक्कांनी गायनाचा वर्गपण चालवलेला दिसतो. मुली नियमाने येईनात म्हणून पुढे तो वर्ग बंद करण्यात आलेला दिसतो.

'कौटुंबिक उपासना' हा उपक्रम बाहेरगावी पण पसरावा म्हणून ही दोन भावंडं कोल्हापूर, सातारा, नगर वगैरे ठिकाणी जाऊन तेथील ब्राह्म मताच्या स्थानिक मंडळींच्या सहाय्याने कौटुंबिक उपासना, वनातील सहली वगैरे कार्यक्रम करून एक मोकळे व उदात्त विचारांचे समाजजीवन निर्माण करू पहात होती, असे अण्णासाहेबांच्या आठवणीतील उल्लेखावरून

दिसते.[३५] कौटुंबिक उपासना मंडळ काढण्यामागे महर्षी शिंद्यांचा हेतू आध्यात्मिक व नैतिक विकासाची संधी पुरुषांप्रमाणे स्त्रियांना पण लाभावी हा होता. कारण समाज परिवर्तनाचे माध्यम कुटुंब आहे, म्हणून स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान असावे असे आपले मत, संगत सभेत जनाक्का बोलून दाखवत असत, असे श्री. चव्हाण आपल्या टिपणात लिहितात.

पुढे विठ्ठलराव काही दिवस राजकारणात पडून तुरुंगात गेले होते, तरीपण त्याही काळात कौटुंबिक उपासना, पाहुण्यांचे स्वागत, सहली वगैरे उपक्रम जनाक्कांनी चालू ठेवलेले दिसतात.

१९२६-२७ च्या सुमारास वल्लभभाई पटेलांच्या बार्डोलीच्या यशस्वी चळवळीमुळे शेतकऱ्यांत जागृती निर्माण झाली. त्या वेळी इंग्रज सरकार नवे नवे कायदे आणून शेतकरी वर्गाला पिळून काढत होते. सारावाढ, तुकडेबंदी (जमिनीचे लहानलहान तुकडे एकत्र करून टाकणे) वगैरेंमुळे शेतकरी नाडला जात होता. संस्थानातूनही शेतकऱ्यांकडून भरमसाट सारा घेतला जात होता. त्यांच्या संरक्षणाचे कायदे नव्हते. ह्या सर्व अन्यायाविरुद्ध विठ्ठलराव उभे झालेले दिसतात. ते म्हणतात–

"अस्पृश्यांची अस्पृश्यता तिकडे कमी होऊ लागली आहे तर इकडे सरकारने दुसरा एक दलित वर्ग मोठ्या प्रमाणात निर्माण करण्याचा चंग बांधला आहे....(त्याविरुद्ध आवाज उठवण्याचे) हे काम धार्मिक समजूनच मी पत्करले आहे...."[३६]

ह्यासाठी खेडोपाडी जाऊन परिषदा भरवून व्याख्यानाच्या द्वारे शेतकऱ्यांत एकजूट व प्रतिकार शक्ती उभी करण्याच्या विठ्ठलरावांच्या कामात जनाक्का पण सहभागी झाल्या होत्या असे, कोल्हापूरच्या शकुन्तलाबाई जमदग्नी व इतर नातेवाईक सांगतात. शेतकऱ्यांच्या घरी जाऊन, स्त्रीवर्गालाही ह्या अन्यायाची जाणीव करून जागृत करण्याचे काम जनाक्का करत असत असे सांगितले गेले. ह्याबाबत विठ्ठलरावांच्या आत्मकथनात किंवा इतरत्र लिखित पुरावा मात्र मला आढळला नाही. इथून पुढचे जनाक्कांच्या आयुष्यातील भावाच्या जोडीने केलेले शेवटचे महत्त्वाचे कार्य म्हणजे वाईत १९३३ मध्ये प्रार्थना समाजाची स्थापना करणे हे होय. ह्या समाजास वरचेवर भेटी देऊन जनाक्कांनी खूप काम केलेले दिसते. सुबोध पत्रिकेच्या त्या काळातील अंकातून प्रार्थना समाजाच्या कार्याविषयी लिहिताना अण्णासाहेबांच्या जोडीने पाठोपाठ जनाक्कांचा नामोल्लेख गौरवाने केलेला आढळतो. उदाहरणार्थ ८ मार्च १९३६ च्या सुबोध पत्रिकेत 'वाई प्रार्थना संघ' ह्या शीर्षकाखाली बातमी आहे–

"१२-६-३४ रोजी श्री. अण्णासाहेब शिंदे व त्यांच्या भगिनी जनाबाई ह्यांनी येथील प्राज्ञ पाठशाळेस भेट दिली. जवळच असलेल्या हरिजन कार्यालयात जाऊन त्यांच्या तक्रारी ऐकल्या... महारवाड्यात प्रत्यक्ष हिंडून वस्तुस्थिती पाहिली. पिण्याच्या पाण्याविषयी फारच गैरसोय असल्याचे आढळून आले.... म्यु. प्रेसिडेंट यांना भेटून गैरसोय दूर करण्याचे प्रयत्न चालू आहेत."

तर २१ जून १९३६ च्या सुबोध पत्रिकेत 'वाईचे प्रचारकार्य' ह्या शीर्षकाखाली खालील

नोंद आढळते.

'पुणे-मुंबईहून प्रार्थना समाजाचे प्रचार कार्य करण्यासाठी श्री. विठ्ठलराव शिंदे, भगिनी जनाबाई शिंदे... वगैरे मंडळी ११ मे १९३६ रोजी वाईस गेले... श्री. गणपतराव हगीर ह्यांच्या घरी कौटुंबिक उपासना झाली... ते स्वतः शेतकरी आहेत. घरातील पुरुष, बायका शेतात खपत आहेत. आज शेतकऱ्यासंबंधाने निरनिराळ्या चळवळीत चर्चा होत असते. पण वाईत ब्राह्मधर्म साक्षात शेतकऱ्यांच्या घरात शिरला आहे.'

ह्याच बातमीत पुढे स्त्रिया, पुरुष, विद्यार्थी मिळून वनोपासनेसाठी गावापासून दूर निसर्गरम्य स्थानी मंडळी गेल्याचे व तिथे उपासना, गप्पा, चर्चा करून मोकळेपणाने काही काळ आनंद उपभोगल्याचे वर्णन आहे.

१७ जून, १९३४ च्या सुबोध पत्रिकेतही, शिंदे भावाबहिणीने पुढाकार घेऊन गावच्या मंडळींना वनोपासनेस नेऊन, सृष्टीदेवतेचे कौतुक दाखवून– आपापसांतली विचार विनिमयाची चळवळ सुरू केल्याचे वृत्त त्या वेळचे सेक्रेटरी रा. कृ. बाबर यांनी कळविले आहे. शेवटी ते लिहितात- 'सर्वांच्या मनात पुन्हा पुन्हा असे स्त्री-पुरुषांनी मोकळे वागण्याचे योग यावेत असे वाटले'– असे लिहिले आहे, यावर भाष्य करताना वाई प्रार्थना समाजाचे सध्याचे अध्यक्ष श्री. रा. ना. चव्हाण आपल्या २२-७-१९९१ च्या पत्रात लिहितात– 'स्त्रियांना बाहेर पडण्याची सोय नव्हती. उपासनेच्या निमित्ताने का होईना स्त्रिया बाहेर जाऊ लागल्या. अशा तऱ्हेने त्यांनी अबलोन्नतिच्या कार्यास जन्म दिला. स्त्री-मुक्तीच्या इतिहासात हे महत्त्वाचे पण उपेक्षित पर्व आहे.' श्री. रा. ना. चव्हाण, तसेच श्री. रा. कृ. बाबर व सौ. माणिकताई बाबर यांचा शिंदे बंधु-भगिनींशी वाई व पुणे येथे अतिशय निकटचा संबंध आलेला आहे. ही सर्व मंडळी शिंदे बंधु-भगिनींची उत्तरायुष्यातली आप्तसदृश सहकारी मंडळी होती. जनाक्कांच्या कार्याविषयी श्री. रा. कृ. बाबर ह्यांनी एक स्वतंत्र व विस्तृत टिपणच पाठविले आहे. त्यातील निवडक भाग असा–

"महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी शिवाजी मराठा हायस्कूल, पुणे येथे चालविलेल्या कौटुंबिक उपासना मंडळाचे माझे वडील कृष्णराव बाबर व मातोश्री सौ. राधाबाई उर्फ ताईसाहेब बाबर हे सभासद होते.... त्यामुळे त्यांचा आमचा परिचय वाढला.

"१५-१-१९३३ रोजी अण्णासाहेबांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या वाई तालुका अस्पृश्यता निवारण परिषदेसाठी म्हणून जनाक्का प्रथम वाईस आल्या. तेव्हा सर्व कार्यकर्त्यांची ओळख करून घेतली.

"१४-११-३३ रोजी राममोहन रॉय सांवत्सरिक पुण्यतिथी निमित्त अण्णासाहेबांनी काढलेल्या महाराष्ट्र दौऱ्याची सुरवात वाईपासून केली. त्या वेळी भगिनी जनाक्का वाईस आल्या होत्या... भगिनी जनाक्कांनी सर्वांच्या घरी जाऊन धर्मासंबंधी माहिती दिली. यामुळे वाई येथील कार्यकर्त्यांवर चांगला परिणाम झाला. त्यांच्याबरोबर ताईसाहेब बाबर होत्या.

"महर्षी शिंदे यांच्या बरोबर त्या अनेक वेळा उत्सवास व खेड्यातील दौऱ्यावर

जाण्यासाठी आल्या होत्या. १९३४ साली कोठावळे बागेतील वनोपासना फार परिणामकारक झाली.... रात्रीच्या प्रसंगी एक महिला आपल्या लहान बालकास घेऊन झोपली असताना... जवळच झाडावरून एक मोठा फणस पडला. सर्व लोक भयभीत होऊन गेले. त्या वेळी भगिनी जनाक्कांनी उपासना केली व सर्वांची मने परमेश्वराकडे लावली.

"...भगिनी जनाक्कांनी (वाई मुक्कामात) महिलांची सुधारणा होणेसाठी वेळोवेळी त्यांचे घरी जाऊन आध्यात्मिक जागृति केली. हरिजन वस्तीस ही भेटी दिल्या. ह्या कामी माझ्या पहिल्या पत्नी कै. हौसाबाई त्यांना सर्वस्वी मदत करीत होत्या.

"ओझर्डे ह्या खेडेगावी एकदा एक प्रचार सभा आयोजित केली होती. भगिनी जनाक्का व ताईसाहेब बाबर घरोघरी जाऊन स्त्रियांनी सभेस यावे म्हणून प्रयत्न करीत... सभेला चावडी-पुढील भव्य पटांगणात स्त्रियांची गर्दी झाली होती... महर्षी शिंदे यांना आनंद झाला. खेडेगावच्या सभेस माझ्या दोन्ही भगिनींनी किती प्रयत्न केला आहे ह्याबद्दल त्यांना आश्चर्य वाटले. यापूर्वी इतक्या महिला मला सभेस कधी दिसल्या नाहीत, असे ते म्हणाले—

"जनाक्कांचा प्रयत्न, चिकाटी आणि प्रेमळ वागणूक यांचा परिणाम दिसून येतो. लोकांची मने आपलेकडे आकर्षित करून घेण्याची त्यांची शैली फार मोठी होती. मिशनरी तत्त्वाप्रमाणे प्रचाराचे कार्य त्यांनी सर्व गावी केले. हरिजन वस्तीस प्रत्येक खेडेगावी भेट देणे, तेथील लोकांची गाऱ्हाणी ऐकून त्यांच्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करणे हे त्यांचे नित्याचे कार्य होते. एकदा त्या एका हरिजनाच्या घरी गेल्या. घरातील भगिनी आपल्या लहान मुलास आंघोळ घालत होती. भगिनी जनाक्कांनी त्या मुलास जवळ घेऊन सर्व अंगाची साफसफाई करून नाक स्वच्छ करून,. स्वतः मार्गदर्शन केले. मानवसेवा हीच हरि सेवा त्यांनी मानली... व बंधुभाव वाढविला. भुईंज ता. वाई गावी इनामदारांच्या भव्य वाड्यात भगिनी जनाक्का व ताईसाहेब बाबर ह्यांनी सभा घेतली. सर्व धर्माच्या, जातीच्या महिलांनी वाडा फुलून गेला होता. हा देखावा पाहून गावकरी कार्यकर्त्यांना आनंद वाटला... भगिनी जनाक्का भाषणात म्हणाल्या—'स्त्रियांची कुचंबणा फार होत असते. पुरुषांबरोबर वागण्याचे समान हक्क मिळत नाहीत. त्यासाठी त्यांनी शिक्षण घेऊन आपली खरी उन्नति केली पाहिजे. शिक्षणाने माणुसकी येते. विचार चांगले होतात. अंधश्रद्धा नाहीशी होते. अंगात धैर्य येते... तरी प्रत्येकाने आपल्या मुलामुलींना शिक्षण दिले पाहिजे.' ...जेव्हां जेव्हा मी अण्णासाहेबांना भेटण्यास पुण्यास जात असे त्या वेळी भगिनी जनाक्का व महर्षी शिंदे हे दोघे बसलेले दिसत असत. एका देहाचे दोन अवयवच वाटे. त्या नेहमी आनंदी असत. घरी काही वातावरण बिघडले तरी त्यांची शांती ढळली नाही. दुःख सहन करण्याची त्यांची आध्यात्मिक शक्ति फार होती. त्यांच्याकडून योग्य तो सल्ला मिळे. महर्षी शिंदे यांची अखेरपर्यन्त त्यांनी सेवा केली. १-८-४४ रोजी म. गांधींनी वाई प्रार्थना समाजास भेट दिली. त्या वेळी त्यांनी, भगिनी जनाक्का यांना अस्पृश्यता निवारणाविषयी केलेल्या कामगिरीबद्दल धन्यवाद दिले."

रा. कृ. बाबरांच्या वरील टिपणावरून वाई तालुक्यात जनाक्कांनी केलेल्या कार्याचा

परिचय होतो. सुबोध पत्रिकेतील वृत्तात पण ह्याचा प्रत्यय येतो. वाई येथील प्रार्थना समाजाच्या कार्याचा उल्लेख करून पुढे ह्या वृत्तात म्हटले आहे की–

"... ह्या कार्याचे सर्व श्रेय श्री. अण्णासाहेब शिंदे ह्यांस आहे.... त्याचप्रमाणे त्यांची बहीण श्री. जनाबाई शिंदे ह्यांनी संघाच्या सभासदांच्या घरोघर जाऊन त्यांच्या कुटुंबातील स्त्रियांचे मनात संघाबद्दल जागृति निर्माण करण्याचे काम केले. उभयता भावा-बहिणींचा उत्साह वंदनीय आहे."

श्रीमती लक्ष्मीबाई शिंदे– अण्णांच्या सूनबाई, पण आपल्या पत्रात लिहितात– "जनाक्कांचे आयुष्य प्रचार व उपासना करण्यात गेले. त्या सर्वजणांना महारवाड्यात व ओळखीच्या घरी नेत."[३७]

वाई प्रार्थना संघाचा तृतीय वार्षिक उत्सव २० नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबर १९३६ ह्या काळात झाला. त्याचेही सविस्तर वृत्त सुबोध पत्रिकेत (२० डिसेंबर १९३६) वाचावयास मिळते. त्यात जनाक्कांच्या उपासनेविषयी म्हटले आहे–

"भगिनी जनाबाई शिंदे यांनी स्त्रियांकरिता जी उपासना चालविली त्या वेळी मुक्ताबाईच्या तीन पद्यांच्या द्वारा जो उपदेश केला त्यात तुम्ही मूर्तिपूजा करून मूर्तीस गंध, पुष्प वहाता. त्यावेळी ते कोणी उत्पन्न केले याचा तुम्ही विचार कराल व वरचेवर रम्य ठिकाणी जाल, तर तुम्हाला ईश्वराचे प्रत्यक्ष दर्शन घडेल, वगैरे स्वानुभवाच्या गोष्टी सांगितल्या... मुक्ताबाईच्या– मजवरी दया करा, ताटी उघडा ज्ञानेश्वरा.... ह्या अभंगाद्वारे सोप्या भाषेत निरूपण केले... ते स्त्रियांना फार आवडलेले दिसले. जनाबाईनी आपल्या गाण्याने उत्सवामध्ये चांगलीच आध्यात्मिक करमणूक केली."

दुसऱ्या दिवशीपण त्यांनी उपासना चालवलेली दिसते. बातमीदार लिहितो– 'त्यांनी आपल्या गोड पद्यांनी सर्वांची मने तल्लीन करून टाकली. गंभीरता उत्पन्न केली. स्त्री समाजही फार जमला होता.'

जनाबाईंच्या उपासना स्वतः ऐकलेले श्री. रा. ना. चव्हाण त्यांच्या उपासना पद्धतीविषयी मला पाठवलेल्या आपल्या टिपणात सांगतात–'आगोदर त्या पूर्व तयारी करत. पदे, अभंग काढून ठेवीत. त्यांच्या उपासनेचे विषय, स्त्रियांनी आध्यात्मिक, सार्वजनिक व अस्पृश्योद्धारक चळवळीत भाग घ्यावा ह्या बाबत असत.' भावाच्या जोडीने त्या भाषणेहि करीत. १५-१-३३ रोजी वाई येथे भरलेल्या अस्पृश्यता निवारक परिषदेत.... त्यांनी भाषण केले. त्यांची शैली सोपी व सुबोध असे. बायकांना त्यांचे भाषण समजे. फार लांबट भाषण त्या करीत नसत, तरी त्या 'वक्त्या' होत्या. उपासना चालविण्यास त्याकाळी स्त्रिया किती दुर्मिळ होत्या ह्याचे प्रत्यन्तर महर्षींच्या खालील पत्रातून मिळू शकते. वाई प्रार्थना समाजाला लिहिलेल्या एका पत्रात ते लिहितात–

"आम्ही २०-११-३६ शुक्रवारी वाईस येऊ. चि. जनाक्कांना बरोबर आणणार नाही. कोणी भगिनी स्त्रियांकरिता उपासना चालविण्यास मिळाली नाही तर मी स्वतः चालवीन..."[३८]

अण्णासाहेबांच्या कार्यात जनाक्कांचे सहकार्य किती हुकमी व अनन्यसाधारण होते ह्याचे प्रत्यंतर महर्षींच्या वाई प्रार्थना समाजाला पाठवलेल्या दुसऱ्या एका पत्रातून येऊ शकते. ते लिहितात–

"मला केसकरांचे अद्याप पत्र नाही. भांडारकर दौऱ्यावर येतील असे वाटत नाही. मामांचे... मत अनुकूल दिसत नाही असे तुम्ही म्हणता. मग मी काय करावे कळेना. चि. जनाबाईंना घेऊन मी एकट्यानेच सर्व उपद्व्याप करावा का ?"[३९]

पण असा 'उपद्व्याप' त्या दोघां बहीण-भावंडांचा शरीर थकेपर्यंत अव्याहत चालूच होता असे दिसते. अध्यात्मातून सामाजिक ऐक्य व समरसता साधण्याचा त्या दोघांचा प्रयत्न दिसतो. म्हणून उपासनेच्या उपक्रमातून स्पृश्य व अस्पृश्य स्त्रियांना एकत्र आणून त्यांना एका सतरंजीवर बसण्याची सोय करीत. याला जोडून महिला संघटनापण जनाक्कांनी स्थापन केलेली दिसते. वाई ब्राह्म समाजाची स्वतंत्र इमारत १९३७/३८ साली झाल्यावर वाचनालय चालविण्याचा पण उपक्रम झाला. श्री. चव्हाण लिहितात– 'भावा- बहिणींनी केलेले हे संयुक्त कार्य हे एक दलित चळवळीचे दालन होते. तसेच बायका गोपात-पडद्यात असत. त्यांना बाहेरचा वारा लागत नाही. त्यातून 'स्त्रीमुक्ती' व्हावी हा स्त्रीमुक्तीचा त्यांचा श्रीगणेशा होता.'

आणखी एका पत्रात ते आपला अनुभव सांगतात (२२-७-९१)–

"....शिंदे बंधू- भगिनीने, वाई व परिसर यामध्ये ब्राह्मण, मराठे व पूर्वास्पृश्य यांना एकत्र केले. असे पूर्वी कधी नव्हते.... मराठा समाजातील काहींचा तरी, दलितविषयक उदार दृष्टिकोन तयार होण्यास अण्णासाहेब व जनाबाई मिळून झालेले एक व्यक्तित्व कारणीभूत झाले. डॉ. आंबेडकर विद्यार्थी असताना अहिल्याश्रमात उतरत असत. शिंदे कुटुंबाने दलितांची जी एक पिढी शिकविली तिचा डॉ. आंबेडकरांना पाया म्हणून उपयोग झाला."

अशा प्रकारे साधारण १९३६ पर्यंत जनाक्कांनी, भावाच्या जोडीने आचरलेल्या कर्मयोगाचा आराखडा हा असा आहे.

इथून पुढे दोघं भावंडं थकत गेलेली दिसतात. अण्णासाहेब आपल्या आत्मकथनात (पृष्ठ ४०९) स्वतः म्हणतात– '१९३३ साल संपत आले नि माझी दुखणी सुरू झाली.... उपचार करून आलो पण रोगाने मांडलेले ठाण काही निघेना.... माझी धडाडीची सार्वजनिक कामगिरी बहुतेक येथेच संपली.' जनाक्कांचा पण दृष्टिदोष वाढत जाऊन हळूहळू त्या सार्वजनिक कार्यातून निवृत्त होत गेलेल्या दिसतात.

* *

निबंध
वा. क्र. 3866
२९९२८
८।८।८२

# संदर्भ सूची


१. स्मृतिचित्रे : जनाक्का शिंदे, तरुण महाराष्ट्र, २४-६-४९
२. माझ्या आठवणी व अनुभव : वि. रा. शिंदे, पृष्ठ १७०
३. महर्षी वि. रा. शिंदे आणि वाई प्रार्थना समाज : रा. कृ. बाबर, पृष्ठ ६७
४. माझ्या आठवणी व अनुभव : वि. रा. शिंदे, पृष्ठ १८१
५. स्मृतिचित्रे : जनाक्का शिंदे, तरुण महाराष्ट्र, २४-६-४९
६. कित्ता: १२-८-४९
७. माझ्या आठवणी व अनुभव : भाग १, २, व ३, विठ्ठल रामजी शिंदे, पृष्ठ १८३
८. स्मृतिचित्रे : जनाक्का शिंदे, तरुण महाराष्ट्र, १२-८-४९
९. माझ्या आठवणी व अनुभव : भाग १, २, व ३, वि. रा. शिंदे, पृष्ठ २२४-२२५
१०. स्मृतिचित्रे : श्रीमती जनाक्का शिंदे, तरुण महाराष्ट्र, २१-१०-४९
११. माझ्या आठवणी व अनुभव: विठ्ठल रामजी शिंदे, पृष्ठ २२६
१२. स्मृतिचित्रे : श्रीमती जनाक्का शिंदे, तरुण महाराष्ट्र, २-१२-४९
१३. माझ्या आठवणी व अनुभव : विठ्ठल रामजी शिंदे, पृष्ठ २३१-२३२
१४. स्मृतिचित्रे: श्रीमती जनाक्का शिंदे, तरुण महाराष्ट्र २-१२-४९
१५. माझ्या आठवणी व अनुभव: विठ्ठल रामजी शिंदे, पृष्ठ ३१४
१६. कित्ता: पृष्ठ ३५०
१७. माझ्या आठवणी व अनुभव: विठ्ठल रामजी शिंदे, पृष्ठ २३०
१८. स्मृतिचित्रे: श्रीमती जनाक्का शिंदे, तरुण महाराष्ट्र १६-१२-४९
१९. माझ्या आठवणी व अनुभव: विठ्ठल रामजी शिंदे, पृष्ठ ३१२
२०. सुबोध पत्रिका: ४-१०-१९०८
२१. माझ्या आठवणी व अनुभव: विठ्ठल रामजी शिंदे, पृष्ठ २३९

२२. कित्ता: पृष्ठ २४२
२३. कित्ता: पृष्ठ २७१-२७२
२४. कित्ता: पृष्ठ २४२
२५. कित्ता: पृष्ठ २५६
२६. कित्ता: पृष्ठ २५९
२७. कित्ता: पृष्ठ २७९
२८. कित्ता: पृष्ठ ३१५
२९. श्रीमती रमाबाई रानडे - व्यक्ती आणि कार्य: मा. श्री. विद्वांस, पृष्ठ २४६
३०. माझ्या आठवणी व अनुभव: विठ्ठल रामजी शिंदे, पृष्ठ ३११
३१. कित्ता: पृष्ठ ३२८
३२. कित्ता: पृष्ठ ३५२
३३. कित्ता: पृष्ठ २६२
३४. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि वाई प्रार्थना समाज: रा. कृ. बाबर १९९१, पृष्ठ ६८, ६९
३५. माझ्या आठवणी व अनुभव: विठ्ठल रामजी शिंदे, पृष्ठ ३६९
३६. कित्ता: पृष्ठ ३८३
३७. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि वाई प्रार्थना समाज: रा. कृ. बाबर, पृष्ठ ११७
३८. कित्ता: पृष्ठ १००
३९. कित्ता: पृष्ठ १०४

प्रकरण ३ रे

# जनाक्का – एक व्यक्ती

आतापर्यंत आपण जनाक्कांच्या जीवनकार्याचा 'एक संन्यस्त कर्मयोगिनी' म्हणून आढावा घेतला.

तथापि, त्या पलीकडे पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे व जीवनाचे काही पैलू उरलेले दिसतात. एक कन्या, बहीण, सून, पत्नी व शेवटी एक स्त्री म्हणून त्या कशा होत्या... तिथे त्यांची भूमिका काय होती, ह्याचा आता आपण थोडक्यात विचार करणार आहोत.

जनाक्कांना आपल्या मात्यापित्यांविषयी खूप आदर व प्रेम होते असे दिसते. त्या दोघांच्या सहृदय, उदारमनस्क वारकरी सांप्रदायिक वृत्तीचा फार मोठा संस्कार जनाक्कांवर झालेला दिसतो. पण त्यांच्या आत्मकथनात वडिलांविषयी जेवढ्या आदरपूर्वक आठवणी व उल्लेख आढळतात त्यामानाने आईविषयी त्या फार कमी बोलताना दिसतात. अण्णासाहेबांच्या आत्मकथनात मात्र आईविषयी आत्यंतिक प्रेमादराचे, ऋणभावनेचे उद्गार अनेकदा दिसतात.

जनाक्कांच्या बाबतीत हे अनवधानाने घडले का आईपेक्षा त्या वडिलांशी जास्त संस्कारबद्ध होत्या असा प्रश्न मनात येतो. मात्र 'तू मुलगी. तुझा काय उपयोग ?' असे नैसर्गिकपणे म्हणणाऱ्या आईला त्यांनी एखाद्या मुलाप्रमाणे समर्थपणे सांभाळलेले दिसते.

जनाक्का व अण्णासाहेब ह्या भावाबहिणींचे नाते तर एक फारच घनिष्ट, परस्परपूरक व अपूर्व असे दिसते.

त्यांच्या नात्याविषयी महर्षी शिंदे विशेषांकाचे (५ वा स्मृतिदिन) संपादक एस. एस. भोसले आपल्या संपादकीयात म्हणतात–

"पोथ्यापुराणातून, लोककथा व लोकगीतांतून, कथा-कादंबऱ्यांतून आपण बहीणभावांच्या प्रेमाची वर्णने वाचतो.... पण बहीणभावाचे प्रेम म्हणजे काय चीज आहे याचे प्रत्यंतर अण्णासाहेब व जनाक्का यांच्या सहवासात चार घटका घालवल्यानेच येऊ शकेल.

तेथे शब्द अपुरे पडतात. दोघांची पुण्याई की असे प्रेम लाभले."

बालपणापासून पाठोपाठची असल्यामुळे दोघांत खूप सहवास होऊन घनिष्ठता आलेली दिसते. तसचे दोघांत वृत्तीसाम्य असल्याने त्यांची व्यक्तिमत्वे परस्परांस पूरक झालेली दिसतात. पूर्वायुष्यात अण्णासाहेब जनाक्कांचे पाठीराखे होते तर उत्तरायुष्यात जनाक्कांनी त्यांची पाठराखण केलेली दिसते. अण्णासाहेबांच्या प्रत्येक कार्यात जनाक्का पहिल्या निष्ठावान सहकारी झालेल्या दिसतात. निराश्रित सहाय्यकारी मंडळीत अनेक वर्षे काम केलेले मधाळे गुरुजी म्हणाले– "अण्णासाहेब आठ-आठ दिवस फिरतीवर जात. त्या वेळी संस्थेची सर्व कामे जनाक्कांनाच संभाळावी लागत. त्यांच्या अंगात स्वतंत्रपणे व धैर्याने काम करण्याचे गुण होते." रमाबाई रानडे जशा पतीच्या पावलावर पाऊल टाकीत समर्थ समाजसेवक झाल्या व आपले कर्तृत्व सिद्ध करीत गेल्या; त्याचप्रमाणे जनाक्का पण शिंद्यांच्या प्रेरणेने त्यांच्या सर्व कार्यात सहभागी होऊन स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व शाबीत करत गेल्याचे दिसते.

रा. ना. चव्हाण आपल्या लेखात व पत्रातून सांगतात– "जनाक्का ह्या अण्णासाहेबांच्या जणू पी.ए. च होत्या. अण्णांचा सर्व विश्वास त्यांच्यावर होता. अण्णा पुरुषांत काम करत... पण स्त्रीकडून होऊ शकणारा कार्यभाग त्यांना अशक्य असे. जनाबाईंनी त्यांच्या बरोबरीने कार्य करून ही उणीव भरून काढली. अण्णासाहेबांचा पुष्कळसा जय झाला त्याचे कारण जनाबाई शिंदे ह्याच होत. अण्णासाहेबांच्या प्रवास दौऱ्यावर त्या गुरुवर्यांसोबत सतत असत. जनाबाई म्हणजे अण्णासाहेबांच्या कार्याची सावलीच होय. जनाबाई व विठ्ठलराव यांच्या चर्चेतून साधकबाधक विचार आम्हास कळत... अण्णासाहेब जनाक्कांचा घरीदारी सल्ला घेत असत. ... कामात विघ्न अगर विरोध येणार असेल तर त्याची कल्पना त्यांना देत असत. मलापण त्यांचा सल्ला उपयोगी पडला. जनाबाई नसत्या तर शिंदे यांना एवढे अध्यात्मिक, मानसिक सामर्थ्य प्राप्त झाले नसते.... कदाचित् विठ्ठलरावांचा एक सार्वजनिक पाय लंगडा ठरला असता."[१]

भावावर जनाक्कांची नितांत श्रद्धा दिसते. भावाविषयीच्या ह्या नितांत श्रद्धेतूनच कौटुंबिक जीवनात, विशेषतः अण्णासाहेबांच्या पत्नीशी कुरबुरी होत असाव्यात असे दिसते. अण्णासाहेबांच्या नात्यातले, त्यांच्या घरी बरीच वर्षं वास्तव्य असलेले श्री. अण्णापा काळे मुलाखतीत म्हणाले– "अण्णासाहेब व जनाक्का प्रार्थना समाजाचे अनुयायी होते. मूर्तिपूजा त्यांना मान्य नव्हती. पण अण्णासाहेबांच्या पत्नी देवपूजा व इतर कर्मकाण्डात्मक विधी करत. त्यामुळे जनाक्का वैनीला, 'नवऱ्याला आवडत नाही तर तू देवपूजा का करतेस ?' म्हणून जाब विचारायच्या व वैनी 'आम्ही नवरा-बायको बघून घेऊ, तू मध्ये पडू नकोस'– म्हणून चिडायच्या." रा. ना. चव्हाणांच्या मतेपण (टिपण) जनाक्का अण्णांची बाजू घ्यायच्या. त्यामुळे दोघींत थोडा संघर्ष चाले.

हे पहाताना वाटते, की जनाक्का इथे वैनीच्या व्यक्तिस्वातंत्र्यापेक्षा भावाच्या विचारांना जास्त जपत होत्या का ? आपली वैनी आपल्या कर्तृत्ववान भावाला पूर्णपणे अनुरूप नाही,

त्याच्या मनाप्रमाणे वागत नाही. त्याच्या व्यस्त जीवनात घरगुती कुरबुरीने ताण वाढवते– अशी काही अढी त्यांच्या मनात असावी का ?

रुक्मिणीबाईंच्या मनातही, आपण संसाराच्या अष्टौप्रहर खस्ता खायच्या आणि नणंदेने नवऱ्याबरोबर कर्तृत्व करून कौतुक मिळवायचे ह्याचे एक नैसर्गिक वैषम्य असेल का ?

अण्णासाहेबांच्या मित्राची मुलगी सौ. शकुंतलाबाई जमदग्नी मुलाखतीत म्हणाल्या– "अक्का (रुक्मिणीबाई), नणंदेशी खटका उडाला की, वैतागून आमच्याकडे महिना महिना येऊन रहायच्या. म्हणायच्या– 'नवऱ्याचे लक्ष नाही (समाज कार्यापुढे) आणि नणंद मला पावलोपावली भाजून खाते. आम्हाला काकींची दया यायची."

जनाक्का बाईमाणूस असून बाहेरच्या कामामुळे घरकामात बरोबरीने सहभाग घेत नाहीत– त्यामुळे हा ताण निर्माण होत असेल का ?

अण्णासाहेबांची नात सौ. सुजाता पवार मुलाखतीत म्हणाल्या– "आमच्या आत्याबाई म्हणजे, जणू अण्णांचा धाकटा भाऊच. अण्णांच्या कामाला त्यांनी स्वतःला वाहून घेतले होते. कुठलेही काम धडाडीने करायच्या. कुणाला भीत नसत."

मनात प्रश्न येतो, की त्या खरोखरच 'भाऊ' असत्या तर त्यांच्याकडून घरकामाबद्दल अपेक्षा केल्या गेल्या असत्या का ? पण कदाचित त्या 'भाऊ' असत्या तर भावा-भावजयीच्या कुरबुरीत अलिप्तही राहिल्या असत्या ! कुणी सांगावे !

अर्थात नणंद-भावजयीतील हा विसंवाद कधी विकोपाला गेलेला दिसत नाही. नातेवाइकांच्या सांगण्याप्रमाणे जनाक्कापण भाऊ गेल्यावर कौटुंबिक भानगडीतून अलिप्त राहू लागलेल्या दिसतात.

जनाक्कांप्रमाणे अण्णासाहेबांना पण बहिणीविषयी खूप प्रेम व आदर असावा असे दिसते. ह्याचे एक कारण जनाक्कांची हुशारी, कर्तृत्व व परिस्थितीचे आव्हान स्वीकारण्याची क्षमता हे असावे. हे गुण त्यांच्या अवती भवतीच्या इतर कुटुंबीय मंडळींत तुलनेने कमी प्रमाणात आढळतात. त्यांचे भाऊ, मुले ह्यात त्यांच्याइतके विद्वान झालेले कोणी दिसत नाही. जनाक्कांत ही हुशारी होती. अण्णासाहेबांच्या पत्नीपण फार शिकू शकलेल्या दिसत नाहीत. कदाचित सांसारिक जबाबदाऱ्यांत अडकल्यामुळे असे झाले असावे. पण पति-पत्नी नात्यात थोडा असमाधानाचा दुरावा असावा असे अण्णासाहेबांची रोजनिशी[२] वाचताना जाणवते. रोजनिशीच्या प्रस्तावनेत डॉ. पवारांनी तसे नमूद केले आहे. (पृष्ठ २५)

ह्या रोजनिशीत अण्णासाहेबांनी, कॉलेजचे शिक्षण पुण्यास घेत असताना एकाकीपणाने होणारी शारीरिक तगमग, मनात वळावणारे अनुचित विकार, ह्याचे स्पष्ट वर्णन केलेले आढळते. शेवटी ते म्हणतात– "अरे, पण माझे हे हाल तर कुलीन विधवांचे काय होत असेल ?"[३]

जनाक्का विधवा असूनही आपले संन्यस्त जीवन खंबीरपणे जगत होत्या. ह्याचादेखील एक पदर, अण्णासाहेबांच्या बहिणीविषयक आदरात असावा, असे वाटते.

अण्णासाहेबांचे बहिणीविषयीचे प्रेम किती गाढ होते ह्याचा प्रत्यय वेळोवेळी त्यांनी

काढलेल्या उद्‌गारांतून तर येतोच पण त्यांच्या काही कृतींतून पण येत राहतो. ह्या संदर्भात पुढील उल्लेख बोलका आहे. अण्णासाहेब आपल्या आठवणींत लिहितात–

"ब्राह्मो समाजाच्या शतसांवत्सरिक उत्सवासाठी कलकत्त्याला गेलो होतो. तिथून अलाहाबादला गेलो.... १४ नोव्हें. (१९२८) ला भाऊबीज होती. भगिनी जनाबाईचा ५१ वा वाढदिवस होता. त्यासाठी मी माझ्या प्रवासाचा प्रांत सोडून घाईने पुण्यास आलो होतो. हा वाढदिवस घरातच उपासना चालवून शांतपणे साजरा केला."[४]

अण्णासाहेबांच्या ह्या भगिनीप्रेमामागे, अण्णासाहेबांचे चरित्रकार ह. कि. तोडमल म्हणतात तद्वत– "स्वतःच्या सुखावर निखारे ठेवून जनाक्कांनी हयातभर सावलीप्रमाणे विठ्ठल रामजींना साथ दिली."[५] हे देखील एक महत्त्वाचे कारण होतेच.

जनाक्कांनी भावाला आयुष्यभर समाजकल्याणात्मक कार्यात तर साथ दिलीच पण उत्तरायुष्यात ते बिछान्याला खिळून होते, तेव्हाही त्यांची अमर्याद सेवा केलेली दिसते. श्री. रा. ना. चव्हाण पत्रात लिहितात–

"....अण्णासाहेबांच्या आजारपणात त्यांची जी व्यवस्था झाली ती जनाक्का ह्यांच्यामुळेच. अखेरपर्यंत अण्णांची उत्तम शुश्रूषा केली. घाणघुण लक्षात घेतली नाही. भावाचे दुःख कमी होण्यास त्याच कारण झाल्या. नाहीतर त्यागी व संन्यासस्वरूपी गृहस्थ एकत्र कुटुंबात जड होतो. म्हातारपणी.... जनाबाई नसत्या तर अण्णांच्या हालाला पारावार नसता."

शिंदे स्मृतिग्रंथाच्या प्रस्तावनेत संपादकपण लिहितात– "अण्णासाहेबांचा आम्हा महाराष्ट्रीयांस थोडा जास्त काळ सहवास लाभण्याचे सर्व श्रेय ह्या माऊलीस (जनाक्का) आहे, एवढेच सांगितले की पुरे."

हे वाचताना मनात प्रश्न येतो, की एकत्र कुटुंबात ही सेवा जनाक्कांच्याच वाट्याला का आली ? ती दोघं एकटी पडली होती का ?

रा. ना. चव्हाणांच्या शब्दातून तसे थोडेसे सूचित होतेच शिवाय ह्या पुस्तकाच्या निमित्ते नातेवाइकांच्या, परिचितांच्या मुलाखती घेतल्या त्यात त्यांचे जावई श्री. ए. के. घोरपडे म्हणाले– "जनाक्का विधवा. जन्मभर भावाकडे राहिल्या... कुरबुरी व्हायच्याच. पण शेवटी जनाक्कांना संभाळायला इतर नाखुष होते. पण शिंदे आपल्या बहिणीत अंतराय पडू देण्यास तयार नव्हते." अण्णासाहेबांचे वाईतील निकटचे सहकारी श्री. रा. कृ. बाबर ह्यांनीपण ह्याच वास्तवाचा उच्चार आपल्या मुलाखतीत केला.

एकूण जन्मभर परहितार्थ झटणाऱ्या ह्या बहीण-भावंडांस शेवटी सामाजिक व कौटुंबिक दोन्ही पातळ्यांवर उपेक्षित जीवन जगावे लागलेले दिसते.

सून म्हणून जनाक्कांच्या जीवनाचा विचार करता... त्या भाग्यवान दिसतात. त्या काळी सर्व परिचित असणारा 'सासुरवास' सुरवातीस तरी त्यांच्या वाट्याला आलेला दिसत नाही. सासरा तर शेवटपर्यंत त्यांच्या पाठीशी उभा राहिलेला दिसतो. सासूपण वाईट स्त्री दिसत नाही. जनाबाईंनी स्वतःच आपल्या आत्मकथनात, पुढे पुढे लेकामुळे त्या स्त्रीची मातृप्रेमापोटी कशी

अगतिक अवस्था झाली व त्या कशा बदलत गेल्या ह्याचे वस्तुनिष्ठ वर्णन केलेले दिसते.

'पत्नी' म्हणून त्या अपयशी ठरल्या. मुख्य दोष हा विषम जोडा जुळवणाऱ्या वडिलांकडे व भरीला तरुण मुलाचे मानसशास्त्र न जाणता सुनेचे भरपूर कौतुक करणाऱ्या सासऱ्याकडे जातो. त्याचे पण वर्णन तटस्थपणे जनाक्कांनी केलेले दिसते.

नवऱ्याची अनैतिकता व उर्मटपणा गर्हणीय असला तरी त्यांची पण कुचंबणा कशी होत होती ते पण जनाक्कांनी आत्मकथनातून स्पष्ट केलेले दिसते.

शेवटी एक स्त्री म्हणून, व्यक्ती म्हणून जनाक्कांविषयी उपलब्ध माहितीतून काय हातात पडते ते पहायचे आहे.

त्यांच्या जवळ राहिलेल्या, त्यांना पाहिलेल्या चव्हाण, मधाळे गुरुजी, घोरपडे, अण्णाप्पा काळे, रा. कृ. बाबर वगैरे वृद्धांच्या बोलण्यातून, पत्रातून जनाक्कांचे जे व्यक्तित्व उभे राहते, ते असे दिसते–

त्या काळ्यासावळ्या, नीटस, ब्राह्मणी वळणाच्या, सुशिक्षित होत्या. कानडी, मराठी, गुजराथी, इंग्रजी भाषा त्यांना अवगत होत्या. मराठी शुद्ध बोलत व लिहीत. इंग्रजी चांगले लिहिता, बोलता येत नसले तरी जाणत होत्या. तुकारामाची गाथा पाठ असून त्यावर कीर्तन करीत. गळा अतिशय गोड होता, त्यामुळे उपासनेत ओलावा येई.

अहिल्याश्रमात सुपरिंटेंडन्ट व शिक्षकीण अशी दोन्हीं कामे करत होत्या. श्री. चव्हाण लिहितात– "त्या अतिशय व्यवहारचतुर, प्रसंगावधानी, धीट, गंभीर होत्या. १९४४ साली शिंदे वारले... मी त्यांचा मानसपुत्र होतो.... त्यांच्या अंत्यदर्शनाला गेल्यावर मला रडे व दुःख अनावर झाले.... त्यावेळी जनाबाई मला म्हणाल्या... बाबूराव किती रडता ? मनाला आवर घाला– " त्यांनी धैर्याने शोक आवरला होता. भावाचा एकमेव आधार गेल्यावर त्या खूपच एकाकी पडल्या पण खचल्या नाहीत. मनाने पूर्णपणे अलिप्त व अनासक्त होऊन त्या कुटुंबात वावरत राहिल्या.

जनाक्का धूर्त पण शहाण्या होत्या. समाजकार्य करताना इतरांच्या कुटुंबात जाऊन चाणाक्षपणे सर्व परिस्थिती हेरत असत. मिशन वर्क ही संकल्पना हिंदुस्थानात नाही. पण जनाबाईंनी ख्रिस्ती मिशनऱ्यांप्रमाणे आपले वैधव्य व एकाकी जीवन, धर्माचे व अस्पृश्यता निवारणाचे कार्य करण्यात खर्ची घातले. 'सर्व मनुष्ये एकाच परमेश्वराची लेकरे आहेत म्हणून भेद न राखता परस्परांशी बंधुभावाने वागणे हे कर्तव्य आहे,' हे प्रार्थना समाजाचे तत्त्व त्यांनी पूर्णपणे आत्मसात केले होते. देवदेव, पूजाअर्चा, व्रतवैकल्य, उपासतापास त्या करत नसत. पण अहिल्याश्रमात सर्व हिंदू सण साजरे करत. त्या वेळी तोरण, रांगोळ्या काढवून घेत असत. शिंद्यांच्या आध्यात्मिक कार्यातही त्यांनी सतत साथ-सहकार्य दिले. अण्णांकडे येणारी केसरी, सुबोध पत्रिका, राष्ट्रवीर वगैरे सर्व वृत्तपत्रे त्या आवर्जून वाचत असत. शिवाय अण्णासाहेबांची स्वतःची लायब्ररी होती. त्याचा फायदापण त्यांनी घेतला. परंतु मुख्य म्हणजे विद्वानांची प्रवचने ऐकून त्या बहुश्रुत झाल्या होत्या.

त्या सभाधीट होत्या. स्त्रियांची कुचंबणा व बाजू त्या आपल्या भाषणातून मांडीत असत. स्त्रियांनी शिक्षण घ्यावे, ज्या स्त्रिया विधवा, परित्यक्त, दुःखी व कष्टी असत त्यांना त्या धीर देत. स्वतः पुनर्विवाह केलेला नव्हता तरी त्यांच्या विवाहासाठी धडपड करत. चव्हाण पुढे लिहितात– 'माझे एक मित्र लग्नाच्या पत्नीला घरीदारी दूर ठेवत. त्या दोघांमध्ये ऐक्य व्हावे म्हणून जनाक्कांनी प्रयत्न केला व पुढे त्यांचे ऐक्य झाले."

"माझ्या मोठ्या बहिणीला - ताराबाईला - लग्नानंतर, तिच्या नवऱ्याला रक्तपिती झाली आहे हे कळल्यावर आम्ही परत आणली. उपासना प्रसंगी भेट झाल्यास जनाक्का तिला धीर देत."

पुढे तिचा सोडचिठ्ठी मिळवून, दुसरा विवाहपण करून दिलेला दिसतो. अण्णासाहेबांचे दुसरे सहकारी बी. बी. केसकर ह्यांच्या विधवा भगिनीस, साळूबाईसपण जनाक्कांनी पनवेलला आपल्याजवळ ठेवून शिकवलेले आपण पाहिलेच आहे. पुढे ही साळूबाई, आपल्या मुलाच्या जोडीने शिक्षण पूर्ण करून मुंबईच्या शाळेत नोकरी करून स्वतःच्या पायावर उभी झालेली दिसते. पुढे तिनेही पुनर्विवाह केला. शाळेस (पार्ले टिळक विद्यालय) वक्तृत्व स्पर्धेसाठी देणगी देण्याइतकी ती सुस्थितही झाली. हे बी. बी. केसकरांच्या हस्तलिखित आत्मवृत्तावरून कळते.

चव्हाण पुढे लिहितात– "मात्र एखाद्या पुरुषाने पहिली बायको असताना तिच्या उरावर दुसरी केल्यास त्यांना मुळीच आवडत नसे. एखादा पुरुष स्त्रियांच्या तोंडाकडे पाहतो, असे दिसल्यास त्यांना फार राग येई."

त्यांचे जावई एकनाथराव घोरपडे जनाक्कांविषयी बोलताना म्हणाले–"बाई समाज-कार्य करणारी म्हणजे आपलीच मालमत्ता असे लोक मानतात. त्यामुळे तरुण विधवा जनाक्कांना पण ह्या वृत्तीचा त्रास भोगावा लागला. त्या मनाने कनवाळू असूनही प्रसंगी कडक वागत. त्यांचा चेहरापण कणखर होता. त्या म्हणत बाईने कडक राहिल्याशिवाय चारित्र्य टिकविणे कठीण असते. कदम नावाच्या एका गृहस्थाने बाईंशी अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला पण त्यांनी खंबीरपणे, आत पाय टाकलास तर पाय मोडून टाकीन असे त्यांना तडकावून वाटेस लावले.

आपल्यामागे बहिणींचे हाल नको म्हणून अण्णासाहेबांनी त्यांना पुनर्विवाहाबद्दल विचारले, परंतु त्यांनी अण्णासाहेबांना– 'मला तू ओळखले नाहीस का ? ते विचार मी सोडून दिले आहेत. मला संसार कर्तव्य नाही. यापुढे हा विचार बोलू नका.'– असे ठाम उत्तर दिले. त्या निग्रही तशाच स्वावलंबी वृत्तीच्या होत्या."

स्त्रियांच्या दुःखाविषयी त्यांची काय मते होती असे मी श्री. घोरपड्यांना विचारता ते म्हणाले– "जनाक्का समर्थ वृत्तीच्या होत्या. त्यांची धारणाच बंडखोर असल्याने योग्य वाटले ते कुणाला न भिता, त्या आचरत गेल्या. कुरकुर, तक्रार, दुःख करीत बसल्या नाहीत तसेच आम्हाला कुणी वाईट वागवतो– असे त्या मानतच नसत." पुढे ते म्हणाले– "जनाक्कांची भाषणांची शैली वैशिष्ट्यपूर्ण होती. त्या भाषणात म्हणी, वाक्प्रचार ह्यांचा उपयोग करत. त्यांची

भाषा घरगुती म्हणून काळजाला हात घाली तर महर्षींची आक्रमक भाषणे मेंदूला हात घालीत. अहिल्याश्रमात राहत असताना कुणी अस्पृश्य विद्यार्थी आजारी पडला तर त्या त्याला घरी आणून शुश्रूषा करत... गरीब अस्पृश्य विद्यार्थ्यांना वाराने जेऊ घालत." श्री. मघाळे जेव्हा प्रथम अहिल्याश्रमात रहावयास आले तेव्हाची ते आठवण सांगतात– "आम्ही एक-दोन विद्यार्थी बाईंची कामे जबाबदारीने करत असू. त्यामुळे त्यांचा आमच्यावर लोभ होता. घरी काही खायला केले की आम्हाला आणून देत. एकदा भाजीभाकरी आणून दिली. खाल्ल्यावर विचारले, कशी लागली ? आम्ही छान लागली म्हटल्यावर म्हणाल्या, 'मांगाच्या बाईनं केली होती.' अशा तऱ्हेने त्या आम्हाला जातिभेद मोडायला शिकवीत."

शिंदे बंधू-भगिनींच्या ह्या अस्पृश्योद्धार कार्याच्या परिणामाबद्दल बोलणारी सुबोध पत्रिकेतील 'गुजराथ आणि निराश्रित' ह्या नावाची ही बातमी पहा. बातमीदार म्हणतो– "महाराष्ट्रात जुन्नर, दापोलीसारख्या गावीदेखील या लोकांस (दलित) अस्पर्श मानणे सुज्ञ लोकांस गौण वाटू लागले आहे. इतकेच नव्हे, तर हे लोक निराश्रितांच्या सभा बोलावून त्यात राजरोस मिसळतात. मुंबई- पुण्यासारख्या शहरी तर सार्वजनिक दिवाणखान्यात होत असतात. त्याचे सर्व श्रेय निराश्रित सहाय्यकारी मंडळींच्या मानसिक धैर्याला आहे. यात शंका नाही. परंतु गुजराथेत एक-दोन शहरी या लोकांसाठी मुसलमान शिक्षकाने चालविलेल्या शाळा दिसतात..." इतर प्रांतांच्या तुलनेत महाराष्ट्र अधिक सुधारणावादी झालेला अनेकदा दिसतो. ह्याचे कारण 'इथे फुले जन्मले' हे जसे आहे; तसेच फुल्यांची विचारज्योत सरसावणारे शिंदे बंधू-भगिनीसारखे नवनवे प्रवर्तक जन्मले हेदेखील असावे असे दिसते. त्या काळातील सुप्रसिद्ध लेखिका आनंदीबाई शिर्के यांनी जनाक्कांविषयी आपल्या आत्मचरित्रात लिहिले आहे–

"विठ्ठल रामजी शिंदे यांनी मला काही दिवस आपल्या घरी रहायला नेले. त्यांच्या पत्नी रखमाबाई व भगिनी जनाबाई ह्या सुशिक्षित होत्या... जनाबाई तर मॅट्रीक झालेल्या होत्या. त्या काळात एवढे शिक्षण जुन्या वळणात राहून त्यांनी मिळवले, हे फार मोलाचे व महत्त्वाचे म्हटले पाहिजे. परंतु जनाक्कांना गर्व कसा तो बिलकुल नव्हता. ही शिंदे मंडळी अस्पृश्योद्धाराचे कार्य करीत असत... अण्णासाहेब शिंद्यांचे ठीक होते. पण ह्या स्त्रिया ? त्या महारमांगाच्या मुलांना आंघोळी घालीत. त्यांच्या उवा काढीत आणि त्यांना शिकवीत. अशी अंतर्बाह्य स्वच्छता व सुधारणा न कंटाळता, न किळसता त्या करीत, हे पाहून माझे मन आदराने भरून येई व वाटे आपण काय रांधा, वाढा, उष्टी काढा एवढेच जाणतो. आपल्या जिण्याला कसलेच मोल किंवा अर्थ नाही आणि ही माणसे खालच्या थरातील माणसांशी समरस होऊन वागतात. मी अगदी दिपून गेले. त्यांच्याबरोबर प्रार्थना समाजातही गेले होते... एकदा सहभोजनाचा योग आला. तेव्हा अण्णासाहेब शिंदे... व आणखी मराठा कुटुंबे या सहभोजनात निःसंकोचपणे भाग घेताना पाहून मला कौतुक वाटले. कुठे ही पुणेकर मराठ्यांची प्रगती आणि कुठे मुंबईकर मराठ्यांची संकुचित मनोवृत्ती !... समोर बसलेला स्त्री-पुरुष समाज स्वच्छ कपडे घातलेला नीटनेटका पाहून मी शंका सोडून त्या समारंभात समरस झाले. अण्णासाहेब शिंद्यांचे व त्यांच्या कुटुंबिय

मंडळींचे कार्य पाहून मला खरोखरच महारांच्या विठोबाचे दर्शन घडल्यासारखे वाटले !"[६]

त्या काळी सामान्यतः मुंबईतील समाज पुण्यापेक्षा अधिक सुधारणाप्रिय व पुरोगामी होत चालला होता. अशा वेळी मराठा समाजात मात्र वेगळे चित्र दिसते. हा शिंदे कुटुंबियांच्या कार्याचा प्रभाव असावा असे दिसते. श्री. रा. ना. चव्हाणांनी आपल्या टिपणात नमूद केले आहे, की 'बाबूराव जगताप, गणपतराव शिंदे व स्वतः मी, अण्णासाहेब व जनाक्का ह्या दोघांच्या संस्कारातूनच घडलो.'

वरील मराठा मंडळी ही उदारमतवादी, सुधारक, स्त्रीशिक्षणाची पुरस्कर्ती बनली होती हे त्या काळचा इतिहास वाचणाऱ्यांना ठाऊक आहे.

ह्याशिवाय शिकू लागलेल्या मराठा समाजातील स्त्रीवर्गावरही जनाक्कांच्या आयुष्याचा कसा प्रभाव पडत होता तेही ह्या उताऱ्यातून लक्षात येते. व्यक्तिगत जीवनाच्या पलीकडे पसरलेल्या तळागाळातल्या समाजाबद्दल आपली काही बांधिलकी आहे, ती स्वीकारण्याने जीवनाला खरी अर्थपूर्णता येत असते– ही नवी सहृदय जाणपण स्त्रियांच्या मनात प्रतिध्वनित होऊ लागलेली दिसते. श्री. कृ. भा. बाबरांच्या (त्या काळातील उदारमनस्क शिक्षणतज्ज्ञ) पत्नी राधाबाई बाबर ह्या जनाक्कांच्या बरोबर अस्पृश्योद्धाराचे कार्य करू लागल्या, असे श्री. चव्हाणांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे. वाईच्या श्री. रा. कृ. बाबरांच्या प्रथम पत्नी हौसाबाई पण ह्या कामी सहभागी झालेल्या दिसतात.

त्यांच्या ह्या कर्तृत्वाचे वर्णन करताना श्री. चव्हाण आपल्या लेखात लिहितात– "सावित्रीबाई फुले ह्यांच्यानंतर तत्सम कामगिरी बजावणारी दुसरी समाजसेवक स्त्री म्हणजे.. जनाक्का ह्याच होत."[७]

जनाक्कांच्या 'निराश्रित सहाय्यकारी मंडळीं'च्या शाळेत शिकण्याची संधी लाभल्याने खालच्या वर्गातूनही काही स्त्रियांना कर्तृत्व करण्याची संधी लाभलेली दिसते. मासिक मनोरंजनाच्या अंकात कु. शांताबाई दगडू शिंदे ह्या नीटनेटक्या तरतरीत मुलीचा फोटो पहावयास मिळतो. त्याखाली– 'अस्पृश्य वर्गातील असून दादाभाई नौरोजी शत सांवत्सरिक उत्सवानिमित्त झालेल्या निबंधाच्या चढाओढीत मराठी मुलींमध्ये पहिल्या नंबरचे बक्षीस मिळाले. ती कामाठीपुरा निराश्रित मुलींच्या शाळेत शिकत आहे.'[८] असा मजकूर आहे.

गांधीजींच्या राजकीय क्षितिजावरील उदयाच्या वेळीच शिंदे बंधू-भगिनीने अस्पृश्यवर्गात शिक्षणाची बीजे रोवून जागृतीची पृष्ठभूमी तयार करून ठेवली होती असे दिसते. सुबोध पत्रिकेतील ही एक आणखी बातमी पहा– 'येथिल निराश्रित सहाय्यक मंडळीने गेल्या फेब्रुवारी महिन्यात जो वार्षिक उत्सव केला त्यात ह. भ. प. बायजाबाई नावाच्या ज्या महार बाईची सुंदर हरिकिर्तने आम्हा मुंबईवासियांस ऐकावयास मिळाली'... पुढे त्यांच्या अकाली निधनाबद्दल खेद व्यक्त करून बातमीदार म्हणतो– 'ह्या साध्वीबाईंच्या कीर्तनाला हजारो लोकांची गर्दी जमत असे... (जागा नसल्याने पुष्कळांना परत जावे लागले. पाच हजारापैकी तीन हजार तरी खालच्या वर्गातल्या बायका आपल्या लेकरांना घेऊन श्रवणास

आल्या होत्या...) १८९० मध्ये हिचा जन्म झाला. मराठी चार इयत्तापर्यंत मिशनस्कूल (D.C.) पुणे येथे तिचे शालेय शिक्षण झाले होते."

अशा तऱ्हेने जातिभेदांची कुंपणे ओलांडून जनाक्कांनी दलित म्हणून उपेक्षिल्या गेलेल्या समाजातील स्त्रीवर्गाला आत्मविकासाच्या वाटा दाखवून दिलेल्या दिसतात. जनाक्कांनी जातिभेद जसा सहजपणे मोडलेला दिसतो तसाच धर्मभेद पण ओलांडून त्या पुढे गेल्या होत्या असे दिसते. घोरपडे म्हणाले– 'मरियम व सैयद ही बहीणभावंडं जमखिंडीपासून शिंदे कुटुंबियांची स्नेही. मुंबईस ह्यांच्याकडेच रहात... ह्यांच्या बरोबरीने काम करत. एकदा प्रार्थना समाजाच्या वार्षिकोत्सवात सैयद वाढायला लागले तर काही जुने प्रार्थना समाजिस्ट उठून गेले. सुबोध पत्रिकेत त्याचे वृत्त पण आले होते. (त्यांना वर्ष आठवेना).' जातिभेद, धर्मभेद ह्याप्रमाणे स्त्रीपुरुष भेदाच्या मर्यादा पण त्यांच्या आचरणावर दडपण घालताना दिसत नाहीत. घरी आल्यागेल्या सर्वांचे आगत स्वागत, क्षेमकुशल त्या न लाजता, न संकोचता करत असत. कर्मवीर भाऊराव पाटलांपासून तो घरी येणाऱ्या स्पृश्यअस्पृश्य कार्यकर्त्यांपर्यंत सर्वांशी त्या सहज मोकळेपणाने वागत. किंबहुना महर्षी शिंद्यांपर्यंत जायला भिणारे लोक जनाक्कांच्या द्वारेच आपली कामे शिंद्यांपर्यंत पोहोचवीत असत.

सुबोध पत्रिकेत वाई प्रार्थना संघाचा दुसरा वर्षिक अहवाल देताना श्री. यजेश्वरपंत भांडारकर लिहितात– "वाईहून मी पुण्यास आलो... शिंदे यांनी मला अहिल्याश्रमातील D.C. Misson दाखवले... त्यांच्या येथे फार प्रेमळपणाचा लाभ झाला. त्यांच्या भगिनी श्री. जनाबाई ह्या किती प्रेमाने माझी विचारपूस करीत."[१०]

जनाक्कांच्या व्यक्तिमत्वाचा आणखी एक पैलू म्हणजे त्यांचे लेखन कौशल्य. जनाक्कांनी स्वतंत्रपणे काही लेखनही केलेले आढळत नाही. तथापि, त्यांच्या आत्मकथनात त्यांनी जी काही व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत, जी खेळकर पण समर्पक शैली वापरली आहे, ती लक्षणीय वाटते.

जनाक्कांनी आपल्याला आपल्या शैक्षणिक कालखंडात भेटलेले काही शिक्षक, मैत्रिणी, हुजुरपागेतील 'मदर' किंवा कार्याच्या सुरवातीस भेटलेल्या काही स्त्रियांची व्यक्तिचित्रे वा कथा रेखाटल्या आहेत.

त्यांनी रंगवलेले आपल्या वडिलांचे व्यक्तिमत्व, थोडक्या शब्दांत वडिलांची सर्व वैशिष्ट्ये, आगळेवेगळेपण ठसवून जाते. सासरच्या बालपणीच्या क्रीडा, भांडणे यांचेपण खुसखुशीतपणे वर्णन केलेले आढळते. एका मास्तरांचे वर्णन करताना त्या लिहितात– "तिसरीत आम्हाला गणित व व्याकरण शिकवायला रावजी काणे नावाचे म्हातारे शिक्षक होते. गृहस्थ मोठा रंगेल. 'झळकफळक' कपडे घालून, अत्तर लावून, पान, तंबाखू चघळत वर्गावर यायचे. कृष्णा मांढरे नावाच्या एका कसबिणीचा एके रात्री खून करून, ही स्वारी आमच्या वर्गात साळसूदपणे दुसऱ्या दिवशी येऊन बसली होती. शाळेत जाताना कृष्णा मांढरेच्या दाराशी सरकारी शिपायांची गर्दी पाहून मी व माझ्या इतर मैत्रिणी शाळेत जाण्याचे सोडून

गंमत पह्यत उभ्या राहिलो." पुढे उशीराने शाळेत गेल्यावर छडी परजीत मास्तर कसे अंगावर धावून आले, मग आपण कृष्णा मांढरेच्या खुनाचे व तपासणीचे कसे चटकदार वर्णन सरांना सांगितले, ते ऐकताना मास्तरांची कशी भंबेरी उडाली ह्याचे मोठे तपशीलवार व रंगतदार वर्णन जनाक्कांनी केले आहे.[११] संवादमय असे हे वर्णन वाचताना ह्यातून जनाक्कांच्या लेखनाच्या शैलीबरोबरच त्या काळातील वरिष्ठ समाजाचे, नीतिमत्तेचे व ब्रिटिश न्यायव्यवस्थेचे पण वाचकाला दर्शन घडते.

हुजुरपागेत असताना भीमा मोरे नावाची एक मुलगी होती. तिचे वर्णन जनाक्का करतात–

"भीमा रूपाने कुरूप काळी. अष्टांग वक्राची बहीण शोभावी अशी शरीराने वक्र. तर कुरूपपणात इसापची बहीण शोभेल अशी. पण बुद्धीने तल्लख, मनमिळावू, विनोदी, खेळकर असून वाटेल त्या व्यक्तीची हुबेहुब नक्कल करून आमची करमणूक करत असे. खेळात निपुण अशी भीमा सर्व शिक्षकांची लाडकी होती."

कृष्णाबाई, यमुनाबाई केळवकर, गुलाबबाई जव्हेरे वगैरे त्यांच्या शालेय मैत्रिणी होत्या. ह्यातील गुलाबबाई जव्हेरे पुढे प्रार्थना समाजाचे थोर उपासक व सुबोध पत्रिकेचे संपादक द्वा. गो. वैद्य ह्यांच्या पत्नी झाल्या. त्यांची दुसरी एक गुलाबच नावाची चुलत बहीण होती. ह्या गुलाबविषयी जनाक्का सांगतात– "ही गुलाब जव्हेरे फार शांत स्वभावाची, सावळीच पण मोहक चेहेऱ्याची असून दिवसातून तीन-चार वेळातरी तोंडाला पिअर्स साबण लावीत असे. ह्यामुळेच भीमाने तिच्यावर एक विनोदी कडवे रचले होते. ते ती आम्हा मुलींदेखत मोठ्या ठसक्याने व ठेक्यात म्हणे–

ओ गुलाब माय डिअर। तोंडाला लाव पिअर
हो गोरी। सकाळच्या पारी ॥

आम्हा मैत्रिणींची जेव्हां जेव्हां गाठभेट पडते तेव्हां आम्ही सर्वजणी गुलाबची ही थट्टा आठवून हसतो."[१२] सईबाई परांजपे–रँग्लर परांजप्यांची पुढे झालेली पत्नी– सीताबाई परांजपे हिचे तर अतिशय सुंदर चित्र जनाक्कांनी उभे केलेले आढळते. त्या लिहितात–"सई व तिची आई यशोदाबाई जोशी दीराच्या* सांगण्यावरून हुजुरपागेजवळच्या ट्रेनिंग कॉलेजात शिक्षण घेत होत्या. दोघी हुजुरपागेत रहात. सई विलक्षण हुशार, चुणचुणीत, पण खेळकर व थट्टेखोर होती. आईने अभ्यास झाला का असे विचारले की सई खेळता खेळताच 'केव्हांच झाला आहे ग' असे उत्तर द्यायची. सदान् कदा खेळत असलेली सई आपल्या अभ्यासात हुशार कशी असू शकते ह्याचे आम्हाला कोडेच होते. अभ्यासातील अडचणी विचारायला इतर मुली सईजवळ जात तेव्हा ती खेळात रमलेली किंवा काहीतरी फालतू कामात गर्क असतानाही अचूक उत्तरे देऊन त्यांच्या शंका निरसन करीत असे.

* हे दीर म्हणजेच सुप्रसिद्ध गोपाळराव जोशी.... आनंदीबाई जोश्यांचे पती. स्त्रीशिक्षणाचे पुरस्कर्ते म्हणून बायकोप्रमाणे वैनीला पण शिकण्याचा आग्रह केलेला दिसतो.

"एकदा एप्रिल महिन्याच्या १ ल्या तारखेला... एप्रिल फूल करण्याचा प्रघात आमच्या मदरनीच पाडल्याने सईच्या डोक्यात 'मदर'नाच एप्रिल फूल करावे असा विचार आला... आम्ही मदरना वचकून असलो तरी सईचे सारेच अचाट... तिने आपल्या सोनी व सुवार्ता डेव्हिड नावाच्या ख्रिश्चन मैत्रिणींसमवेत मदरना एप्रिल फूल करण्याचा घाट घातला. शाळेतील गायनाच्या हॉलमध्ये सापाप्रमाणे दिसणारी वेडीवाकडी काळी कुळकुळीत काठी ठेवली. तिच्या टोकास बारिक काळा धागा बांधून त्याचे टोक हॉलच्या खिडकीबाहेर सोनीच्या हातात दिले. ती जेव्हा धागा ओढी तेव्हां ती काठी हलून कंदिलाच्या प्रकाशात सापाची छायाच हललेली दिसत असे. ह्या कटात शाळेच्या भय्याला पण तिने सामिल करून घेऊन, 'आम्ही बोलवीपर्यंत इकडे येऊ नको' म्हणून सांगितले होते. पुढे सईने कसा साप साप म्हणून ओरडा केला, मुली कशा भेदरल्या, मेट्रन पण कशा घाबरल्या, जिकडे तिकडे कसा कल्लोळ माजला, मग मुद्दाम मदरच्या कानावर हे घालून त्यांना कसे आणले, त्या कशा भय्याच्या नावाने आरडाओरडा करू लागल्या, स्वत: दुरून साप पाहून कशा गांगरल्या, लटलटू लागल्या—ह्याचे साद्यंत चित्रमय वर्णन जनाक्कांनी केले आहे. मुलींच्या तोंडचे संवाद तर फारच गमतीदार व वास्तवपूर्ण लिहिले आहेत. शेवटी सईने मदरना सर्व गंमत सांगून आपण त्यांना एप्रिल फूल केल्याचे सांगितले. सईच्या आई यशोदाबाई आता मदर किती रागावेल म्हणून भयभीत झाल्या होत्या." पण जनाक्का सांगतात- "त्यांनी सईला आनंदातिशयाने छातीशी धरून, तिच्या कल्पनेची प्रशंसा करीत, तिची पाठ थोपटत म्हटले- 'यस् मिस जोशी, नो डाउट आय ॲम अ ग्रेट फूल.' आणि सई तरी किती हजरबाबी ! ती पटकन् म्हणाली- 'Mother I am grateful too; as you did not lose your temper on being so fooled.' दुसऱ्या दिवशी मदरने सर्वांसमक्ष सईला एक छानदार गोष्टीचे पुस्तक दिले. पुढे रँगलरांची पत्नी झाल्यावरही ती माझ्याशी पूर्वीच्याच स्नेहभावाने सलगीची वृत्ती ठेवून वागत असे. एकदा 'शिग्राम' (बैलाचा छकडा) पाठवून तिने मला घरी बोलावून नेले होते. रघुनाथरावांना ती 'अप्पा' या नावाने संबोधित असे हे मला ठाऊक नव्हते. मी तिला विचारले, 'हे कोण ग अप्पा ?' तर 'अप्पा होय ? अप्पा माझे मित्र आहेत' खोडकर हास्य मुद्रेवर आणत सईने उत्तर करताच मी बुचकळ्यात पडले. तेव्हा सईने मोठ्याने हाक मारली. 'अहो अप्पा थोडं आत या बघू' आणि पहाते तो अप्पा दुसरे तिसरे कोणी नसून खुद्द रघुनाथरावच आत आलेले. माझ्या मनात विचार आला की आमची सई पूर्वी जशी थट्टेखोर व खेळकर होती तशीच अजूनही आहे तर !"[१३]

जनाक्कांनी वर्णिलेले हे सीताबाईचे शाळकरी रूप वाचताना त्यांची कन्या शकुंतलाबाई परांजपे व नात सई परांजपे ह्यांच्या हुशारी, खेळकरपणा, स्वतंत्र वृत्ती व धीटपणा—ह्या वैशिष्ट्यांचा उगम सापडल्याचा आनंद मिळतो.

शांता सुखटणकरची कथा आपण थोडक्यात पाहिली आहे. मूळ कथनात जनाक्कांनी ती चित्रमय शैलीत, प्रसंग डोळ्यापुढे उभे करत, असहाय्य स्त्री जीवनावर भाष्य करत व स्वत:ची मन:स्थिती रंगवत हृदयस्पर्शी भाषेत आपल्या पुढे साकार केलेली दिसते.

महर्षी शिंदे जेव्हां धर्मशिक्षणासाठी इंग्लंडला गेले;तेव्हां त्यांच्या आईवडिलांनी आपला

अपेक्षाभंग मनात दडवून मोठ्या मनाने त्यांना निरोप दिलेला दिसतो. तो प्रसंग चार-दोन वाक्यांत जनाक्का कसा रंगवतात व वाचकाला गलबलून टाकतात ते पहा–

"बॅलार्ड पिअरवर आम्ही अण्णांना निरोप देण्यासाठी आलो असताना माझ्या आईबाबांनी मोठ्या प्रयासाने आपले पुत्रवियोगाचे दुःख आवरून धरले. खिन्न चेहेऱ्याने ते पहात राहिले. कोणी म्हटले इथे उभे रहा तर राहिले. तिकडे चला म्हटले, तिकडे गेले असा प्रकार चालला होता. अण्णांना घेऊन जाणारी बोट हलली तेव्हां थरथर कापत असलेल्या आईने स्वतःशीच उद्गार काढले– बाळा, तू पोटात असताना मला जसे फिरल्यासारखे व्हायचे तसेच आत्ताही पोटात फिरल्यासारखं होतय रे !"[१४]

जनाक्का पनवेलला असताना त्यांना मदत करणाऱ्या शेजारच्या सहृदय मुसलमान गृहस्थाचा उल्लेख आपण वाचलेला आहे. त्यांच्या मुलीच्या लग्नातला गमतीदार प्रसंगपण जनाक्कांनी छान रंगवला आहे. त्या लिहितात–

"हे गृहस्थ सुखवस्तू व सज्जन. त्यांच्या मुलीचे लग्न होते. लग्न खूप थाटात झाले. आम्ही लग्नात सहभाग घेतला. दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांच्या घरातून मोठमोठ्याने रडण्याचा आवाज येऊ लागला. आम्हाला कळेना काय झाले, काही बरेवाईट झाले की काय अशी भीती मनात डोकावली. मग चवकशी करता कळले, की नवऱ्या मुलाला झोपेत कामाची सवय होती. रात्री मुलगा सवयीने उठून झोपेत सामान आवरू लागला. बिछान्याची वळकटी सुद्धा त्याने बांधली. वधू बिचारी घाबरून गेली. रात्री त्यांना त्यांच्या खोलीत धाडल्यावर रूढ पद्धतिनुसार इतरांनी बाहेरून कडी घातली होती. त्यामुळे तिला काय करावे कळेना. ती कोपऱ्यात घाबरून सारा प्रकार पहात बसून राहिली. सकाळी कडी काढताच हंबरडा फोडून आईच्या गळ्याला मिठी मारून रडू लागली... मागाहून हा प्रकार कळला. नवरा खजील झाला. त्याने आपल्याला व्यसन वा वैगुण्य काही नाही, ही जन्मतः खोड असून इलाज करूनही नाईलाज झाल्याचे दीनवाणीने सांगितले. म्हणूनच पहिली पत्नी नांदत नव्हती हे पण कबूल केले. शेवटी नवरीकडच्या लोकांनी संयम राखून प्रारब्धावर हवाला ठेऊन मुलीला नवऱ्याच्या घरी पोहोचती केली. हा प्रकार ध्यानात आल्याने केवळ हिंदू लग्नसंस्थाच दूषणपूर्ण आहे, अशी जी हाकाटी केली जाते तिचा फोलपणा कळून येऊन यच्चयावत लग्नसंस्थाच किती चमत्कृतिपूर्ण आहे असा विचार मनात घोळू लागला.

"पुढे ती दोघं सुखाने नांदली. पण वधू भेटल्यावर, नवऱ्याच्या झोपेतल्या फिरण्याच्या सुरस, अरेबियन नाईट्सइतक्या चमत्कृतिपूर्ण कथा ऐकवून करमणूक करायची. नवऱ्याचा मुंबईतच धंदा असल्याने भेटी व्हायच्या. 'जग हे असे आहे' ह्या नावाच्या ह. ना. आपट्यांच्या कादंबरीच्या नामाभिधानाची सार्थकता पूर्णत्वाने कळून येई."[१५]

जनाक्कांच्या ह्या लेखनातील इसाप, अष्टांगवक्र, अरेबियन नाईटस्, ह. ना. आपटे इ. च्या जाता जाता केलेल्या उल्लेखातून जनाक्कांचे वाचन विविध प्रकारचे होते हे लक्षात येते. ह्या ओघात जनाक्कांनी आपला आणखी एक अनुभव रंगवला आहे. त्या लिहितात–

"पुण्यात डॉ. मॅन ह्यांच्या संस्थेमार्फत अनाथ असहाय्य पतित स्त्रियांना त्यांच्या अधोगतीपासून वाचवून सन्मार्गास लावणे ह्यासाठी संस्थेत रखमाबाई पापरकर नावाची बाई ठेवली होती. पुण्यात जत्रा, कथा-किर्तने या सारख्या ठिकाणी ती फिरत असे. तिथे अनेक प्रकारच्या बायका जमत. त्यांच्या बोलण्यावर ती लक्ष ठेवी. या मेळाव्याच्या ठिकाणी काही बायका पळवून, फूस लावून आणलेल्या तरुणी, विधवा, गरती वा पतित स्त्रिया, ह्यांच्या देवघेवीविषयी गुप्तपणे बोलणी करत. ती ऐकून अशा असहाय्य स्त्रियांची माहिती मिळवून ती आणी व त्यांच्याच संस्थेतील खान नावाच्या मुसलमान अंमलदाराला ती कळवीत असे. मग तो अंमलदार पोलिसांच्या मदतीने अशा स्त्रियांना सोडवून पुण्याच्या आमच्या मिशनमध्ये वा पंढरपुरातील आश्रमात पाठवले जाई.

"एकदा वेणू नावाची एक बाई अशीच आमच्या पुण्याच्या मिशनमध्ये आली. मिशनमध्ये स्त्रियांना ठेवून घेण्यास जागा नसल्याने आम्ही प्रार्थना समाजाच्या सभासदांना कळवून कुणाकडे तरी रहायची व्यवस्था करीत असू. श्री. द्वा. गो. वैद्य, डॉ. काशीबाई नवरंगे, गिरीजाशंकर त्रिवेदी वगैरे मेंबरांकडे अशा मुली ठेवल्या जात. मग त्या मेंबराने तिला शिकवून, वळण लावून योग्य वर बघून प्रार्थना समाजाच्या संमतीने विवाह करून द्यायचा, अशी पद्धत होती. पुण्याच्या मिशनप्रमुख मुदलियारांनी वेणूची सोय बघायला अण्णांना सांगितले. अण्णांनी प्रार्थना समाजाला कळविले. तेव्हा समाजाने दुसरी सोय होईपर्यंत तुमच्याकडेच ठेवा असे कळविले. आम्ही वेणूला घरी ठेवून घेतली, शाळेत घातली. वेणू हुशार, कामसू, अंग मोडून उत्साहाने काम करायची. मनमिळावू पण होती. परंतु एके रात्री ती (जवळच रहाणाऱ्या किडकिडीत आजारी मोटर ड्रायव्हरच्या प्रेमात पडून) पळून गेली. अण्णा परगावहून थकून आलेले होते म्हणून मीच रात्री तिची खूप शोधाशोध केली. तेव्हां तिचा पत्ता समजला. दुसरे दिवशी ती घरी आली. तिला समजावले. 'तुला लग्न करायचे होते तर आम्हास का नाही सांगितलेस ? आम्ही चवकशी करून योग्य वाटता तर तुझे लग्न लावून दिले असते.' त्यावर ती म्हणाली, 'तुम्ही ह्या मुलाशी लग्न लावून देणार नाही. ह्या भीतीने मी पळून गेले.' आम्ही तिची रवानगी प्रार्थना समाजात केली. पण तिथून पंढरपूरला जाईपर्यंत तिने चोरून त्या ड्रायव्हरशी संबंध ठेवलाच होता असे कळले."[१६]

वरील कथा सविस्तर देण्याचे कारण म्हणजे त्यातून त्या काळातील पुण्यातील समाज जीवनाचे विशेषतः स्त्री जीवनाचे भेदक दर्शन घडते. धार्मिक व सामाजिक अमानुष रूढींमुळे स्त्रियांच्या वाट्याला येणारे दुःखी जीवन, त्यातून त्यांची शरीरधर्माला बळी पडून होणारी अपरिहार्य अवनती, त्यांच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन चालणारा स्त्रियांचा व्यापार, तोही कथा-किर्तनासारख्या धार्मिक व सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्यांच्या मेळाव्यात व अशाही परिस्थितीत निस्वार्थपणे ह्या स्त्रियांना वाचवण्यासाठी धडपडणारा वर्ग व त्याची मर्यादा– ह्या सर्वांचे दर्शन ह्या छोट्याशा हकीगतीतून जनाक्कांनी घडवलेले दिसते. ७०-८० वर्षांपूर्वी स्त्रियापण अशा व्यवसायात सामील होत्या ही माहिती धक्कादायक आहे. अशा प्रकारे लेखणीचे सामर्थ्य असूनही पूर्ववयात समाजकार्य व उत्तरवयात डोळ्याचे अधूपण ह्यामुळे

बहुधा जनाक्कांच्या हातून काही स्वतंत्र लेखन निर्मिती झालेली दिसत नाही.

भावाच्या मृत्यूनंतरचे जनाक्कांचे जीवन जवळ जवळ अंधारातच गेल्यासारखे दिसते. एकेक करीत बहुतेक कार्यक्षेत्रातून त्या बाजूला पडत गेल्या. पुणे येथील प्रार्थना समाजाच्या वार्षिक महोत्सवांना तेवढ्या जात असाव्यात, असे दिसते.

अशा विफल अवस्थेतच १९५६ मध्ये त्यांना मृत्यूने भयानक रीतीने गाठलेले दिसते. त्याबद्दल नातेवाइकांनी सांगितलेली हकीगत अशी- त्यांच्याच घरात मट्टू आडनावाचे एक काश्मीरी तरुण जोडपे रहात होते. २७ एप्रिल १९५६ रोजी स्टोव्ह पेटवताना गौरीदेवी मट्टू ह्या पेटल्या आणि धावत सुटल्या. त्यांना वाचवण्याच्या प्रयत्नात जनाक्कापण भाजल्या गेल्या. दोघींना तत्काळ ससून इस्पितळात नेण्यात आले. पण गौरीदेवी तर गेल्याच पण जनाक्काही दुसरे दिवशी वारल्या. त्यांना बघायला येणाऱ्या डॉक्टरांना त्या शेवटपर्यंत- 'गौरीला आधी बघा. ती तरुण आहे. मी काय आता म्हातारीच झालेय'- असे सांगत होत्या, असे सांगण्यात आले.

नेमक्या त्या दोन दिवसांत पुणे प्रार्थना समाजाचा वार्षिकोत्सव चालू होता. १ त्या दिवशीच्या श्री. रा. कृ. बाबरांच्या उपासनेला 'मला ने' अशी त्यांनी भाच्यास विनंती केली होती. पण ते घडलेले दिसत नाही. मृत्युसमयी त्यांचे वय ७८ वर्षांचे होते. त्यांच्या मृत्यूनंतर, अण्णासाहेबांच्या प्रमाणेच, प्रार्थना समाजाच्या पद्धतीने प्रार्थना होऊन त्यांना अग्नी देण्यात आला, असे प्रार्थना समाजाचे एक उपासक श्री. जोग म्हणाले.

अशा रीतीने त्यांची एकाकी व कष्टमय जीवनयात्रा निमूटपणे विस्मृतीच्या अंधारात विलीन झालेली दिसते.

१३ मे १९५६ च्या सुबोध पत्रिकेत त्यांच्यावर विमला गद्रे यांचा एक छोटेखानी मृत्यूलेख आलेला दिसतो. त्यात 'आपल्या मधुर रसनेने परमेश्वराचे नामगान करून अतुल जीवनाचे सार्थक केले,' असे म्हटले आहे. तसेच प्रार्थना समाजाचे त्यावेळचे अध्यक्ष व्ही. के. जोग लिहितात- 'अस्पृश्यात काम करण्यास कोणी धजत नव्हते, अशा काळात त्यांच्यात मिसळून काम करताना मी त्यांना पाहिले आहे.'

तसेच वाई प्रार्थना समाजाने दुखवट्याचा ठराव मांडलेला आढळतो. त्यात म्हटले आहे- '...त्यांनी दुसऱ्याचा प्राण वाचविण्यासाठी आपण स्वतः अग्निज्वालात उडी टाकून अखेर क्षणापर्यंत सेवाधर्मात आयुष्य घालविले.'

ह्या व्यतिरिक्त त्यांच्या मृत्यूची दखल इतर कोणत्याही वृत्तपत्राने वा संस्थेने घेतलेली मला आढळली नाही.

अशा तऱ्हेने ह्या कर्मयोगिनी स्त्रीच्या जीवनाची अखेर अतिशय करुणपणे व अलक्षितरित्या झालेली दिसते. अशा वेळी अण्णासाहेबांचे चरित्रकार ह. कि. तोडमल यांनी केलेल्या विधानाचे स्मरण होते... ते लिहितात- "समाज सुधारणेच्या सागरमंथनातून उद्भवलेल्या अनुभवाचे हलाहल अण्णासाहेब आणि जनाक्कांनी निमूटपणे पचविले."[१७]

* *

# संदर्भ सूची


१. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे जन्मशताब्दी स्मृतिग्रंथ : (१९७४), पृष्ठ २३

२. महर्षी वि. रा. शिंदे यांची रोजनिशी:(१९७९), संपादक डॉ. गो. मा. पवार

३. कित्ता : पृष्ठ २६, ३७, ११ मे व १९ जुलै १९९८, (प्रस्तावना पृष्ठ २५)

४. माझ्या आठवणी व अनुभव: कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, पृष्ठ ३९७

५. महर्षी शिंदे: ह. कि. तोडमल, पृष्ठ ३५

६. सांजवात: आनंदीबाई शिर्के (१९७२), पृष्ठ १९१-९२

७. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे : जन्मशताब्दी स्मृतिग्रंथ, (१९७४), पृष्ठ २३

८. मासिक मनोरंजन: नोव्हेंबर १९२५

९. सुबोध पत्रिका: २७ ऑगस्ट १९११

१०. कित्ता : २ जून १९३५

११. स्मृतिचित्रे : जनाक्का शिंदे तरुण महाराष्ट्र, २१-१-४९

१२. कित्ता : जनाक्का शिंदे, तरुण महाराष्ट्र , २०-५-४९

१३. कित्ता : २७-५-४९

१४. कित्ता : १७-६-४९

१५. कित्ता : २४-६-४९

१६. कित्ता : २३-१२-४९

१७. महर्षी शिंदे : ह. कि. तोडमल, पृष्ठ ७१

# समारोप

जनाक्का शिंदे यांचे जीवन व व्यक्तिमत्त्व ह्याचा आतापर्यंत आपण आढावा घेतला. त्यावरून काही प्रश्न व निष्कर्ष आपल्या हातात येतात.

जनाक्कांचे बालपण वगळता जवळ जवळ सर्व आयुष्य कष्टात व थोडेफार दुर्दैवात गेलेले दिसते.

बालपणी घरी दारिद्र्य असले तरी घरच्या कौतुकाच्या व मोकळ्या वातावरणाचा, उदारमनस्क सहृदयी संस्कारांचा त्यांच्या घडणीत खूप प्रभाव पडलेला दिसतो. जातिभेद, धर्मभेद ह्या संकल्पना मनात शिरण्यापूर्वीच ही भावंडे त्या पलीकडे गेलेली होती. पं. रमाबाई-प्रमाणे जनाक्कांना पण वडिलांमुळे शिक्षणाचा लाभ झाला. त्या काळी सुखवस्तू मराठा समाजातसुद्धा मुलांमध्ये शिक्षणाची ओढ व गोडी फारशी दिसत नाही. पण वडील व भाऊ दोघांच्या सहवासात जनाक्कांची हुशारी व शिक्षणाची गोडी विकसित होत गेलेली दिसते. घरात ब्राह्मणी वातावरण, वडिलांचे व भावाचे ब्राह्मण मित्र असल्यामुळे दोन्ही भावंडांत पुढे चळवळीत ब्राह्मणद्वेष दिसत नाही. उलट जाती-जातींत दऱ्या पडू नयेत ही त्यांची धडपड होती. पण कदाचित त्यामुळेच नव्या बदलत्या जमान्यात ते निष्प्रभ होत गेले असावेत.

जनाक्का बालपणी घरात मुलाप्रमाणे वाढवल्या गेलेल्या दिसतात. वडिलांच्या लाडक्या पण दिसतात.* बालपणाच्या, शाळेतील खोड्यांतून त्यांचा धीट व कणखर स्वभाव पण जाणवत राहतो. घरकामाचा स्वभावतः थोडा कंटाळाच असावा असे वाटते. तशात भावाबरोबर व त्याच्या मित्रांमध्येसुद्धा, खेळण्या-वावरण्यामुळे मूळच्या हूड व धीट स्वभावाला स्त्री-पुरुष भेदभावनेचे व संकोचाचे कुंपण पडले नसावे असे वाटते.

घरच्या दारिद्र्यामुळे कष्टांची सवय झालेली होती. तसेच आईच्या प्रभावामुळे, असेल

---

* आपण अभ्यासिलेल्या सर्वच स्त्रिया (पं. रमाबाई, रमाबाई रानडे, ताराबाई शिंदे) आपापल्या वडिलांच्या खास लाडक्या होत्या असे दिसते.

त्या परिस्थितीत समाधान मानण्याची वृत्तीपण घडत गेली असावी, असे वाटते.

लग्नानंतर झालेली जनाक्कांच्या जीवनाची परवड पाहता लग्न ठरविताना दूरदृष्टीचा अभाव जाणवतो.

स्वतंत्र विचाराचे, निर्भीड व बाणेदार असे वडील लाभूनही त्यांच्या लग्नाबाबत मात्र नीटसा विचार झालेला दिसत नाही. परंपरेनुसार चांगले व माहितीचे सुखवस्तू घराणे फक्त पाहण्यात आलेले दिसते. ह्या विषम विवाहामुळे जनाक्कांच्या लग्नाची शोकान्तिका झालेली दिसते. जनाक्कांच्या जिवाला सासरी धोका आहे हे कळूनसुद्धा त्यांचे वडील, 'ज्यांच्याशी जन्माची गाठ त्याच्याकडे पाठवूया'— असे म्हणतात तेव्हा आश्चर्य वाटते. 'जन्मगाठ' ही संकल्पना भारतीय मनात इतकी खोल रुजलेली दिसते की सहृदय, बाणेदार, स्वाभिमानी अशा रामजीपंतांना सुद्धा ती तोडण्याची शक्यता स्वीकारता आलेली दिसत नाही. तसेच सासरची माणसे चांगली असूनही स्त्रीचे फुलणे, प्रभावशाली होणे ही कल्पना, त्यांच्या पुरुषप्रधान मानसिकतेत बसू शकलेली नाही. त्यासाठी संसार विस्कटवण्याचीसुद्धा त्यांची तयारी दिसते. ह्या शोकांतिकेबावत वडील, सासरा वा पती ह्या कुणालाच जनाक्का दोष देताना दिसत नाहीत. इतकेच नव्हे, तर एकूण आपल्या लग्नसंस्थेविषयी पण त्या काही प्रश्न उभे करताना दिसत नाहीत. इथे ताराबाई शिंद्यांनी स्वानुभवावरून आपल्या लग्न ठरविण्याच्या पद्धतीविषयी उपरोधाने केलेले लिखाण आठवते. मात्र पनवेलच्या लग्नप्रसंगाच्या आठवणीवरून— लग्न संस्थेतील दोषाविषयी त्यांच्या मनात विचार चालत असत— असे दिसते.

असे जरी असले, तरी जनाक्कांचे व्यक्तित्व परिस्थितीशी दोन हात करीत ताठ उभे असलेले जाणवते. स्त्रीची शारीरिक व मानसिक दुबळेपणाची प्रतिमा त्यांनी खोडून काढलेली दिसते. जमखिंडी सोडून आल्यावर पुण्याच्या वास्तव्यातील व हुजुरपागेच्या वसतिगृहातील घडलेले प्रसंग त्यांच्या स्वाभिमानी, निर्भय व प्रसंगावधानी वृत्तीचे दर्शन घडवितात. वसतिगृहातील शांता सुखटणकरची सर्वच कहाणी, जनाक्कांच्या मनातील दुर्दैवी स्त्री-जातीविषयीची कणव व त्या दुर्दैवाशी झगडा देण्याची जिद्द, चिकाटी दाखवून जाते. एकंदरीतच त्यांच्या व्यक्तिमत्वात रडवेपणा, कुढेपणा, दुबळेपणा वा self-pity ची भावना दिसत नाही. नवऱ्याला सोडून, भावाच्या पाठिंब्यावर त्या कणखरपणे समाजकार्य करीत जगल्या. त्यांनी स्वेच्छेने पुनर्विवाह नाकारला. व्यक्तिगत जीवनाच्या पलीकडचा, अर्थपूर्ण जीवनाचा मार्ग त्यांनी निवडला. पुरुषप्रधानतेशी झगडा न मांडताही पुरुषात सहजपणे बरोबरीच्या नात्याने वावरल्या. कर्मठ व पडदानशीन मराठा समाजात त्यांच्यामुळे स्त्रिया व दलितविषयक उदार दृष्टिकोनाचा थोडासा का होईना पण शिरकाव झालेला दिसतो. शिंद्यांच्या समकालीन पां. चि. पाटील (शेतकीतज्ज्ञ), भाऊराव पाटील (शिक्षण महर्षी), भास्करराव जाधव (शिक्षण मंत्री), श्रीपतराव शिंदे ('विजयी मराठा' कर्ते) इ. जी पुढारलेली बुद्धिवादी मराठा मंडळी पुढे आली त्यात कुणाच्याही घरची कुणी स्त्री जनाक्कांप्रमाणे क्रियाशील होऊन पुढे आलेली दिसत नाही. जनाबाई रोकडे— हे एकमेव नाव जनाक्कांच्या जोडीने त्या काळात ऐकू येते. जनाक्कांच्या नंतर मात्र श्रीमती आनंदीबाई शिर्के, राधाबाई व माणिकताई बाबर, ताराबाई चव्हाण, शांताबाई

जाधव इत्यादींसारख्या काही मराठा स्त्रिया पुढे येऊ लागलेल्या दिसतात.

मराठा समाजातील एक विधवा स्त्री, शुद्ध उच्चारात बोलते, समाजात उत्तम गायन करते, सभ्यता, मर्यादा पाळून पुरुषवर्गात मिसळण्याचे धैर्य दाखवते, जरुरीपुरते का होईना वक्तृत्व करते ह्या गोष्टी मराठा समाजाला अभिनव होत्या. जनाक्कांच्या रूपाने 'नवी स्त्री प्रतिमा' उभी झालेली दिसते.

ही प्रतिमा भावाच्या प्रभावातून घडत गेलेली दिसते. अण्णासाहेबांच्या बुद्ध, संत व सुधारक ह्या तीनही रूपांचे संस्कार जनाक्कांवर फार मोठ्या प्रमाणात झालेले दिसतात. भावात त्यांची गुरू, मार्गदर्शक, सहकारी व मित्र अशी सर्व नाती सामावलेली दिसतात.

ज्या काळात दलितांच्या सावलीचाही विटाळ मानला जात होता, त्या काळात आपल्या सुसंस्कृत मोहोल्ल्यातून उठून सरळ उपेक्षित दलितांच्या गलिच्छ वस्तीत जाऊन राहणे, त्यांच्यांत मिसळणे, त्यांच्या घरात जाऊन त्यांची गलिच्छता दूर करू पाहणे, ह्यासाठी फार मोठ्या मनोबलाची व ध्येयनिष्ठेची आवश्यकता होती. एक स्त्री असूनही जनाक्कांनी ते मनोबल दाखविले. आणि म्हणूनच अण्णासाहेबांच्या अस्पृश्योद्धाराला थोडेफार दृश्य रूप येऊ शकले. कारण स्त्रीवर्गापर्यंत पोहोचल्याखेरीज दलितांच्या जीवनातील अज्ञान, अस्वच्छता, अंधश्रद्धा या सर्वांचा, तळातला गाळ उपसला जाणे असंभव होते. अण्णासाहेबांना जनाक्कांसारखा हुशार, कष्टाळू व निर्भीड स्त्री-सहकारी लाभला म्हणूनच ते आपल्या त्या काळाच्या संदर्भात अत्यंत नवीन व बिकट असलेल्या कार्यात व समाजपरिवर्तन प्रक्रियेत काही गती निर्माण करू शकले.

जनाक्कांनी तळागाळातील मुलांची जी सेवा केली ती पाहता आणखी एक विशेष लक्षात येतो. दीनदुर्बल, लुळेपांगळे, रोगी, गलिच्छ लोकांना जवळ करून त्यांची सेवा ह्या काळातील ज्या स्त्रियांनी केलेली दिसते त्या बहुतेकांवर ख्रिस्ती धर्माचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्रभाव पडलेला दिसतो. पं. रमाबाई तर ख्रिस्ती धर्मतत्त्वाने भारलेल्याच होत्या. बाया कर्व्यांनी पण गरीब मुलांना जवळ करून त्यांची सेवा केली. त्यांच्यावरही पं. रमाबाईंच्या मिशनचा संस्कार होताच. लक्ष्मीबाई टिळकांनी पण ख्रिस्ती धर्माचा अंगीकार केल्यावर टिळकांच्या जोडीने अनाथ मुलांचे पोषण केले. इतर स्त्रियांच्या समाजसेवेत अशा प्रकारची सेवा प्राबल्याने दिसत नाही. जनाक्कांवर ख्रिश्चन धर्माचा प्रत्यक्ष प्रभाव नसताही त्यांनी अशी सेवा केलेली दिसते. ह्यामागे कदाचित महर्षींवर परदेशवास्तव्यात झालेल्या ख्रिस्ती मिशनच्या प्रभावाची प्रेरणा असू शकेल. पण तरीदेखील, भावाच्या ध्येयानुसार अशा प्रकारच्या कठीण सेवेत जनाक्का ज्या तत्परतेने व मनःपूर्वक सहभागी झालेल्या दिसतात, त्यात त्यांची पृथगात्मता जाणवते. स्वयंप्रेरणेने त्यांनी काही स्वतंत्र कार्य उभारलेले दिसत नाही. पण उपेक्षित, बहिष्कृत स्त्रीचे अस्तित्व आणि अधिकार समाजाच्या नजरेत अधोरेखित करणे, हीच जनाक्कांच्या कार्याची फलश्रुती होय. तळागाळातल्या सामान्य स्त्रीलादेखील चांगले ऐहिक व उच्च आध्यात्मिक जीवन जगायला मिळावे ह्यासाठी त्यांची धडपड चालू होती. ह्या आपल्या कार्यासाठी

कोणत्याही रूढ धर्मकल्पनांचा आधार त्यांनी आवश्यक मानलेला दिसत नाही. 'वारकरी संप्रदायाची उदात्त पातळीवरील नैतिकताच' त्यांचा धर्म होता. प्रार्थना समाजाची पण तीच प्रेरणा होती. जगण्याच्या वाटचालीत, वेगवेगळ्या वळणांवर त्यांच्या पुढे भिन्न पर्याय उपलब्ध होते. उदा. सासरा न्यायला आला तेव्हा घरी जाऊन घरसंसार करणे किंवा मिळालेली सरकारी नोकरी टिकवून आर्थिक स्वातंत्र्यात व सुस्थितीत स्वबळाने जगणे, किंवा भावाने विचारल्यावर पुनर्लग्न करून संसारसुख मिळवणे. पण जनाक्कांनी हे तीनही लोकमान्य मार्ग नाकारून, दलितोद्धाराचा मार्ग निवडला. ह्या खडतर मार्गावरून ठामपणे चालत राहण्याचे आत्मिक बळ त्यांनी जे दाखवले ते त्यांना वारकरी पंथाच्या व प्रार्थना समाजाच्या उच्चतम नैतिक व आध्यात्मिक संस्कारांतूनच लाभले होते.

प्रार्थना समाजाच्या माध्यमातून त्यांनी केलेल्या कार्यामुळे त्या रमाबाई रानडे, उमाबाई केळकर, शांताबाई मोडक, काशीबाई नवरंगे, कृष्णाबाई जव्हेरे वगैरेंच्या मालिकेत गणल्या जातात. पण जनाक्कांच्या कामाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या कार्यातून प्रार्थना समाजाचा सुधारणावाद, मानवतावाद खालच्या वर्गापर्यंत जाऊन पोहोचला. त्यांच्या ह्या संन्यस्त व सेवाभावी जीवनामुळे त्यांना 'भगिनी निवेदिता' ह्या चालीवर 'भगिनी जनाक्का' म्हणण्याचा परिपाठ पडलेला दिसतो. स्त्रीत्वाच्या हळव्या जाणिवा ओलांडून पल्याड गेलेल्या जनाक्कांना हे भगिनी विशेषण साजूनही दिसते. कारण ह्या विशेषणात स्त्रीत्व तर आहेच पण स्त्रीत्वाच्या इतर दडपणांपासून, बंधनांपासून ते मुक्त असल्यासारखे वाटते.

ह्या 'भगिनी'— भावांमुळे त्यांना समाजात पुरुषाच्या बरोबरीचे आपले स्थान गृहीत धरून सहजपणे वावरता आले. मुक्ती हा शब्द त्यांनी वापरला नाही. मुक्तीसाठी झगडलेल्या पण दिसत नाहीत. कारण 'मुक्ती' हा त्यांचा सहजभाव होता असे वाटते. स्त्री म्हणून आपली प्रतिष्ठा आपण जाणायची असते, जपायची असते. अशी त्यांची धारणा असावी असे त्यांच्या जीवन शैलीवरून वाटते. बुवाबाजीच्या संदर्भात एकदा महर्षी शिंदे म्हणाले होते, की— सर्व बायका स्वतंत्र झाल्या, आत्मरक्षणास योग्य झाल्या, धार्मिक बाबतीत स्वतः विचार करू लागल्या तर बुवाबाजी आपोआप संपुष्टात येईल. जनाक्का अशा स्त्री बनल्या होत्या असे दिसते, म्हणूनच आयुष्यात अनेक संकटांना व दुःखांना तोंड देतानाही त्या कधी बुवाबाजी, नवससायास यांच्या मागे लागलेल्या दिसत नाहीत.

जनाक्का वडील व भावाच्या धोरणांमुळे भिन्न जाती, भिन्न धर्मांच्या माणसांत वावरल्या. निराश्रित सहाय्यकारी मंडळीमुळे तळागाळातल्या माणसांशी तर प्रार्थना समाजामुळे समाजातील प्रतिष्ठित व संपन्न वर्गाशी त्यांचा निकटचा संबंध आला... कामामुळे वऱ्हाड, प. महाराष्ट्र, कर्नाटक वगैरे भागांत त्यांचे भ्रमण झाले. ह्या व्यापक जीवनानुभवामुळे त्यांचे व्यक्तिमत्व समृद्ध व आत्मविश्वास संपन्न झालेले दिसते.

त्यामुळेच वयाच्या सत्तरीला, आपल्या पूर्वायुष्याविषयी लिहिताना त्या तटस्थ राहू शकलेल्या दिसतात. महर्षी कर्व्यांनी जनाक्कांना आपल्या आश्रमात घेतले नाही म्हणून

अण्णासाहेब शिंदे आपल्या 'आठवणी'त नाराज दिसतात. पण जनाक्का मात्र आपल्या आत्मकथनात 'थोरांना पण परिस्थितीच्या मर्यादा कशा पडतात' हे समजून घेताना दिसतात. जनाक्कांच्या सासूबद्दल अण्णासाहेबांनी रागाने शेरा मारला आहे. पण जनाक्का तत्कालीन असहाय्य स्त्रीचे अगतिक पुत्रप्रेम... समजूतदार पणे रंगवताना आढळतात. इतकेच काय पण ज्या नवऱ्यामुळे त्यांचे वैवाहिक जीवन उद्‌ध्वस्त झाले त्याच्याबद्दलही राग किंवा आकस त्या व्यक्त करताना दिसत नाहीत. उलट त्याची मनःस्थिती, त्याची कुचंबणा जाणून घेऊन परिस्थितीचे विश्लेषणात्मक चित्रण त्या करतात.

धार्मिक परंपरा व रूढींविरुद्ध जाऊन जनाक्का आयुष्यात स्त्रीला नाकारलेल्या अनेक गोष्टी करताना दिसतात. तथापि, त्याबद्दल त्यांनी लिखाणातून वा भाषणांतून धर्माला आव्हान दिलेले, वा धर्मकल्पनेला विरोध केलेला दिसत नाही. एकूणच ही दोन भावंडे फुले, आंबेडकरांप्रमाणे संघर्षवादी, विग्रही वृत्तीची नव्हती असे दिसते. समन्वयवादी वृत्तीमुळे, एकदम क्रांती व बंडाची भाषा न करता, आपल्याला उचित वाटेल ते ठामपणे करत राहणे हा त्यांचा स्वभाव दिसतो. धर्माची, जातिव्यवस्थेची मूळ चौकट न मोडता माणुसकीच्या पातळीवरील अंतर्गत सुधारणा त्यांनी केल्या व समाजाने पण त्या विरोध करीत चालवून घेतलेल्या दिसतात. तथापि, ह्या वर्ग विद्रोही वृत्तीच्या अभावामुळे, दलितांसाठी एवढा त्याग व कष्ट करूनही, स्वतंत्र अस्तित्वासाठी तहानलेल्या दलित वर्गाने, आंबेडकरांसह पुढे पुढे त्यांना नाकारलेले दिसते.

दलितांत काम करू लागल्याने मराठा समाजानेही त्यांना 'महार शिंदे' म्हणत धिक्कारलेले दिसते.

तशात जनाक्कांनी काम केले, तो काळ प्रा. मंगुडकर म्हणतात तद्वत् सामाजिक कार्याच्या दृष्टीने अंधार युगाचा होता. म. फुले १८८९ मध्ये, १८९२ मध्ये लोकहितवादी, आगरकर १८९५ मध्ये व रानडे १९०० मध्ये गेलेले. अशा तऱ्हेने सामाजिक सुधारणेचे सर्व खंदे पुरस्कर्ते पडद्याआड गेलेले. राष्ट्रवादाची लाट येऊन स्वातंत्र्यलढ्याला अग्रगामी महत्त्व आल्याने इतर सामाजिक कार्ये कमी महत्त्वाची मानली जाऊ लागली होती. पुढे १९२३ मध्ये अॅनी बेझंट यांनी, पुन्हा राजकीय व सामाजिक चळवळीची सांगड घालण्याचा ठराव आणेपर्यंत हे दोन प्रवाह भिन्न राहिले.

ह्या परिस्थितीमुळे अण्णासाहेब व जनाक्कांचा असीम त्याग समाजाकडून उपेक्षित राहिलेला दिसतो. प्रार्थना समाजाचे त्यांचे कार्यपण पुढे गारठत गेलेले दिसते. कारण मूर्तिपूजा पूर्णपणे वगळणे हे हिंदू मानसिकतेला दुरापास्त होते.

एवंढच ह्या दोघा भावंडांना म्हातारपणी सामाजिक संन्यास,आर्थिक चणचण व कौटुंबिक असमाधान ह्याचे धनी व्हावे लागलेले दिसते.

जनाक्कांची अवस्था तर अण्णासाहेबांपेक्षा करुण झालेली दिसते. पुरुषासारखे खंबीरपणे कार्य करूनही स्त्री असल्याने पुरुषाला असणारी स्वाभाविक सत्ता त्यांना नव्हती.

भावाच्या ध्येयधोरणांसाठी असलेली नोकरी सोडल्यामुळे आर्थिक सत्ता गमावलेली. स्वतःचा संसार नसल्यामुळे कौटुंबिक सत्तापण नव्हती. अशी एक सत्ताशून्य अवस्था ह्या कर्तृत्ववान बाईच्या वाट्याला आलेली दिसते. शेवटची १०-१५ वर्षे निस्तेजपणात गेल्याने समाजही त्यांचे असामान्य कष्ट विसरलेला दिसतो. तशात ती एक स्त्री ! त्यामुळे त्यांच्या निधनाची नोंद सुबोध पत्रिकेतील एक छोटासा लेख वगळता कुणी वृत्तपत्रांनी फारशी घेतलेली दिसत नाही. 'प्रगतिपथावर' ह्या वेणूताई पानसेंच्या १९३४ मध्ये प्रसिद्ध झालेल्या पुस्तकात हुजुरपागेतील पुढे कर्तृत्व गाजवलेल्या विद्यार्थिनींच्या नामावलीत जनाक्कांचे नाव आढळत नाही. ज्या 'निराश्रित सहाय्यकारी मंडळी'साठी जनाक्कांनी आपले आयुष्य वेचले त्या मिशनच्या आवारात आज अनेक शाळा-कॉलेजेस उभी आहेत; त्यांत फुल्यांचे नाव आहे, आंबेडकरांचे आहे, सुदैवाने महर्षी शिंद्यांचे पण आहे. तथापि, मुलींच्या प्राथमिक शाळेला तरी जनाक्कांचे नाव द्यावे असे कुणालाच वाटलेले दिसत नाही, ह्याचा खेद होतो. मिशनच्या कचेरीत बुद्धापासून आंबेडकरांपर्यंत, म. गांधींपासून राजीव गांधींपर्यंत अनेकांचे फोटो आहेत; पण महर्षी व जनाक्का ह्यांचे कृतज्ञता म्हणून दोन साधे फोटो काही दिसत नाहीत.

निराश्रित सहाय्यकारी मंडळीच्या वारसदाराप्रमाणेच शिंद्यांविषयी आदरभाव असणाऱ्या त्यांच्या चरित्रकर्त्यांनी पण जनाक्कांच्या कार्याविषयी अनास्था दाखवलेली दिसते. श्री. रा. ना. चव्हाण म्हणतात तद्वत महर्षी शिंद्यांची अनेक चरित्रे लिहिली गेली. पण त्यात महर्षींच्या कामातील जनाबाईचा महत्त्वाचा हिस्सा उत्कटतेने दिसेल, असा मांडलेला नाही.

जनाक्कांचे 'स्त्रीत्व' ह्याला कारण असावे का ? पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत घडलेल्या भारतीय मानसिकतेने, आजवर इतिहासात स्त्रीचे कार्य व कर्तृत्व नेहमीच दुर्लक्षित केले आहे. जनाक्कांबाबत तीच उपेक्षा झालेली दिसते. समाजाने त्यांच्या कर्तृत्वाची नोंद केलेली नाही. प्रस्तुत लेखनाने ही उणीव भरून निघावी अशी अपेक्षा आहे. पुढे जेव्हा केव्हा वस्तुनिष्ठपणे इतिहासाचे पुनर्लेखन व पुनर्मूल्यमापन होईल त्या वेळी ह्या लेखनाचा निश्चित उपयोग होईल.

* *

निबंध
क्र. ३८६६
२६६२६
८/६/९२

REFBK-0026627

# स्त्रीमुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा

# स्त्रीअस्मितेचा आविष्कार : एकोणिसावे शतक

## भाग ३ - ताराबाई शिंदे , जनाक्का शिंदे

**मृणालिनी जोगळेकर**

'स्व'च्या शोधासाठी चाललेला स्त्रीचा आजचा झगडा समजून घेण्यासाठी इतिहासात शक्यतो पाठी जाऊन शोध घ्यावा लागेल. त्या काळी हे झगडे स्त्रीमुक्तीच्या नावाने ओळखले गेले नसले, तरी आजच्या स्त्रीमुक्ती चळवळींची बीजे त्यातच सापडतात. या संशोधन प्रकल्पात अशा प्रकारच्या झगड्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

हा शोध घेताना कालक्रमानुसार मालिकेचे पाच अभ्यासखंडांमध्ये विभाजन केले आहे. संतकाळ म्हणजेच साधारणपणे तेराव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंतचा काळ, नंतर पेशवेकाळ, एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्ध व उत्तरार्ध आणि विसाव्या शतकातील सुरवातीचा काळ असे या अभ्यासखंडांचे टप्पे मानता येतील. त्याचप्रमाणे विषयाची मांडणी करताना आवश्यकतेनुसार वाङ्मयविचार, व्यक्तिचित्रण, ऐतिहासिक पुराव्यांच्या आधारे केलेली चर्चा, प्रत्यक्ष मुलाखती अशा विविध माध्यमांचा केलेला वापर हे या मालिकेचे वैशिष्ट्य ठरावे.

'स्त्रीप्रश्नांची चर्चा : एकोणिसावे शतक' हे या मालिकेतले तिसरे पुस्तक एकोणिसाव्या शतकातील स्त्रीप्रश्नांचा शोध घेणारे होते. त्यानंतरच्या 'स्त्रीअस्मितेचा आविष्कार एकोणिसावे शतक' ह्या पुस्तकांत एका वेगळ्या कोनातून एकोणिसाव्या शतकाकडे पाहिले आहे. या काळातील सुधारकांच्या चळवळीच्या पार्श्वभूमीवर शिक्षणाची संधी लाभलेल्या महाराष्ट्रातील चार स्त्रियांचे जीवनदर्शन या पुस्तकात घडते. कुशाग्र बुद्धीच्या पंडिता रमाबाई, समाजसेवेचे अखंड व्रत चालवणाऱ्या रमाबाई रानडे, सडेतोड लिहिणाऱ्या ताराबाई शिंदे आणि आपल्या भावाच्या, म. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या, खांद्याला खांदा लावून झटणाऱ्या जनाक्का शिंदे या सर्वांचेच व्यक्तिगत जीवन, दृष्टिकोन वेगवेगळे होते. स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाच्या या चौघींच्या आचारविचारांचा परिचय या पुस्तकांतून होतो.

वाचकांच्या सोयीसाठी या पुस्तकाचे पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे आणि ताराबाई शिंदे – जनाक्का शिंदे असे तीन भाग पाडले असून ते तीन स्वतंत्र पुस्तकांच्या रूपात उपलब्ध आहे.

**किंमत रु. ७५ .००**

(म- ७६७)

ISBN 81 -7185 - 600 - 4

पॉप्युलर प्रकाशन

मुखपृष्ठ : बाळ ठाकूर